
डिसेंबर २०१२ । किंमत : ₹ १०

# लोकराज्य



हरित क्रांतीचे प्रणेते


# वसंतराव नाईक

ज न्म श ता ब्दी

RABHA

**वसंतवैभव**
जन्मशताब्दी वर्ष
१ जुलै २०१२ -३० जून २०१३





# तुकडोजी महाराजांचा आशीर्वाद

श्री गुरुदेव सेवाश्रम,
गुरुकुंज-आश्रम (अमरावती),
दिनांक १३-१०-६६

वसंतराव नाईक यांनी बहुजन समाजाच्या हितासाठी बहुजन समाजाशी समरस होऊन कार्य करण्यामध्ये आपले उभे आयुष्य घातले आहे. हे मी अनेक वर्ष त्यांच्या घराण्यापासून पहात आहे.

मागासलेला समाज शिक्षणाशिवाय उन्नत होणे शक्य नाही हे त्यांचे वडील अत्यंत वृद्धापकाली सुद्धा माझ्या जवळ डोळ्यांत पाणी आणून सांगताना मी पाहिले आहे. गरीब मजुरापासून ते सुशिक्षित माणसापर्यंत मित्रत्त्वाच्या नात्यांनी वागताना मी अनेकदा त्यांना पाहिले आहे.

आपल्या मुख्यमंत्री पदावरून वागताना त्यांच्या स्वभावात थोडाही फरक झालेला मला आढळलेला नाही. त्यांचे चिंतन देशाच्या नवनिर्मितीकडे व लक्ष मजदूर व गरीब शेतकरी उन्नत होतील ह्याकडेच असते. ही विदर्भाची मायभूमी अशा अनेक रत्नांना प्रसवली आहे. त्याच इतिहासाची साक्ष पटविण्यासाठी स्वर्गीय श्री.कन्नमवारांनंतर त्यांनीही लोकजनमनावर आपला वारसा उत्तम तऱ्हेने चालविला आहे.

त्याही पुढे या विशाल महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी त्यांचे जीवन देशव्यापी होवो अशी त्यांच्या गौरवपत्रिकेला माझी शुभकामना आहे.

- तुकड्यादास

(वसंतराव नाईक यांच्या ५३ व्या जन्मदिनानिमित्त काढण्यात आलेल्या गौरव ग्रंथातून साभार)

वर्ष ६४ वे | अंक ९ | डिसेंबर २०१२

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

# लोकराज्य

- मुख्य संपादक — प्रमोद त्र्यं. नलावडे
- व्यवस्थापकीय संपादक — प्रल्हाद जाधव
- संपादक — सुरेश वांदिले
- कार्यकारी संपादक — प्रभाकर मुराळकर
- उपसंपादक — किरण केंद्रे
- प्रशासन व वितरण अधिकारी — दिगंबर पालवे
- वितरण अधिकारी — विलास बोडके, दत्तात्रय कोकरे
- साहाय्य — विद्या कदम
- मुखपृष्ठ — राभा
- मांडणी, सजावट — संदीप पवार
- मुद्रण — एच. टी. मीडिया लि. दिघे, नवी मुंबई


**संपादकीय पत्ता**
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक, दालन क्र. ३३, तळ मजला, मंत्रालय, मुंबई-३२.
संपादकीय संपर्क : ०२२-२२८८२८८८

**e-mail :** lokrajya@dgipr.maharashtra.gov.in
lokrajya2011@gmail.com

ई-लोकराज्यसाठी
**Website :** http://dgipr.maharashtra.gov.in

वर्गणीदार व तक्रार निवारणासाठी संपर्क - ०२२-२२०२१५३०
वितरण संपर्क - ०२२-२२०२३५५७

**e-mail :** lokvitran@dgipr.maharashtra.gov.in
lokrajyavitaran@gmail.com






# अंतरंग


| | | |
|---|---|---|
| हरितक्रांतीचा अक्षय फुलोरा | संपादकीय | ५ |
| शेतकऱ्यांचा मुख्यमंत्री | मा. मुख्यमंत्री | ६ |
| प्रशासक नेता | सुरेश द्वादशीवार | ८ |
| कर्तृत्वाचा कळस | शरद पवार | १५ |
| वासंतिक सौंदर्य | बाबा आमटे | १७ |
| विकासाचा महानायक | मधुकर भावे | १८ |
| वसंतरावांचे ऋण | सुशीलकुमार शिंदे | २१ |
| दुर्दम्य इच्छाशक्ती | डॉ. एम. एस. स्वामीनाथन | २२ |
| आमचा प्रेरणास्त्रोत | शिवाजीराव मोघे | २४ |
| दूत पर्जन्याचा | मधु मंगेश कर्णिक | २५ |
| प्रगतिशील शेतकरी | मनोहरराव नाईक | ३० |
| आर्जवी पण खंबीर | ग. दि. माडगूळकर | ३४ |
| जीवनयात्रा | -- | ३८ |
| प्रसन्न व्यक्तिमत्त्व | राजेंद्र दर्डा | ४१ |
| आमचे मुख्यमंत्री | ग. त्र्यं. माडखोलकर | ४३ |
| जातीधर्मांच्या पल्याड... | प्रा. फौजिया खान | ४५ |
| कुटुंबवत्सल | शरद अकोलकर | ४७ |
| हायब्रिडला प्रोत्साहन | डॉ. बद्रिनारायण बारवाले | ५० |
| विनम्र राज्यकर्ता | युधिष्ठिर जोशी | ५१ |
| नव्या आत्मभानाचे प्रतीक | मोहन राठोड | ५३ |
| कृषी विद्यापीठांचे शिल्पकार | सौ. माधवी गुल्हाने | ५५ |
| पायाभरणी आणि उभारणी | किरण केंद्रे | ५६ |
| रत्नपारखी वसंतराव | न. मा. जोशी | ६० |
| आमचे राजे | हरिभाऊ राठोड | ६१ |
| शेती आणि मातीवर निस्सीम भक्ती | प्रा. दिनकर गुल्हाने | ६२ |
| आत्मविश्वास महत्त्वाचा! | वसंतराव नाईक यांचे भाषण | ६५ |
| आदर्श गाव | वसंतराव नाईक यांचे भाषण | ६७ |
| युवकांसाठी रेड रिबन | सुहेल जमादार | ६९ |
| अर्थतज्ज्ञ बाबासाहेब | डॉ. प्रदीप आगलावे | ७० |
| कामगार हिताचे सजग प्रहरी | भि. म. कौसल | ७३ |

# सप्रेम नमस्कार

**आकर्षक, महत्त्वपूर्ण, चांगला**




लोकशाही आघाडीस ३ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने 'लोकराज्य'चा नोव्हेंबर २०१२ चा 'तीन वर्षपूर्ती' विशेषांक मिळाला. माझ्या विभागासोबतच प्रत्येक विभागाच्या महत्त्वपूर्ण निर्णयाचे विश्लेषण, ठळक नोंदी व फोटोंमुळे अंक अत्यंत आकर्षक झालेला आहे. महत्त्वपूर्ण व चांगला अंक प्रकाशित केल्याबद्दल आपले मन:पूर्वक अभिनंदन!

**- अनिल देशमुख,**
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री

---

**संदर्भ अंक**

नेहमीप्रमाणे 'लोकराज्य'चा अंक हाती आला. उद्योग क्षेत्राची संपूर्ण माहिती असणारा हा अंक खरोखरच उपयुक्त आहे.



मागील ३० वर्षांच्या माझ्या पत्रकारितेत मी अनेकवेळा महाराष्ट्राच्या उद्योग क्षेत्रासंदर्भात लिखाण केले. परंतु, लोकराज्यच्या या अंकाने औद्योगिक क्षेत्रातील अनेक गोष्टी समोर आल्या. एक संदर्भ अंक म्हणून मला या अंकाचा निश्चितच फायदा होईल.

**- संजय राऊत,** खासदार (राज्यसभा)

---

**माहितीचा खजिना**




लोकराज्य मासिकाच्या वाचकांना माहितीचा खजिना सातत्याने मिळतो, लोकराज्यमधून प्रकाशित होणारी माहिती व विविध लेख, उपक्रम यांसह सरकारी योजना, निर्णय, प्रेरणा इत्यादी महत्त्वपूर्ण माहिती अतिशय प्रभावी पद्धतीने वाचकांसमोर मासिकातून मांडली जाते. यांत्रिकीकरणाच्या या युगात पारंपरिक ऊर्जास्रोत व उपकरणे याबद्दल लोकराज्यमधून जनजागृती केली जाते. ऑक्टोबर महिन्याच्या अंकामध्ये श्री. अनिल गडेकर यांचा 'हलकी - फुलकी बैलगाडी' हा लेख वाचण्यात आला. आज वातानुकूलित वाहन व आंतरराष्ट्रीय वाहनाच्या आयातीच्या युगात आधुनिक बैलगाडी अर्थात न्यू 'बी'कारच्या शृखंलेच्या जनजागृतीबद्दल आपल्या विभागाचे व श्री. अनिल गडेकर यांचे मन:पूर्वक आभार!

**- प्रा. सुदर्शन आनंदराव दहातोंडे**
लोणी

---

**उद्‌बोधक अंक**

व्यवसायाच्या निमित्ताने माझे वर्षातून ३-४ वेळा मायदेशी येणे होते. यावेळी मुंबईतील मुक्कामात मी अनेक पुस्तके व मासिके खरेदी करतो. या यादीत लोकराज्य हमखास असते. लोकराज्यमधून नेहमीच मला उद्‌बोधक माहिती मिळत आली आहे. शासन स्तरावरील अत्यंत महत्त्वाच्या घडामोडींचे आकलन होण्यास त्यामुळे मदत होते. विविध विषयांची सांगोपांग माहिती हे लोकराज्यचे वैशिष्ट्य आहे. आपले संपादकीय खूप छान असते. केवळ एका पानाच्या मर्यादेत योग्य वाक्यरचना अन् चपखल शब्द वापरून आपण चांगले उद्‌बोधन करीत असता. सप्टेंबरच्या अंकातील कै. विलासराव देशमुख यांच्यावरील लेख खूप भावला.

**- विजय ढवळे,** ओट्टावा, कॅनडा

---

**बहुपयोगी**

लोकराज्यच्या अंकात समाजातील विविध क्षेत्रांतील घडामोडींचे यथार्थ चित्रण केलेले असून शासकीय धोरणे, निर्णय यांची उपयुक्त माहिती देण्यात आलेली आहे. त्यामुळे हा अंक बहुपयोगी आणि संग्राह्य आहे, असे माझे प्रामाणिक मत आहे. लोकराज्यचे अंक नियमितपणे वाचण्यास मला नक्कीच आनंद वाटेल.

**- आशुतोष घोरपडे,** संचालक, सांस्कृतिक कार्य

---


'लोकराज्य'मधील लेखांचे पुनर्मुद्रण केल्यास आम्हाला आनंदच होईल...

वार्षिक वर्गणी – वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, बॅरेक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई-४०००२१ या पत्त्यावर मनीऑर्डरने पाठवावी किंवा 'लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई' यांच्या नावे मुंबई येथे वटणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा. लोकराज्य अंकाच्या वर्गणीदारांनी नूतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठवताना आपला वर्गणी क्रमांक कळवावा. (प्रति अंक मूल्य १० रुपये, वार्षिक वर्गणी रु. १००/-)

*या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.

लोकराज्यची वर्गणी ऑनलाईन भरण्यासाठी

http://dgipr.maharashtra.gov.in



# हरितक्रांतीचा अक्षय फुलोरा

**पा**हता पाहता २०१२ संपत आले. हे वर्ष महाराष्ट्राच्या दृष्टीने अनेक महत्त्वपूर्ण घटना-घडामोडींचे ठरले. डिसेंबरचा महिना तर विविध कार्यक्रमांनी आणि उपक्रमांनी गजबजलेला असतो.

कोट्यवधी उपेक्षित जनतेला जगण्याची नवी उमेद आणि आत्मविश्वास देणाऱ्या प्रज्ञासूर्य भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण ६ डिसेंबर १९५६ ला झाले. या महामानवाला अभिवादन करण्यासाठी बौद्धबांधव महापरिनिर्वाणदिनी मुंबईला चैत्यभूमीवर जमत असतात. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मरण आपणा सर्वांना प्रेरणादायी ठरते. देशाच्या संरक्षणासाठी हौतात्म्य पत्करलेल्या जवानांचे स्मरण करण्यासाठी ७ डिसेंबरला देशभर ध्वजदिन साजरा केला जातो. जवानांच्या विविध कल्याणकारी योजनांसाठी ध्वजनिधी संकलित केला जातो. मातृभूमीच्या रक्षणासाठी प्राणाची बाजी लावणाऱ्या जवानांसाठी अर्थसाहाय्य करण्याची संधी देशातील प्रत्येक नागरिकाला ध्वजदिनाच्या निमित्ताने मिळते. २० डिसेंबर हा गाडगे महाराज यांचा स्मृतीदिन. लोकसेवा, स्वच्छता आणि अंधश्रद्धा निर्मूलनाला आयुष्य वाहून दिलेल्या या संताचे स्मरण करण्याची संधी देणारा हा दिवस होय. २४ डिसेंबर १९८६ रोजी ग्राहक संरक्षण कायदा संमत करण्यात आल्याने दरवर्षी २४ डिसेंबर रोजी राष्ट्रीय ग्राहक हक्क दिन साजरा होतो. ग्राहकांच्या हक्काबाबत जागृतीच्या दृष्टीने हा दिवस अतिशय महत्त्वाचा आहे. जगाला शांती, प्रेम, वात्सल्य यांची शिकवण देणाऱ्या प्रभू येशू यांचा जन्मदिवस २५ डिसेंबर रोजी उत्साहात व आनंदात साजरा होतो. याच महिन्यात नागपूर येथे महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिवेशन होत असते.

हरितक्रांतीचे प्रणेते आणि सलग ११ वर्षे महाराष्ट्राचे मुख्यमंत्रिपद भूषविलेले स्व. वसंतराव नाईक यांची जन्मशताब्दी याच वर्षात येत असून त्यानिमित्त 'लोकराज्य'चा डिसेंबरचा अंक 'वसंतराव नाईक जन्मशताब्दी विशेषांक' म्हणून आपल्यासमोर सादर करताना मला विशेष आनंद होत आहे.

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांची जन्मशताब्दीही याच वर्षात यावी, हा एक योगायोग म्हणावा लागेल. यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री. त्यांनी आधुनिक महाराष्ट्राची पायाभरणी केली. भविष्यातील महाराष्ट्र कसा असावा, याची स्वप्ने त्यांनी पाहिली तर त्यांच्या बहुतांशी स्वप्नांची पूर्तता वसंतराव नाईक यांनी केली.

ग्रामीण भागातील बंजारा समाजात जन्मलेले वसंतरावजी स्वकर्तृत्वाने राजकारण आणि समाजकारण यात तळपू लागले. बुद्धिमत्ता, संघटन कौशल्य, दूरदृष्टी, अखंड परिश्रम, सर्वसामान्य, उपेक्षित व शेतकऱ्यांबद्दलची कळकळ हे त्यांचे गुण त्यांना झपाट्याने यशोशिखरावर घेऊन गेले.

वसंतरावांचे राजकारण संयमी होते. विरोधकांचा ते सन्मान करत. ते उत्तम प्रशासक होते. बदलत्या जगाचे त्यांचे भान उच्चकोटीचे होते. ग्रामीण भागाकडे त्यांनी जसे लक्ष दिले तसेच नागरी भागांकडेही दिले. मुंबईतील रिक्लेमेशन त्यांच्या काळात झाले. आधुनिक मुंबईच्या विकास प्रक्रियेतील हा महत्त्वाचा टप्पा होय. नवी मुंबई, सिडको-औरंगाबाद याचे श्रेयही त्यांच्याकडेच जाते. महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाचा पाया राज्याच्या सर्व भागांत त्यांच्याच काळात विस्तारला.

वसंतराव नाईक यांची खरी ओळख ही महाराष्ट्राच्या हरितक्रांतीचे जनक अशी आहे. राजकारणात सर्वोच्च पदावर पोहचूनही ते मनाने शेतकरीच होते. १९७२ चा भीषण दुष्काळ म्हणजे त्यांच्यातील संवेदनशील व्यक्तीसाठी मोठे आव्हान होते. राज्य अन्नधान्याच्या बाबतीत समृद्ध करण्याचा विडा त्यांनी उचलला. त्यांच्या कार्यकाळात चार कृषी विद्यापीठांची स्थापना करण्यात आली हे देशातील एकमेव उदाहरण असावे. कृषी विद्यापीठांमध्ये शेतीपूरक नव्या वाणांच्या संशोधनाला चालना, तंत्रज्ञानाचा विकास या बाबींवर त्यांनी व्यक्तिगत लक्ष पुरवले. कृषी संशोधन शेतकऱ्यांच्या शिवारापर्यंत पोहचवले. गहुली येथील स्वतःच्या शेतीवर अनेक प्रयोग करून शेतकऱ्यांपुढे 'आधी केले मग सांगितले' असा आदर्श ठेवला. या प्रयत्नांमुळेच महाराष्ट्रातील अन्नधान्याची टंचाई बऱ्याच प्रमाणात कमी झाली. वसंतरावांच्या कार्यकाळात समर्थ, एकसंध, सामाजिकदृष्ट्या पुरोगामी, औद्योगिकदृष्ट्या प्रगत आणि आर्थिकदृष्ट्या संपन्न महाराष्ट्राची उभारणी झाली.

वरील सर्व बाबींचा विस्तृत ऊहापोह या विशेषांकात करण्यात आला आहे. या अंकात महाराष्ट्रातील ज्येष्ठ राजकीय नेते, ज्येष्ठ पत्रकार, संपादक आणि साहित्यिकांनी वसंतरावांच्या जीवनकार्यावर लिहिलेल्या लेखांचा समावेश करण्यात आला आहे.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने दोन खास लेखही आम्ही या अंकात प्रकाशित केले आहेत. ते वाचकांना निश्चित आवडतील.

लोकराज्यच्या इतर विशेषांकाप्रमाणेच या अंकाचे देखील वाचक स्वागत करतील, अशी आशा आहे.

**प्रमोद त्र्यं. नलावडे**
मुख्य संपादक तथा महासंचालक
(माहिती व जनसंपर्क महासंचालनालय)
संपर्क : ०२२-२२०४१५८५/२२०२७९५६
dg@dgipr.maharashtra.gov.in

# शेतकऱ्यांचा मुख्यमंत्री



सर्वाधिक काळ महाराष्ट्राचे मुख्यमंत्रिपद भूषविणारे मुख्यमंत्री असा स्व. वसंतराव नाईक यांच्या कारकिर्दीचा गौरवाने उल्लेख केला जातो. त्यांच्या कारकिर्दीत घडलेल्या धवलक्रांती आणि हरितक्रांतीने राज्यातील शेतकरी आणि शेतीशी संबंधितांचे अवघे जीवनच बदलले. त्यांनी शेतीक्षेत्रात घडविलेल्या बदलांची फळे आपण आजही चाखत आहोत. आधुनिक राहणीमुळे प्रसिद्ध असलेले स्व. नाईक त्यांच्या ऐतिहासिक निर्णयांसाठीही कायमचे स्मरणात राहतील.... सांगत आहेत, **मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण.**

बंद गळ्याचा कोट, तोंडात चिरूट, चमकदार सोनेरी चष्मा, शिकारीची आवड अशा प्रकारचे बाहेरून आधुनिक वाटणाऱ्या माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांचे व्यक्तिमत्व विचाराने आणि कृतीने मात्र पूर्णत: मराठमोळे होते. शेती आणि शेतकरी, ग्रामीण भागातील महत्त्वाचे प्रश्न हा त्यांचा सततच्या चिंतनाचा आणि जिव्हाळ्याचा विषय होता. नागपूरच्या मॉरिस महाविद्यालयातून पदवी प्राप्त केल्यानंतर त्यांनी कायद्याचीही पदवी मिळविली. बंजारा समाजातील पहिले वकील असा त्यांचा लौकिक होता. डॉ. पंजाबराव देशमुख यांच्यासारख्या नामवंत कायदेपंडिताच्या हाताखाली त्यांनी वकिली सुरू केली. मात्र केवळ वकिलीत अडकून न राहता त्यांनी स्वत:च्या बंजारा समाजामध्ये सुधारणा करण्यासाठी एक मोठी सामाजिक चळवळ उभी केली. इथूनच त्यांच्या सामाजिक आणि राजकीय प्रवासाला सुरवात झाली. यानंतर पुसद नगरपालिकेचे अध्यक्ष, आमदार, उपमंत्री, मंत्री आणि त्यानंतर मुख्यमंत्री अशी त्यांची कारकीर्द उत्तरोत्तर वृद्धींगत होत गेली. ग्रामीण भागातील हा नेता महाराष्ट्रात सर्वाधिक काळ मुख्यमंत्री पदावर राहिला, याचे श्रेय त्यांचा प्रामाणिकपणा, लोकप्रियता आणि कामावरील निष्ठा यालाच द्यावे लागेल.

नागपूरच्या नील सिटी हायस्कूलमधून वसंतरावांनी मॅट्रीक उत्तीर्ण केले. याच काळात त्यांना वाचनाची आवड निर्माण झाली. त्यांनी हरीभाऊ आपटे आणि नाथमाधव अशा कादंबरीकारांच्या साहित्यकृतींचे वाचन केले. या दोन साहित्यकारांसोबतच महात्मा फुले, साने



गुरूजी यांच्या विचार आणि साहित्याचा पगडा वसंतरावांवर होता. अस्पृश्यता निवारण, स्त्री-शिक्षण, समाजजागृती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सामाजिक लढा त्याचबरोबर महात्मा फुले, डॉ. आंबेडकर आणि डेल कार्नेजी यांच्या आचार-विचार आणि कार्याचा त्यांच्यावर प्रभाव पडला. यामुळे त्यांच्या मनात सामाजिक कार्याची प्रेरणा रूजली.

एकीकडे सामाजिक, राजकीय कार्य तर दुसरीकडे शेती आणि शेतकरी हे त्यांच्या केवळ जिव्हाळ्याचे नव्हे तर अभ्यासाचेही विषय होते. शेतीच्या जिज्ञासेपोटी त्यांनी तालुक्यातील शेतीत अनेक सुधारणा घडवून आणल्या. महाराष्ट्राच्या आर्थिक, कृषी, औद्योगिक, सामाजिक तसंच राजकीय क्षेत्रावर स्वत:चा असा ठसा उमटविणारा हा नेता या राज्याचा सर्वात जास्त काळ मुख्यमंत्री होता हे नमूद करणं मला फार आवश्यक वाटते. खंड न पडता मुख्यमंत्री पदावर ११ वर्षांपेक्षा अधिक काळ मान त्यांच्या लोकप्रियतेमुळेच मिळू शकला.

वसंतरावांनी आपल्या प्रदीर्घ कारकिर्दीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. या ठाम निर्णयांतूनच राज्याला विकासाची भक्कम दिशा देण्याची भूमिका त्यांनी पार पाडली. त्यांनी शेती आणि शेतकऱ्यांचे प्रश्न, समस्या यांना सर्वाधिक प्राधान्य दिले. राज्यात मोठ्या प्रमाणात घेतल्या जाणाऱ्या कापूस, ज्वारी, भात या पिकांची खरेदी एकाधिकार पद्धतीने खरेदी करण्याचा निर्णय





येतला आणि त्याची अंमलबजावणीही केली. दुधाबाबत परावलंबी असलेल्या राज्याला त्यांनी दूध उत्पादनात अग्रेसर केले. संकरित गायी खरेदी करून दुग्ध उत्पादन वाढविण्यासाठी शेतकऱ्यांना बँकांच्या माध्यमातून कर्जपुरवठा करण्याची व्यवस्था केली. त्यामुळे हरितक्रांतीप्रमाणेच धवलक्रांतीचे श्रेयही वसंतरावांनाच द्यावे लागेल.

आज देशभरात राबविली जाणारी आणि गोरगरिबांच्या, गरजूंच्या हाताला निश्चितपणे काम देणारी आणि लोकप्रिय ठरलेली रोजगार हमी योजना वसंतरावांच्याच कार्यकाळात सुरू झाली. त्यांच्या काळात या योजनेतून असंख्य विहिरी, तलाव खोदले गेले. गावागावात पोहचणारे रस्ते निर्माण झाले. या 'ग्रास रूट'च्या योजना राबविताना पारंपरिक शेतीला आधुनिकतेची जोड मिळावी, कृषी उत्पादनाच्या बाबतीत प्रगत राष्ट्रांशी स्पर्धा करण्यासाठी शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान आणि पीक पद्धतीची माहिती मिळावी, यासाठी राज्यात चार कृषी विद्यापीठांची स्थापना केली, हे केवळ वसंतरावांच्या कृषीविषयक ध्येयधोरणांमुळेच घडू शकले.

मराठवाड्यामधील पैठण येथे राज्यातील पहिले खुले कारागृह सुरू करणाऱ्या वसंतरावांची दृष्टी किती आधुनिक होती, हे दिसून येते. मटका, जुगार आदी प्रकारांना आळा बसावा, यासाठी त्यांनी राज्य शासनाची लॉटरी सुरू केली. वसंतरावांनी १४ फेब्रुवारी १९६४ रोजीच मराठी ही राज्याची राज्यभाषा राहील, असा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. त्यानंतर १९६५ मध्ये 'पुढच्या दोन वर्षात महाराष्ट्र अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला नाही तर मला फाशी द्या', असे त्यांनी जाहीररित्या सांगितले. त्यांच्या या वाक्याप्रमाणे त्यांनी बरोबर दोन वर्षांत राज्याला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण करून दाखविले. अशी ही प्रातिनिधिक उदाहरणे असली तरी राज्याच्या एकूण प्रगतीच्या दृष्टीनं त्यांची कामगिरी खूपच महत्त्वाची आहे.

आपल्या प्रदीर्घ कारकिर्दीत त्यांनी राज्याचा चेहरामोहराच बदलवून टाकला. शेती, महसूल, राज्यभाषा, दारूविक्री, सरकारी यंत्रणेला कार्यप्रवण करणे यासोबतच अवर्षण-दुष्काळ या नैसर्गिक आपत्तींवर मात करण्यासाठी त्यांनी कठोर परिश्रम केले. मुख्यमंत्री म्हणून वसंतरावांनी जी छाप सोडली, तिच छाप त्यांनी संसदेत खासदार म्हणूनही सोडली. अत्यंत सौजन्यशील, नम्र, सुसंस्कृत, शांत स्वभावाचा हसतमुख नेता म्हणून त्यांचा लौकिक होता. त्यांच्या याच गुणांवर त्यांनी इंदिरा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री या ज्येष्ठ नेत्यांबरोबरचे उत्तम संबंध निर्माण झाले होते. आधुनिक पेहराव आणि राहणीमान असलेला, पण खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांचा कैवारी असलेला असा हा नेता होता. त्यांनी आखून दिलेल्या मार्गावरुनच महाराष्ट्राची मार्गक्रमणा सुरू आहे.

(शब्दांकन : सतिश लळीत )


## जन्मशताब्दी समिती

**१ जुलै, २०१२ ते ३० जून, २०१३ या कालावधीत माजी मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतराव नाईक यांचे जन्मशताब्दी वर्ष साजरे करण्यात येणार आहे. या जन्मशताब्दी वर्षात प्रस्तावित कार्यक्रमाची रूपरेषा ठरविण्यासाठी खालील मान्यवरांची समिती स्थापन करण्यात आली आहे.**

१) मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण - अध्यक्ष, २) सार्वजनिक बांधकाम मंत्री, श्री. छगन भुजबळ- सदस्य, ३) गृह मंत्री, श्री.आर.आर. पाटील- सदस्य, ४) वन मंत्री श्री. पतंगराव कदम-सदस्य, ५) सामाजिक न्याय, विमुक्त/भटक्या जमाती मंत्री,



श्री. शिवाजीराव मोघे- सदस्य ६) महसूल मंत्री, श्री. बाळासाहेब थोरात-सदस्य , ७) ग्राहक संरक्षण आणि अन्न व नागरी पुरवठा मंत्री, श्री. अनिल देशमुख- सदस्य, ८) अन्न व औषधे प्रशासन मंत्री श्री. मनोहरराव राजूसिंग नाईक-सदस्य, ९) रोजगार हमी योजना, जलसंधारण मंत्री, डॉ. नितीन काशिनाथ राऊत-सदस्य, १०) सामान्य प्रशासन विभाग राज्यमंत्री प्रा.फौजिया खान- सदस्य, ११) आ. श्री. माणिकराव ठाकरे- सदस्य, १२) आ. श्री. संदीप बजोरीया- सदस्य, १३) आ. श्री.निलेश शिवराम देशमुख पारवेकर- सदस्य, १४) श्री. शांताराम पोटदुखे- अशासकीय सदस्य, १५) श्री. हरिभाऊ राठोड- अशासकीय सदस्य, १६), श्री. गिरीश गांधी, अशासकीय सदस्य, १७) श्री. एस. पी. उपासनी - अशासकीय सदस्य, १८) सचिव, प्रशासकीय सुधारणा व रचना व कार्यपद्धती, सामान्य प्रशासन विभाग- सदस्य सचिव.



वसंतराव नाईक यांनी ११ वर्षे महाराष्ट्राची धुरा अत्यंत यशस्वीपणे सांभाळून राज्याची कीर्ती दिगंत नेली. महाराष्ट्राचा नावलौकिक वृद्धिंगत केला. ते धुरंधर राजकारणी, कृतीशील शेतकरी आणि उत्तम प्रशासक होते. त्यांच्या काळात महाराष्ट्राला विविध क्षेत्रांत स्थैर्य लाभले. विभागीय समतोल उत्तमरितीने साधला गेला.

# प्रशासक नेता

सुरेश द्वादशीवार

यशवंतरावांच्या पश्चात कन्नमवारांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्रिपद स्वीकारणे हा तेव्हाच्या प्रस्थापित परंपरेचा भाग असला तरी कन्नमवारांपाठोपाठ वसंतराव नाईकांनी त्या पदावर येणे हा परंपरेचा वा साध्या योगायोगाचा प्रकार नव्हता. आरंभी राजकीय वाटलेली पण पुढे यशस्वी झालेली ती यशवंतरावांची योजना होती. १९६२ च्या भारत-चीन युद्धानंतर पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांनी यशवंतरावांना देशाचे संरक्षणमंत्रिपद देऊ केले. त्यावेळी दादासाहेब कन्नमवार हे राज्याच्या उपमुख्यमंत्रिपदावर होते. विदर्भ राज्याची मागणी मागे टाकून आपल्या पन्नासावर आमदार-सहकाऱ्यांसह विदर्भाचे महाराष्ट्रात विलिनीकरण करायला ते तयार झाले होते. शिवाय ते एक ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक होते. त्यांच्यानंतर राज्याचे मुख्यमंत्रिपद चालून यायला वसंतरावांच्याजवळ यातले काहीएक नव्हते.

१९५६ मध्ये स्थापन झालेल्या द्विभाषिक मुंबई राज्याच्या यशवंतराव मंत्रिमंडळात त्यांनी कृषी, सहकार व महसूल मंत्री म्हणून काम केले होते. त्यांच्या मागे स्वातंत्र्यसंग्रामाचे लखलखीत वलय नव्हते. अनुयायी म्हणविणाऱ्या लोकप्रतिनिधींचा वर्ग नव्हता. राज्यातील कोणतीही मोठी जात संघटित स्वरूपात त्यांच्यासोबत नव्हती. ते ज्या बंजारा समाजातून आले होते तो भटक्या व विमुक्तांचा वर्ग संख्येने लहान, अशिक्षित व मागासलेला म्हणून ओळखला जाणारा होता. अशा वर्गातून आलेले एक यशस्वी वकील, स्वच्छ चारित्र्याचे, हसतमुख लोकप्रतिनिधी आणि प्रशासनावर आपल्या कर्तृत्वाची छाप उमटविणारे मंत्री एवढीच त्यांची ओळख होती. यशवंतरावांसारखे ते लोकनेते नव्हते आणि कन्नमवारांसारखी लोकप्रियता त्यांच्याजवळ नव्हती... तरीही त्यांना राज्याच्या मुख्यमंत्रिपदावर आणणे हा यशवंतरावांच्या राजकीय दूरदृष्टीचा व चाणाक्ष नेतृत्वाचा निर्णय होता.

यशवंतरावांनंतर राज्याच्या मुख्यमंत्रिपदावर यायला प. महाराष्ट्रातील मराठा नेत्यांचा एक वर्ग तेव्हाही सज्ज होता. बाळासाहेब देसाई हे त्यात अग्रेसर होते. यशवंतरावांसारखेच सातारा जिल्ह्यातून आलेले बाळासाहेब त्यांच्याहून वयाने वडील होते. राजकारणातील ज्येष्ठता, स्वातंत्र्यलढ्यातील सहभाग आणि सोबत असलेली मराठा समाजाची संघटित ताकद या बळावर राज्याचे मुख्यमंत्रिपद आपल्याकडे येईल ही त्यांची समजूत योग्य म्हणावी अशीही होती. (संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेच्यावेळी 'हे मराठी राज्य की मराठा राज्य' असा अग्रलेख लिहून ग.त्र्यं. माडखोलकरांनी या राज्यावरील मराठा वर्चस्वाची जाणीव तेव्हा साऱ्यांना करूनही दिली होती.) तसे बाळासाहेब तेव्हा व नंतरही मुख्यमंत्र्याच्या थाटात असत व तसेच बोलत.

वसंतराव नाईक या मराठी व मराठा राजकारणाला तोवर बऱ्यापैकी अपरिचित



असलेल्या नेत्याची महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदी या पार्श्वभूमीवर झालेली निवड हीच त्यांच्यासमोर असणारी राजकीय व प्रादेशिक आव्हाने स्पष्ट करणारी बाब होती. त्यांच्या पदोन्नतीमुळे खट्टू व रुष्ट झालेले मराठा नेतृत्व आपलेसे करणे आणि स्वतःचे वैदर्भी व मागासवर्गीय असणे महाराष्ट्राच्या गळी गोड करून उतरविणे हा त्यांच्यासमोरचा प्राथमिक प्रश्न होता. कन्नमवारांपाठोपाठ विदर्भातून आलेल्या नाईकांना मुख्यमंत्रिपद देण्याचा यशवंतरावांचा निर्णय मराठा समाजाचा रोष त्यांच्यावर ओढवणाराही होताच. यशवंतरावांना स्वजातीय नेत्यांचा भरवसा नाही आणि आपल्यामागे ती माणसे आपले राजकारण चालवतील असा विश्वास त्यांना वाटत नाही अशी टीका त्या काळात त्यांच्यावर झाली हेही येथे लक्षात घ्यायचे. मात्र, तेव्हाची काँग्रेस संघटना आजच्याहून अधिक सधन व नेतृत्वनिष्ठ असल्याने आणि तीत यशवंतरावांचा शब्द बऱ्याच अंशी प्रमाण असल्याने वसंतरावांना या अडचणींवर मात करणे जसे शक्य झाले तसा त्यांच्या त्या महाराष्ट्रविजयात त्यांच्या स्वभावातील खुल्या वृत्तीचा, आर्जवी व मृदू वागणुकीचा आणि हसतमुखाने कोणालाही आपलेसे करून घेण्याच्या हातोटीचाही वाटा मोठा होता. लोकनायक बापूजी अण्यांपासून यशवंतरावांपर्यंतच्या सगळ्या थोरामोठ्यांनी वसंतरावांचे शालीन व सुसंस्कृतपण यांचा गौरव करताना त्यांना 'अवघड स्थितीतही आपले सत्प्रवृत्त मन जपणारा नेता' असे म्हटले आहे. त्यांचा गौरव करताना अत्रे आणि मृणाल गोरे यासारख्या विरोधकांनीही हातचे फारसे राखलेले कधी दिसले नाही. जुन्या मध्यप्रांत व वऱ्हाडच्या विधिमंडळातील लोकप्रतिनिधी व उपमंत्री या नात्याने प्रशासनाशी त्यांची असलेली ओळख जुनी व पक्की होती; शिवाय ते कामालाही वाघ होते. तब्बल ११ वर्षे वसंतराव महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदावर होते आणि तो सारा काळ आजच्या भाषेत २४ x ७ असे काम करीतच त्यांनी घालविला.

वसंतरावांकडे राज्याचे मुख्यमंत्रिपद सोपविण्यामागे तोवर विझलेली वेगळ्या विदर्भ राज्याची चळवळ हेही एक कारण अर्थातच होते. लोकनायक बापूजी अणे, जांबुवंतराव धोटे आणि त्र्यं.गो. देशमुख हे त्या चळवळीचे तीन प्रमुख नेते यवतमाळ या वसंतरावांच्या जिल्ह्यातून आले असणे ही बाबही त्या निवडीला कारण ठरणारी होती. राज्य पुनर्रचना आयोगाने मान्य केलेली विदर्भ राज्याची मागणी त्या प्रदेशाला विसरायला लावण्याचे एक गणितही त्या निवडीमागे होते. वसंतरावांच्या मागे राजकीय कार्यकर्त्यांचा कोणताही गट व वर्ग नसल्याने त्यांचे मुख्यमंत्रिपद आपल्याला डोईजड होणार नाही असाही पश्चिम महाराष्ट्रातील कर्त्या नेत्यांचा एक कयास असावा... वसंतरावांचे मुख्यमंत्रिपद या सगळ्या कसोट्यांवर उतरले. एक गोष्ट मात्र खरी, आपल्याकडून असलेल्या महाराष्ट्राच्या वजनदार नेत्यांच्या अपेक्षा जपताना वसंतरावांनी स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचे वेगळेपण आणि त्याची स्वतंत्र छाप याही गोष्टी कायम राखल्या. कोणत्याही महत्त्वाच्या निर्णयासाठी ते यशवंतरावांच्या किंवा दिल्लीकरांच्या संमतीसाठी थांबले आहेत असे त्यांच्या कारकीर्दित कधी दिसले नाही. तोंडातला पाईप जेवढ्या सहजपणे शिलगवावा तेवढ्या सहजपणे ते त्यांच्यापुढचे जटिल प्रश्न सोडविताना राज्याला दिसले. त्या प्रश्नांच्या ओझ्यांनी ते वाकल्याचे वा त्यांच्या अवघडपणामुळे त्यांची स्वच्छ दृष्टी झाकोळल्याचे कधी दिसले नाही.

या काळात महाराष्ट्रावर अनेक मोठी संकटे आली. कोयनेचा भूकंप व सत्तरच्या दशकातील अभूतपूर्व दुष्काळासारखी काही नैसर्गिक तर काही मानवनिर्मित. या काळात वसंतरावांनी राज्याला जे धीरोदात्त नेतृत्व दिले आणि राजकीय व प्रशासकीय व्यवहारच नव्हे, तर जनतेचे मनही आपण जाणतो याची जी ओळख महाराष्ट्राला पटविली ती जनमानसातील त्यांच्याविषयीचा आदर व विश्वास उंचावणारी होती... कोयनेच्या भूकंपाआधी राज्याच्या राजकारणातही एक भूकंप झाला होता. बाळासाहेब देसाई यांनी आपल्या गृहमंत्रिपदाचा राजीनामा देऊन पाटणचा रस्ता धरला होता. मुंबईतील गिरणी कामगारांच्या एका मोर्चाने हिंसक वळण घेतले तेव्हा त्याच्या बंदोबस्तासाठी गोळीबाराचा आदेश द्यायला बाळासाहेबांनी नकार दिला होता. त्यामुळे संतापलेल्या मुंबई काँग्रेसने त्यांच्याविषयीची नापसंती दर्शविणारा ठराव केला तर होमी तल्यारखान आणि कैलास या मंत्र्यांनी त्याचसाठी त्यांचे राजीनामे मुख्यमंत्री वसंतराव नाईकांकडे सोपविले. त्या प्रकारात तडजोड करण्यासाठी वसंतरावांनी स.का. पाटील या तेव्हाच्या मुंबईच्या वजनदार नेत्याची मध्यस्थी वापरली व त्या दोन मंत्र्यांना त्यांचे राजीनामे मागे घ्यायला लावले. दुसरीकडे बाळासाहेबांचे मन वळवून



आचार्य विनोबा भावे यांच्यासोबत वसंतराव.

त्यांना गृहखात्याऐवजी महसूल खाते घ्यायला राजी केले. हा सारा खटाटोप त्यांना नसलेल्या राजकीय अनुभवाची परीक्षा घेणारा आणि तीत पास करणारा होता... बाळासाहेबांना देऊ केलेले आणि त्यांना आरंभी न आवडलेले महसूल मंत्रिपद दुसऱ्या अर्थाने मात्र कमालीचे उपयोगाचे ठरले. ते पाटणमध्ये असतानाच कोयनेचा भीषण भूकंप झाला. महसूलमंत्री म्हणून वाट्याला आलेले सगळे अधिकार वापरून बाळासाहेबांनी भूकंपग्रस्तांसाठी जे काम केले ते अलौकिक म्हणावे असे होते. साऱ्या जगातून भूकंपपीडितांसाठी त्यांनी मदत आणली आणि त्यात घरे गमवावी लागलेल्या लोकांसाठी सत्तर हजार घरे बांधूनच ते मुंबईत परत आले. त्या संबंध काळात वसंतराव बाळासाहेबांच्या पाठीशी पहाडासारखे उभे राहिले व त्यांच्या सगळ्या कामात त्यांना पडेल ती मदत करायला सदैव सज्जही राहिले.

सेनापती बापटांनी त्याच काळात मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानासमोर सीमाप्रश्नावर आपले बेमुदत उपोषण मांडले. सेनापतींना सारा महाराष्ट्र भीष्माचार्य म्हणून शिरावर घेणारा होता. स्वाभाविकच सारे राजकारण त्यांच्या उपोषणाने ढवळून निघाले. सेनापतींचा निग्रह आणि राज्य सरकारचा नाइलाज यातून मार्ग कसा निघतो या चिंतेने साऱ्यांना ग्रासले असतानाच वसंतरावांनी सेनापतींची त्यांच्या उपोषणात मंडपात जाऊनच भेट घेतली. ते ज्या प्रश्नासाठी लढत आहेत त्यासाठी केंद्राकडे स्वतः मध्यस्थी करण्याची त्यांनी तयारी दाखविली. वसंतरावांच्या आर्जवातील प्रामाणिकपणाने सेनापतीच विरघळले. त्यांनी उपोषण तर सोडलेच आणि तेवढ्यावर न थांबता मुख्यमंत्र्यांच्या निमंत्रणाचा स्वीकार करून त्यांचे एक दिवसाचे आतिथ्यही 'वर्षा'वर जाऊन त्यांनी अनुभवले... आचार्य अत्रे ही त्याही काळात महाराष्ट्र सरकारला भेडसावणारी प्रतिभाशक्ती होती. सरकारवर घणाघाती प्रहार करण्याचे त्यांचे काम तेव्हाही सुरू होते. त्यांच्या वारांची धार कमी करायला वसंतरावांनी त्यांना आपल्याकडे जेवायला यायचे आमंत्रण दिले. जेवणातले आचार्यांसमोरचे ताट आणि वाटी वेगळी व चांदीची होती. आचार्यांनी त्याचे कारण विचारले तेव्हा 'हे ताट वत्सलाबाईंनी त्यांच्या भावासाठी घेतले होते' असा खुलासा वसंतरावांनी केला. वत्सलाबाईंचे भाऊ तेव्हा दिवंगत झाले होते. वत्सलाबाईंनी आपल्या भावाच्या जागी आपली स्थापना केल्याचा गहिवर मग आचार्यांनाच आवरता आला नाही.

१९७१ च्या सुमारास महाराष्ट्रात जीवघेणा दुष्काळ पडला. ग्रामीण भागातील कष्टकऱ्यांएवढीच घरंदाज माणसेही रस्त्यावर आलेली तेव्हा दिसली. त्या संकटात न डगमगता सगळ्या पक्षांना सोबत घेऊन वसंतरावांनी रोजगार हमी योजनेची महत्त्वाकांक्षी मुहूर्तमेढ महाराष्ट्रात रोवली. लाखोंना रोजगार मिळवून दिला आणि कोट्यवधींना जगण्याचे बळ प्राप्त करून दिले. रोजगार हमी ही त्यांची योजना नंतर साऱ्या देशाने स्वीकारली. आताची महात्मा गांधी रोजगार हमी योजना (नरेगा) ही तिचीच विस्तारित व राष्ट्रीय आवृत्ती आहे.

मृणाल गोऱ्यांच्या नेतृत्वात त्याच काळात निघालेल्या एका लाटणे मोर्चाने मुख्यमंत्र्यांची गाडी रस्त्यात अडविली. त्यातली एक मोर्चेकरीण त्या गाडीच्या बॉनेटवर चढून बसली व तिने त्या गाडीवरील तिरंगी झेंड्याचा स्तंभच त्या झेंड्यासह उपटून हातात घेतला. आपल्या कार्यकर्तीने केलेली चूक मृणालताईंनी नंतर दुरुस्त केली. तो झेंडा त्याच्या स्तंभासह घेऊनच त्या मुख्यमंत्र्यांना त्यांच्या दालनात भेटायला गेल्या. त्यांच्याच शब्दांत सांगायचे तर, त्यांनी हातात दिलेला राष्ट्रध्वज वसंतरावांनी ज्या अदबीने स्वीकारला ती त्यांच्या विनम्रतेएवढीच त्यांच्या मनातील राष्ट्रभक्तीची खूणगाठ पटवून देणारी होती... जांबुवंतराव धोटे हे वसंतरावांसारखेच यवतमाळचे. विदर्भवादी आणि वसंतरावांचे नको तसे घोर टीकाकार. त्यांनी वसंतरावांवर मोर्चे नेले, त्यांच्या गाड्या अडविल्या, सभा मोडल्या आणि ते सदैव अस्वस्थ राहतील असेच आपले राजकारण आखले. या जांबुवंतरावांची आई रुग्णावस्थेत मुंबईच्या इस्पितळात दाखल असताना तिला भेटायला प्रत्यक्ष मुख्यमंत्रीच एकदा तेथे हजर झाले. त्या घटनेने जांबुवंतरावांनाही वसंतराव समजले व त्यांचा त्यांना असलेला विरोध मग पूर्वीएवढा टोकाचा व धारदार राहिला नाही.

पण, वसंतरावांनी केवळ अनुनयाचेच राजकारण केले नाही. कोणत्याही चांगल्या भटक्या विमुक्ताचा असतो तसा त्यांचा कणा राजकारणात ताठ होता आणि त्यांची मानही त्यात झुकलेली कधी कोणाला दिसली नाही. स्वतः शेतकरी असलेल्या वसंतरावांनी १महाराष्ट्रात हरितक्रांती घडवून आणण्याचा ध्यास घेतला. तो घेताना 'एक वर्षात राज्याचा अन्नधान्याच्या क्षेत्रातला अनुशेष संपविला नाही, तर मला फासावर चढवा' अशी घोषणाच त्यांनी पुण्याच्या जाहीर सभेत केली. लोकशाहीतल्या राज्यकर्त्याने तसे आततायीपण करू नये हा यशवंतरावांचा सल्लाही त्यावेळी त्यांनी मनावर घेतला नाही. त्या वर्षात व नंतरच्या काळात महाराष्ट्रात शेती व सिंचनाच्या क्षेत्रात त्यांनी जे अतोनात परिश्रम घेतले त्याचा परिणाम हे राज्य सुजलाम् सुफलाम् होण्यात झाला.

यशवंतरावांनी चालना दिलेल्या सहकाराच्या चळवळीला वसंतरावांनी पुढली ११ वर्षे बळ दिले. महाराष्ट्राचे ऊस उत्पादन वाढले. त्यातून साखरेचे शंभरावर कारखाने उभे राहिले. द्राक्षाच्या शेतीला प्रोत्साहन देण्याचे कामही त्यांचेच. द्राक्षांची निर्मिती व आजचे वायनरीचे उद्योग त्यातून आले. दुधाचे उत्पन्न वाढावे, शेतकऱ्यांना उत्पन्नाची जास्तीची साधने उपलब्ध व्हावी या प्रयत्नांना चालना देण्याचे कामही त्यांचे... विदर्भातील कापूस उत्पादकांसाठी सुरू झालेली कापूस ते कापड ही एकाधिकार खरेदी योजना त्यांच्याच कारकीर्दितील. तिने शेतकऱ्यांना सावकारांच्या तावडीतून सोडवण्याचे क्रांतिकारी कार्य आरंभी केले. वसंतरावांच्या धोरणानुसार ती तशीच पुढे चालू राहिली असती तर राज्यातला कापूस उत्पादक शेतकरी एक दिवस कापडाचा उत्पादकही झाला असता... या साऱ्या कामातून वसंतराव यवतमाळ वा विदर्भाचे प्रतिनिधी न राहता महाराष्ट्राच्या ग्रामीण जनतेचे विश्वसनीय नेते बनले. बळवंतराय मेहता समितीने देशात सत्तेच्या विकेंद्रीकरणाची योजना आणली आणि १९६२ मध्ये तिचा भव्य प्रयोग महाराष्ट्रात सुरू झाला. नंतरची बारा वर्षे त्या योजनेची पायाभरणी भक्कम करण्यात व पंचायत समिती आणि जिल्हा परिषद यांच्या कामाला आजचे वळण देण्यात त्यांचा वाटा मोलाचा होता. महाराष्ट्राच्या ग्रामीण कार्यकर्त्यांशी याच कामातून त्यांचे संबंध



दृढ झाले व खेड्यांना त्यांचा विश्वासाचा साथी मिळाला.

वसंतरावांच्या जीवनाला एक देखणी सांस्कृतिक बाजूही होती. ते चांगले व चोखंदळ वाचक होते. उत्तमोत्तम मराठी व इंग्रजी ग्रंथांचा त्यांचा संग्रह मोठा होता. त्यांच्या भाषणात त्या ग्रंथांचे दाखले येत. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्राशीही त्यांनी जवळचा संबंध ठेवला होता. १९७३ मध्ये यवतमाळात ४९ वे अ.भा. मराठी साहित्य संमेलन भरले होते. वसंतरावांचे पुतणे सुधाकरराव त्याचे स्वागताध्यक्ष, ते स्वतः प्रमुख पाहूणे, यशवंतराव उद्घाटक तर ग.दि. माडगूळकर हे अध्यक्ष होते. 'ग्रामीण महाराष्ट्राचे व त्याच्या व्यथा वेदनांचे चित्र मराठी साहित्यात जरा उमटू द्या' हे त्यावेळच्या भाषणात मराठी सारस्वतांना त्यांनी केलेले कळकळीचे आवाहन आजही अनेकांच्या स्मरणात राहिले आहे... तेव्हाची ही आठवण. मंत्री आणि पदाधिकारी तेव्हा आजच्या एवढे तोऱ्यात राहात नसत आणि सामान्य माणसांपासून त्यांना तोडणारी सुरक्षा व्यवस्थाही त्या काळात आजच्या एवढी भक्कम नसे. संमेलनाचे उद्घाटन आटोपले होते आणि मंडपासमोरच्या चौकात एका बाजूला उभे राहून संमेलनाध्यक्ष, उद्घाटक आणि प्रमुख पाहूणे उभ्या उभ्याच गप्पा करीत रेंगाळले होते. पोलीस व्यवस्था दूर होती, संमेलनाला आलेली माणसे पुढाऱ्यांपर्यंत सहज जात-येत होती. वसंतरावांनी त्यांचा तो प्रसिद्ध पाईप पेटवायला घेतला आणि कोणाच्या काही लक्षात येण्याआधी डोक्यावर गाठोडे घेतलेला एक ग्रामीण माणूस लगबगीने त्यांच्यापर्यंत पोहोचला. त्याने मुख्यमंत्र्यांना काय मागावे? तो म्हणाला, 'जरा माचिस दे की बाबा.'

त्याच्या हातात त्याची विझलेली विडी होती. वसंतरावांनी त्याला क्षणभर न्याहाळले आणि काहीएक न बोलता आपल्या जवळच्या लायटरने त्याची विडी तिथल्या साऱ्यांसमक्ष पेटवून दिली. तो ग्रामीण माणूस आला तसाच परतलाही. त्याला अडवून एका पत्रकाराने विचारले, 'तुझी विडी पेटविणारे कोण होते, ठाऊक आहे का तुला?'

'नाही बा.' तो भाबडेपणाने म्हणाला.

'वसंतराव नाईक. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री.' पत्रकाराने त्याला सांगितले.

'बापारे, म्हणजे त्या फुलसिंग नाईकाचा लेक?' तो तेवढ्याच सहजपणे उद्गारला आणि चालू लागला... तेव्हाचे नेते जनतेच्या केवढे जवळ होते त्याचा हा साक्षात्कार.

वसंतरावांच्या व्यक्तिमत्त्वातले साधे माणूसपण असे अनेक प्रसंगांनी प्रगट व्हायचे. कधीकधी ते त्यांच्या नेतेपदाविरुद्धही गेलेले दिसायचे. विधिमंडळाचे अधिवेशन संपले की चंद्रपूरजवळच्या ताडोबा या अभयारण्यात येऊन विश्रांतीसाठी काही काळ काढायचा हा त्यांचा नेम होता. मुंबईहून चंद्रपूरला विमानाने आले की विमानतळावरूनच एका खुल्या गाडीत बसून ते थेट ताडोबाला पोहोचायचे. वत्सलाबाई सोबत असायच्या; शिवाय काही निकटचे सहकारीही. अशा एका ताडोबा भेटीत त्यांच्यासोबत तेव्हाचे वनमंत्री व चंद्रपूरचे पालकमंत्री दादासाहेब देवतळे हेही होते. ताडोबाला पोहोचत असताना वाटेतच त्यांना एक चांगला मोठा ढाण्या वाघ त्यांचा रस्ता अडवून उभा असलेला

## पायाभरणी आणि उभारणी...

**महाराष्ट्राच्या शिल्पकारांची एक दुर्मिळ भेट**



दिसला. वसंतराव जातिवंत शिकारी होते. त्यांना राहावले नसावे. जवळची बंदूक उचलून त्यांनी नेम साधला आणि एकाच गोळीत त्या वाघाला त्यांनी आडवे केले... काही दिवसांआधी औरंगाबादच्या विमानतळावर त्यांना घेऊन येणारे हेलिकॉप्टर जमिनीवर आडवे झाल्याने त्यांचा एक हात प्लास्टरमध्ये बांधला होता व निकामीही होता. त्याही स्थितीत एका हातात धरलेली बंदूक अचूक चालविण्याचे त्यांचे कसब देवतळ्यांनाही चांगले जाणवले होते... त्या रात्री पत्रकारांसोबत बोलताना स्वतः देवतळ्यांनीच मुख्यमंत्र्यांच्या शिकारीबाण्याची व त्यांच्या एकहाती वाघ मारण्याची किमया खुलवून सांगितली आणि पत्रकारांनी, त्यात मीही होतो, ती सारी शिकारकथा तीत जमेल तेवढे रंग भरून आपापल्या वृत्तपत्रांच्या पहिल्या पानावर छापून आणली.

दुसरे दिवशी सगळ्या पत्रकारांच्या घरचे फोन खणखणले. आम्हा सगळ्यांनाच मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या कोळसा मुक्कामी चहाला यायचे निमंत्रण दिले होते. ठरल्यावेळी सरकारी गाड्यांतून आम्ही वनविभागाच्या तिथल्या विश्रामभवनात पोहोचलो तेव्हा स्वतः मुख्यमंत्रीच आमची वाट पाहात व्हरांड्यातल्या खुर्चीवर पाईप ओढत असलेले दिसले. आगत-स्वागत आणि चहा-बिस्किटे झाली. जरा वेळाने आमच्यातले एक ज्येष्ठ पत्रकार म्हणाले, 'काल तुम्ही केलेल्या वाघाच्या शिकारीबद्दल आम्हाला तुमचे अभिनंदन...'

त्यांचे वाक्य अर्ध्यावर तोडत मुख्यमंत्री गरजले, 'वाघाची शिकार? कोणी केली? कुठे झाली?'

आता अवाक् व्हायची पाळी आमची होती. मुख्यमंत्री म्हणाले, 'अरे या राज्यात वाघाच्या शिकारीवर बंदी आहे ना?'

'होय' आमच्यातला एकजण म्हणाला.

'मग वाघाची शिकार येथे होईलच कशी?' मुख्यमंत्री म्हणाले.

'पण सर, आमच्यातला एकजण. तुमच्या शिकारीची माहिती खुद्द वनमंत्र्यांनीच...'

त्याला अडवीत मुख्यमंत्री म्हणाले, 'अरे तो तुमचा वनमंत्री उद्या काहीही सांगेल, पण तुम्ही कायदाबियदा काही पाहायचा की नाही?'

'पण सर.'

'पण नाही आणि बिण नाही. कायद्याने वाघाच्या शिकारीवर बंदी असल्याने ती झाली नाही आणि होऊही शकत नाही हे तुम्हा पत्रकारांनाही कळू नये काय?'

आम्ही समजायचे ते समजलो. जरा वेळ गेल्यानंतर 'आमची चूक' कबूल करून आम्ही हसतच वसंतरावांचा निरोप घेतला. त्यांच्याही चर्येवर स्मिताची जाणती रेषा होती.

पुढे ही शिकार विधानसभेत गाजली. वसंतरावांनी त्यांची चूक मान्य करताना आपण शिकारी असल्याचे आपले भान कधी जातच नसल्याचे व तुम्ही द्याल ती शिक्षा आपल्याला मान्य असल्याचे डोळ्यांत अश्रू आणून सभागृहाला सांगितले. त्यांचे प्रांजळपण लक्षात घेतलेल्या तेव्हाच्या समंजस सभागृहाने त्या प्रकरणावर मग पडदाही टाकला.

हा सारा काळ वसंतरावांचे व्यक्तित्व व नेतृत्व चौरस आणि प्रगल्भ करणारा होता. त्यांच्यात पूर्वीच असलेला गोडवा वाढविणाराही होता. सुदैवाने त्या काळात राजकारणातले वैर आजच्या एवढे विषारी नव्हते आणि हेत्वारोप करण्याचा आजचा सवंग प्रकारही त्या काळी नव्हता. टीका

पक्षीय राजकारणात त्यांनी भाग घेतला. पण, पक्षीय वैरांपासून ते सदैव दूर राहिले. रा. स्व. संघाचे सरसंघचालक गोळवलकर गुरुजी यांची त्यांच्या अखेरच्या आजारात वसंतरावांनी भेट घेतली व ती घेताना आपले राजकारण बाजूला ठेवण्याचे पथ्य त्यांना पाळता आले. आपल्या जवळच्या माणसांना काय आवडेल, ते कशामुळे आनंदी होतील याचे भान त्यांना असे. प्रिन्स आगाखान भारतात आले आणि मुंबईच्या त्यांच्या मुक्कामात मुख्यमंत्र्यांनी ताज हॉटेलच्या प्रिन्सेस रूममध्ये त्यांच्या सन्मानार्थ मेजवानी दिली. तिला हजर राहायला खोजा समाजातील आपले मित्र डॉ. हिराणी यांना त्यांच्या पत्नीसह बोलावून घेऊन त्यांना जन्मभर पुरेल एवढा आनंद वसंतरावांनी मिळवून दिला. राजकारणात अभावानेच आढळणारे निर्वैरपण त्यांना नेहमी जपता आले. भटक्या व विमुक्त समाजात जन्मलेल्या आणि नागपुरातील घाटे या प्रतिष्ठित ब्राह्मण कुटुंबातून आलेल्या वत्सलाबाईंशी प्रेमविवाह केलेल्या वसंतरावांच्या मनाला जातीयताही कधी शिवली नाही.



वसंतराव आणि वत्सलाबाई एका निवांतक्षणी...





पंडित नेहरू आणि वसंतराव

भूमिकेवर व्हायची आणि भूमिकांवर आक्षेप येण्यात दुष्टावा असण्याचेही कारण नसायचे. राजकारणातली माणसे परस्परविरोधी पक्षात असतानाही एकमेकांना सांभाळून घ्यायची. व्यक्तिगत अडचणी राजकारणात कधी आणायची नाहीत. प्रांजळपणाएवढेच उदारपण खाजगी व्यथावेदनांबाबतही असायचे... वसंतराव मुख्यमंत्री असताना त्यांना व्यथित करणारे अनेक प्रसंग त्यांच्या वाट्याला आले. एका पहाटे त्यांच्या तरुण मुलीचा मृतदेह मुंबईच्या प्लॅटफॉर्मशेजारी पडलेला लोकांना आढळला. पण, ती घटना मुख्यमंत्र्यांची कोंडी करण्यासाठी कोणी वापरली नाही. एका दु:खी बापाची व्यथा म्हणूनच साऱ्यांनी तिच्याकडे पाहिले. त्या घटनेत काही विपरित असल्यास त्याची चौकशी करण्याची व संबंधितांना शासन करण्याची मागणी करूनच सारे थांबले. त्या घटनेने वसंतराव मात्र फार खोलवर दुखावले गेले. वत्सलाबाई त्यांच्याहून जास्तीच्या खचल्या. नंतरच्या काळात वसंतरावांनी त्यांना कधी एकटे राहू दिले नाही. आपल्या प्रत्येक शासकीय दौऱ्यात, कार्यक्रमात आणि प्रवासात त्यांना सोबत घेण्याचे पथ्य वसंतरावांनी अखेरपर्यंत सांभाळले.

माणसे कशाकशाने फुलून आणि फुगून जाताना पाहावी लागण्याच्या आजच्या काळात ११ वर्षे महाराष्ट्राचे मुख्यमंत्रिपद अनुभवणाऱ्या या नेत्याला अहंकार वा गर्व सोडा, पण त्याच्या साध्या अभिमानाचा दर्प चढल्याचेही कधी आढळले नाही. त्याहून महत्त्वाची बाब ही की एवढी वर्षे सत्ता हातात ठेवणाऱ्या वसंतरावांवर कोणाला कधी तिचा गैरवापर केल्याचा आरोप ठेवता आला नाही. साऱ्यात राहून साऱ्याहून वेगळे राहता येणे, राजकारणात असतानाही राजकारणी न होणे आणि पदावर असतानाही जमीन व जमाना यांच्याशी नाते राखता येणे हीच आजच्या काळात किमया वाटावी अशी बाब आहे. महाराष्ट्राच्या एवढ्या वर्षांच्या राजकारणात एकट्या वसंतराव नाईकांनाच ती जमली असे म्हटले तर ते चूक ठरू नये.

मात्र, वसंतरावांनी राजकारणाला स्वत:पासून दूर ठेवण्यात आपल्या सहज साध्या प्रकृतीधर्माच्या बळावर यश मिळविले असले तरी राजकारणाने त्यांना तसे नेहमीच राहू दिले नाही. ते यशवंतरावांचे विश्वासू सहकारी व स्नेही होते आणि त्यांना नसले तरी यशवंतरावांना जाचाचे ठरेल असे राजकारण करणारे लोक फार होते. ते दिल्लीत होते तसे मुंबईत होते आणि पुण्यात होते तसे नागपूर-विदर्भातही होते. यशवंतरावांचे पंख व पाय कापण्याचे राजकारण करणाऱ्या दिल्ली व मुंबईतील लोकांना वसंतरावांची त्यांच्यावरील निष्ठा सलणारीही होती. त्या माणसांनी प्रथम त्या दोघांत वितुष्ट आणण्याचा प्रयत्न करून पाहिला. निदान त्यांनी यशवंतरावांचे राजकारण चालविणे थांबवावे अशी गळ त्यांना घालून पाहिली. दिल्लीकर यात पुढे होते आणि यशवंतरावांच्या पाठिंब्यासाठी स्पर्धा करणारी मुंबईतील माणसेही त्यात मागे नव्हती. पण, वसंतराव त्यांच्या राजकारणाला कधी बधले नाहीत.

१९६९ मध्ये काँग्रेस पक्षाच्या झालेल्या दुभंगाच्या काळात त्यांनी इंदिरा गांधींचा पक्ष न घेता यशवंतरावांची बाजू घेतली. नंतरच्या इंदिरा व यशवंत यांच्यातील जवळीकीच्या काळातही ते यशवंतरावांच्या जवळ आणि इंदिरा गांधींपासून एक अंतर राखून राहिले. हा काळ इंदिरा गांधींचा दुरावा व रोष ओढवून घेणारा आणि त्यांची अस्वस्थता वाढविणारा होता. त्या दुराव्याचे कारण वसंतराव नव्हते, यशवंतराव होते. यशवंतरावांचे मराठी राजकारणातील स्थान जोवर भक्कम आहे तोवर दिल्लीकरांना त्यात फारशी ढवळाढवळ करता येत नव्हती. ते स्थान उखडायचे तर वसंतरावांना त्यांच्यापासून दूर करणे गरजेचे होते. वसंतरावांनी मात्र यशवंतरावांची साथ अखेरपर्यंत सोडली नाही. परिणामी, यशवंतरावांच्या राजकारणाची जी परवड त्यांच्या शेवटच्या काळात झाली तशीच ती वसंतरावांच्याही वाट्याला त्यांच्या आयुष्याच्या अखेरच्या काळात आली. दिल्लीच्या काँग्रेस नेतृत्वाने त्यांना मुख्यमंत्रिपदावरून पायउतार होण्याचा आदेश ज्या तऱ्हेने दिला तो त्यांच्या तोवरच्या सेवेची कदर करणारा नव्हता. ज्यांचा आधार होता ते यशवंतराव स्वत: निराधार झाले होते आणि ते पायउतार होणार म्हणून उतावीळ झालेले महाराष्ट्रातील मराठा नेतृत्व त्यांची उपेक्षा करायला सज्ज होते. अखेरच्या काळात काँग्रेस पक्षाने वसंतरावांना लोकसभेचे तिकीट दिले. ते प्रचंड बहुमताने निवडूनही आले. पण, महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्याचे मुख्यमंत्रिपद तब्बल ११ वर्षे भूषविलेला हा नेता दिल्लीत साधा खासदारच राहिला. आपली व आपल्या मान्यवर नेत्याची दिल्लीत होणारी परवड पाहात व मुंबईत होणारी उपेक्षा सहन करीतच त्यांनी हा काळ काढला. अखेर, त्याच स्थितीत सिंगापूरला असताना हृदयविकाराचा तीव्र झटका येऊन त्यांचे प्राणोत्क्रमण झाले.

वसंतरावांनी त्यांच्या आयुष्यात मिळविलेले यश मोठे होते. यवतमाळ जिल्ह्याच्या पुसद तालुक्यातील गहूली या खेड्यात एका भटक्या जातीत जन्माला आलेला मुलगा, त्याची बुद्धी, परिश्रम व निष्ठा यांच्या बळावर महाराष्ट्राचा मुख्यमंत्री होतो, त्या पदावर तीन वेळा निवड होण्याचा त्याचा मान त्याच्याअगोदर व नंतर कोणाला मिळत नसतो, साऱ्या महाराष्ट्राला आपलेसे करण्याएवढे त्याचे नेतृत्व सर्वगामी व सर्वव्यापी होते, त्याने राज्यात सुरू केलेल्या अनेक योजना राष्ट्रपातळीवर स्वीकारल्या जातात आणि खेड्यातल्या माणसांएवढाच शहरातल्या कामगारांचा आणि गरीब आदिवासींएवढाच तो शहरी मध्यमवर्गीयांना आणि धनवंतांनाही आपला वाटू लागतो. तो


शेतकऱ्यांचा पुढारी असतो आणि शहरी माणसांच्याही विश्वासाचा विषय होतो. त्याला समाजकारणात मान्यता मिळते, सांस्कृतिक क्षेत्रात लौकिक प्राप्त होतो आणि त्याचा चाहता वर्ग सर्वक्षेत्रीय असतो... याहून त्याचे मोठे यश राजकारणात राहूनही निर्वैर असण्यात असते. त्याला सर्वच पक्षातून मित्र मिळतात. त्याचे कौतुक एसेम जोशी यांना असते आणि सेनेचे ठाकरे यांनाही त्याच्याविषयी आपलेपण वाटते. शेकापचे कृष्णराव धुळुप यांच्यांशी त्याचे मैत्र असते आणि कॉ. डांगे यांनाही त्याच्याशी आत्मीयतेचे संबंध ठेवावेसे वाटतात. तो काँग्रेसला आपला वाटतो आणि विरोधकांनाही वैरी वाटत नाही... याहूनही त्याचे मोठे यश एवढी वर्षे राजकारणात राहून आपले चारित्र्य निष्कलंक ठेवण्यातले असते. साऱ्या राजकीय हयातीत त्यांना चिकटू शकेल असा ठपका विरोधी पक्षांना, माध्यमांना किंवा कोणा खुसपटखोराला त्यांच्यावर ठेवता आला नाही. राजकारणात जाताना ते जेवढे साधे आणि स्वच्छ होते तेवढेच त्याचा व जगाचा निरोप घेतानाही ते साधे आणि स्वच्छच राहिले. मधल्या काळाने त्यांना दिलेच असेल एक प्रगल्भ विनम्रपण, हसतमुख माणूसपण, नेता असतानाचे अनुयायीपण आणि अनेकांमध्ये एकमेव असतानाही एकमेव न होता अनेकातला एक राहण्याचे निगर्वीपण...

वसंतराव रसिक होते. त्यांना गाणे आवडायचे. चांगल्या सामिष भोजनाचा चवीने आस्वाद घेणे त्यांना सगळ्या धकाधकीत जमायचे. त्यांना आवडणारे आणि आताच्या गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचालाच मिळू शकणारे मासे मुंबईत बोलवून घेणे व ते आपल्या स्नेह्यांना खिलविणे यात त्यांना रस होता. त्यांच्या स्वभावात मैफलीपण होते. हसरे संवाद मनमुरादपणे अनुभवणे हा त्यांच्या विरंगुळ्याचा भाग. चांगली माणसे, कलावंत, मूर्तिकार, चित्रकार आणि साहित्यिक यांच्या संपर्काची त्यांना ओढ होती. त्यांना ते सतत प्रोत्साहन देत आणि त्या कौतुकात साधे कोरडेपण नसे, त्याला मदतीची जोड असे.

वसंतरावांचे घराणे श्रीमंत होते. सासुरवाडीही धनवंत होती. मात्र, त्यांच्या वागण्या-बोलण्यात पुढाऱ्याचे सुस्तावलेले सैलपण नव्हते. नेतेपदावर असतानाही त्यांच्या व्यक्तिमत्त्वातला प्रशासकच नेहमी प्रभावी दिसायचा. त्यांचा पोषाख, तोंडात पाईप धरण्याची त्यांची ऐट, बोलण्यातली अधिकाराची जाण आणि हसरी असली तरी डोळ्यांतली तीक्ष्ण जरब थेट करडी आणि लष्करी होती. मुंबईत वावरतानाही त्यांच्यातले 'गहूलीपण' कायम होते. कष्टातून वर आलेल्या समाजातील तरुणांमध्ये दिसणारे त्यांचे ताठपण नंतरच्या सुखासीन आयुष्यातही तसेच होते. त्यामुळे जवळच्यांनाही ते दूरस्थ वाटत आणि त्यांच्या मनात त्यांच्याविषयी एक जरबही असे. 'मी त्यांना सांगून आलो आहे' किंवा 'मी सांगतो तसे ते करणारच' असे त्यांना गृहीत धरून कोणाला बोलता येत नसे.

वसंतरावांनी महाराष्ट्राची धुरा सांभाळली तेव्हा ते तुटीचे राज्य होते, अन्नधान्याच्या संकटात होते आणि दुष्काळाच्या सावटात होते. मुंबईत असंतोष आणि कामगारांत चळवळ होती. विदर्भात असमाधान आणि मराठवाड्यात विकासाच्या अनुशेषावरून उठलेले वादळ होते. पश्चिम महाराष्ट्राला 'हा' मुख्यमंत्री आपल्यावर लादलेला वाटला तर कोकण प्रदेशाला त्याचे दूरचे असणे खटकणारे होते. वसंतरावांनी मुख्यमंत्रीपद सोडले तेव्हा राज्याची तूट भरून निघाली होती. अन्नधान्यात स्वयंपूर्णता आली होती. मुंबईतला असंतोष आणि विदर्भातले असमाधान शमले होते, मराठवाड्याच्या अनुशेषावर मात करण्यात यश आले होते आणि कोकणचा त्यांच्याविषयीचा दुरावा मिटला होता... जबाबदारी घेतानाचा व ती सोडतानाचा काळ यातला फरकच नेत्याचे यशापयश निश्चित करीत असतो. त्या गणिताने वसंतरावांचे यश पूर्ण नसले तरी मोठे व अभिनंदनीय होते आणि त्यात त्यांना व महाराष्ट्राला समाधान होते. यशवंतरावांवर त्यांच्या कारकिर्दीच्या आरंभी झाली तशी विषारी टीका त्यांच्यावर झाली नाही आणि कन्नमवारांच्या वाट्याला आलेला अडाणी उपहासही त्यांना सहन करावा लागला नाही. सन्मानपूर्वक स्वीकारलेले मुख्यमंत्रिपद त्यांनी जनतेतला आपला आदर कायम राखूनच नंतरच्या नेत्याकडे सोपविलेले साऱ्यांना दिसले.

असा नेता महाराष्ट्राच्या अध्वर्युपदावर एवढी वर्षे राहिला आणि त्याच्या वर्तमान व भविष्याची वाट त्याने प्रशस्त केली यासाठी त्याला अभिवादन!




साहित्यिकांसमवेत वसंतराव आणि यशवंतराव.



# कर्तृत्वाचा कळस

**महाराष्ट्राचे भाग्यविधाते म्हणून ज्या नेत्यांचा आपण आवर्जून उल्लेख करतो, त्या यशवंतराव चव्हाण व वसंतराव नाईक यांची जन्मशताब्दी एकाच वर्षी यावी, हा आपल्या दृष्टीने दुग्धशर्करायोग म्हणावा लागेल. चव्हाणसाहेबांनी आधुनिक महाराष्ट्राचा पाया रचला, तर नाईकसाहेबांनी त्यावर कळस चढविला.**


## शरद पवार
(केंद्रीय कृषी मंत्री)

**वसंतराव नाईक यांच्यासोबत चर्चा करताना शरद पवार.**

महाराष्ट्राला खऱ्या अर्थाने दिशा दिली ती वसंतराव नाईकांनी! साठच्या दशकात महाराष्ट्रात म्हणावे तसे उद्योग भरभराटीला आले नव्हते. उत्तरप्रदेश हे उद्योगधंद्याचे केंद्रबिंदू होते. राज्यात उद्योगधंदे तर वाढले पाहिजेच, परंतु शेतकरी आणि शेती टिकली पाहिजे, या मताचे ते होते. बहुसंख्य समाज हा शेतीवर अवलंबून असतो. शेती टिकली तर देश टिकेल असे ते म्हणायचे. शेतीला उद्योगाचा दर्जा मिळावा, असे त्यांना वाटायचे. विषय कोणताही असो, 'शेती'शिवाय ते पूर्ण होत नसत. शेती व उद्योगधंद्यासाठी वीज, पाणी अत्यंत महत्त्वाचे घटक होते. त्यांच्या काळात कोराडीसारखे मोठे वीज प्रकल्प उभे राहिले. जायकवाडीसारखी धरणं तयार झाली.

कृषीवर आधारित उद्योगाला चालना म्हणून त्यांनी सूतगिरण्या, दूध उत्पादन आदी शेती पूरक उद्योगांना चालना दिली. एक नव्हे, तर चक्क चार कृषी विद्यापीठे महाराष्ट्रात त्यांच्या काळात उभी झाली, ही त्यांचीच देण होय. शेतकऱ्यांना चांगले बियाणे उपलब्ध व्हावे, म्हणून महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाची स्थापना त्यांच्याच काळात झाली.

दुष्काळ किंवा आपत्तीशी सामना कसा करावा, हे वसंतराव नाईक यांच्याकडूनच मला शिकायला मिळाले. कोयनेचा भूकंप आणि १९७२ चा भीषण दुष्काळ कोणीही विसरू शकणार नाही. या दोन्ही आपत्तीतून आपण सावरलो ते केवळ त्यांच्या धीरोदात्त स्वभावामुळे! ते फारच संयमी होते. सर्वांना बरोबर घेऊन जाण्याची त्यांची हातोटी वाखाणण्याजोगी होती. दुष्काळात अन्नधान्याचा मोठा प्रश्न होता. लोकांना उपाशी राहायला लागायचे. वेगवेगळ्या राज्यांतून धान्य आणायला लागायचे. ते स्वत: विविध राज्यातील मुख्यमंत्र्यांशी बोलायचे. मी त्यावेळी त्यांच्या मंत्रिमंडळात राज्यमंत्री होतो. समन्वयाची जबाबदारी त्यांनी माझ्यावर सोपविली होती. दिवसभराचा अहवाल रोज संध्याकाळी मी त्यांना द्यायचो. एक आठवण सांगतो. ते अधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीसाठी पुण्याला आले होते. मी तमिळनाडूच्या मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन पुण्याला आलो. धान्याचा उपलब्ध साठा व धान्याचे वितरण याबाबतची त्यांना माहिती दिली. धान्य मिळविण्यासाठी आपल्याला वेगवेगळ्या राज्यांकडे याचना करावी लागत आहे, ही चिंता त्यांना सतावत होती. ते अस्वस्थ व्हायचे. परंतु, ते चेहऱ्यावर अजिबात दिसू देत नव्हते. संकटाला धैर्याने सामोरे गेले पाहिजे, हे आम्हाला सांगायचे.

त्याच दिवशी शनिवारवाड्यावर त्यांची सभा होती. मुख्यमंत्री काय बोलणार याकडे सर्वांचे लक्ष होते. आपल्या भाषणात ते म्हणाले, दुष्काळामुळे अन्नधान्यासाठी दारोदार भटकावे लागत आहे, हे पुरोगामी राज्याला न शोभणारे आहे. परंतु, आपल्या सर्वांच्या साक्षीने मी प्रतिज्ञा करतो, 'येत्या दोन वर्षांत महाराष्ट्र अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला नाही तर मी जाहीरपणे फासावर जाईन.' यामागे त्यांचा किती मोठा आत्मविश्वास होता.

लोकांमध्ये विश्वास निर्माण करण्याचा त्यांचा हेतू होता. त्यानंतर त्यांनी अधिक उत्पादन देणारी संकरित वाणं महाराष्ट्रात आणली. हायब्रिड ज्वारीच्या प्रचार-प्रसारासाठी त्यांनी संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढला. शेतकऱ्यांच्या कापसाला चांगला भाव मिळावा म्हणून एकाधिकार कापूस खरेदी योजना अंमलात आणली. विरोधी पक्षाने एखादी विधायक सूचना केली तर ते आनंदाने स्वीकार करत. त्या काळात गिरणी कामगारांचे मोर्चे निघायचे. कॉ. डांगे, जॉर्ज फर्नांडीस आदी नेत्यांनी पुकारलेले बंद-मोर्चे अभूतपूर्व असायचे. त्यांच्याशी चर्चा व वाटाघाटी करून प्रश्न मोठ्या कौशल्याने सोडवायचे.



**"शेती टिकली तरच देश टिकेल. शेतीला उद्योगाचा दर्जा मिळावा, असे त्यांना वाटायचे. त्यांच्या काळात शेती पूरक उद्योगाला चालना मिळाली. ते अत्यंत संयमी होते. सर्वांना बरोबर घेऊन जाण्याची त्यांची हातोटी वाखाणण्याजोगी होती. कोयनेचा भूकंप आणि १९७२ च्या भीषण दुष्काळाला धीरोदात्तपणे ते सामोरे गेले. आपत्तीशी सामना कसा करावा, हे मला त्यांच्याकडून शिकायला मिळाले..."**

कधीही तुटेपर्यंत ताणू द्यायचे नाही.

मागेल त्याला काम देणारी रोजगार हमी योजना ही अभूतपूर्वच होती. दुष्काळात लोकांच्या हाताला कामे मिळाली. महाराष्ट्रात रस्त्यांचे जाळे आणि छोटे-मोठे बंधारे हे रोजगार हमी योजनेमुळे झाले. आज देशाने ही योजना स्वीकारली आहे. जास्तीत जास्त शेती सिंचनाखाली आली पाहिजे, म्हणून छोटे बंधारे व विहिरी खोदण्याचा धडक कार्यक्रम घेतला गेला. एच-४, हायब्रिड ज्वारीचे उत्पादन वाढले. कार्यक्रम कोणताही असो, शेती आणि शेतकरी या विषयाशिवाय ते पूर्ण होत नसे. माझ्यासारख्या तरुण मंत्र्यांना ते विश्वास देत, विश्वास निर्माण करत. कृषी विद्यापीठांमुळे विविध वाणांचे संशोधन झाले. परिणामी, कृषी संशोधक तयार करू शकलो. नांदेड ४४ हे वाण आजही संपूर्ण देशात प्रसिद्ध आहे.

शेतकऱ्यांसमोर बोलताना ते म्हणत, 'शेती ओलीताखाली आणा. पावसाळ्यात पडणारे पाणी शेतातच जिरवा. शेतात पाणी नसेल तर घाम गाळून शेती भिजवा, पण शेती सिंचनाखाली आणा,' असे ते पोटतिडकीने सांगायचे.

घटनेप्रमाणे अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती या दोन प्रवर्गांनाच अनुक्रमे १३ व ७ टक्के राखीव जागा होत्या. महाराष्ट्रात भटक्या-विमुक्त जातींची संख्या लक्षणीय आहे. त्यांचे जीवनमानही बेताचेच आहे, हे लक्षात आल्यानंतर त्यांच्या कारकिर्दीत घटनेच्या कलम १६(४)(ब) चा आधार घेऊन राज्यात तिसरी सूची निर्माण करण्यात आली. भटक्या-विमुक्त या वंचित घटकांसाठी ४ टक्के जागा राखीव ठेवण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर या वर्गांसाठी राज्यात मोठ्या प्रमाणात आश्रमशाळा सुरू करण्यात आल्या; परिणामी या समाजाला नोकरीमध्ये संधी मिळाली.

१९६३ ते १९७५ या १२ वर्षांच्या कालखंडात नाईक साहेबांनी महाराष्ट्राला सर्वोच्च स्थानी नेले. त्या काळात उत्तरप्रदेश, बिहार यासारख्या मोठ्या राज्यांमध्ये सतत मुख्यमंत्री बदलायचे; परंतु महाराष्ट्रात प्रदीर्घ काळ स्थिर सरकार देण्याची किमया नाईक साहेबांनी केली. त्यामुळे महाराष्ट्रात पायाभूत सुविधा निर्माण होऊ शकला. त्यांनी घालून दिलेले आदर्श अजूनही प्रेरणादायी आहेत.

**(शब्दांकन : मोहन राठोड, संपर्क : ०८१३०८५५४३६/०९४२३८४८५४५)**

## वसंत-विचार

### स्वाभिमानी महाराष्ट्र

''दुष्काळी स्थिती निर्माण होते त्यावेळेला मनुष्य घाबरतो, त्याची हिंमत खचते. काय करावे, काय करू नये या विवंचनेत तो असतो. अशा वेळी त्याचा विचार आणि आचार विधायक राहिलच याची खात्री देता येत नाही. अशा बिकट परिस्थितीत लोकांना काम देऊन त्याचा विचार आणि आचार विधायक राहील असे वातावरण आपण सर्व मिळून टिकवीत आहोत. अशा संकटकाळी स्वाभिमान न सोडता अधिक काम केले पाहिजे, ही धारणा लोकांमध्ये रुजवीत आहोत. मला मोठ्या अभिमानाने सांगावेसे वाटते की, दुष्काळाच्या या भीषण परिस्थितीतही महाराष्ट्रातील माणूस कुणाच्या सहानुभूतीवर, दयेवर किंवा औदार्यावर न जगता, कष्ट उपसून मानाची चटणी-भाकरी मिळवीत आहे. त्यामुळे कराल संकटालाही महाराष्ट्राचा स्वाभिमानी इतिहास बदलता येणार नाही.''

### वसुली न देण्यात प्रतिष्ठा कुठली?

''शेतकऱ्याला लागणारे भांडवल त्याला वेळेवर मिळत राहिले पाहिजे, असे आपण म्हणतो. यात अडचण अशी निर्माण झाली आहे की, दिलेल्या कर्जाची वसुली दिली नाही. देण्याची ऐपत नव्हती म्हणून वसुली दिली नाही, असे मात्र नाही. अनेकांची स्थिती पैसा देण्यासारखी असते; पण वसुली दिली तर सरकार दरबारी आपले काही वजन नाही असे सिद्ध होईल या समजुतीने ते वसुली देत नाहीत. चुकीच्या सामाजिक प्रतिष्ठेच्या या कल्पना आहेत. पण, त्याचा परिणाम नियमित भांडवल पुरवठ्यावर आणि उत्पादन वाढीवरही होतो. वसुलीच मिळाली नाही, तर रिझर्व्ह बँक किंवा इतर कोणतीही बँक पैसे कसे देणार? आपला शेजारी किंवा जिव्हाळ्याचा माणूस अडचणीत असला तर आपण त्याला एकदा, दोनदा मदत करतो. पण त्याने पैसे कधी परत केले नाहीत, तर जवळच्या माणसालासुद्धा तिसऱ्यांदा आपण काही देत नाही. व्यवहार हा असाच असतो. वसुली दिली असती तर अनेक पटीने आपल्याला अधिक भांडवल मिळाले असते.''



# वासंतिक सौंदर्य

थोर समाजसेवक **बाबा आमटे** यांचे वसंतराव नाईक यांच्याशी स्नेहाचे संबंध होते. बाबा करीत असलेल्या अलौकिक समाजकार्याबद्दल वसंतरावांना आपुलकी व जिव्हाळा होता. वसंतरावांसोबत झालेल्या विविध प्रसंगी आणि भेटीद्वारे दोघांमधील जिव्हाळा वाढत गेला. या भेटींमधून बाबांना दिसलेले वसंतराव त्यांनी अतिशय समर्थपणे या छोट्या लेखामध्ये रेखाटले आहेत.

जून महिन्याच्या पहिल्या चरणात आकाशात सुजल, श्यामल मेघांची दाटी होते आणि बरसत्या तुषारांनी प्रखर दुष्काळाची तगमग थोडीशी कमी झाल्यासारखी वाटते. दुष्काळाच्या चौथ्या वर्षीही चाललेली ही सतत झुंज; क्षितिजावर इंद्रधनुष्य चमकू लागले. पण, ते सारेच विचित्र. पुन्हा वैराण रूप धारण करू लागले.

### चैतन्यमय व्यक्तिमत्त्व

या कसोटीच्या क्षणी वसंतराव नाईक या व्यक्तिमत्त्वाला मुख्यमंत्री या नात्याने वेगळेच रंग लाभले. त्यांच्या आवडत्या पाईपासारखे सरळ मन, बुलंद प्रयत्न आणि दूरची ध्येयस्वप्ने न्याहाळणारा हा माणूस अनेक संघर्षांचे, टीकेचे, संकटांचे, अपयशांचे प्रहार झेलूनही चंद्राने कोरलेल्या ध्येयासारख्या, अशांच्या जीवनातला ओलेता अंधारही इतरांना चकित करून जातो.

काळ्या ढगाआडच्या रेशमी किरणांच्या उबेला प्रणाम करण्याची विनम्रता आणि आशांकित प्रफुल्लता त्यांच्यापाशी होती. अत्यंत विपरीत परिस्थितीतही एका धुंदीत, निर्मितीच्या उन्मादात आपल्या पाईपाच्या झुरक्यावर सारी आव्हाने झेलत त्या धुरात रंगमाया कॅमोफ्लाज नसे तर एक जिद्द, प्रामाणिक कार्यनिष्ठा अखंड संघर्षाची तयारी त्यात असे. त्यांच्या आशयात समाज-प्रवणता, शब्दात निर्णायकता आणि पराक्रमात विवेक होता. समस्यांशी झुंजताना ते वर्तमानाशी गतिमान नाते ठेवीत. सत्तेच्या झगमगाटात ते वावरत; पण त्याचबरोबर टीका, निंदा, घृणा पचवायची शक्ती त्यांच्या ठायेत होती.

### शिकारी आणि राजकरण

वसंतरावांच्या अंगातील शिकारी, सावज नेमके गाठीत असे. आशा-निराशांचे सावज सापळे टाकून क्षणाक्षणाला पकडण्याची हिंमत धरून असे. त्यांना नेमक्या पाऊलखुणा,



वसंतराव आणि बाबा आमटे

शिकारीचा भाग माहीत असे; पण अनेकदा हाका घालणाऱ्या घोळक्यांकडून डाव विसकटत असे. शिकार गायब होते असे नाही, पण नेमका क्षण गाठून निमिषार्धात पलीकडल्या भक्ष्याला कसे टिपायचे हे त्यांना पुरते माहीत होते. शिकाऱ्याच्या खेळातील धडाडी त्यांच्या राजकीय सामाजिक कार्यातही दिसून येई. कितीही भेटू जातानाही वाटेवर तारेच्या कम्पाऊंडात शिरून दत्तपूरच्या शेतीच्या प्रयोगाची ते दखल घेत. पिकांचे निरीक्षण, त्यावरच्या रोगांचे निवारण यांची अत्यंत जिव्हाळ्याने चर्चा करीत. सिरोंचा शेतकरी मेळाव्यात वसंतरावांचे एक वेगळे दर्शन जाणवते. चर्चेच्या ओघात कुणातरी उपस्थिताने खट्याळपणे म्हटले, ''पलीकडच्या तीरावरली आंध्रची शेती बघा. सिरोंचा आंध्रात गेले असते तर...'' त्यावर ताडकन वसंतरावांनी विचारले, ''बोला, तुम्हाला काय काय हवे आहे?'' उपस्थितांनी शंभर ट्यूबवेल्स मंजूर केल्या आणि तो टापू विद्युतमय करण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त केली. कास्तकारांच्या मेळाव्यात त्यांच्या सोबत चहापान केले. एका ठिकाणी मिरचीचे अत्यंत कसदार असे बियाणे दिसले तर स्वत:साठी म्हणून २ मिरच्या नमुन्याला मागून घेतल्या. तरुण डॉक्टरने भामरागडच्या रानात जाऊन कार्य करण्याची तयारी दाखविली. वसंतरावांनी त्याला जीवनातील इतर मौजमजा करण्याचा व मग तिकडे जाण्याचा सबुरीचा सल्ला देऊ केला. त्यावर उसळून त्या तरुणाने म्हटले की, तुम्ही तरुणांवर अन्याय करता. तरुण जात नाहीत हा तुमचा धोशा असतो. वसंतरावांनी ताबडतोब महाराष्ट्र-आंध्रवरच्या सीमी जिल्ह्यातील अधिकाऱ्यांना फोन लावून योग्य अशा जागेची पाहणी करण्याचे आदेश दिले.

### हरितक्रांतीची तळमळ

तथापि, त्यांची ही तळमळ, धडपड सर्वच बाबतीत सफल होई असे नाही. त्यांचे अनेक संकल्प लोकांपर्यंत नीटसे पोहोचत नव्हते. शासकीय कारभार यंत्रणा अपुरी पडे. क्वचित ढिलाई होई. पर्यायाने योजना बदनाम होई. विरोधी पक्ष त्यांच्या कार्यातील उणिवा, दोष दाखविण्याचे कार्य सतत करी. तथापि, विरोधकांना हे मान्य करावे लागेल की, हरितक्रांतीचा शेतीचा कार्यक्रम वसंतरावांनी जिद्दीने पुढे रेटला.

दुष्काळ-दुष्काळ-दुष्काळ! आज हा घोष सर्वत्र निनादत असला, भकास दर्शन घडवीत असला तरी वाळवंटासारख्या महाराष्ट्र मातेची कूस वासंतिक सौंदर्याने आणि समृद्धीने फुलविण्याची त्यांची मनीषा हे वसंतरावांचे चैतन्यमय पाथेय!

**(संदर्भ : १९८३ मधील लोकराज्यच्या कृषक जयंती विशेषांकातून)**

# विकासाचा महानायक!

**मधुकर भावे**

स्व. यशवंतराव चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष सुरू असतानाच १ जुलै २०१२ रोजी स्व. वसंतराव नाईक यांचे जन्मशताब्दी वर्ष सुरू झाले आहे, हा एक विलक्षण योगायोग आहे. यशवंतराव चव्हाण यांना संरक्षणमंत्री म्हणून त्यावेळचे पंतप्रधान पंडितजींनी दिल्लीला बोलावून घेतले आणि महाराष्ट्राची धुरा यशवंतरावांनी दादासाहेब कन्नमवार यांच्यावर सोपवली. पण, कन्नमवारांची कारकीर्द अल्प होती. त्यानंतर ५ डिसेंबर १९६३ रोजी यशवंतराव चव्हाण यांच्या पूर्ण पाठिंब्याने वसंतराव नाईक यांची महाराष्ट्रात मुख्यमंत्रिपदी बिनविरोध निवड झाली. यशवंतरावांची ही निवड इतकी बिनचूक होती की, महाराष्ट्राच्या इतिहासात एकदा नव्हे तर तीनदा (१९६३, १९६७, १९७२) मुख्यमंत्रिपदी बिनविरोध निवड होण्याचे भाग्य वसंतरावांच्या वाट्याला आले. महाराष्ट्राचे सर्वाधिक काळ सलग सव्वाअकरा वर्षे (५ डिसेंबर १९६३ ते १९ फेब्रुवारी १९७५) मुख्यमंत्री राहण्याचे भाग्य त्यांना मिळाले. पण, या भाग्यापेक्षाही वसंतराव नाईक यांच्या कर्तृत्वाचा, नेतृत्वाचा आणि उमद्या मनाचा वाटा सगळ्यात अधिक आहे.

सव्वाअकरा वर्षांतील त्यांचे कर्तृत्व तर अफाटच आहे. महाराष्ट्राच्या गेल्या पन्नास वर्षांतल्या बांधणीमध्ये यशवंतरावांनी पाया घालून दिलेली आणि दिशा ठरवून दिलेली महाराष्ट्राची चौफेर बांधणी वसंतराव नाईक साहेबांच्या काळातच सर्वाधिक झालेली आहे. किंबहूना १९६० ते १९७५ या अवघ्या पंधरा वर्षांच्या काळात शेती, धरणे, वीज, रस्ते, शिक्षण, ग्रामीण विद्युतीकरण, कृषीविद्यापीठे आणि नवी मुंबई, नवीन औरंगाबादची निर्मिती हे सगळे मोठे प्रकल्प अवघ्या ९० हजार कोटी रुपयांत महाराष्ट्रात उभे राहिले आणि त्याचे जवळपास सर्व श्रेय वसंतराव नाईक यांना आहे. आज वीजटंचाईने आपण अडचणीत आहोत. पण, आज जी काही १० हजार मेगावॅट वीजनिर्मिती होत आहे त्यातली ९ हजार मेगावॅट वीज वसंतराव नाईक साहेबांच्याच नेतृत्वाखाली उभ्या राहिलेल्या औष्णिक वीजनिर्मिती केंद्रांतील आहे. कोयनेचा पहिला टप्पा १९६२ साली सुरू झाला असला तरी पुढचे दोन्ही टप्पे वसंतराव नाईक साहेबांच्याच काळातले आहेत. कोयनेचे जल विद्युत केंद्र, यशवंतराव चव्हाणांच्या पुढाकाराने उभे राहिले तर पुढचे दोन टप्पे नाईक साहेबांनी उभे केले. विदर्भातील कोराडी, पारस, ही औष्णिक केंद्रे नाईकसाहेबांच्या काळात उभी राहिली. चंद्रपूरचे २५०० मेगावॅटचे औष्णिक केंद्र नाईकसाहेबांच्या कारकिर्दीच्या नंतर सुरू झाले असले तरी आर्थिक तरतूद नाईक साहेबांच्याच मुख्यमंत्रिपदाच्या काळात सुरुवातीला झाली होती. विद्युत निर्मिती करीत असतानाच महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात १४ हजार १६७ खेड्यांमध्ये विद्युतीकरणाचे काम नाईक साहेबांच्याच कारकिर्दीत झालेले आहे आणि त्यांच्याच काळात २ लक्ष ३९ हजार ९१५ शेतीपंपांना वीजपुरवठा करण्यात आलेला आहे. शेतीच्या आघाडीवर आणि विजेच्या आघाडीवर अतिशय प्रतिकूल परिस्थितीत नाईक साहेबांनी एवढे मोठे काम उभे करून ठेवले आहे. महाराष्ट्र अन्नधान्याच्या आघाडीवर जो स्वावलंबी झाला ते यश त्यांचेच आहे. पन्नास वर्षांपूर्वी परदेशातून येणाऱ्या अमेरिकेच्या भिकार








गव्हावर जगणाऱ्या महाराष्ट्राला स्वावलंबी करण्याची शपथ नाईकसाहेबांनी घेतली. स्वावलंबी करू शकलो नाही तर मला फासावर द्या, इतक्या तीव्रतेने त्यांनी हा विषय महाराष्ट्राच्या मनावर बिंबवला. हायब्रिड बियाणाचा ध्यास घेऊन महाराष्ट्राच्या त्यांच्या कारकिर्दीतली पहिली पाच वर्षे हायब्रिडचा प्रचार करण्यात त्यांनी खर्ची घातली. बघता बघता उत्पादन वाढत गेले. एकीकडे हायब्रिड, दुसरीकडे शेतीपंपांना वीज. महाराष्ट्राच्या शेतकऱ्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यात नाईकसाहेब कमालीचे यशस्वी झालेले आहेत.

महाराष्ट्राचे म्हणून जे पुरोगामी निर्णय मानले जातात ते महत्त्वाचे सगळे निर्णय वसंतराव नाईक मुख्यमंत्री असतानाच झालेले आहेत. देशपातळीवर स्वीकारली गेलेली रोजगार हमी योजना ही महाराष्ट्राची योजना आहे. वि. स. पागे हे त्याचे संकल्पक आहेत आणि नाईकसाहेब त्याचे निर्माते आहेत.


**महाराष्ट्राचे पुरोगामीपण कशात आहे?**

नाईकसाहेबांनी आणलेल्या या योजनेला त्यावेळचे विरोधीपक्षनेते कृष्णराव धुळप यांनी नुसताच पाठिंबा दिला नाही, तर संसदीय लोकशाहीच्या इतिहासात सरकारने आणलेल्या योजनेसाठी कर बसविण्याचा प्रस्ताव विरोधी बाकावरून मांडण्यात आला. नाईकसाहेबांनी मग विनंती करून तो प्रस्ताव मागे घ्यायला लावला आणि विरोधी पक्षातर्फे मांडलेला प्रस्ताव सरकारने स्वीकारून सरकारने तो मांडला आणि एकमताने तो मंजूर झाला. एस.टी.च्या आणि बसतिकिटाच्या मागे तो पन्नास पैशांचा करभार आहे, हा महाराष्ट्र विधानसभेने टाळ्यांच्या गजरात मंजूर केलेला कर आहे. नाईकसाहेबांच्या या योजनेत सरकारकडे पहिल्या वर्षी १३८ कोटी रुपये जमा झाले. रोजगार हमीवर कोणी कशीही टीका केली तरी रोजगार हमीतून महाराष्ट्रात ५ लाख विकासकामे उभी राहिली आहेत. ग्रामीण महाराष्ट्राचा चेहरा बदलण्याचे काम रोजगार हमीतूनच झाले आहे. नालाबंडिंग, तळ्यातला गाळ काढणे, सपाटीकरण, झाडे लावण्यासाठी खड्डे आणि आता तर शेती नांगरून देण्याचे कामही रोजगार हमीतून केले जात आहे. नाईकसाहेबांची ही योजना देशाने स्वीकारली. दुसरी महाराष्ट्राची अत्यंत पुरोगामी योजना आहे ती म्हणजे कापूस एकाधिकार खरेदीची. ती योजनाही नाईक साहेबांचीच. त्याचे पुरस्कर्ते यशवंतराव मोहिते. प्रामुख्याने विदर्भात कापसाचे पीक आले की, व्यापारी आणि दलाल परदेशातला कापूस नागपूरच्या बाजारात आणून ओतत. खासकरून ईजिप्तचा. शेतकऱ्याचा कापूस भाव पाडून खरेदी करत. व्यापारी, दलाल आणि अडते यांच्या आर्थिक मजबूत लॉबीवर मात करून नाईक साहेबांनी ही एकाधिकार कापूस योजना आणली आणि खरेदीचा अधिकार सरकारनेच घेतला. पहिल्या २५ वर्षांत या योजनेने विदर्भातल्या शेतकऱ्याला ताठ मानेने उभे केले. महाराष्ट्राच्या या दोन्ही पुरोगामी योजना वसंतराव नाईक यांच्याच नावावर



वसंतराव आणि वत्सलांबाईंसोबत दोन बॅरिस्टर, ए. आर. अंतुले आणि रामराव आदिक.

औष्णिक विद्युत प्रकल्पांप्रमाणेच महाराष्ट्रातील मोठी धरणे वसंतराव नाईकसाहेबांच्याच कारकिर्दीत झाली आहेत. यामध्ये महाकाय उजनी, जायकवाडी, अप्पर वर्धा, पेंच, चास, अरुणावती, कालीसरार धोम यांच्यासह ७० धरणांचा समावेश आहे. म्हणजेच अन्नधान्य उत्पादन आणि वीज अशा महत्त्वाच्या आघाड्यांवर नाईकसाहेबांच्या काळात फार मोठे काम झाले. महाराष्ट्राच्या विकासाच्या बांधणीत नाईकसाहेबांना तोड नाही.



महाराष्ट्रातला विरोधी पक्ष जेवढा प्रखर होता त्या प्रखर निखाऱ्याची आज राख झालेली आहे. एस.एम. जोशी, आचार्य अत्रे, कॉ. डांगे, जॉर्ज फर्नांडिस, मृणालताई गोरे, अहिल्या रांगणेकर आणि विदर्भात जांबुवंतराव धोटे अशी प्रचंड ताकदीची मंडळी विरोधी पक्षाच्या बाकावर होती. पण, नाईक साहेबांनी या सर्व नेत्यांशी अत्यंत आत्मीयतेने व्यवहार केला. राजकारणातला विरोध राजकारणापुरता ठेवून व्यवहारात त्यांनी कधीही कटुता येऊ दिली नाही. त्यावेळच्या प्रखर विरोधक मृणालताई गोरे म्हणजे अंगार होता. त्या पुसदला एका कार्यक्रमाला गेल्या होत्या. नाईक साहेबांना नंतर कळले. विधान भवनात भेट झाल्यावर ते म्हणाले, ''ताई, तुम्ही पुसदला जाऊन आलात; मला सांगितले नाहीत. भावाला न कळवता तुम्ही गावाला गेल्या कशा?'' याच मृणालताईंची लाडकी लेक अंजू हिचा विवाह ऐन पावसाळ्यात वसईत होता. मृणालताईंनी नाईक साहेबांना लग्नाला यायचे आमंत्रण दिले. पावसाळा असल्याने हेलिकॉप्टरने जाणे शक्य नव्हते. नेमका त्या दिवशी प्रचंड पाऊस होता. नाईक साहेबांनी मृणालताईंना शब्द दिला होता. भर पावसात नाईक साहेब सौ. वत्सलाताईंना घेऊन वसईला रात्री ९ ला पोहोचले. स्वागत समारंभाला हजर राहिले आणि रात्री २ ला परत आले.

जांबुवंतराव धोटे तुरुंगात असताना त्यांच्या मातोश्री नागपूर येथे आजारी झाल्याचे नाईक साहेबांना कळल्यावर मातोश्रींना मेयो रुग्णालयात त्यांनी दाखल केले आणि जांबुवंतरावांना पॅरोलवर सोडून नागपूरला पाठविण्याची व्यवस्था केली. राजकारणात शत्रुत्व करायचे नाही, अशा उमद्या स्वभावानेच नाईकसाहेब प्रखर विरोधकांनाही मनापासून जिंकत होते. आचार्य अत्रे यांच्यासारख्या प्रखर विरोधकालाही नाईकसाहेबांबद्दल कमालीची आत्मीयता वाटायची. सत्ता कधीही डोक्यात न जाऊ देता, समोरच्याला समजून घेऊन कट्टर विरोधक समोर असतानाही नाईकसाहेबांनी सव्वाअकरा वर्षे राज्यात जो समतोल साधला त्याला तोड नव्हती. वसंतराव नाईक यांच्याबद्दल बोलताना यशवंतराव चव्हाण एकदा म्हणाले होते की, ''वसंतराव नाईक यांची मुख्यमंत्रिपदी जी निवड केली गेली ती किती अचूक आहे हे त्यांच्या कर्तृत्वाने सिद्ध झाले आहे. वसंतराव नाईक आणि वसंतदादा पाटील महाराष्ट्र काँग्रेसचे नाक आणि डोळे आहेत.'' वसंतदादा पाटील हे १९६७ च्या विधानसभा निवडणुकीच्या वेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष होते; आणि वसंतराव नाईक मुख्यमंत्री होते. १९६७ साली नऊ राज्यांत काँग्रेसचे सरकार गेली असताना महाराष्ट्रात काँग्रेसचे २०२ आमदार निवडून आले आणि १९७२ साली २२२ आमदार निवडून आले.

यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री असताना त्यांनी महाराष्ट्रात जिल्हा परिषद पंचायतराज व्यवस्था सुरू केली. पण या व्यवस्थेच्या अगोदर पंचायतराज सूत्र ठरविण्यासाठी वसंतराव नाईक साहेबांच्या अध्यक्षतेखाली (तेव्हा ते महसूलमंत्री होते) एक समिती स्थापन केली. या समितीने २९३ पानांचा अहवाल सादर केला. त्यातूनच महाराष्ट्रात जिल्हा परिषद, पंचायतराज निर्मिती झाली. जिल्हा परिषदेचा मुख्य कार्यकारी अधिकारी आय.ए.एस. असावा ही नाईक साहेबांचीच शिफारस होती. मध्यप्रदेशात उपमंत्री, महाराष्ट्रात मुख्यमंत्री आणि सत्ता असो वा नसो अपार माणुसकीने ओतप्रोत भरलेला हा नेता होता. महाराष्ट्राच्या आजच्या भरभराट झालेल्या चौफेर विकासात नाईक साहेबांचा वाटा खूप खूप मोठा आहे. महाराष्ट्राच्या विकासाचे ते 'महानायक'च होते!

आहेत. चार कृषी विद्यापीठांची निर्मिती नाईक साहेबांच्याच काळात झाली. पण, अकोला कृषी विद्यापीठाच्या निर्मितीचे श्रेय त्यावेळचे आमदार जांबुवंतराव धोटे यांनाही द्यावे लागेल. कारण, अकोल्याला कृषी विद्यापीठ करायचे नाही असा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला असताना जांबुवंतराव धोटे यांनी जी प्रचंड चळवळ उभी केली त्यातून विद्यापीठाचा निर्णय झाला हे मान्य करावेच लागेल. पण, नाईकसाहेबांच्या मनाची ठेवण अशी होती की विरोधकांशी मतभेद झाले तरी त्यांनी ते कधी ताणले नाहीत आणि कटुता येऊ दिली नाही. नाईकसाहेबांच्या काळातला



# वसंतरावांचे ऋण



केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या राजकीय कारकिर्दीचा प्रारंभ वसंतराव नाईक मुख्यमंत्री असताना झाला. पोटनिवडणुकीमध्ये साधारणत: मुख्यमंत्री प्रचाराला जात नाहीत. पण वसंतराव नाईक हे सुशीलकुमार शिंदे यांच्या निवडणूक प्रचाराला गेले. ही निवडणूक सुशीलकुमार शिंदे मोठ्या फरकाने जिंकले. नाईकसाहेबांनी त्यांना लगेच आपल्या मंत्रिमंडळात राज्यमंत्री म्हणून घेतले. त्यानंतर श्री. शिंदे यांचा सतत उत्कर्ष होत राहिला. या लेखात **श्री. सुशीलकुमार शिंदे** यांनी वसंतरावांबद्दलच्या आठवणींना उजाळा दिला आहे.

वसंतराव नाईक हे मुख्यमंत्री असताना मी पोलीस अधिकारी होतो. योगायोगाने मी राजकारणात आलो. १९७४ मध्ये काँग्रेसचा उमेदवार म्हणून विधानसभेची पोटनिवडणूक लढवित होतो. तिकीट जाहीर होताच मी वसंतरावांना भेटायला वर्षा बंगल्यावर गेलो. बंगल्यावर मुख्यमंत्र्यांचे त्यावेळचे सचिव श्री. नाशिककर यांना भेटलो व वसंतरावांची भेट मागितली. नाशिककरांनी मला 'वर्षा'च्या एका हॉलमध्ये बसवले. १ तास होऊन गेला तरी वसंतरावांकडून मला बोलावणे आले नाही. मी नाशिककरांना परत भेटलो व त्यांच्या लक्षात ही बाब आणून दिली. तेव्हा कळले की, नाशिककर कामाच्या गडबडीत मी आल्याचे वसंतरावांना सांगायचे विसरून गेले. त्यांनी माझी क्षमा मागितली आणि लगेच नाईकसाहेबांना मी आल्याचा निरोप देतो, असे त्यांनी मला सांगितले. त्यांनी तत्काळ वसंतरावांना माझ्याबद्दल सांगितले.

अवघ्या ५ मिनिटात वसंतराव मला भेटायला मुख्य हॉलमध्ये आले. त्यांनी माझी विचारपूस केली. आत्मविश्वासाने निवडणूक लढा, मी तुमच्या पाठीशी उभा आहे. काळजी करू नका, असे ते म्हणाले. त्यांनी मला एक पाकीट दिले व निवडणुकीच्या यशासाठी शुभेच्छा दिल्या. त्या पाकिटामध्ये निवडणुकीसाठी लागणाऱ्या खर्चाची रक्कम होती. मी तुमच्या प्रचारासाठी नक्की येईन, असेही त्यांनी कबूल केले.

साधारणत: पोटनिवडणुकीच्या प्रचारासाठी मुख्यमंत्री जात नाहीत. पण, वसंतराव माझ्यासाठी आवर्जून आले. सभेला प्रचंड गर्दी होती. आपल्या भाषणातून त्यांनी श्रोत्यांची मने जिंकली. बोलता बोलता ते म्हणाले, ''अतिशय उज्ज्वल भविष्य असलेल्या एका कार्यकर्त्याच्या प्रचारासाठी मी आलो आहे. त्याच्या हातून महाराष्ट्राची सेवा घडणार आहे, सुशीलकुमार शिंदे यांना निवडून द्या. मी त्यांना नक्की मंत्री करीन.' आम्ही सर्व अवाक् झालो. हे कसे शक्य आहे? माझी पहिलीच निवडणूक. मला कितीतरी आमदार ज्येष्ठ होते. आमचा विश्वास बसत नव्हता. मी निवडून यावे, माझा पराभव होऊ नये, या हेतूने ते बोलले असावेत, असे आम्हाला वाटले.



या निवडणुकीत मी मोठ्या फरकाने जिंकलो. पहिल्यांदाच आमदार झालो आणि वसंतरावांनी आपला शब्द पाळला. नाईक साहेबांनी माझा मंत्रिमंडळात समावेश केला. 'बोले तैसा चाले...' याप्रमाणे माझ्या मतदारसंघातील लोकांना दिलेला शब्द पाळला. माझ्या राजकीय जीवनाला एकदम कलाटणी मिळाली. त्यानंतर मागे वळून पाहण्याची वेळ माझ्यावर आली नाही. चढत्या क्रमाने पुढे-पुढे जात गेलो. नाईक साहेब ज्या खुर्चीत बसून राज्यकारभार करीत होते, त्या खुर्चीत बसण्याची संधी मला मिळाली. राज्यपाल झालो. आज देशाच्या गृहमंत्री पदावर विराजमान आहे. नाईक साहेबांसोबत काम करताना मला राज्य कारभारातील अनेक बाबी कळल्या. त्यांना जवळून पाहता आले. त्यांच्या कामाची पद्धत अभ्यासता आली. समाजातील उपेक्षित घटकांचा सर्वांगीण विकास झाल्याशिवाय राज्याची प्रगती झाली आहे, असे म्हणणे संयुक्तिक ठरणार नाही. त्यामुळे या घटकांसाठी आपण सर्वाधिक लक्ष दिले पाहिजे. त्यांच्यासाठी विविध योजना आखून त्यांची अंमलबजावणी प्रभावीपणे होईल, याकडे स्वत: लक्ष दिले पाहिजे, असे ते नेहमी सांगत. ही बाब मी कायम लक्षात ठेवली.

महाराष्ट्र राज्याचा मुख्यमंत्री झालो तेव्हा सामाजिक न्यायाच्या अनेक योजना आखल्या व त्याची अंमलबजावणी करण्यासाठी कालबद्ध कार्यक्रमसुद्धा राबवला. माझ्या कारकिर्दीला घडवण्यात वसंतरावांचा मोठा सहभाग होता. ते ऋण मी आजन्म विसरणार नाही. त्यांच्या विचारसरणीनेच मी पुढे जात आहे.

नाईक साहेबांचे व्यक्तिमत्त्व उत्तुंग होते. सर्वसामान्य, शेतकरी व वंचित घटकांचे प्रश्न त्यांनी जवळून पाहिले होते. महाराष्ट्राची उभारणी त्यांनी केली. त्यांनी घालून दिलेले आदर्श आणि दिलेली दिशा महाराष्ट्रासाठी प्रेरणादायी आहे.

आज मला लोकसभेचा नेता व केंद्रीय गृहमंत्री म्हणून काम करण्याची संधी श्रीमती सोनिया गांधी यांनी दिली. अशा उच्च पदावर कार्यरत असताना मला नाईक साहेबांची आठवण आल्याशिवाय राहत नाही. त्यांचा दृष्टकोन अतिशय विशाल होता. मी निवडून आल्याबरोबर १९७४ साली मला राज्यमंत्री म्हणून मंत्रिमंडळात घेतले आणि तोच छोटासा कार्यकर्ता आज भारताच्या लोकशाहीच्या सर्वोच्च मंदिरामध्ये नेता म्हणून बसलेला आहे. केवळ नाईकसाहेबांची दूरदृष्टी मला इथपर्यंत पोहचवू शकली, हे मी माझे भाग्य समजतो.

**(शब्दांकन : मोहन राठोड)**







# दुर्दम्य इच्छाशक्ती

वसंतराव नाईक यांनी महाराष्ट्रातील भीषण दुष्काळावर मात करुन शेतकऱ्यांमध्ये नव्या तंत्रज्ञानाची बीजे रोवली आणि अन्नधान्याच्या बाबतीत महाराष्ट्राला स्वंयपूर्ण केले. लालबहादूर शास्त्री यांचा 'जय जवान, जय किसान'चा नारा त्यांनी प्रत्यक्षात उतरविला.

**डॉ. एम. एस स्वामीनाथन**
(ज्येष्ठ कृषी शास्त्रज्ञ)

वसंतराव नाईकांचे शेतीवरील प्रेम सर्वश्रुत आहे. साठच्या दशकात दुष्काळ आणि पावसाच्या पाण्याची अनियमितता यामुळे शेतीचे उत्पन्न वाढत नव्हते. परिणामी अन्नधान्याचा प्रश्न निर्माण व्हायचा, या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री म्हणून वसंतरावांची कारकीर्द निश्चितच स्मरणात राहील. राज्याच्या विकासात कृषी क्षेत्रच महत्त्वाची भूमिका बजावू शकते, असा त्यांचा ठाम निर्धार होता.

कृषी क्षेत्राला पूरक असलेले घटक म्हणजे पशुधन, कुक्कुट, मत्स्य, वन आदी बाबी अत्यंत महत्त्वाच्या आहेत, असे ते म्हणत. महाराष्ट्रातील शेती ही पावसावर अवलंबून आहे आणि पाऊस अनियमित झाला तर ज्वारी, बाजरी, सूर्यफूल, मका आदी जीवनाश्यक असलेले कडधान्यांच्या पिकांचे उत्पन्न कमी यायचे, शेतकरी हताश व्हायचे. लोकांना खायला अन्न मिळत नव्हते. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना दिलासा देणे महत्त्वाचे होते. शेती मोडली तर अर्थव्यवस्था बिघडेल, त्यामुळे शेतीला पर्याय नाही. ८० टक्के लोक शेतीवर अवलंबून असतात, त्यामुळे ते नेहमी चिंतेत असायचे. शेतीचे जीवनमान कसे सुधारेल, पिकाचे उत्पादन कसे वाढेल, याचाच ते विचार करीत असत.

एखाद्या वर्षी शेतीचे उत्पादन वाढले तर शेतकऱ्यांना बाजारपेठा म्हणाव्या तशा उपलब्ध होत नसायच्या, शेती सिंचनाखाली नव्हती, कमी पावसात व कमी दिवसात कोणते पीक घेता येईल, यासाठी ते सातत्याने विविध पातळयांवर चर्चा करत. शेतीत आधुनिक तंत्रज्ञान व संकरित बियाणे आत्मसात केल्याशिवाय शेतकऱ्यांचे दारिद्र्य दूर होणार नाही, या जाणिवेतून त्यांनी १९६५ मध्ये सीएसएच-१ हे ज्वारीचे संकरित वाण महाराष्ट्रात आणले. त्याकाळात पारंपरिक शेतीवर लोकांचा फार विश्वास असायचा. नवीन तंत्रज्ञान

*माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी त्याकाळात 'जय जवान, जय किसान' असा नारा देऊन देशात कृषीक्रांतीची ज्योत पेटविली होती, वसंतराव नाईक यांनी ती ज्योत सतत तेवत ठेवण्याचे काम केले. शेतकऱ्यांमध्ये प्रकाशाची ज्योत पेटविली, निराशेच्या वाटेवर असलेल्या शेतकऱ्यांना दिशा दाखविली. त्यांच्यामधील अंधार त्यांनी दूर केला. त्यांनी नेहमी शेतकऱ्यांचेच हित पाहिले. त्याकाळात त्यांची दुर्दम्य इच्छाशक्ती महाराष्ट्राला सावरू शकली.*



**महाराष्ट्रातील भीषण दुष्काळात अरविंद मफतलाल, मणिभाई देसाई यांच्यासारख्या उद्योपतींना दुष्काळ निर्मूलनाच्या कामात वसंतरावांनी सहभागी करून घेतले. पाणी व चाऱ्याअभावी जनावरे दगावू नयेत म्हणून दानशूरांना जनावरांच्या ठिकठिकाणी छावण्या उघडण्यास त्यांनी प्रवृत्त केले. त्यामुळे जनावरांना चारा मिळाला, पाणी मिळाले आणि जनावरे जगली. साळुंके यांच्या पाणी पंचायतीला व वन पंचायतीला त्यांनी चालना दिली, प्रोत्साहन दिले. राज्यात मोठया प्रमाणावर शेतात विहिरी व छोटे-मोठे बंधारे बांधले गेले. सोनाली, कल्याण सोना या संकरित गव्हाच्या जाती त्यांनी महाराष्ट्रात आणल्या.**


गहुली येथील आपल्या शेतीत मुंबईच्या पत्रकारांसोबत वसंतराव.

आत्मसात करायला कोणीही पुढे येत नसत. अपप्रचारावर लोक विश्वास ठेवायचे. अशा परिस्थितीत वसंतराव नाईक यांनी सर्वप्रथम आपल्या स्वत:च्या शेतात सीएसएच-१ या हायब्रीड ज्वारीचे वाण लावले. ते वाण पहायला वसंतराव लोकांना शेतावर बोलवायचे. त्यांच्यातील गैरसमज दूर करण्यासाठी प्रयत्न करायचे. त्यावेळी कमी दिवसात प्रति क्विंटल ५ टन ज्वारीचे उत्पादन त्यांच्या स्वत:च्या शेतात झाले. हळूहळू शेतकरी त्यांच्या या प्रयोगाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून बघू लागले.

मराठवाडा व विदर्भ हा भाग दुष्काळप्रवण क्षेत्रात येतो. तेथे सातत्याने दुष्काळ पडायचा. अन्नधान्याचा प्रश्न निर्माण व्हायचा. यावर उपाय म्हणजे नवीन बियाणे व नवे तंत्रज्ञान स्वीकारल्याशिवाय बदल घडणार नाही, हे ते जेथे जातील तेथे लोकांना सांगायचे आणि काही वर्षातच फरक जाणवू लागला. 'आधी केले अन् मग सांगितले' या उक्तीप्रमाणे सर्वांच्या समोर त्यांनी आदर्श घालून दिला.

१९७२-७३ चा काळ असेल. ती घटना मला अजूनही आठवते. महाराष्ट्रात भीषण दुष्काळ पडला होता. मुख्यमंत्री म्हणून वसंतराव नाईकांची कसोटी पाहण्याचा काळ होता. परंतु मोठया हिंमतीने व चातुर्याने त्यांनी त्यावर मात केली. आताचे केन्द्रीय कृषीमंत्री शरद पवार या तरुण-उमद्या नेत्यांकडे त्यांनी कृषी खाते सोपविले. त्यांना प्रोत्साहित केले, लोकांच्या हिताचे धडक निर्णय घेण्याचे अधिकार त्यांना दिले. पुणे येथील कृषी महाविद्यालयात या अनुषंगाने श्री. शरद पवार यांनी महत्त्वाची बैठक बोलाविली होती. या बैठकीला मी स्वत: उपस्थित होतो. या बैठकीत नवीन शेती धोरणाची बीजे रोवली गेली. ध्येयधोरणाची आखणी केली गेली. वसंतराव नाईक या बैठकीला उपस्थित होते. शेतकऱ्यांना आपण विश्वास दिला पाहिजे. त्यांच्यामध्ये जागृती निर्माण करता आली पाहिजे, या जाणिवेतून त्यांनी 'उत्पादन हमी कार्यक्रम' जाहिर केला. ज्वारी, बाजरी या अधिक उत्पादन देणा-या संकरित वाणाचा शुभारंभ करण्यात आला. त्यांनतर महाराष्ट्रात एक प्रकारे कृषी चळवळ निर्माण झाली. परिणामी उत्पादन दुपटीने वाढले. महाराष्ट्राचा पाया शेती आहे. शेती टिकली पाहिजे, त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाबरोबरच राजकीय इच्छाशक्ती आणि शेतक-यांचा सहभाग असावा लागतो, तो त्याकाळी महाराष्ट्रात दिसला, म्हणून अन्नधान्याच्या बाबतीत आपण स्वंयपूर्ण झालो, त्याकाळात वसंतराव नाईकांनी महाराष्ट्रात चक्क चार कृषी विद्यापीठांची निर्मिती केली. यामागे त्यांची मोठी दूरदृष्टी होती. राहुरी येथे महात्मा फुले कृषी विद्यापीठ, अकोला येथे डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, परभणी येथे मराठवाडा कृषी विद्यापीठ आणि दापोली येथे कोंकण कृषी विद्यापीठ ही विद्यापीठे कॅलिफोर्नियाच्या धर्तीवर असावीत, शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत तंत्रज्ञान पोहचावे, नवनव्या वाणांची निर्मिती व्हावी, उत्पादन प्रचंड वाढावे आणि शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलावे, अशी त्यांची धारणा होती. या चारही विद्यापीठांनी आपली भूमिका बजाविताना सामान्य शेतकरी डोळ्यासमोर ठेवून कार्य करावे. एकमेकांमध्ये विचारांची देवाण-घेवाण असावी. एकमेकांमध्ये समन्वय ठेवावा, असे ते सांगत.

पशुवैद्यकीय अभ्यास करणाऱ्या पशुवैद्यकीय विद्यार्थ्यांना प्रशिक्षण घेता यावे, त्यांना प्रात्यक्षिके करता यावीत, यासाठी त्यांनी मुंबईच्या आरे मिल्क कॉलनीतील जागा कोंकण कृषी विद्यापीठाला दिली. त्यामागची त्यांची भूमिका दूरदृष्टीची होती, पशुवैद्यकीय विषयाचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना हे क्षेत्र दुय्यम वाटू नये. त्यांच्यामध्ये विश्वास निर्माण करण्याचा त्यांचा हेतू होता. शेतीसाठी पशुधन, कुक्कुटपालन व मत्स्यव्यवसाय हे घटक पूरक ठरू शकते, म्हणून त्यांनी नेहमीच प्रोत्साहन देण्याचे काम केले. शेतजमिनीबरोबरच पूरक व्यवसायाकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. शेतीने दगा दिला तर या पूरक व्यवसायामुळे शेतकऱ्यांना आधार मिळू शकतो, याची त्यांना जाणीव होती. शेती व शेतकरी आणि ग्रामीण जीवनमान त्यांनी अत्यंत जवळून पाहिले होते, आणि ते स्वत: या वातावरणात जगले देखील होते.

आता हवामानात बदल होताना आपण पाहतोय, वाढते तापमान ही समस्या उभी राहत आहे. अशा परिस्थितीत नाईक साहेबांचे स्मरण म्हणून 'हवामान पंचायत' चळवळ राबविण्याची गरज आहे, असे म्हणावेसे वाटते.

**(शब्दांकन : मोहन राठोड)**


# आमचा प्रेरणास्रोत



"आदिवासी तरुणांना वसंतराव नाईकांनी प्रोत्साहन दिले. त्यांच्या पाठीवर हात ठेवला. ग्रामीण समाज जीवनाची नाडी त्यांना माहीत होती. ते सामान्य लोकांची भाषा बोलायचे. कुळकायदा, कसेल त्याची जमीन, आदिवासींच्या नावाने शेत जमीन असे कितीतरी समाजहिताचे निर्णय त्यांनी घेतले. त्यांच्या प्रेरणेमुळेच मी समाजकार्यात अधिक सक्रिय झालो. माझी राजकीय वाटचालही त्यांच्यामुळेच झाली." सांगताहेत **सामाजिक न्याय मंत्री शिवाजीराव मोघे.**

माझे गाव पुसदपासून २२ किलोमीटर अंतरावर होते. पुस धरणामुळे माझ्या खरडा गावाचे १९६६ मध्ये पुनर्वसन झाले. वडील गावचे सरपंच होते. 'एक माणूस गाव पाय' म्हणजे गावातील एका माणसाला संदेश गेला म्हणजे तो संपूर्ण गावाला गेला, अशी त्या काळात प्रचलित पद्धत होती. वसंतराव नाईक यांचे ज्येष्ठ बंधू बाबासाहेब नाईक हे संपूर्ण काम पाहायचे. कार्यकर्ते सांभाळायचे. माझे वडील त्यांचेच कार्यकर्ते होते.

चार वर्षांसाठी मलाही चार गावे फिरावी लागली. लहानपणापासून माझ्यावर नाईक साहेबांचा प्रभाव होता. आम्ही त्यांना काका म्हणायचो. घरात तेच वातावरण होते. काका मुख्यमंत्री झाले, काका येणार आहेत, काकांनी असे निर्णय घेतले, हे सर्व माझ्या कानी लहानपणी पडायचे. नाईक साहेब आमच्या गावात, आमच्या घरी अनेक वेळा आले. त्यांचे बोलणे, त्यांचे बसणे, त्यांचा ऐटदारपणा या गुणांमुळे आम्ही लहान मुलं प्रभावित व्हायचो. पाचवी ते नंतर पदवीपर्यंतचे माझे शिक्षण पुसद येथे झाले.



आदिवासी समाज शिकून पुढे आला पाहिजे, असे काका सांगायचे. सामाजिक कार्याची शिकवण मला घरातूनच मिळाली. त्यामुळे कॉलेजात असताना आदिवासी युवकांची संघटना स्थापन केली. त्या माध्यमातून व्यसनमुक्ती, सामूहिक विवाहाची चळवळ आम्ही राबवू लागलो. दरम्यान, नाईक साहेबांचे लक्ष आमच्याकडे गेले. आदिवासी समाजातील काही तरुण सामाजिक कार्य करीत असल्याचे समजल्यावर त्यांनी आम्हाला बोलावून घेतले. आमचे कार्य त्यांनी जाणून घेतले. एकदा आम्ही त्यांना सामूहिक विवाहासाठी गावात येण्याचे निमंत्रण दिले. रस्ता बरोबर नव्हता. मोटार कार येणार नाही, हे त्यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी जीपने येण्याची तयारी दर्शविली, परंतु मुख्यमंत्री गावात येणार म्हटल्यानंतर रात्रीतून रस्त्याची दुरुस्ती झाली, मुख्यमंत्री गावात वेळेवर आले. सामूहिक विवाहाला तीनच जोडपी मिळाली. मुख्यमंत्री नाराज होतील, याची मनातून भीती वाटत होती, परंतु त्यांनी उलट कौतुकाची थाप आमच्या पाठीवर दिली. सामाजिक कार्याची सुरुवात अशीच होत असते. नाउमेद होऊ नका, असा विश्वास दिला.

एकदा त्यांना आम्ही पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांची भेट घालून देण्याची विनंती केली. त्यांनी लगेच होकार दिला. त्यानंतर आम्ही विसरून गेलो. परंतु, त्यांच्याकडून निमंत्रण आले की, ३० नोव्हेंबर १९७४ ला दिल्लीला जायचे आहे. आमचा आनंद गगनात मावेनासा झाला. खरोखरच आम्ही दिल्लीला गेलो. इंदिरा गांधींची भेट नाईक साहेबांनी घडवून आणली. आम्ही पंतप्रधानांशी बोलतो आहोत, यावर विश्वास बसत नव्हता. आमची मागणी अशी होती की, आदिवासींच्या सवलतींसाठी क्षेत्रीय बंधन उठवले पाहिजे. क्षेत्रीय बंधनामुळे एका तालुक्यातील आदिवासींना सवलती तर दुसऱ्या तालुक्यातील आदिवासी सवलतींपासून वंचित, असा विरोधाभास संपूर्ण देशात होता.

सांगायचं तात्पर्य म्हणजे यवतमाळ जिल्ह्यातील केळापूर तालुक्यातील आदिवासींना शैक्षणिक व राजकीय सवलत, तर त्याच जातीतील पुसद तालुक्यातील आदिवासींना कोणतीही सवलत नसायची. त्यामुळे हे क्षेत्रीय बंधन उठले पाहिजे, अशी आमची मागणी होती. दरम्यान, नाईक साहेबांनी महाराष्ट्रात सवलत देताना क्षेत्रीय बंधन उठविले होते. त्यामुळे आम्हाला शिक्षणासाठी भारत सरकारची शिष्यवृत्ती मिळायची व नोकरीत सवलत होती. "Those who are leave outside specified area" असा जाहिरातीत उल्लेख असायचा. तथापि, केंद्र सरकारच्या नोकरीत ठरावीक भागातील आदिवासींनाच सवलत असायची. हा एकप्रकारे अन्याय होता. एका भावाला न्याय तर दुसऱ्यावर अन्याय होता. या मागणीचा पाठपुरावा मुख्यमंत्री म्हणून नाईक साहेबांनी शासनाकडे वारंवार केला. त्यानंतर आमची पंतप्रधानांची भेट घडवून आणली. त्याचा परिणाम असा झाला, १९७६ मध्ये घटना दुरुस्ती झाली आणि क्षेत्रीय बंधन उठले. त्यामुळे सर्वच आदिवासींना सर्व प्रकारच्या सवलती मिळू लागल्या. याचे श्रेय नाईक साहेबांनाच द्यावे लागेल. याशिवाय दुसरी आठवण म्हणजे, आर्णी तालुक्यातील श्री. गोविंदराव बुचके या आदिवासी कार्यकर्त्यांची विधान परिषदेवर वर्णी लावून आदिवासी समाजाप्रति ऋण व्यक्त केले. ते दोन वेळा आमदार होते. त्यानंतर आजपर्यंत आदिवासी समाजातील एकही व्यक्ती विधान परिषदेवर निवडून **(पान ५४ वर)**



# दूत पर्जन्याचा

ज्येष्ठ साहित्यिक व राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष **मधु मंगेश कर्णिक** यांनी वसंतराव नाईक यांचे जनसंपर्क अधिकारी म्हणून काम बघितले आहे. त्यांच्या सोबतच्या आठवणी श्री. कर्णिक यांनी अतिशय भावपूर्ण आणि रसाळ शब्दांत नोंदवल्या आहेत.



५ डिसेंबर १९६३. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री म्हणून राजभवनावर नुकताच शपथविधी आटोपून नामदार वसंतराव नाईक वर्षा बंगल्यावर परतले होते. महाराष्ट्र राज्याचे ते तिसरे मुख्यमंत्री होते. त्यांच्याबरोबर गेल्या दोन तपांच्या सहचरी सौ. वत्सलाबाई होत्या. १३ वर्षांचा मोठा मुलगा अविनाश होता आणि ५ वर्षांचा गोंडस निरंजन.

मुले त्यांच्या खळाळत्या उत्साहानुसार बंगल्याच्या पायऱ्या दडदडा चढून आत गेली. वत्सलाबाईही मुलांच्या पाठोपाठ संथपणे आत गेल्या. वसंतराव मात्र अद्याप गर्दीच्या तावडीतून मोकळे होत नव्हते. मलबार हिलवरील त्या गर्द झाडीने वेढलेल्या 'वर्षा' बंगल्याच्या आवारात शासकीय आणि खाजगी गाड्यांची रांग लागलेली होती. राजकीय नेते, कार्यकर्ते, चाहते, पत्रकार यांच्या वेढ्यातून साहेबांना घरात कसे न्यावे, या काळजीत नवनिर्वाचित मुख्यमंत्र्यांचे सुरक्षा अधिकारी आणि खाजगी साहाय्यक पडले होते. नाईक साहेबांच्या गळ्यात हार मावत नव्हते. पुष्पगुच्छ, नमस्कार, हस्तांदोलने, मिठ्या आणि शुभेच्छांचे जिव्हाळ्याचे शब्द. कॅमेऱ्यांच्या फ्लॅशचा चकचकाट. सारे वातावरण उत्साहाने उसळत होते.

वसंतराव नाईक त्या गर्दीत कुचंबल्यासारखे उभे होते. या साऱ्या गराड्यातून कधी एकदा बंगल्यात जातो, असे त्यांना झाले होते. विदर्भातून यवतमाळ, पुसद येथून असंख्य माणसे आली होती. मुंबईकरांच्या झकपक गर्दीत ती माणसे हरवल्यासारखी भासत होती. वसंतरावांना त्यांपैकी प्रत्येकाशी बोलायचे होते. एकेक शब्द प्रेमाने बोलत विचारपूस करायची होती. पण, गर्दीतून बाजूला होणे त्यांना कठीण होत होते. जन्मजात सभ्य आणि सुसंस्कारी स्वभावामुळे आलेला काहीसा भिडस्तपणा आडवा येत होता. कुणाचेही मन दुखवावे असे त्यांना वाटत नव्हते. आपल्यावरील प्रेमाने एवढी माणसे जमली आहेत. दूरदुरून आलेली आहेत. त्यांच्या भावना ओळखल्या पाहिजेत. त्यांचा नाइलाज झाला होता. तेवढ्यात वसंतरावांचे थोरले बंधू बाबासाहेब बंगल्याच्या पायऱ्या उतरून खाली आले. त्यांच्याबरोबर त्यांचे मोठे चिरंजीव सुधाकरराव हेही होते. उंचेपुरे आणि रुबाबदार व्यक्तिमत्त्वाचे बाबासाहेब नाईक तेथे येताच वसंतरावांच्या भोवतालची गर्दी आपोआप दूर झाली. वसंतरावांनी पुतण्याच्या, सुधाकररावांच्या खांद्यावर जणू आधारासाठी हात ठेवला. तोच बाबासाहेब म्हणाले- 'साहेबांना आता आत जाऊ द्या- घरची माणसं वाट पाहताहेत.'

सुधाकरराव पुढे आणि वसंतराव मागून असे बाबासाहेबांच्या बरोबर बंगल्यात शिरले. वसंतरावांच्या गळ्यात आणि हातांत भरघोस पुष्पहार होते. 'वर्षा'च्या प्रवेशद्वाराशी वत्सलाबाई सस्मित मुद्रेने त्यांना ओवाळण्यासाठी उभ्या होत्या. दोन बाजूंना अविनाश आणि निरंजन. घरातील माणसे. वत्सलाबाईंनी पतीला ओवाळले. त्यांनी दिलेल्या पेढ्याचा एक तुकडा वसंतरावांनी तोंडात टाकला आणि ते गंभीर मुद्रेने आत आले.

त्याच दिवशी वसंतराव नाईक यांनी आपले मंत्रिमंडळ बनवले. महाराष्ट्राच्या सर्व विभागांना त्यामध्ये प्रतिनिधित्व मिळेल, याची दक्षता त्यांनी घेतली होती. सर्वश्री बाळासाहेब देसाई, प.कृ. सावंत, शांतिलाल शहा, डॉ. गोपाळराव खेडकर, बॅ. शेषराव वानखेडे, शंकरराव चव्हाण, मधुकरराव चौधरी, नरेंद्र तिडके, जी.डी. पाटील, यशवंतराव मोहिते, हरीभाऊ वर्तक, मधुसूदन वैराळे, दादासाहेब जगताप, राजारामबापू पाटील यांसारख्या अनुभवी व प्रशासनावर पक्की मांड असलेल्या सहकाऱ्यांचा समावेश होता.

मुख्यमंत्री या नात्याने महाराष्ट्रातील जनतेला उद्देशून जे भाषण केले त्यामध्ये त्यांच्या भावनांचे, मनाचे आणि भावी कार्यपद्धतीचे उत्कृष्ट प्रतिबिंब पडलेले होते. श्री. यशवंतराव चव्हाणांसारख्या नेत्याबद्दलची कृतज्ञ भावना त्यामध्ये व्यक्त होत होती. कै. कन्नमवारजींच्या आकस्मिक निधनाबद्दलचे दु:ख होते. संकटांतून यशस्वी मार्गक्रमण करणाऱ्या महाराष्ट्राच्या परंपरेचा गौरवपूर्ण उल्लेख होता आणि शेती व औद्योगिक उत्पादनावर भर दिलेला होता. ग्रामीण भागात नव्याने उदयाला येत असलेल्या नव्या

नेतृत्वाचे स्वागत होते आणि सर्वांच्या सहकार्याचे आवाहन होते. महाराष्ट्र राज्य भारतामध्ये नेहमी प्रगतीच्या आघाडीला राहावे हे ईर्षेने सांगितले होते व या कार्यात यशस्वी होण्यासाठी जनतेचे आशीर्वाद त्यांनी मागितले होते.

हे भाषण करून, मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांबरोबर पहिली बैठक आटोपून वसंतराव वर्षा बंगल्यावर परतले तेव्हा वडील बंधू बाबासाहेब त्यांची वाटच पाहत होते. ते प्रेमभराने म्हणाले-

'शेवटी या वर्षा बंगल्यालाच मुख्यमंत्र्यांचा बंगला म्हणून नावलौकिक मिळणार असं दिसतंय.'

होय, बाबासाहेब! छप्पन्न साली आम्ही आपल्या मोठ्या बाबाच्या, अविनाशच्या सहाव्या वाढदिवशी 'वर्षा'वर राहायला आलो, तेव्हापासूनचे सारे दिवस- फक्त गेलं वर्ष वगळता- सुखाचे गेले. तुम्ही आग्रह करत होता, 'सह्याद्री'चा.

तोच वत्सलाबाईही तिथे आल्या. थोरल्या दिरांचा यथायोग्य मान ठेवून त्याही त्यांच्याशी मोकळेपणानं बोलत. नाईक घराण्यात बायकांना बोलण्याचालण्याचं पुरुषांएवढंच स्वातंत्र्य होतं. वत्सलाबाई म्हणाल्या,

वर्षाची पसंती खरंतर माझी. मला हा बंगला प्रथम पाहिला तेव्हाच आवडला होता.

आता तर आम्ही इथं रुळलोच आहोत. आता सह्याद्री नको की विंध्याद्री नको! आपण इथं खूश आहोत.

तेवढ्यात अविनाश आणि निरंजनसुद्धा तिथे आले.

व्हॉट डू यू मीन बाय् वर्षा, काका?

वसंतरावांची मुले वडिलांना काका म्हणत. ही सवय पुसदच्या सुधाकर, मधुकर आणि मनोहर या पुतण्यांची. अविनाश, निरंजननेही तेच नाव उचलले.

वर्षा म्हणजे रेन्स! पाऊस
हाऊ स्वीट!

वत्सलाबाईंच्या मनात आले, वसंत, वत्सला आणि वर्षा- 'व' अक्षराने सुरू झालेली ही नावं- खरंच, हा वर्षा बंगला आपल्याला भाग्याचा ठरेल? या विचाराबरोबर त्यांना असंही वाटून गेलं- याच वर्षा बंगल्यात आपलं गेलं वर्ष फक्त वाईट गेलं. १९६२ चं गेलं साल. त्याच साली आपली एकुलती एक लाडकी लेक बेबी आपणास दुरावली. वसंतरावांना राजकारणातले काही कटू प्रसंग त्याच वर्षी अनुभवावे लागले. आणि त्याच या बंगल्यामध्ये आज मी मुख्यमंत्र्यांची पत्नी म्हणून इतमामाने वावरतेय. त्यांना आठवलं, १९५६ साली वसंतरावांबरोबर त्या मुंबईला आल्या. नोव्हेंबरची ७ तारीख होती ती. अविनाशचा वाढदिवस होता. वर्षा बंगल्याचं इंग्रजी अमदानीतलं नाव होतं- 'डग बीगन' (Dug Began). वसंतराव नाईकांनी त्याचं 'वर्षा' हे नामांतर केलं. त्या दिवसापासून नाईक कुटुंब तिथं राहिलं. विदर्भ कुठे, मुंबईचा मलबार हिल कुठे! विदर्भात पुसद, गहुली भागात दिसणारी झाडं, वनस्पती किती वेगळी! सागवान, हेदू, अंजन यासारखी प्रचंड झाडं. वर्षाच्या आवारात वसंतरावांनीच सारी झाडं लावलेली. आंब्याची, लिंबाची, सुपारीचीही. ते माळ्याला म्हणायचे, 'मी झाडं लावीन ती माझ्यासाठीच आहेत असं समजू नकोस. पुढील काळात ती कुणालाही उपयोगी पडायला हवीत.'

हाच वर्षा बंगला वसंतराव आज मुख्यमंत्री झालेले पहात आहे.

वत्सलाबाई आठवणीत रमल्या होत्या, आणि वसंतराव फोनवर कुणाशी तरी बोलत होते. फोन बहुधा दिल्लीचा असणार. बहुधा यशवंतरावांचाच- नाईक साहेबांच्या बोलण्याच्या पद्धतीवरून वत्सलाबाईंनी ओळखले.

वत्सलाबाईंना वर्षा बंगल्यात बऱ्याच सुधारणा करायचं मनात होतं. पण, वसंतरावांचा सौम्य विरोध होता. ते म्हणत, 'आपण काय आज मंत्री आहोत, उद्या कदाचित नसूही! आपल्या खातर सरकारवर खर्चाचा बोजा नको.'

याच वसंतरावांनी पुसदच्या घरात नाना तऱ्हेचे नवनवीन फर्निचर, क्रॉकरी, गालिचे एके काळी हौसेने आणलेले होते. पुसदच्या घरी ते वकिली करीत असताना कधी कधी नागपूर, मुंबईकडचे पाहुणे येत. मुंबईलाही पाहायला न मिळणारी उंची क्रॉकरी नाईकांच्या घरात पाहून त्यांना नवल वाटे. असा उत्तमोत्तम चिजांचा शौक असणारे वसंतराव आज महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले तरी जुने फर्निचर बदलून नवे आणण्याची गोष्ट काढत नव्हते.

वत्सलाबाई मनात म्हणाल्या, आपण त्यांना इतकी वर्षे ओळखतो. ते कोणतीही गोष्ट विचारपूर्वकच ठरवतात. ती सहसा चुकीची ठरत नाही. मग, ती राजकारणातील असो, घरातील असो किंवा गावाकडील शेतीची असो.

आजवरचा हाच अनुभव होता. मुख्यमंत्री म्हणून महाराष्ट्र राज्याच्या कारभाराची सूत्रे हाती घेताना वसंतराव नाईक यांच्या मनात भावी कार्यक्रमाविषयी निश्चित स्वरूपाच्या काही कल्पना होत्या. आपले मंत्रिमंडळ बनवल्यानंतर त्यांनी सहकाऱ्यांबरोबर त्याबद्दल प्रथम चर्चा केली. मंत्रिमंडळातील त्यांचे सहकारी आपापल्या परीने अनुभवी आणि कार्यक्षम होते. त्यांना



पंडित नेहरू, विजयालक्ष्मी पंडित यांच्या समवेत वसंतराव व वत्सलाबाई.





मुख्यमंत्र्यांच्या धोरणाबद्दल, भावी योजनांबद्दल खुले मतप्रदर्शन करण्याचा स्वायत्त अधिकार सुरुवातीपासूनच वसंतराव नाईक यांनी दिलेला होता.

महिनाभरातच त्यांनी काही महत्त्वाचे निर्णय घेतले. राज्याच्या विविध भागांतील ६१ कार्यकर्ते, नेते, 'राजबंदी' म्हणून कारागृहामध्ये अडकलेले होते. त्या सर्वांची त्यांनी एका आदेशान्वये मुक्तता केली. त्यामध्ये 'मराठा'चे संपादक आणि प्रख्यात साहित्यिक आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांचा समावेश होता. कटुतेपेक्षा सदिच्छेमुळे गोष्टी सोप्या होतात, असं ते म्हणायचे. पण सोपेपणा म्हणजे तडजोड नव्हे, हा व्यवहारीपणासुद्धा त्यांना ठाऊक होता.

डिसेंबर १९६३ च्या अखेरीस 'विदर्भ परिषदे'मध्ये त्यांनी नागपूरचे महत्त्व कायम ठेवले जाईल, अशी घोषणा केली. तिच्या मागेही ही सदिच्छा होती.

वास्तवाचे भान ठेवून महाराष्ट्राच्या सर्व भागांच्या विविध समस्यांचे निराकरण करीत, विरोधकांशीही स्नेहसंबंध वाढवीत, पक्ष संघटना अभेद्य ठेवून पक्षनेत्यांबरोबर जिव्हाळ्याचे, एकात्म संबंध राखून महाराष्ट्र प्रगतिपथावर नेण्याचे त्यांचे धोरण जाणकारांना स्वागतार्ह वाटत होते. सहकाऱ्यांना, अधिकाऱ्यांना स्वीकारार्ह वाटत होते.

१९६४ च्या मेमध्ये पंडित जवाहरलाल नेहरू मुंबईला आले होते. प्रकृती फारशी चांगली नव्हती. १८ मे रोजी ते मुक्कामाला राजभवनावर होते. राज्यपाल विजयालक्ष्मी पंडित या नेहरूंच्या भगिनी होत्या. वसंतरावांचे त्यांच्याशी फार जिव्हाळ्याचे संबंध होते. वसंतरावांनी पंडितजींना आणि विजयालक्ष्मींना आपल्या घरी भोजनाचे निमंत्रण दिले आणि ते दोघांनीही स्वीकारले.

वर्षा बंगल्याच्या हिरवळीवरच वत्सलाबाईंनी 'डिनर'ची व्यवस्था केली होती. पंडितजी वसंतरावांच्या सहवासात प्रसन्नचित्त होते. ते थोडेच पण मनापासून जेवले. जेवणानंतर हापूस आंब्याची त्यांनी आवडीने चव घेतली.

जेवण झाले आणि स्वस्थपणे हिरवळीवरच खुर्च्या टाकून गप्पा सुरू झाल्या. वसंतरावांनी आपला पाईप काढला आणि ओढायला सुरुवात केली. पंडितजी गमतीने म्हणाले-

'नाईक साहेब, पाईप सोडावासा नाही वाटत?'

'पंडितजी! जी चीज सोडावी लागेल ती मी कधीच स्वीकारलेली नाही,' वसंतराव आदबशीरपणे उद्‌गारले. पंडितजी खुशीने हसले.

मग, वसंतराव म्हणाले-

'मी येत्या महिन्यात युगोस्लाव्हियाला जावं म्हणतोय! गोव्याच्या चौगुल्यांच्या बोटी आमच्या कोकण किनाऱ्यावर प्रवासी वाहतुकीसाठी सुरू व्हायच्या आहेत. त्यांचा स्वीकार करण्यासाठी.'

'अवश्य जा! टिटोसाहेब आपले मित्र आहेत. त्यांना मीही पत्र लिहीन, तुम्ही येणार आहात म्हणून..'

'बरोबर मिसेस नाईकांनाही न्यावं म्हणतो आहे.'

'जरूर न्या! युरोपियन लोकांना एकट्याने भेटीला गेलेलं आवडत नाही. तुम्ही मिसेस नाईकांना न्याच. आणि मॅडम, तुम्ही नाही म्हणू नका.'

वत्सलाबाईंनी मूकपणेच कृतज्ञभाव व्यक्त केले.

पंडितजी दिल्लीला जाण्यासाठी राजभवनावरून जेव्हा सांताक्रुझ विमानतळावर गेले, तेव्हा वसंतराव आणि वत्सलाबाई त्यांना निरोप देण्यासाठी गेले होते. तोच शेवटचा निरोप ठरला. पंडितजी शिणलेले भासत होते. विमानतळावरही नेहमीची गर्दी नव्हती. नेहरू विमानाच्या पायऱ्या उतरून चार पावलं मागे आले आणि त्यांनी छोट्या निरंजनाच्या गालावर चापट मारली. त्याला कुरवाळल्यासारखे केले आणि ते संथपणे पायऱ्या चढून विमानात शिरले.

त्यानंतर जेमतेम नऊ दिवसांनी त्यांचे दिल्लीला देहावसान झाले.

नेहरूंच्या निधनाची वार्ता ऐकताच वसंतराव क्षणभर खचून गेले. पण, दुसऱ्याच क्षणी त्यांनी स्वत:ला सावरले. पंडितजींच्या अंत्ययात्रेला ते वत्सलाबाईंसह उपस्थित राहिले.

पंतप्रधान आणि मुख्यमंत्री या नात्याने त्या दोघांचा संबंध गेल्या फक्त सहा महिन्यांचा, पण त्या अल्पकाळात वसंतराव नाईकांनी पंडितजींचा आधीचा विश्वास अधिकच दृढ केला होता. वसंतरावांचे लोकाभिमुख राज्यकारभाराचे धोरण पंतप्रधानांना मनोमन आवडल्याचे अनेक उदहरणांवरून सांगता येईल. त्यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर पहिल्याच आठवड्यात सीमावासीयांचा एक प्रचंड मोर्चा महाराष्ट्राच्या विधानसभेवर आला होता. ज्येष्ठ नेते बा.र. सुंठणकर मोर्चाच्या अग्रभागी होते. या मोर्चाचे जणू स्वागत करावे अशा रीतीने मुख्यमंत्री नाईक आपल्या विधानसभेतील कार्यालयातून उठून सामोरे गेले! हा एक नवा पायंडा होता. आणि तो पंडितजींना फारसा आवडला नव्हता! पण, जेव्हा

*आपल्या सरकारचा कारभार हा लोकाभिमुख असला पाहिजे, सामान्य माणसाचा त्यामध्ये प्रामुख्याने विचार झाला पाहिजे, महाराष्ट्र राज्याला मुंबईसारखे समृद्ध शहर राजधानी म्हणून लाभले आहे आणि मुंबईबाहेरील उर्वरित महाराष्ट्राची विकासक्षमता अमर्याद आहे, याचे भान ठेवून आपल्या कारभाराची व्यवहार्य आखणी आपण केली पाहिजे. धान्योत्पादन, औद्योगिक उत्पादन यांची कमाल वाढ आणि सर्व नैसर्गिक तसेच मानवनिर्मित साधनसामग्रीचा कमाल उपयोग यांवर आपला भर असला पाहिजे, हे वसंतराव नाईकांच्या विचारांचे सूत्र होते. त्या दृष्टीने त्यांनी धोरण आखण्यास व त्याबरहुकूम पावले टाकावयास सुरुवात केली. प्रत्येक पाऊल व्यवहार्य असले पाहिजे यावर नाईकसाहेबांचा कटाक्ष होता.*

वसंतरावांची आणि नेहरूंची भेट झाली, तेव्हा वसंतरावांनी आपण होऊनच स्पष्टीकरण करून नेहरूंचा गैरसमज दूर केला. महाराष्ट्रासमोरील त्यावेळचे मुख्य प्रश्न म्हणजे सीमातंटा, कृष्णा-गोदावरी पाणीतंटा, दारूबंदीच्या धोरणाचा पुनर्विचार असे होते. त्यासंबंधी त्यांनी पंतप्रधानांशी वेळ ठरवून सविस्तर चर्चा केली होती आणि त्यांचे सहकार्य मागितले होते.

पंतप्रधान नेहरूंचे असे आकस्मिक निधन झाले नसते तर महाराष्ट्राचे अनेक प्रश्न वसंतरावांना आपल्या सौहार्दाच्या बळावर सोडविता आले असते.

नेहरूंच्या निधनानंतर त्यांचा उत्तराधिकारी ठरविण्याबाबत दिल्लीमध्ये हालचाली सुरू झाल्या. मोरारजीभाई यांना पंतप्रधानपदाची महत्त्वाकांक्षा होती. पण, काँग्रेस अध्यक्ष कामराज यांनी बहुमताचा, 'कन्सेन्सस्'चा मुद्दा पुढे आणला. कन्सेन्सस्‌मध्ये मोरारजीभाईंना एकमुखी वा बहुमुखी पाठिंबा दिसेना. या सर्व प्रक्रियेमध्ये महाराष्ट्राचे मुख्यमंत्री या नात्याने आणि इतक्या वर्षांमध्ये सर्वांशी जोडलेल्या स्नेहसंबंधामुळे वसंतराव नाईक यांच्या शब्दाला फार मोल प्राप्त झाले होते. त्यांनी लाल बहादूर शास्त्रींच्या नावाचा शांतपणे पण ठामपणे पाठपुरावा चालविला. यशवंतराव चव्हाण, कामदार आदी श्रेष्ठींचे मत त्यांच्यासारखेच होते.

मोरारजींनी एकमताने आपली निवड होत नाही हे पाहून नाव मागे घेतले आणि लाल बहादूर शास्त्री हे एकमताने भारताचे पंतप्रधान झाले.

पंडित नेहरूंच्या परिचयाच्या कित्येक दिवस आधी वसंतरावांची आणि शास्त्रीजींचा चांगला परिचय होता. १९५२ साली मध्यप्रदेशात असताना वसंतरावांना विधानसभेचे तिकीट प्रथमच मिळवून देण्यात शास्त्रीजींचाच मोठा हात होता.

शास्त्रीजींची पंतप्रधानपदी निवड होताच नाईक समाधानी मनाने मुंबईला परत फिरले. जसे महाराष्ट्राचे प्रश्न पंडितजी असताना आपण त्यांच्यासमोर मांडत होतो, तसेच यापुढे लाल बहादूरजींसमोरही मांडता येतील, याचा त्यांना विश्वास वाटत होता.

जून १९६४ अखेरीस वसंतराव वत्सलाबाईंसह युगोस्लाव्हीयाला गेले. युरोपचा हा त्यांचा पहिलाच दौरा होता. युगोस्लाव्हीयातील

> कोणत्याही प्रश्नामध्ये आपली भूमिका प्रांजळ आणि सद्‌सद्‌विवेकाला धरून असेल तर डगमगण्याचे मुळीच कारण नाही, असे वसंतराव नेहमी म्हणत आणि त्याप्रमाणे प्रत्यक्षात त्यांचे वागणे असे.



महाराष्ट्राचे भाग्यविधाते: वसंतराव, यशवंतराव आणि वसंतदादा.

औद्योगिकीकरणाबरोबरच तेथील सहकारी शेती हा त्यांचा निरीक्षणाचा विषय होता. मार्शल टिटोंची व त्यांची मात्र भेट होऊ शकली नाही.

परदेशाहून ते परतले तोवर विधानसभेचे पावसाळी अधिवेशन येऊन ठेपले होते. त्या अधिवेशनाच्या प्रारंभीच विरोधी पक्षाने नाईक मंत्रिमंडळावर अविश्वासाचा ठराव मांडला. मुख्यमंत्री नाईक यांची हा ठराव म्हणजे एक कसोटी होती. त्या ठरावावर २७ व २८ जुलै १९६४ या दोन दिवशी गरमागरम चर्चा झाली व त्याला मुख्यमंत्र्यांनी शांतपणे, सविस्तर उत्तर दिले. त्यांच्याविरुद्धचा अविश्वासाचा ठराव ३२ विरुद्ध १८२ मतांनी फेटाळला गेला...

परंतु, आपला युगोस्लाव्हीयाचा दौरा एका खाजगी उद्योगपतीने आयोजित केला होता, व त्याला आपण कबुली दिली ही चूकच झाली, असेही त्यांनी विधानसभा सदस्यांसमोर सांगून टाकले.

१९६५ मध्ये पुन्हा देशामध्ये युद्धाचे वातावरण पसरले. ६२ साली शत्रू चीन होता, या वर्षी पाकिस्तानबरोबर मुकाबला होता.

वसंतरावांनी गेल्या खेपेप्रमाणेच याही खेपेला युद्ध-प्रयत्नांसाठी, स्वयंपूर्णतेसाठी व जनतेचे मनोधैर्य टिकवण्यासाठी जोरदार आघाडी सुरू केली. सप्टेंबरमध्ये दिल्लीला भरलेल्या मुख्यमंत्र्यांच्या परिषदेनंतर त्यांनी मुंबई-महाराष्ट्रामध्ये जाहिर सभा घ्यावयास सुरुवात केली. शेतकरी, कामगार, उद्योगपती, विद्यार्थी, महिला, डॉक्टर्स, इंजिनीअर्स, सरकारी नोकर, वकील आणि अन्य सर्व व्यावसायिक यांनी युद्धप्रयत्नांमध्ये सर्व प्रकारे सामील झाले पाहिजे, हे त्यांच्या बोलण्याचे सूत्र असे. नागरिक संरक्षण समितीची त्यांनी पुनर्रचना केली. देशाची युद्ध-साहित्याची गरज महाराष्ट्र भागवू शकेल, असे त्यांनी केंद्र सरकारला सांगितले; आणि पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांनी स्वत: महाराष्ट्रामध्ये येऊन जनतेमध्ये अधिक चैतन्य निर्माण करावे, अशी त्यांना विनंती केली.

याचप्रमाणे संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण यांनाही 'सह्याद्रीने आपणास महाराष्ट्र जागविण्यासाठी बोलाविले आहे' असे आवाहन केले व संरक्षणमंत्री मुंबई-पुण्यास येऊन त्यांनी तेथे प्रचंड जनसमुदायाच्या सभा घेतल्या. त्याच प्रसंगी पुणे येथे शनिवारवाड्यासमोर ३ ऑक्टोबर १९६५ रोजी वसंतरावांनी ती ऐतिहासिक घोषणा केली-

'दोन वर्षांमध्ये महाराष्ट्र अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला नाही, तर मला शनिवारवाड्यासमोर फाशी द्या!'





अशी नाट्यमय घोषणा करणे हा नाईक यांचा स्वभाव नव्हता; त्यामुळे अनेकांना त्याचे आश्चर्य वाटले. वृत्तपत्रांतून त्या घोषणेला मोठी प्रसिद्धी मिळाली. विरोधी पक्षांना, विरोधी लिहिणाऱ्या पत्रकारांना, अनेक दिवस ही घोषणा कुचेष्टा करण्यासाठी उपयोगी पडत होती. परंतु वसंतरावाच्या त्या उद्‌गारांमागील तळमळ खरीच होती. केवळ भडकपणे, सवंग बोलावे, ही त्यांची वृत्ती नव्हती. अशा घोषणा शब्दार्थाने घ्यावयाच्या नसतात, हे विरोधकांना कोण सांगणार? पण, एवढी टीका होऊनही वसंतराव स्वस्थ होते. त्यांनी अवाक्षरानेही त्या टीकेचा प्रतिवाद केला नाही. परंतु, शेतीचा विकास आणि अन्नधान्य आघाडी बळकट करण्यासाठी प्रयत्न त्यांनी अविरतपणे चालू ठेवले.

आज वसंतराव नाईक यांच्या अविश्रांत प्रयत्नांची फळे महाराष्ट्र चाखत आहे. महाराष्ट्राची शेती समृद्ध व्हावी, इथला शेतकरी उपासाने तडफडू नये हीच त्यांची एकमेव इच्छा होती. महाराष्ट्राच्या सर्व विभागांत कृषिविद्यापीठे कालांतराने त्यांच्याच प्रयत्नाने उभी राहिली. आज महाराष्ट्र अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झालेला आहे.

पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री हे १७ ऑक्टोबरला मुंबईला आले. आझाद मैदानावर अतिप्रचंड सभा झाली. त्या सभेत भारताचे वामनमूर्ती पंतप्रधान हिमालयाएवढे उत्तुंग होऊन गरजले, 'पाकिस्तान काश्मीरसाठी एक हजार वर्ष लढण्याच्या गोष्टी करत आहे; पण आम्ही त्यांना बजावून सांगतो की जगाच्या अंतापर्यंत जरी ते लढत राहिले तरी काश्मीर त्यांना मिळणार नाही. तसेच छांब विभागातून पाकिस्तानी फौजा मागे हटल्या नाही, तर लाहोर भागातून भारतीय सेनादलही मागे फिरणार नाही.'

या सभेत मुख्यमंत्री या नात्याने वसंतराव थोडाच वेळ बोलले, पण त्यावेळीही अन्नधान्यामध्ये स्वयंपूर्ण होण्याच्या निर्धाराचा त्यांनी पुनरुच्चार केला आणि संरक्षणविषयक साहित्य-मग ते कोणतेही असू द्या-महाराष्ट्र त्याचे उत्पादन पार पाडण्यास समर्थ आहे, अशी आत्मविश्वासपूर्ण ग्वाही त्यांनी पंतप्रधानांना म्हणजेच भारताला दिली.

या युद्धकाळात संरक्षण-मोहिमेसाठी तीन महिन्यांत पंचवीस कोटी संरक्षण बचत योजनेमध्ये गुंतवायचे साध्य मुख्यमंत्र्यांनी ठरविले होते व ते मुदतीत सफल झाले.

सर्व महाराष्ट्रामध्ये देशभक्तीची व संरक्षण प्रयत्नांची एक अभेद्य लाट निर्माण झाली होती व तिचा वेग कायम ठेवण्यात मुख्यमंत्री वसंतराव नाईक यशस्वी झाले होते.

वसंतरावांचा १ जुलै रोजी येणारा वाढदिवस त्यांचे कुटुंबीय, स्नेही आणि कार्यकर्ते दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरा करीत. अनेक वर्ष ती प्रथा चालत आली होती. ते मुख्यमंत्री झाल्यावर या वाढदिवस समारंभाला एखाद्या उत्सवाचे स्वरूप येऊ लागले आणि ते टाळणे वसंतरावांच्या ऋजू स्वभावाला मानवणारे नव्हते. असाच १९६६ चा वाढदिवस यवतमाळ जिल्ह्यातील लोकांनी मोठ्या थाटामाटात साजरा करावयाचे ठरवले. त्यासाठी दिल्लीहून यशवंतराव चव्हाणांना निमंत्रण पाठविण्यात आले आणि त्यांनी येण्याचे मान्य केले.

पण, वसंतरावांना जेव्हा त्या महोत्सवासारख्या मोठ्या कार्यक्रमाची माहिती झाली, तेव्हा त्यांनी आपल्या स्नेह्या-सोबत्यांची समजूत घालून तो कार्यक्रम रद्द करायला लावला. त्यांना परमपूज्य असलेले लाल बहादूर शास्त्री यांच्या निधनाच्या पार्श्वभूमीवर आपला सत्कार व्हावा हे त्यांना पटत नव्हते. राज्यामध्ये दुष्काळी परिस्थिती होती, ते वेगळेच.

पण, यशवंतराव चव्हाण त्यांना शुभेच्छा देण्यासाठी आले. वर्षा बंगल्यावर साध्या, अनौपचारिक पद्धतीने वसंतरावांचा तो वाढदिवस साजरा झाला. ठरल्याप्रमाणे यवतमाळ जिल्ह्यामार्फत त्यांना एक लक्ष त्रेपन्न हजार रुपयांची देणगी देण्यात आली. त्या रकमेमध्ये स्वत:च्या ११,१५३ रुपयांची भर घालून तो निधी त्यांनी सार्वजनिक कार्यासाठी उपलब्ध केला. याप्रसंगी यशवंतराव चव्हाण जे शुभेच्छानिदर्शक बोलले ते फार महत्त्वाचे होते. ते म्हणाले, मी मुख्यमंत्री झालो तेव्हा शेतकऱ्याचा मुलगा मुख्यमंत्री झाला, असे अभिमानाने सांगण्यात आले. मी शेतकऱ्याचा मुलगा असलो तरी शेतकरी नाही. पण, आता वसंतरावांच्या रूपाने महाराष्ट्राला पहिला शेतकरी मुख्यमंत्री लाभला आहे. त्यांनी महाराष्ट्राच्या शेतकऱ्यामध्ये जो विश्वास निर्माण केला आहे, त्यामुळे महाराष्ट्राचाच नव्हे, तर भारताच्या शेतीचा गुंतागुंतीचा प्रश्न आपण सोडवू शकू, अशी आशा निर्माण झाली आहे. शेतीचा त्यांना छंद आहे. शेतीच्या प्रत्यक्ष अनुभवामुळे व जिव्हाळ्यामुळे नवीन दृष्टी देण्याचे सामर्थ्य त्यांना लाभले आहे. गेल्या तीन-साडेतीन वर्षांत श्री. वसंतराव यांनी महाराष्ट्राचा कारभार अत्यंत खंबीरपणे, आत्मविश्वासाने व तितक्याच समतोलपणे हाकला. दु:खी जनतेची दु:खे दूर करण्याचा त्यांनी श्रद्धेने प्रयत्न केला आहे. महाराष्ट्राचा कारभार त्यांनी इतक्या शोभायमान पद्धतीने चालविला आहे की, साऱ्या भारतात महाराष्ट्राचा लौकिक होत आहे. महाराष्ट्राच्या या यशाची व लौकिकाची जबाबदारी व श्रेय श्री. नाईक यांचेच आहे. श्री. वसंतराव नाईक यांच्या हातांत महाराष्ट्राची प्रगती व भवितव्य सुरक्षित आहे.

पंचवीस-सत्तावीस वर्षांपूर्वी ज्यांनी नाईकांच्या शेतीच्या वेडाची कुचेष्टा केली तेच आज त्यांचे नाव घेऊन म्हणताना आढळतात की, वसंतराव नाईकांनी महाराष्ट्रात कृषिविषयक सुबत्तेचा पाया घातला!

# प्रगतिशील शेतकरी



'वसंतराव नाईक यांना हरितक्रांतीचे जनक, राजकारणातील राजहंस, महाराष्ट्राचा भाग्यविधाता, हरितक्रांतीचा प्राणवायू, देवमाणूस, सज्जन माणूस, कृषी विद्यापीठांचा शिल्पकार, नायक नव्हे महानायक, तडफदार मुख्यमंत्री, दिलखुलास मुख्यमंत्री अशा अनेक पदव्यांनी महाराष्ट्राच्या जनतेने भूषवले आहे. पण, माझ्या मते खऱ्या अर्थाने काका म्हणजे स्वतःच्या शेतात प्रचंड आर्थिक झीज सोसून नवनवे प्रयोग करणारे प्रगतिशील शेतकरीच होते,' असे सांगताहेत राज्याचे **अन्न व औषध प्रशासन मंत्री** आणि स्व. वसंतराव नाईक यांचे पुतणे **श्री. मनोहरराव नाईक.** ज्येष्ठ पत्रकार **न. मा. जोशी** यांनी त्यांची लोकराज्यच्या विशेषांकासाठी मुलाखत घेतली. या मुलाखतीत त्यांनी वसंतरावजींच्या अनेक हृदयस्पर्शी आठवणी सांगितल्या.

लोकराज्यच्या डिसेंबर २०१२ च्या विदर्भ विशेषांकासाठी माझे काका दिवंगत माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या संबंधीची माझी मुलाखत प्रसिद्ध करावयाची इच्छा माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या महासंचालकांनी व्यक्त केली तेव्हा क्षणभर मी भूतकाळात रमून गेलो. कळत नकळत माझे डोळे पाणावले. भूतकाळ किती झपाट्याने निघून गेला हे समजलेही नाही. काकांच्या आठवणींनी डोळ्यांत येणारा अश्रूंचा पूर पापण्यांच्या इवल्याशा बांधाने अडवणे कठीण होते. याचे कारण असे की, काकांचे म्हणजे वसंतराव नाईक यांचे माझ्यावर अतोनात प्रेम होते. मनू या नावानेच ते मला बोलवत असत. त्यांच्या प्रेमाची, मायेची पाखर मला आजही ऊब देत आहे.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्रिपद आमच्या घरात एका तपापेक्षा जास्त काळ राहिले. माझे वडील बंधू दिवंगत सुधाकरराव नाईक हेसुद्धा मुख्यमंत्री होते. या दोन्ही व्यक्तींनी मुख्यमंत्री पदाचा गौरव वाढवला. सत्ता ही स्वार्थासाठी वापरावयाची नसून लोककल्याणासाठी व समाजसेवेसाठी वापरावयाची असते हा आदर्श घालून दिला आहे.

''काका वसंतराव नाईक जेव्हा मुख्यमंत्री होते तेव्हाचा राजकारणाचा थाट वेगळा होता. राजकीय स्थैर्य होते. त्यामुळे निर्णय घेण्याची प्रक्रिया गतिमान होती,'' काका दीर्घकाळ मुख्यमंत्री होते; पण त्यांची नाळ शेती आणि शेतकऱ्यांशीच जुळलेली होती. त्यामुळेच ते महिन्यातून एक-दोन दिवस यवतमाळ जिल्ह्यातील आमचे जन्मगाव असलेल्या गहुली येथे येत असत. थेट शेतात जाऊन कृषी तंत्रज्ञानाचे वेगवेगळे प्रयोग करीत असत.



ज्वारीच्या शेतात वसंतराव.

पुसद येथील आपल्या बंगल्यावर काका यायचे तेव्हा जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यापासून तर लहान-मोठे अनेक अधिकारी हजर असायचे. त्या सर्वांशी थोडा वेळ बोलून, तुम्ही आता निघा, मला शेतावर जायचे आहे, असे सांगून दिवसभर शेतात कृषी तंत्रज्ञानाचे प्रयोग करीत बसायचे हे सर्व प्रयोग अत्यंत खर्चीक, महागडे व तोट्याचे होते म्हणून माझे वडील म्हणजेच नाईक साहेबांचे वडील बंधू बाबासाहेब नाईक रागवायचे. हा तोट्याचा धंदा कशाला हवा ? असे जेव्हा बाबासाहेब म्हणायचे तेव्हा काका त्यांना सांगायचे की, आपली खर्च करण्याची ऐपत आहे. आपण तोटा किंवा नुकसान सहन करू शकतो. सामान्य शेतकरी कृषी तंत्रज्ञानाचे असे प्रयोग करू शकणार नाही. मात्र, आपण केलेल्या यशस्वी प्रयोगांमुळे शेतकरी बांधवांचा लाभ होत असेल तर नुकसान सहन करून आपण शेतकऱ्यांच्या भल्यासाठी झीज सोसली पाहिजे. नाईक साहेबांच्या मनात शेती आणि शेतकऱ्यांबद्दल किती कणव होती याचे हे



ज्वलंत उदाहरण आहे. प्रथम आपण त्यांच्याशी संपर्क स्थापित केला पाहिजे. आपण त्यांच्या दु:खात सहभागी झाले पाहिजे. तेव्हाच आपण जनतेचे खरेखुरे प्रतिनिधित्व करू शकू, असे नाईक साहेबांना वाटायचे. राज्यातील विविध क्षेत्रांत काम करणाऱ्यांच्या प्रश्नांबरोबरच शेतकऱ्यांचे शाश्वत आणि सार्वत्रिक प्रश्न नाईक साहेबांनी हाताळले; कारण ते मानवी स्वभावाच्या दौर्बल्यातून निर्माण झालेले होते याची नाईक साहेबांना जाणीव होती. नाईकसाहेब कमालीचे शालीन होते. माणसांचे आणि राष्ट्राचे भवितव्य ठरविण्याची ज्या अनेकांना संधी मिळाली त्या संधीचा मी एक पाईक आहे, असे नाईकसाहेब म्हणायचे. नाईकसाहेबांनी हायब्रिड ज्वारीचे प्रयोग केले, धानाचे प्रयोग केले, सुधारित जातीच्या टोमॅटो लागवडीचे आणि कापसाच्या लागवडीचे प्रयोग केले. कारण, शेतकरी हा स्वावलंबी व्हावा, सुखी व्हावा. त्याने आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची कास धरावी; कारण त्याशिवाय पर्याय नाही, असे नाईक साहेबांचे ठाम मत होते.



बंधूप्रेमाचा आदर्श कसा असावा याचे उत्तम उदारण म्हणजे माझे काका वसंतराव आणि वडील बाबासाहेब या दोन बंधूचे सांगता येईल. रामायण काळातील राम-लक्ष्मण या भावांचे उदाहरण आम्ही जगातील एक आदर्श भातृभाव कसा असतो यासाठी देत असतो. तेच उदाहरण आम्ही बाबासाहेब आणि वसंतराव यांच्या बंधूप्रेमात अनुभवले आहे. बंधूप्रेमाचे हे दोघे अत्युच्च आदर्श होते. बाबासाहेबांच्या संमतीशिवाय वसंतराव कोणतेच निर्णय घेत नव्हते; आणि वसंतरावांना विचारल्याशिवाय कोणतीही गोष्ट बाबासाहेब करीत नव्हते.

एकदा बाबासाहेबांना छातीत खूप दुखू लागले तेव्हा त्यावेळी आमच्या कुटुंबातीलच एक घटक असलेले डॉ. एन.पी. हिराणी यांना बोलावण्यात आले. त्यावेळी ई.सी.जी. किंवा पॅथॉलॉजी लॅबची सोय नव्हती. डॉ. हिराणी यांनी बाबासाहेबांना विचारले की, काय त्रास आहे? तेव्हा बाबासाहेब म्हणाले, छातीत दुखत आहे. घामाघूम झालेल्या बाबासाहेबांना क्लिनिकल टेस्टच्या आधारे डॉ. हिराणी यांनी सांगितले की, बाबासाहेबांना हृदयविकाराचा तीव्र झटका आलेला आहे. ही गोष्ट वसंतराव नाईकांना कळविण्यात आली तेव्हा त्यांनी मुंबईचे प्रसिद्ध हृदयरोगतज्ज्ञ डॉ. दाते यांना एका वैद्यकीय साहाय्यकासोबत घेऊन प्रथमच सरकारी विमानाने नागपूरला पाठविले आणि नागपूरवरून मोटारकारने डॉ. दाते आणि त्यांचे सहकारी रात्री उशिरा पुसदला पोहोचले. कारण, त्यावेळी रस्ते किंवा नद्यांवरील पूल चांगले नव्हते. डॉ. दाते यांनी बाबासाहेबांना तपासून उपचार करून विश्रांतीचा सल्ला दिला. हृदयरोगाचाच तीव्र झटका असल्याचे त्यांचेही निदान होते. त्यानंतर नागपूर मग मुंबईला बाबासाहेबांना वसंतरावकाका घेऊन गेले आणि प्रकृती पूर्ण बरी झाल्यानंतरच पुसदला पाठविले.

बाबासाहेबांचेही काकांवर अगाध प्रेम होते. औरंगाबादला हेलिकॉप्टरचा अपघात झाला होता. त्या हेलिकॉप्टरमध्ये नाईकसाहेब होते. त्यांच्या उजव्या हाताला फ्रॅक्चर झाले होते. तरीही त्यांनी बाबासाहेबांना तातडीने निरोप देऊन सुखरूप असल्याचे कळवले. पण, हेलिकॉप्टरच्या अपघातात सापडलेला माणूस वाचूच शकत नाही या कल्पनेने अस्वस्थ झालेले बाबासाहेब तातडीने वसंतरावांच्या भेटीला औरंगाबादला गेले. बाबासाहेबांची प्रकृती ठीक नव्हती, त्यांना पूर्ण विश्रांतीचा सल्ला डॉक्टरांनी दिलेला होता. पण, आपल्या बंधूच्या भेटीसाठी त्यांनी कोणतीच पर्वा न करता औरंगाबादला धाव घेतली. बाबासाहेबांना औरंगाबादला का पाठविले, असा प्रश्न वसंतरावांनी डॉ. हिराणींपासून तर आम्हा सर्वांना विचारला. तेव्हा सर्वांचे उत्तर एकच होते, ते म्हणजे ''बाबासाहेब कुणाचेच ऐकत नाहीत.'' ''मला माझ्या भावाला प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय चैन पडणार नाही,'' असे सांगून त्यांनी औरंगाबाद गाठले होते. असे या दोघांचे राम-लक्ष्मणासारखे बंधूप्रेम होते.

काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर इंदिरा काँग्रेस की यशवंतराव चव्हाणांची काँग्रेस असा प्रश्न वसंतराव नाईकांच्या समोर उभा होता तेव्हा कोणता पर्याय निवडावा, असा प्रश्न साहजिकच वसंतराव नाईकांच्या मनात आला असेल. त्यावेळी त्यांनी यशवंतराव चव्हाण यांची साथ घेण्याचे ठरवले. हे खरे आहे की, काका त्यावेळी फार द्विधा मन:स्थितीत होते. बाबासाहेब नाईकांनी वसंतरावांना पुसदला बोलावून घेतले. कोणत्या काँग्रेससोबत जावे याबद्दल काकांची द्विधावस्था होती; आणि बाबासाहेबांच्या सल्ल्याशिवाय ते निर्णय घेत नव्हते म्हणून बाबासाहेबांशी त्यांनी चर्चा केली. बाबासाहेब म्हणाले की, ज्या यशवंतराव चव्हाणांनी आपल्याला राजकारणात मोठे केले, ज्यांनी आपल्याला घडवले त्यांचे ऋण आपण विसरता कामा नये. त्यांच्याप्रति आपण कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी चव्हाणांच्या काँग्रेसची साथ धरली पाहिजे. बाबासाहेबांचा सल्ला शिरसावंद्य मानून काकांनी इंदिरा काँग्रेसची साथ करण्याऐवजी चव्हाण साहेबांच्या काँग्रेसची साथ केली. तत्त्वनिष्ठेचे यापेक्षा दुसरे कोणते चांगले उदाहरण असू शकते?

नाईक साहेबांच्या व्यक्तिमत्त्वाचे वर्णन करताना मनोहरराव म्हणाले की, काकांचे केवळ कुटुंबातीलच व्यक्तींवर प्रेम नव्हते तर गुणांची पारख करून त्या गुणवान व्यक्तींवरही काकांचे निर्व्याज प्रेम असायचे. त्यांच्यासाठी काका आपले मुख्यमंत्रिपद विसरून जायचे. सध्या सामाजिक न्यायमंत्री असलेले शिवाजीराव मोघे यांच्यावर काकांचे फार प्रेम होते. मोघे साहेबांनी आदिवासी युवक विकास संघटना स्थापन करून वसंतपूर या लहानशा खेड्यात सामूहिक आदिवासी विवाह मेळावे घेतले होते. त्या मेळाव्यांना काका सर्व कार्यक्रम

बाजूला ठेवून हजर राहायचे. सामाजिक जाणिवेपोटी काका लहान लहान कार्यकर्त्यांना हिमालयाएवढे प्रोत्साहन देत असत.

आणखीही उदाहरण सांगायचे झाल्यास डॉ. एन.पी. हिराणी या खोजा समाजातील तरुणाचे देता येईल. डॉ. हिराणी एम.बी.बी.एस. झाल्यानंतर त्यांच्यासाठी त्यांनी नांदेडच्या शासकीय इस्पितळातील नोकरीची ऑर्डर पाठविली होती. कारण, डॉ. हिराणी यांना नांदेडमध्ये व्यवसाय करावयाचा होता. तसे त्यांनी काकांना बोलून दाखवले होते. पण, डॉ. हिराणी यांनी नांदेडऐवजी आई-वडिलांच्या आग्रहाखातर पुसदमध्येच प्रॅक्टीस सुरू केली होती. खोजा समाजाचे धर्मगुरू प्रिन्स आगाखान मुंबईला वसंतराव काकांचे पाहुणे असताना डॉ. एन. पी. हिराणी आणि त्यांच्या पत्नी श्रीमती मलक यांना मुंबईला बोलावून ताज हॉटेलमध्ये या दोघांना आगाखान यांच्या सोबत प्रीतीभोजसाठी बसवले होते. पुण्याच्या आगाखान पॅलेसचे हस्तांतरण केंद्र सरकारला आगाखान यांनी केले त्यावेळीसुद्धा डॉ. हिराणी आगाखान यांच्या सोबत होते. या आठवणींनी आजही डॉ. हिराणी यांच्या अंगावर रोमांच उभे राहतात; कारण खोजा समाजातील व्यक्तीसाठी आगाखान यांच्याशी हस्तांदोलन हीच फार भाग्याची गोष्ट समजली जाते. इथेतर आगाखान यांच्या सोबत दिवस घालविण्याची संधी काकांनी डॉ. हिराणी दाम्पत्याला दिली होती. डॉ. हिराणी यांना पुसदच्या जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्षपद काकांनीच दिले होते. २७ वर्षांपर्यंत ते जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष होते. एकदा बाबासाहेब नाईक यांनी डॉ. एन.पी. हिराणी व स्वत:साठी मुंबईहून महेंद्र कंपनीच्या दोन जीपगाड्या आणण्यासाठी पुसदवरून मुंबईला दोन चालक पाठविले होते. डॉ. हिराणींचे वडील बंधू बाबूसेठ हिराणी हे सोबत होते. मुंबईहून दोन्ही जीपगाड्या घेऊन दोन्ही चालक पुसदसाठी निघाले. पण, ५० कि.मी. अंतरावरच एक जीप पलटली आणि त्या अपघातात बाबूसेट हिराणी यांना तीन ठिकाणी फ्रॅक्चर झाले. चालक कय्युम गंभीर जखमी झाला होता. या अपघाताचे वृत्त काकांना समजताच त्यांनी जखमी झालेल्या चालक कय्युमला जे.जे. रुग्णालयात दाखल केले आणि स्वत: तेथे हजर राहून त्याच्या उपचाराची अगदी रक्तदानापासून तर औषधोपचारापर्यंतची व्यवस्था केली. तो पूर्णत: बरा झाल्यानंतरच त्याला पुसदला पाठविले आणि त्यानंतर तो एस.टी. महामंडळात चालक पदावर लागला.

नाईकसाहेबांच्या आठवणी खूप आहेत. एकदा एका खेड्यातून जात असताना विहिरीचे पखालभर पाणी खांद्यावर वाहून एक शेतकरी शेताला पाणी देत होता. नाईक साहेबांनी हे दृश्य पाहून आपली गाडी थांबविली. वीज पंप मिळाला नाही म्हणून या शेतकऱ्याला पाणी खांद्यावर वाहून न्यावे लागत आहे असे समजताच नाईक साहेबांनी सोबतच्या अधिकाऱ्यास या शेतकऱ्याची सर्व माहिती घेण्यास सांगितले. या शेतकऱ्याला उद्याच्या उद्या वीज पंप मिळाला पाहिजे, असे आदेशच दिले.

काका शेतातून आल्यानंतर ज्या खोलीत बसायचे त्या खोलीत आधीच एका टेबलवर पाण्याचा गडवा व पेला ठेवलेला असे. लोकांशी चर्चा करताना स्वत:ला पाणी हवे असल्यास ते स्वत: उठून गडवा-पेला घेऊन पाणी घेत असत; पण कुणालाही माझ्यासाठी पाणी आण, असे सांगत नव्हते. एक मुख्यमंत्री असूनही स्वत:ची कामे स्वत: करण्यावर त्यांचा कसा भर होता हे लक्षात येते.

नाईक साहेब आजारी असताना मनू मनू असे म्हणायचे. मला ते प्रेमाने मनू या नावाने हाक मारायचे आणि शेतीबद्दलची माहिती विचारायचे. नाईक साहेब म्हणजे दिलदार मनाचा, उदार अंतकरणाचा आणि तितकाच हळव्या प्रकृतीचा माणूस होते. ते मीतभाषी होते. त्यांच्या वृत्ती जहाल नव्हत्या. राग नावाची गोष्ट तर त्यांना कधी शिवलीच नाही. खूपच संताप आला तर दोन्ही हात उंचावून ''अरे, तुम्हाला काय म्हणावे?'' एवढेच चार शब्द बोलायचे.


२० फेब्रुवारी १९७५ रोजी काकांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला तेव्हा आमच्या जनता शिक्षण प्रसारक मंडळावर बारा-तेरा लाख रुपयांचे कर्ज होते. कारण नवीन अभ्यासक्रमासाठी काही बांधकाम केले होते. काका मुख्यमंत्री नसल्याने संस्थेचे कर्ज कसे फेडणार अशी चिंता पदाधिकाऱ्यांना लागली असतानाच काकांनी स्वत:हून चिंता करू नका. मुख्यमंत्री नाही



ज्येष्ठ नेत्या मृणाल गोरे यांच्या मुलीच्या लग्नात वसंतराव नाईक सपत्निक उपस्थित होते.

'विरोधकांना त्यांनी कधीच शत्रू मानले नाही. विरोधकांनाही समजून घेतले पाहिजे, त्यांना आदर दिला पाहिजे, अशी त्यांची भूमिका होती. अनेक विरोधकांनाही ते आपला जिवलग मित्र मानत होते. त्यांच्या सुख-दु:खात सहभागी होत होते. काकांनी कुणाचाही कधीही व्यक्तीद्वेश केला नाही. विरोध करणाऱ्या विरोधकांची पद्धती कितीही चुकीची असली तरी काका संयमाने प्रश्नांची सोडवणूक करीत असत. विरोधी पक्षाचा आंदोलन करण्याचा हक्क त्यांनी नेहमीच मान्य केला होता. त्यामुळेच आंदोलन करणारे जांबुवंतराव धोटे, उद्धवराव पाटील, कृष्णराव धुळप, एन.डी. पाटील, आहिल्या रांगणेकर, तारा रेड्डी किंवा मृणालताई गोरे, या सर्वांशी व्यक्तिगत जिव्हाळ्याचे संबंध त्यांनी कधीही बिघडू दिले नाहीत. जांबुवंतराव धोटे आजारी झाले तेव्हा त्यांच्या घरी ते भेटायला गेले होते. आंदोलने व चळवळीतील घोषणांमुळे धोटे यांचा जेव्हा घसा बसला होता तेव्हा नाईकसाहेबांनी धोटे यांना दवाखान्यात नेऊन त्यांच्यावर उपचार करण्यासाठी पुढाकार घेतला. विरोधकांचा आवाज अवरुद्ध होता कामा नये, तो दमदारच असला पाहिजे, असे गमतीने काका म्हणायचे. लोकशाहीत विरोधकांशिवाय खऱ्या अर्थाने प्रगती होणार नाही; म्हणून विरोधकांनाही सन्मानाने वागविले गेले पाहिजे, असे काकांचे प्रामाणिक मत होते.'





मनोहरराव नाईक यांना एकदा वसंतरावांनी विहीर बांधायला सांगितली.होती. ती बांधून पूर्ण झाल्यावर बघायला वसंतरावजी स्वत: विहिरीवर आले. समोर बाबासाहेब नाईक उभे आहेत. विहिरीवर हात टेकलेले सुधाकरराव नाईक आणि वसंतराव नाईक यांच्या पाठीमागे टोपी घातलेले गांधीवादी नेते मणीभाई देसाई.

म्हणून काय झाले? मी अनेक मित्र जोडले आहेत, असे सांगून आम्हाला धीर दिला. १९७९ मध्ये काकांचे निधन झाले त्यानंतर माझे वडील बंधू दिवंगत माजी मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांनी अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून संस्थेचे कर्ज फेडले.

वसंतराव काकांना क्रिकेटचा फार शौक होता. मुंबईत होणाऱ्या क्रिकेटच्या टेस्ट मॅचेस त्यांनी कधीही पाहिल्याशिवाय सोडल्या नाहीत. खाण्याच्या बाबतीत मटणावर ताव मारण्याचा जणू त्यांना शौक होता आणि कपड्यांच्या बाबतीत तर सिल्कचा बंद गळ्याचा कोट आणि पॅन्ट हा त्यांचा आवडता पेहराव होता. शिकार करण्याचीही नाईक साहेबांना मोठी हौस होती. त्यांच्या शिकारीचे अनेक किस्से गाजलेले आहेत. काकांना क्रिकेटचा, कपड्यांचा जसा शौक होता तसाच चिरुट, सिगार किंवा पाईपमध्ये तंबाखू भरून ती ओढण्याचा देखील शौक होता. माझे काका म्हणजे एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व होते.

१ जुलै १९१३ रोजी यवतमाळ जिल्ह्याच्या पुसद तालुक्यातील गहुली येथे बंजारा जमातीच्या सधन शेतकरी कुटुंबात जन्मलेले माझे काका वकिलीच्या व्यवसायातही निपुण होते. उल्लेखनीय म्हणजे ६ जुलै १९४१ रोजी त्यांनी नागपूरच्या वत्सला याटे या पदवीधर तरुणीशी प्रेमविवाह केला. काका स्वत:ही कायद्याचे पदवीधर होते. आंतरजातीय प्रेमविवाह करून जातपात पंथाच्या पलीकडे पाहण्याचा दृष्टिकोन काकांनी पक्का केला होता. हा विवाह नोंदणी पद्धतीने झाला होता. पुसद नगरपालिकेच्या अध्यक्षपदापासून मुख्यमंत्रिपदापर्यंत मजल मारून सलग ११ वर्षे मुख्यमंत्रिपद भूषविणारे काका वाशीम लोकसभा मतदारसंघातून १९७७ मध्ये निवडून गेले होते.

वसंतराव नाईक यांचे पितृतुल्य वडीलबंधू राजुसिंग उपाख्य बाबासाहेब नाईक यांचे २६ जून १९७९ रोजी निधन झाले. त्या दिवशी वसंतराव नाईकांची अवस्था कशी होती ते दृष्य हृदय हेलावून टाकणारे होते. बाबासाहेब नाईकांच्या निधनामुळे काका वसंतराव यांना इतके दु:ख झाले की, सतत तीन दिवस काकांच्या नेत्रांतून अश्रूधारा वाहत होत्या. त्यांना हुंदके आवरत नव्हते. खोलीत बसून ते रडतच होते. त्यांच्या हृदयाची अस्वस्थ धडधड पाहवली जात नव्हती. काकांना आम्ही कधी इतके भावविवश झालेले पाहिले नव्हते. पण, आपल्या बंधूवियोगाचे दु:खच पर्वताएवढे मोठे होते की ते पेलणे त्यांना शक्य नव्हते. काकांनी आपले मन मोकळे करण्यासाठी अश्रूंचाच सहारा घेतला. उल्लेखनीय म्हणजे बाबासाहेबांच्या निधनानंतर दोन महिन्यांच्या आतच काकांचे १८ ऑगस्ट १९७९ ला सिंगापूर येथे हृदयविकाराच्या झटक्याने वयाच्या ६६ व्या वर्षी निधन झाले.

महाराष्ट्राची १२ वर्षे ज्याने बांधणी केली, शेतीचा विचार सातत्याने ज्याने बांधला, अन्नधान्याच्या बाबतीत ज्याने कमालीचा आटापिटा केला, राज्यात पराकोटीचा राजकीय विरोध होत असताना ज्याने माणुसकी आणि संयम कधीही सोडला नाही, असे माझे काका वसंतराव नाईक होते. 'असा माणूस पुन्हा होणे नाही .' शेती हा काकांचा जीव की प्राण होता. काकांसारखी माणसं आजच्या काळाची गरज आहे. काकांच्या साऱ्या निष्ठा अव्यभिचारी होत्या. निर्धारी मनाचा, उदार हृदयाचा आणि तीव्र इच्छाशक्तीच्या जोरावर सार्वजनिक जीवनात आणि व्यक्तिगत विचारात धुक्याच्या वर जगणारा माणूस म्हणजे माझे काका होते. गुंतागुंतीचे प्रश्न व्यवस्थित रितीने हाताळण्याची प्रशासकीय क्षमता आणि माणसे ओळखण्याचे कसब काकांच्या ठिकाणी होते. स्वत:चे महत्त्व वाढवणे, स्वत:ची जाहिरात करणे किंवा स्वत:ला वरचे स्थान मिळवण्यासाठी खोट्या लटपटी करणे हे काकांच्या स्वभावात नव्हते. आपण जी तत्त्वे श्रद्धापूर्वक जोपासतो त्यांची अवहेलना त्यांना सहन होत नव्हती.

१८ ऑगस्ट १९७९ रोजी सिंगापूर येथे वयाच्या ६६ व्या वर्षी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने वसंतराव नाईक यांचे निधन झाले. त्यांचे पार्थिव जन्मगाव असलेल्या पुसदजवळील गहुली येथे आणण्यात आले. लाखो लोकांच्या साक्षीने गहुलीच्या शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले. वसंतराव नाईक यांचे मोठे बंधू म्हणजेच माझे वडील बाबासाहेब नाईक यांच्या समाधीजवळच गहुलीच्या शेतात नाईक साहेबांची समाधी बांधलेली आहे. त्याच ठिकाणी माझे वडील बंधू दिवंगत माजी मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांचीही समाधी आहे. बाबासाहेब, वसंतराव आणि सुधाकरराव या तीनही महापुरुषांच्या समाधीचे दर्शन आमच्यासाठीच नव्हे, तर नाईक घराण्यावर प्रेम करणाऱ्या हजारो-लाखो लोकांसाठी ऊर्जास्रोत आहे. या महापुरुषाला माझे विनम्र अभिवादन!

**(शब्दांकन : न. मा. जोशी**
**संपर्क : ८८०५९४८९५१)**

# आर्जवी पण खंबीर

## ग. दि. माडगूळकर

दोन-तीन वर्षांपूर्वीची गोष्ट. मुद्रण व्यवसायातील माझे एक मित्र माझ्याकडे आले आणि म्हणाले, मला जरा मुख्यमंत्र्यांना भेटायचं आहे. तुम्ही माझ्या बरोबर याल का? मी म्हटले, येईन. न यायला काय झालं. त्या निमित्तानं त्यांची माझी भेट होईल. तुमची भेट तर नेहमीच होत असेल? होते. पण ती विधान भवनात. यांच्या मागे शंभर कामं. एकमेकांचे कुशल विचारण्याइतकाही अवसर नसतो. तुमच्या कामाचं तुम्ही बोला. मी तुमच्या बरोबर येतो. आधी कळवायला पाहिजे. अजून कळविलेलं नाहीच होय. नाही. मग तुम्हाला कशाला चला म्हणतोय. बरं तर ठीक आहे. आमदार म्हणून नव्हे, पण एक मित्र म्हणून मला त्यांच्या भेटीला परवानगी लागत नाही, हे खरंच आहे, त्यांच्या बोलण्याचा रोख लक्षात आला आणि मी हसून म्हणालो.


वसंतरावांचा मुक्काम मुंबईतच आहे, हे मला निश्चित ठाऊक होते. कामाचा घबडगा सदैव असतोच. माझ्यासारख्याच्या भेटीने त्यांनाही किंचित बरे वाटते. डॉक्टरला भेटायला एखादा हसतमुख माणूस यावा तसे. मग किती वाजता जाऊ या? माझ्या मित्राने विचारले. केव्हाही. ऑफिसची वेळ असेल तर सचिवालयात जाऊ, नाहीतर मग वर्षावर. अडीच वाजता निघू या. ठीक आहे. दादरहून आम्ही अडीचला निघालो आणि तीनच्या सुमारास सचिवालयात पोहोचलो. लिफ्टने सहाव्या मजल्यावर आलो. मुख्यमंत्र्यांच्या चेंबरच्या दाराशी आलो. दारावर उभ्या असलेल्या त्यांच्या नेहमीच्या शिपायाला मी विचारले, आहेत का रे साहेब? आहेत, एवढेच सांगून तो गप्प उभा राहिला. वास्तविक, तो होऊन दार उघडायचा. आज तो तसे करायला नाराज दिसला. मीटिंगबिटिंग चालली आहे का? मी विचारले. नोकर थोडा वेळ थबकला. काकुळतीच्या स्वरात बोलला, जेवण घेताहेत साहेब. आत्ता, तीन वाजता? मनगटावरले घड्याळ पाहात मी त्यालाच विचारले. तो काय सांगणार बापडा. माझ्याबरोबर एक गृहस्थ होते आणि कुणी जेवण घेत असताना आत शिरणे बरे नव्हेच, म्हणून मी मोठ्यांदा म्हणालो, बरं मग आम्ही शेजारच्या खोलीत थांबतो. साहेबांचं आटोपलं म्हणजे सांग. ''आटोपलंय, आटोपलंय. या, अण्णा या,'' आतून मुख्यमंत्र्यांचाच आवाज आला. आत जाणे मग भागच पडले.

वसंतरावांचे जेवण संपत आले होते. ते म्हणाले, ''बसा.'' मी माझ्याबरोबर आलेल्या गृहस्थांचा त्यांच्याशी परिचय करून दिला. आम्ही दोघेही बसलो. फळाची बशी आमच्यापुढे करीत ते म्हणाले, ''घ्या.'' एक संत्र्याची फोड अलगद काढून घेत मी म्हणालो, ''इतक्या उशिरा लंच?'' ''काय करता जेवायलासुद्धा वेळ सापडू नये असं झालंय आजकाल. मोर्चे, मोर्चे, मोर्चे. त्यांच्या शिष्टमंडळाला भेटले तर पाहिजे. त्यांचं ऐकलं पाहिजे. करता येईल ते केलं पाहिजे.'' मी मनात म्हणालो, वेळेवर जेवायलासुद्धा फुरसत मिळत नाही, त्या मुख्यमंत्रिपदाचं सुख काय असेल? कशासाठी ही एवढी ओढाताण? काय कमी आहे या माणसाला?

आजच्या लोकशाहीच्या जमान्यात, अशी अधिकारपदे धारण करणाऱ्या माणसाला विदेही जनकाचीच शक्ती अंगी बाणवली पाहिजे. एक पाय अग्नीत आणि दुसरा पाय कुणी सेवकजन हळुवारपणे चेपत आहेत, असाच मामला.

मला वाटते, ही शक्ती कमविण्यात वसंतरावांनी बरीच प्रगती केलेली आहे. विरोधी पक्षांचे सदस्य कठोर शब्दांचे प्रहार करीत असतात तर स्वकीयांतला एखादा करू नये इतकी स्तुती करू लागतो. मात्र, वसंतरावांच्या मुद्रेवरील शांती कधी ढळत नाही. ते विचलित होत नाहीत की उल्हसित होत नाहीत.

अगदी अविश्वासाच्या ठरावाला उत्तर द्यायची



वसंतराव, यशवंतराव आणि ग. दि. माडगूळकर.



कमाल जमीन धारणेच्या कायद्यापासून वसंतराव महाराष्ट्राच्या शेतीच्या प्रश्नाशी निगडित आहेत. अधिकाधिक जमीन ओलीताखाली यावी यासाठी त्यांचा अट्टाहास चालू असे. अन्नधान्याच्या स्वयंपूर्णतेवाचून अन्य प्रगतीच्या गोष्टी अकारण ठरतील असे त्यांना मन:पूर्वक वाटते. आभाळातून पडलेला पाण्याचा प्रत्येक थेंब साठवला जावा, उपयोगी पडावा यासाठी त्यांचा आटापिटा असे. पाझर तलाव, छोटे बंधारे ही सारी त्या अट्टाहासाचीच अपत्ये. जमिनीचा पोत सुधारावा, तिला खताचा पुरवठा व्हावा, चांगले बियाणे मिळावे या साऱ्या गोष्टी त्यांनी शासनाकडून करविल्या. दुष्काळ आला तरी माणसाने दबू नये. आभाळाची अवकृपा पचविण्याइतके बळ त्याने धरणीला दिले पाहिजे, असे त्यांचे म्हणणे. एकाधिकार कापूस खरेदी हा शेतकऱ्यांच्या संरक्षणासाठीच केलेला प्रसिद्ध प्रयास.

***सतत वाहते उदंड पाणी / कुणी न वळवून आणी रानी / आळशास ही व्हावी कैसी गंगा सुखदायी***

या ओळी त्यांना इतक्या आवडल्या की माझ्या पाठीवर एक धबाका मारून ते म्हणाले, ''अण्णा, हे तुमचे गाणे खेडोपाडी वाजले पाहिजे.'' त्यांचा आणि या गीताचा स्वर जणू एक झाला होता. उपलब्ध उदकाचा बिंदू आणि बिंदू उत्पादनाला उपयोगी पडला पाहिजे. ही त्यांच्या मनाची तळमळ होती.

वेळ असू द्या. त्यांचा स्वर सहसा चढत नाही. विरोधकांचा एक एक मुद्दा घेऊन, ते त्याचा सौम्यपणे समाचार घेतात. एखादा रेशमी चिमटा घेतील, पण वक्तृत्वाचा थयथयाट असा कधीच नाही. शासनकर्ते कधीच चुकत नाहीत, असला दावा तर ते मुळीच करीत नाहीत. जे सत्य आहे तेच ते सांगतात आणि वर आर्जवी स्वरात, आमचीही चूक होईल जरूर, पण या सदनाच्या सन्मान्य सदस्यांना मी सांगू चाहतो की, या विषयात ती मुळीच झालेली नाही.



एवढी सारी आर्जवी कैफियत ऐकूनही विरोधी पक्ष उभे ठाकतात.

आमचे समाधान झाले नाही. आम्ही बहिर्गमन करतो म्हणून धमकावतात. सभागृहाबाहेर पडतात.

वसंतरावांची मुद्रा पालटत नाही. ते भडकत नाहीत आणि बावरतही नाहीत. विरोधी पक्षीयांची भाषणे ते अधिक सावधपणे ऐकत असतात. स्वपक्षीयांना हेवा वाटावा इतक्या मन:पूर्वक ऐकत असतात.

त्यांच्या मुख्यमंत्रिपदाला मी तर सुखनैव तपश्चर्या म्हणेन. परशुरामांचे वैष्णवी धनुष्य आपणहून श्रीरामांच्या हाती गेले तसे मुख्यमंत्रिपद आपणहून त्यांच्याकडे आले. यशवंतराव चव्हाण दिल्लीला निघाले. तेव्हाच माझ्यासारख्या त्यांच्या असंख्य चाहत्यांना वाटले होते की, मुख्यमंत्रिपदाची माळ वसंतरावांच्या गळ्यात पडेल. पण, तेव्हा तसे घडले नाही. ज्येष्ठतेचा विचार झाला आणि कै. कन्नमवार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. वसंतराव महसूल मंत्रीच राहिले.

त्या काळातच कधीतरी एका सावळ्या संध्याकाळी मी त्यांना भेटण्यासाठी वर्षावर गेलो होतो. वर्दळ फारशी नव्हती. बंगल्याच्या पिछाडीला आपल्या बागेत ते फेऱ्या मारीत होते. मी तिथे गेलो. त्यांची मुद्रा प्रसन्न होती. नेहमीसारखी पाईपची उसाभर चालू होती. त्यांनी हसून या म्हटले. बागेतल्याच खुर्चीवर आम्ही बसलो.

हे असे कसे झाले? आम्हाला वाटले मुख्यमंत्री म्हणून तुमची निवड होईल. आमच्या नेत्यांना नाही वाटले तसे. ते किंचित हसले. यशवंतरावांना मी अगदी सलगीचा प्रश्न केला. म्हणा हवं तर. त्यांना विचारलं नाहीत तुम्ही. मी का विचारू? अधिकार ही मागून मिळणारी गोष्ट नाही. आपले काम त्या योग्यतेचे झाले की अधिकार आपोआप आपल्याकडे येतो. त्यांच्या म्हणण्यासारखेच झाले. सहकारमंत्री, कृषिमंत्री, महसूलमंत्री म्हणून त्यांनी बजावलेली सेवा सन्मानली गेली व त्रेसष्ठ साल सरता सरता ते नव्या संयुक्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. गेली दहा वर्षे ते या सन्माननीय पदावर आहेत. त्यांच्यावर उघड आणि छुपी टीका अमाप झाली, हारतुऱ्यांचाही पाऊस पडला. थैली अर्पण केली गेली. वसंतरावांनी टीकेचा खेद मानला नाही, स्तुतीचे हार गळ्यात मिरविले नाहीत, मिळालेली थैली आपल्या स्वत:च्या काही दानासह सार्वजनिक कार्याला देऊन टाकली.

***जो निंदे ते न घे स्तुतीते ना घे***
***आकाशा न लागे, लेपु जैसा***

अशीच मनाची अवस्था सांभाळीत त्यांनी प्रगतीचा मार्ग चोखाळला. यशवंतरावांनी घातलेला महाराष्ट्राच्या प्रगतीप्रासादाचा पाया, वसंतरावांच्या कारकिर्दीत वास्तूच्या आकाराला आला, ही गोष्ट मान्य करायला हवी, त्यांच्या विरोधकांनाही याबाबतीत खरा विरोध करता येणार नाही. एक खरे की, वसंतराव मुख्यमंत्री झाले तेव्हापासून आजपर्यंत महाराष्ट्रावर सारखी गडांतरे येत आहेत. त्यांच्यासारख्या स्थिरबुद्धी नेतृत्वाची जणू पुन:पुन्हा परीक्षा घेतली जात आहे. असे का होते आहे असा अकारण विचार माझ्या मनी अनेकदा येतो. माझे मलाच उत्तरही गवसते. 'कस' सोन्यालाच लागतो. अन्य धातू केवळ तोलून घ्यायचे असतात. 'दग्धं दग्धं पुनरपि पुन: कांचनं कांतवर्णम', असे त्यांच्या नेतृत्वाबाबत नित्य होत आले आहे. १९६३ साली वसंतराव मुख्यमंत्री झाले. चौसष्टच्या जुलैत ते

युगोस्लाव्हियाचा दौरा करून आले. उणेपुरे एक वर्ष गेले. पासष्टच्या सप्टेंबरात भारत-पाक संघर्ष सुरू झाला. त्या काळात त्यांनी केलेली जनजागृती नि:संशय वाखाणणीय होती. महाराष्ट्राच्या भूमीचा सारा कणखरपणा आणि चिवटपणा त्यावेळी त्यांच्या वाणीने आत्मसात केला होता. अवघा महाराष्ट्र त्यांच्या मागे उभा ठाकला. संकट संपले. आपल्या लोकांवरचा विश्वास, हे वसंतरावांचे बळ.

त्यांच्या कारकिर्दीत भारताला आपल्या शेजाऱ्यांशी लढावे लागले. महाराष्ट्राला आपले तन मन धन देशासाठी द्यावे लागले. निसर्गानेही वसंतरावांच्या कारकिर्दीचा कस पारखायला प्रारंभ केला. दोन वेळा महापूर आले. त्रिवार दुष्काळाने थैमान मांडले. एकदा तर धरणीमातेलाच अर्धांगाचा झटका आला. कोयनेच्या परिसरातील महाराष्ट्रीयांचे जीवन जमीनदोस्त झाले. वसंतराव डगमगले नाहीत. ऐकताच अंगावर शहारा उभा राहावा अशा या संकटांतूनदेखील त्यांनी महाराष्ट्राला बाहेर आणले. धरणी दुभंगली तरी त्यांनी माणसांची मने दुभंगू दिली नाहीत. ते स्वत: हादरले नाहीत. हे झाले निसर्गाचे प्रहार. राजकारणातल्या माणसांनी आणि विचारांनीही वसंतरावांच्या वाटचालीला पदोपदी अडविले आहे. संप काय, बंद काय, घेराव काय, दंगली काय जनसमुद्रात सारखी वादळे इतकी वादळे आणि इतके जलचर यांच्याशी झुंज घेत घेत महाराष्ट्राची महानौका वसंतरावांनी सुखरूपपणे पुढे पुढे चालविलेली आहे. एखाद्या भूखंडाच्या प्रगतीचा प्रवास हा महासागराच्या प्रवासासारखा सुदीर्घ असतो. पैलतीर ही शतकानुशतके कल्पनाच राहते. त्या दिशेने पुढे जाणे हाच पुरुषार्थ.

वसंतराव राजकारणात आले. मध्यप्रदेशात उपमंत्री झाले. मुंबई राज्यात मंत्री झाले. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. हा प्रवास नि:संशय अभिनंदनीय. पण, वसंतरावांचा मूळ पिंड शेतकऱ्याचा. शेती हा त्यांचा खरा जिव्हाळ्याचा विषय. शेती, व्यवसाय म्हणून केली गेली पाहिजे, शेतकऱ्याला प्रतिष्ठा लाभली पाहिजे, हे त्यांच्या चिंतनगीताचे



'वसंतरावांच्या घरात अजून जुनी कुटुंबसंस्था अबाधित आहे. भावाभावांचे प्रेम अवर्णनीय आहे. मुलगा आणि पुतण्या यात फरक करणे दोघाही भावांना ठाऊक नाही. स्वत:च्या हाताचे हाड विमान अपघातात दुखावले असताना तो हात अलगद दुसऱ्या हाती ठेवून त्यांनी असेंब्लीत भाषण केले, पण थोरल्या भावाच्या आजाराच्या नुसत्या वार्तेनेच ते घाबरून गेलेले मी पाहिले आहेत.'

जणू ध्रुपद आहे.

कोणी कितीही म्हणाले तरी, एक गोष्ट कोणासही मान्य करावी लागेल की, महाराष्ट्राच्या शेतीचा मुखडा गेल्या दहा वर्षांत पूर्ण बदलून गेला आहे, त्याच्यावर झळाळी आली आहे. शेती कसणाऱ्या माणसाच्या मुखावरचा स्वाभिमान वाचून घ्यावा इतका सुस्पष्ट झाला आहे. आकड्यांची अक्कलहुशारी हे मान्य करो की न करो. शून्य क्रमांकाच्या काचेचा चष्मा घालून पाहिले तर दिसेल की, महाराष्ट्राची शेती आता नागडीउघडी राहिली नाही. तिच्या कटीला लाज राखेल असे हिरवे वस्त्र आहे. शालीनता सांभाळता येईल एवढी कंचुकी तिच्या वक्षस्थळावर आहे. ती पायघोळ पैठणी नेसून मिरवील, तेव्हा वसंतरावांचे सारे मनोरथ फळाला येतील.

नवकाँग्रेस या संस्थेचा प्रत्येक सभासद समाजवादी असतोच. नव्हे त्याने तसे असावेच लागते. वसंतरावांना मी उदारमतवादी मानवतावादी असे काही वेगळे विशेषण देईन. गरिबांविषयी त्यांना अपार कळवळा आहे. पण गरिबांच्या गरिबीच्या गर्तेत, साऱ्या देशाचे स्वास्थ्य तडकाफडकी गाडून टाकण्याइतका त्यांचा समाजवाद उतावळा नाही. श्रीमंत शेतकऱ्यांचा कैवारी हे नको असलेले बिरूद म्हणूनच पाहिजे तेव्हा त्यांच्या कोटाला लटकाविले जाते. त्यांच्यावर अकारण अन्याय केला जातो.

देशातील गरिबी हटली पाहिजे, पण ती आततायी पद्धतीने नव्हे. विचार आणि नियोजन या दोन शस्त्रांनीच ती शस्त्रक्रिया केली पाहिजे असे त्यांना वाटत असावे. वसंतराव एक समर्थ प्रशासक आहेत. सहकारी व अधिकारी यांच्यात उत्साह निर्माण करण्याची शैली त्यांना अवगत आहे. मागण्यांसाठी दारी आलेल्या समाजापुढे कायद्यांच्या काड्यांनी 'नो' अक्षरांची रचना करणारे अधिकारी त्यांना विनोद विषय वाटतात. राज्य जनतेचे आहे. तिच्या कल्याणासाठी जे जे करणे आवश्यक ते ते शासनाने केलेच पाहिजे अशी त्यांची धारणा आहे. इंग्रजी राज्यातील अधिकारी



लोकांची अरेरावी त्यांच्या कारकिर्दीत नामशेष झाली. महाराष्ट्र शासन त्यांनी लोकाभिमुख केले. वसंतरावांच्या कारकिर्दीत सरकारी अधिकाऱ्यांना एक समज निश्चित आली आहे की आपण जनतेचे सेवक आहोत. गेल्या वर्षा - दोन वर्षांतला दुष्काळ तर वसंतरावांनी फार धैर्याने हाताळला. लाखो लोकांना काम उत्पन्न करून दिले. अन्नाचा पुरवठा करण्याची पराकाष्ठा केली. नवनवीन कामे इतकी करवून घेतली की, चालू वर्षी पाऊस वेळेवर पडला तर गेला दुष्काळ ही एक इष्टापत्ती ठरेल.

वसंतराव उत्तम प्रशासक आहेत. समर्पित समाजसेवक आहेत. कार्यरत राष्ट्रभक्त आहेत तसेच फार प्रेमळ गृहस्थही आहेत. अतिशय चांगले स्नेही आहेत. गहुलीचे त्यांचे घर मी पाहिलेले नाही. पुसदचा पाहुणचार मात्र मनसोक्त घेतलेला आहे.

सत्ताविकेंद्रीकरणाचा कायदा वसंतरावांच्या नेतृत्वाखाली जन्मला. कार्यवाहीत आला. त्यांच्या मुंबईच्या घरात मात्र अजून राणीचेच राज्य असल्याचा माझा अनुभव आहे. महाराष्ट्राचा हा मुख्यमंत्री दिवसाचा जेवढा वेळ घरी असेल, तेवढा वेळ तरी पराधीन असतो. घरात प्रवेश केला की त्याला गृहसम्राज्ञीचे एकछत्री साम्राज्य मानावे लागते. विरोधी पक्षाचा आवाज तेथे उमटत नाही. विरोधाला तिथं वावच ठेवला जात नाही.

वसंतराव पत्नीला हाक मोठी गमतीने मारतात. त्यावेळी त्यांच्या सादीला खास वऱ्हाडी वास येतो. माझ्यासारखा सलगीतला मित्र भेटायला गेला, अन्य कुणी अतिथी नसला तर ती हाक ऐकायला मिळते. नेहमी मंद स्वराने बोलणारे मुख्यमंत्री अशा वेळी बसल्या बैठकीवरून मोठ्यांदा ओरडतात, ''वच्छ, चहा पाठव ग.''

त्या हाकेत बरेच रंग असतात. अलेक्झँड्रा नावाचा एक खडा असतो. अंगठीत घालतात तो. त्यात जसे अनेक रंग दिसतात, तसे.

वसंतरावांचा प्रेमविवाह झालेला आहे. त्यांच्या पत्नी पूर्वाश्रमीच्या कु. वत्सला घाटे, बी.ए. त्या ब्राह्मण, वसंतराव वंजारी जमातीतील. वंजारी मंडळींनी या नवदाम्पत्याला काही काळ वाळीतही टाकले होते म्हणे. या गोष्टीला आता बत्तीस वर्षे होऊन गेली.

त्या दोघांतला प्रेमभाव ताजा आहे. तरुण आहे. वर्षा बंगल्यात राहणाऱ्या वसंतरावांना गहुली पुसदची आठवण रोज होत असली पाहिजे. बागेचे नाव देऊन म्हणूनच त्यांनी बंगल्याच्या पिछाडीला एक शेत सजविलेले आहे. प्रेमळ वडील माणसे, प्रेमळ पत्नी, मुलेबाळे यांच्या सहवासात वसंतरावांचा गृहस्थाश्रम नित्य वसंतकालात वावरत असतो.

वसंतरावांना वेळच मिळत नाही. दुपारचे जेवणदेखील तीन वाजता, आपल्या कार्यालयात बसूनच घेण्याची पाळी नेहमी येत असते. दौऱ्यांनाही दम नसतो. युद्ध सिद्धतेचा दौरा, दुष्काळ निवारणाचा दौरा, पुनर्वसनार्थ दौरा, नाहीतर निवडणुकीसाठी दौरा... सारखे चालूच असते.


वसंतराव पिंडाने शेतकरी, वृत्तीने उदारमतवादी आणि निष्ठेने समाजवादी आहेत. काँग्रेसच्या विद्यमान नेतृत्वाविषयी त्यांच्या मनात गाढ आदर आहे. आपल्याला न पटणारी गोष्टही नेत्यांच्या निर्णय म्हणून शिरोधार्य मानण्याइतकी शिस्त त्यांनी स्वत:त बाणवलेली आहे. एका विषयात मात्र ते काँग्रेसने काढलेल्या खडूच्या वर्तुळाबाहेर दिसतात. जुन्या काँग्रेसवाल्यांनी रूढ केलेला वेष त्यांनी स्वीकारलेला नाही. ते कटाक्षाने खादी वापरतात. पण पायघोळ धोतर, नेहरू सदरा, जाकीट व कोचदार गांधी टोपी हा संच त्यांनी पत्करलेला नाही. बूट-पँट-कोट असा त्यांचा वेष टिपटॉप असतो. खादीतदेखील किती तलम आणि सुरेख रंगापोताचे कापड निवू शकते ते वसंतरावांचा वेष पाहिल्यावर समजते. ते सुवेषधारी असतात. काळाबरोबर असतात. ते संपूर्ण निर्व्यसनी नाहीत. चर्चिलच्या चिरुटासारखी त्यांची आवडती पाईप सदैव त्यांच्या ओठाशी असते. चहा ते पितात पण रशियन पद्धतीने. चहाची पत्ती घालून उकळलेले पाणी, चवीपुरता लिंबाचा रस, बस्स.

कधीकधी कपिलाषष्टीचा योग येतो. वसंतरावांना दीड-दोन दिवसांची उसंत गवसते. शिकारीच्या निमित्ताने मग ते ताडोबासारख्या अरण्याकडे जातात. सहकुटुंब जातात. मोकळा वारा छातीत भरून घेतात. कधीमधी कुटुंबीय मंडळींशी, मित्रांशी पत्ते खेळण्याचीही त्यांना लहर येते. पण, हे सारे कधीतरी. एरव्ही सदैव कामास जुंपलेले असतात. ते थकत नाहीत, कुरकुरत नाहीत. साडेचार कोटी समाजाचे नेतृत्व करण्यातही एक आगळा आनंद असेल. आपले स्वत:चे शेत पिकविण्यात अपार आनंद असतो. मग, साऱ्या राज्याची शेती समृद्ध करविण्यात केवढा आनंद असेल? वसंतरावांनी खूप कामे केली आहेत. राज्यातले हरिजन, गिरिजन आणि विद्यार्थी यांच्या लेखी त्यांना प्रगाढ प्रेम आहे. त्यांच्यासाठी कितीही श्रमावे लागले तरी त्यांची सिद्धता आहे. प्रश्न अनंत आहेत. सीमाप्रश्न, गोदावरीचे पाणी, जातीय दंगली, तरुणांचा असंतोष.. वसंतराव साऱ्या प्रश्नांना सामोरे आहेत. बगल नाही.

कर्तृत्ववान माणसाचे वय **(पान ४० वर)**



*'वसंतराव जातीचे शेतकरी आणि व्यवसायाने मुख्यमंत्री. साहित्यकला क्षेत्रातल्या माझ्यासारख्या माणसाशी त्यांचा स्नेह कसा. हे कोडे नाही. त्यांना वाचनाची आवड आहे. नाटके पाहण्याची, संगीत ऐकण्याची हौस आहे. चित्र-शिल्प या कलांतील सौंदर्यही त्यांना भुरळ घालते. अशा अनेक प्रसंगी त्यांच्याबरोबर उपस्थित राहण्याची संधी मला मिळालेली आहे. परवाचीच गोष्ट आहे. राजा केळकर म्युझियम, ते तास-दीड तास पाहात राहिले होते. त्या संग्रहालयातील वस्तूंच्या दर्शनाने त्यांना इतका आनंद झाला होता की, नंतर झालेल्या पत्रकारांच्या बैठकीत त्यांनी सांगितले, मी एका तरुण माणसाचे अलौकिक काम आज पाहिले. तो तरुण माणूस म्हणजे कवी अज्ञातवासी श्री. केळकर. वय वर्षे पंचाहत्तर.'*



वसंतराव, वत्सलाबाई आणि अविनाश व निरंजन नाईक.

# जीवनयात्रा



भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटरमधील लांब पल्ल्याची दुर्बिण बघताना वसंतराव. सोबत सर होमी भाभा आणि डॉ. होमी सेठना.

१ जुलै१९१३ - यवतमाळ जिल्ह्यातील पुसद तालुक्यातील गहुली येथे बंजारा जमातीच्या सधन शेतकरी कुटुंबात जन्म.

१९३३ - नागपूर येथील नील सिटी हायस्कूलमधून मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण.

१९३७ - मॉरिस कॉलेज, (सध्याचे वसंतराव नाईक सामाजिक विज्ञान संस्था) नागपूर येथून बी.ए. पदवी परीक्षा उत्तीर्ण.

१९४० - नागपूर विद्यापीठ विधी महाविद्यालयातून एल. एल. बी. पदवी उत्तीर्ण.

१९४१ - प्रारंभी अमरावतीचे प्रख्यात वकील कै. बॅ. पंजाबराव देशमुख ह्यांच्याबरोबर व नंतर पुसद येथे स्वतंत्रपणे वकिली व्यवसायास प्रारंभ.

- पुसद तालुक्यातील 'आदर्श ग्राम चळवळी'त पुढाकार.
- त्यांच्या प्रयत्नांमुळे व तळमळीमुळे त्यांचे स्वत:चे गाव 'गहुली' हे आदर्श गाव बनले.

६ जुलै १९४१ - प्रतिष्ठित ब्राह्मण घराण्यातील कु. वत्सला घाटे, यांच्याशी विवाह केला. हा विवाह आंतरजातीय असल्यामुळे त्यांच्या बंजारा समाजात मोठी खळबळ उडाली. काही दिवस त्यांना वाळीतदेखील टाकण्यात आले.

१९४६ - पुसद नगरपालिकेचे अध्यक्ष म्हणून निवड. जुन्या मध्यप्रदेश राज्यात उपमंत्री म्हणून १९५२ मध्ये नियुक्ती होईपर्यंत याच पदावर होते. ह्या अवधीत सुधारणाविषयक अनेक कामे केली.

१९५० - पुसद हरिजन मोफत वसतिगृहाचे व दिग्रस राष्ट्रीय मोफत छात्रालयाचे अध्यक्ष.

१९५१ - विदर्भ प्रदेश काँग्रेस समितीचे व कार्यकारिणीचे सदस्य.

१९५२ - पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत मध्यप्रदेश मंत्रिमंडळात महसूल खात्याचे उपमंत्री म्हणून नियुक्ती.

- ह्याच काळात मध्यप्रदेश गृहनिर्माण मंडळाचे अध्यक्षपद भूषविले.
- तसेच मध्यप्रदेश भू-सुधार समितीचे उपाध्यक्ष व मध्यप्रदेश सरकारच्या मेट्रिक समितीचे अध्यक्ष होते.

१९५६ - राज्य पुनर्रचनेनंतर जुन्या मुंबई राज्यात सहकार, कृषी, दुग्धव्यवसाय या खात्यांचे मंत्री म्हणून नियुक्ती.

- अखिल भारतीय काँग्रेसचे तसेच महाराष्ट्र विभागीय काँग्रेस समितीचे व तिच्या कार्यकारिणीचे तेव्हापासून सदस्य.



१९५७ - सार्वत्रिक निवडणुकीत विधानसभेत पुसद मतदारसंघातून दुसऱ्यांदा निवड झाली.
महाराष्ट्र मंत्रिमंडळात कृषीमंत्री म्हणून नियुक्ती.
- इंडिया कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल फायनान्स सोसायटीचे सभासद म्हणून निवड.

१९५८ - जपानला गेलेल्या आंतरराष्ट्रीय राईस कमिशनच्या भारतीय शिष्टमंडळात समावेश व जपानला भेट. टोकीयो येथे एफ.ए.ओ.च्या बैठकांना हजर.

१९५९ - पुसद येथे 'फुलसिंग नाईक कॉलेज'ची स्थापना. चिनी सरकारच्या शेतकी संघटनेच्या निमंत्रणावरून चीनला भेट.

१९६० - महाराष्ट्र राज्य स्थापनेनंतर राज्याच्या पहिल्या मंत्रिमंडळात महसूल मंत्री म्हणून नियुक्ती. ह्यावेळी शासनाने महत्त्वपूर्ण असा कमाल जमीन धारणा क्षेत्रासंबंधीचा कायदा संमत केला.
- आपल्या मंत्रीपदाच्या कारकीर्दित त्यांनी लोकशाही विकेंद्रीकरण समितीचे अध्यक्ष म्हणूनही काम केले व महाराष्ट्रात पंचायती राज्याची मुहूर्तमेढ रोवली.

१९६२ - सार्वत्रिक निवडणुकीत महाराष्ट्र विधानसभेवर यवतमाळ जिल्ह्यातील पुसद मतदारसंघातून तिसऱ्यांदा निवड होऊन पुन्हा महसूल मंत्री म्हणून नियुक्ती आणि मुख्यमंत्री होईपर्यंत हेच खाते त्यांच्याकडे राहिले.

५ डिसेंबर १९६३ - महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले.

१९६४ - युगोस्लाव्हियाचा दौरा.

१९६५ - १ मे १९६५ रोजी आंतर भारती (इंडियन ॲकॅडमी ऑफ लेटर्स) मुंबई, संस्थेचे उद्‌घाटन.
- भारत-पाक संघर्ष सुरू होताच ९ ते ११ सप्टेंबरला मुंबईत स्फूर्तिदायक व मार्गदर्शक भाषणे दिली. त्यामुळे महाराष्ट्रात चैतन्यदायी वातावरण निर्माण झाले. नंतर काही महिने युद्धसज्जतेसाठी महाराष्ट्राचा दौरा केला.
- शेती उत्पादनाच्या नव्या कार्यक्रमाचा प्रचार करण्यासाठी महाराष्ट्रातील २५ जिल्ह्यांचा दौरा.

१९६६ - अवर्षणामुळे भयंकर परिस्थिती निर्माण झाली होती. संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना हिंमत देण्यासाठी राज्यातील दुष्काळी जिल्ह्यांत झंझावती दौरा.

१९६७ - सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रभावी प्रचारासाठी महाराष्ट्रात दौरा. या निवडणुकीत महाराष्ट्र विधानसभेवर पुसद मतदारसंघातून चौथ्यांदा निवड होऊन ६ मार्च १९६७ ला महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदावर दुसऱ्यांदा एकमताने निवड.
- महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नाबाबत महाराष्ट्र विधानसभेत भाषण- (१७-११-१९६७)

१९७० - अमेरिकी शासनाच्या निमंत्रणावरून अमेरिकेचा दौरा व युरोपिय देशांना भेटी.

१९७२ - सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रचारासाठी महाराष्ट्रात दौरा. या सार्वत्रिक निवडणुकीतून पुसद मतदारसंघातून पाचव्यांदा निवड होऊन १४ मार्च १९७२ ला महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदी तिसऱ्यांदा निवड झाली.
- महाराष्ट्रात गंभीर स्वरूपाचा दुष्काळ पडला होता. राज्यातील नऊ जिल्ह्यांतील दुष्काळ हा देशातील इतर कोणत्याही भागातील दुष्काळापेक्षा अधिक तीव्र स्वरूपाचा होता. प्रत्येक जिल्ह्यात फिरून त्यांनी दुष्काळी कामाला जोराने चालना दिली.

२० फेब्रु.७५ - महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदाचा राजीनामा.

१२ मार्च ७७ - वाशिम लोकसभा मतदारसंघातून खासदार म्हणून निवड

१८ ऑगस्ट १९७९ - सिंगापूर येथे ६६ व्या वर्षी निधन.

(संदर्भ : महानायक ग्रंथ – संपादन: मधुकर भावे)

(संदर्भ : सामान्यांतील असामान्य – वसंतराव नाईक : लेखक – पंढरीनाथ पाटील)



**(पान ३७ वरून)** उच्चारू नये. त्याला शतायुष्य लाभावे, अशी इच्छा व्यक्त करावी.

वसंतरावांचे कर्तृत्व आत्मसिद्ध आहे. प्राथमिक शिक्षणासाठी रोज चार मैल पायपीट करणारा मुलगा आज महाराष्ट्राचे मुख्यमंत्रिपद भूषवितो आहे. या मुख्यमंत्र्यांच्या कारकिर्दीत महाराष्ट्रावर अनंत संकटे आली. मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्राला त्यातून तर वाचविलेच. पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा हे महाराष्ट्र शंकराचे त्रिदल आहे. यातील प्रत्येक दलाचा हिरवा रंग आणि ताजेपण त्यांनी टिकवून धरले. तिन्ही दलांचे ऐक्य अभंग ठेवले.

राजकारणातील विरोधकांचे विरोध हे काम आहे. श्री. नाईकांचा व त्यांचा मतभेद असेल. वैयक्तिक वैर कुणाशीच नाही. श्री. बापूराव काळदाते यांच्या आजारपणाची ते कळकळीने चौकशी करतील. त्यावेळी त्यांची सभागृहातील कडवी वक्तव्ये त्यांच्या स्मरणाकाशात मुळीच भिरभिरणार नाहीत. माझ्यासारख्या मित्राची ते जितकी विचारपूस करतील तितकीच विरोधी सदस्यांचीही. असे हे वसंतराव नाईक. पूर्वी ते राठोड आडनाव लावीत. राठोड आडनावातील झुंजार कणखरपणा त्यांच्या वृत्तीत आहे. नाईक या नावाला योग्य ती नेतृत्वशक्तीही त्यांनी संपादली आहे. महाराष्ट्रात रामराज्य नांदते आहे असे कुणीच म्हणणार नाही. दुसऱ्या राज्यातले आवर्जून म्हणतात, 'महाराष्ट्र तरक्कीपर है.' हे श्रेय वसंतरावांचे. त्याच्या षष्ट्यब्दिपूर्तीच्या या शुभप्रसंगी श्री. यशवंतराव चव्हाण नाईकांच्याच एका वाढदिवसानिमित्त बोलले होते, तेच शब्द मी पुन्हा उच्चारीन.

मुख्यमंत्री म्हणून श्री. नाईक यांची आपल्याला आणखी काही काळ जरुरी आहे.

जन्मत:च ओठी सोन्याचे गोकर्ण लागले. मागासलेल्या जमातीत जन्म मिळूनही ज्ञानाच्या मंदिराशी अडवणूक सहन करावी लागली नाही. समाजसेवेची संधी मिळाली. अधिकारपदांचा गालिचा पायाखाली उलगडत गेला. चढत चढत महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदासारख्या कष्टसाध्य स्थानाचा लाभ झाला. उणीपुरी दहा वर्षे हे पद समर्थपणे सांभाळले.

दु:ख वाट्याला आलेच नाही असे नाही. आले तेव्हा ते भयंकर प्रहार करून गेले. टीका तर नित्याच्याच.

आता साठी उलटली. वसंतराव अजूनही उत्साही आहेत. महाराष्ट्र आणि भारत यांच्या प्रगतीसाठी आणखीही काही करीत राहण्याची जिद्द त्यांच्या ठिकाणी आहे. परमेश्वराने त्यांना उदंड आयुष्य द्यावे. त्यांच्याकडून आणखी सेवा करवून घ्यावी.

**(संदर्भ : १९७३ साली प्रकाशित 'हिरवी क्षितिजे' या ग्रंथातून साभार.)**

## वसंत-विचार

### आत्मविश्वास!

''आपण कोण आहोत याची जाणीव जर आपल्याला राहिली नाही, तर आपल्या कर्तृत्वाला वाव मिळणार नाही आणि ते उजळून निघणार नाही. आपण हे समजून चालले पाहिजे, की आपल्यामध्ये शक्ती आहे, बुद्धी आहे, कर्तृत्व आहे. आपण निश्चय केला तर कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होऊ शकतो. आपली सुप्त शक्ती उपयोगात आणली तर आपल्या राष्ट्रासारखे संपन्न असे दुसरे कोणतेही राष्ट्र राहू शकत नाही, पण त्यासाठी हजारो कोटी रुपये खर्च करावे लागतील. अनेक पंचवार्षिक योजना राबवाव्या लागतील. अवघ्या काही वर्षांतच विकासाचे पर्व आणता येईल.
महाराष्ट्रापुरते बोलायचे झाले तर विकासाचा गोवर्धन उचलण्याची महान शक्ती महाराष्ट्रात आहे. त्यामुळे महाराष्ट्राचे भविष्य मला अत्यंत उज्ज्वल दिसते.
आपण संकटापुढे डगमगायचे नाही, धीर खचू द्यावयाचा नाही. त्यांच्याशी मुकाबला करावयाचा आहे. आत्मविश्वास हा आपला पिंड आहे. तो आपण कायम ठेवला पाहिजे, त्यामुळे सर्वच्या सर्व अडचणी आपोआप दूर होतील. राष्ट्राला महान बनवावयाचे कार्य आपल्या अत्यंत मोलाच्या सहकार्याने आणि आत्मविश्वासाने सहजासहजी पार पडेल.''

### उज्ज्वल भवितव्याची शाश्वती

''खेडे विभागात एक रक्तहीन क्रांती होत आहे. खेड्यातील माणूस बदलत आहे, त्याचे आचार बदलत आहेत, त्याचे विचार बदलत आहेत, त्याला आपल्या कर्तृत्वाची जाणीव होत आहे. पूर्वी दैववादी असणारा माणूस आता कर्तृत्ववादी बनत आहे. त्याच्यातील आत्मविश्वास व पुरुषार्थ जागृत होत आहे. आपल्या भवितव्याचे शिल्पकार आपणच आहोत याची जाणीव त्याला झाली आहे आणि त्यामुळे या देशाला उज्ज्वल भवितव्याची शाश्वती निर्माण झाली आहे.



# प्रसन्न व्यक्तिमत्त्व

एकीकडे समाजाला सुशिक्षित करणे, दुसरीकडे सत्तेचा उपयोग करून शेतकऱ्यांना आधुनिक शेती करायला लावणे यासाठीच वसंतराव नाईक यांनी आपले आयुष्य वेचले. त्यांनी महाराष्ट्राला आधुनिक विज्ञानाची व शेतीतंत्राची ओळख करून दिली. विशेष म्हणजे शेतीचे नवीन तंत्र शिकवण्याआधी ते स्वत: गहुली या आपल्या गावी त्याचा प्रयोग करीत असत.

**राजेंद्र दर्डा**
(मंत्री, शालेय शिक्षण)



यवतमाळ येथील दर्डा उद्यानात द्राक्ष उत्पादनाची पाहणी करून संवाद साधताना वसंतराव नाईक. सोबत जवाहरलाल दर्डा, वीणादेवी दर्डा, लहानगे राजेंद्र दर्डा आणि जिल्हा परिषदेचे तत्कालीन अध्यक्ष देवराव पाटील चोंढीकर.

वसंतराव नाईक हे शेतीवर प्रचंड प्रेम करणारे शेतकरी होते. समाजाच्या तळातील घटकांपर्यंत शिक्षणाची पहाट उगवली पाहिजे, अशी धारणा उराशी बाळगून त्यासाठी झटणारे कार्यकर्ते होते!

सर्वसामान्यांशी बांधिलकी मानणारा आणि राज्याच्या हिताची प्रचंड जपणूक करणारा हा द्रष्टा नेता होता. विरोधी पक्षांना मानसन्मान देणारा आणि शत्रूलाही आपल्या प्रेमळ स्वभावाने जिंकणारा असा हा विलक्षण राजकारणी होता. एक दिलदार मित्र, मनस्वी नेता आणि समाजसेवक अशीच त्यांची ओळख बनली आहे. सतत साडेअकरा वर्षे महाराष्ट्रासारख्या राज्याचा मुख्यमंत्री म्हणून अत्यंत प्रभावीपणे काम करणे ही गोष्ट साधी नाही. रोजगार हमी योजना व कापूस एकाधिकार खरेदी योजनेने तर त्यांना अजरामर करून ठेवले आहे.

सुदैवाने लहानपणापासून मला त्यांना जवळून पाहता आले. वडिलांबरोबर अनेक चर्चांमध्ये मला बसता आले. शेवटच्या टप्प्यांमध्ये पत्रकार म्हणून त्यांच्याबरोबर फिरताही आले. नाईक-दर्डा घराण्याचे जिव्हाळ्याचे संबंध संपूर्ण महाराष्ट्र जाणतो.

### १९४५ ची गोष्ट...

वसंतराव नाईक हे ज्या समाजातून येत होते, ते लक्षात घेता, त्यांनी अतुलनीय कामगिरी बजावली, असेच म्हणता येईल. तांड्यात राहणाऱ्या या समाजाला स्वातंत्र्यपूर्व काळात शिक्षणाचा गंधही नव्हता. माझ्या वडिलांनी-बाबूजींनी सांगितलेली ही गोष्ट. साधारणत: १९४५ ची! स्वातंत्र्यलढ्यात बाबूजी जबलपूर तुरुंगातून सुटून यवतमाळला आले होते. तुरुंगातून सुटल्यानंतर जिल्ह्यातील तरुणांना एकत्रित करण्याचे काम त्यांनी हाती घेतले होते. त्याच कामासाठी नाईक साहेबांना भेटायला बाबूजी पुसदला गेले. त्यावेळी वसंतराव नाईक हे पुसदला वकिली करायचे. बाबूजी नाईक साहेबांना भेटायला गेले ते पावसाळ्याचे दिवस होते. छत्री घेऊन नाईक साहेब बाहेर पडले. 'कुठं चाललात,' असं बाबूजींनी विचारलं. 'बंजारा समाजाच्या लोकांना शिक्षण गरजेचं आहे. त्यांना शिक्षणाचं महत्त्व पटविण्यासाठी वर्ग घ्यायला चाललोय,' असं नाईक साहेब म्हणाले. ते स्वत: सुशिक्षित होते; परंतु मागास राहिलेल्या आपल्या समाजानेही शिक्षित झाले पाहिजे, ही त्यांची तळमळ होती. शिक्षणाबद्दलची त्यांची ही ओढ नक्कीच प्रेरणादायी आहे.

### घाईघाईत निर्णय घेतले नाहीत...

वसंतराव नाईक यांनी आयुष्यात कधीही घाईघाईत कोणतेही निर्णय घेतले नाहीत. एकदा नव्हे, तर दहादा विचार करूनच ते निर्णय घेत असत. त्यामुळे त्यांचे निर्णय कधी चुकत नसत. उलट ते दूरगामी व परिणामी ठरत असत.



बंजारा जमातीसारख्या जमातीत जन्मलेल्या वसंतराव नाईक यांनी शहाणपण, प्रेमळपणा या जोरावर महाराष्ट्र जिंकला, राज्याला आर्थिक बळकटी मिळवून दिली. दुष्काळाचा सामना कसा करावा, हे त्यांनीच शिकवले. शेती फुलवा, सोनं पिकवा ही जादू याच जादूगाराची. खेड्यात राहणाऱ्या कष्टकऱ्यांना, शेतकऱ्यांना मातीतून पांढरं सोनं पिकवणाऱ्यांना कापसाचे भाव त्यांनीच बांधून दिले. शेती व शेतकऱ्यांना प्रतिष्ठा देणारा, सत्तेपेक्षा राज्यातील जनतेची काळजी वाहणारा, दीर्घकाळ सत्तेवर राहूनही निगर्वी राहणारा वसंतराव नाईक यांच्यासारखा नेता विरळाच.

**शिक्षणाचे महत्त्व**

शिक्षकांना योग्य प्रतिष्ठा व दर्जा सर्वांनी प्राप्त करून द्यावयास हवा याबाबत वसंतराव नाईक आग्रही होते. शाळा व शिक्षक ही श्रद्धास्थाने विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण करावयास हवीत. श्रमाबद्दल घृणा निर्माण करणारी जी अनिष्ट भावना आज समाजात निर्माण झाली आहे, तिला जबरदस्त धक्का देऊन नेस्तनाबूत करणारी शक्ती आजच्या शिक्षणाने निर्माण केली नाही, तर देश संकटाच्या परिस्थितीवर मात करण्याची सुतराम शक्यता नाही, असे त्यांचे मत होते. शिक्षणामुळे मनुष्याला पूर्णत्व येते म्हणतात; पण अलीकडे दिसणारी प्रवृत्ती वेगळी आहे. कोणताही देश महान होतो तो देशातील लोकांनी जपलेल्या श्रमाप्रतिच्या जाणिवेमुळे. स्वावलंबन, आत्मविश्वास व स्वतःच्या हाताने काम करण्याची वृत्ती या गोष्टी शिक्षणातून निर्माण व्हायला हव्यात. नाही तर शिक्षणाचे स्वरूप केवळ माहिती गोळा करणे एवढेच ठरेल, अशी त्यांची भावना होती.

१९७२ च्या दुष्काळातून महाराष्ट्राला त्यांनी लीलया बाहेर काढले. कुणालाही उपाशी राहू दिले नाही. वि. स. पागे यांच्या कल्पनेतून आकाराला आलेल्या रोजगार हमी योजनेची मुख्यमंत्री असताना नाईक साहेबांनी प्रभावी अंमलबजावणी केली. आजच्या महात्मा गांधी नरेगा योजनेचे मूळही याच रोजगार हमी योजनेमध्ये आहे. शेतकऱ्यांना मातीमोल भावाने कापूस विकावा लागायचा. हे रोखण्यासाठी नाईक साहेबांच्याच काळात सुरू झाली ती एकाधिकार कापूस खरेदी योजना!



**वादग्रस्तता नाही**

देश व राज्य पातळीवरील राजकारण्यांकडे नजर वळविली तर काही राजकारणी आपल्या वक्तव्यांमुळे अडचणीत येतात व वादग्रस्त ठरतात; परंतु महाराष्ट्राची धुरा तब्बल साडेअकरा वर्षे सांभाळणारे वसंतराव नाईक हे कधीही वादग्रस्त बनले नाहीत. त्यांच्या तोंडून एकही वावगा शब्द बाहेर पडला नाही. अत्यंत विचाराने, समन्वयाने त्यांनी महाराष्ट्राची धुरा सांभाळली. लोकशाहीत विरोधी पक्षांना योग्य मानसन्मान देण्याची शिकवण त्यांनी दिली. कृष्णराव धुळप, एन. डी. पाटील, एस. एम. जोशी, आचार्य प्र. के. अत्रे, जांबुवंतराव धोटे, मृणाल गोरे, केशवराव धोंडगे, उद्धवराव पाटील यांच्यासारख्या बलाढ्य विरोधी नेत्यांशी नाईक साहेबांना तोंड द्यावे लागले. या अशा नेत्यांना त्यांनी मानसन्मान दिला, एवढेच नव्हेतर विधानसभा व विधान परिषदेच्या विरोधी पक्षनेत्यांना मंत्री पदाचा दर्जा दिला. विरोधी पक्षातही त्यांचे तेवढेच मित्र होते. खऱ्या अर्थाने ते अजातशत्रू होते.

वसंतराव नाईक हे कमी बोलायचे. त्यांच्या चेहऱ्यावर कधी राग नसायचा. राग आलाच तर त्यांच्या पाईपमधून गतीने निघणाऱ्या धुरातून निघायचा.

वसंतराव नाईक यांची एक आठवण आवर्जून सांगावीशी वाटते. माझे वडील स्व. जवाहरलाल दर्डा व नाईक साहेब यांची प्रगाढ मैत्री संपूर्ण महाराष्ट्राला माहिती आहे. १९७७ च्या निवडणुकांमध्ये इंदिरा गांधी यांचा पराभव झाला. त्यानंतर त्यांच्याबरोबर राहावयाचे की नाही, यावरून माझे वडील व नाईक साहेब यांच्यात मतभेद झाले. वडिलांनी इंदिराजींबरोबर जाण्याचा निर्णय घेतला आणि आमदारकीचाही राजीनामा दिला व 'लोकमत'मध्ये जानेवारी १९७८ मध्ये 'ऋणानुबंधाच्या तुटून पडल्या गाठी' या अग्रलेखाने खळबळ उडवून दिली. दुसऱ्या दिवशी नाईक साहेब वडिलांना भेटायला नागपूरला आले. तेव्हा दोघांनाही एकमेकांना घट्ट मिठी पकडून रडताना आम्ही पाहिले. वेगळ्या पक्षांत राहनही त्यांच्या मैत्रीत कधी फरक पडला नाही.

१९७८ ची विधानसभेची निवडणूक होती. ते विदर्भात स्वर्णसिंग काँग्रेसच्या प्रचारासाठी आले होते. ते नागपुरात आमच्याच घरी थांबले. नाईक साहेब खालच्या मजल्यावर... वडील वरच्या मजल्यावर! वडील इंदिरा काँग्रेससाठी, तर नाईक साहेब स्वर्णसिंग काँग्रेससाठी प्रचार करीत होते. नाईक साहेबांना भंडाऱ्याला प्रचाराला जायचे होते. त्यावेळी विदर्भात इंदिरा काँग्रेसची लाट आली होती. नाईक साहेबांना भंडाऱ्याला घेऊन जाण्याची आणि सुखरूपपणे नागपूरला आणण्याची जबाबदारी माझ्यावर टाकण्यात आली होती.

**स्फूर्तीदायक भाषणे**

शेतकऱ्यांबद्दल वसंतराव नाईक यांना विलक्षण तळमळ होती. शेती हा त्यांचा आवडीचा विषय. महाराष्ट्रात हरितक्रांती घडली ती नाईक साहेबांमुळेच. त्या काळी त्यांच्याबरोबर लोकमतचा वृत्तसंपादक म्हणून मला फिरण्याचा योग आला. माझ्या डायरीत टिपण केलेले त्यांचे एक भाषण आहे. यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा येथील शेतकऱ्यांसमोर केलेल्या भाषणाचे ते रिपोर्टिंग आहे. ते म्हणाले होते की, तुमच्या शेतीला काही करून पाणी द्या. ती भिजवा. धरणाचे पाणी द्या, विहिरीचे-नाल्याचे पाणी द्या, ओंजळीने पाणी द्या. हेही होत नसेल तर घाम गाळून का होईना शेती भिजवा. शेतकऱ्यांना दिलेल्या स्फूर्तीदायक आव्हानातूनच महाराष्ट्रात त्यांनी हरितक्रांती घडवली. नाईक साहेब नेहमी आपल्याला क्रांती घडवायची आहे असे म्हणत. ते पुढे सहज म्हणायचे, क्रांती म्हटली की रक्तपाताची कल्पना समोर येते. रक्त सांडल्याशिवाय क्रांती होत नाही अशी कल्पना होऊन बसली आहे; परंतु आजच्या जमान्यात आम्हाला अभिप्रेत असलेली क्रांती रक्तपाताची नाही. ही क्रांती यशस्वी करण्यासाठी रक्त आटवावे लागेल. शेतात घाम गाळावा लागेल. उद्योगात रात्रंदिवस परिश्रम करावे लागतील. ही क्रांती आम्हाला हवीय. तसे बघितले तर मुळात वसंतराव नाईक हे स्वभावाने राजकारणी नव्हते. तरीही त्यांनी महाराष्ट्राची धुरा जवळपास १२ वर्षे यशस्वीरीत्या सांभाळली. १९७२-७३ च्या दुष्काळात उभा महाराष्ट्र होरपळून निघत होता. त्यातून महाराष्ट्राला बाहेर काढण्यासाठी वसंतराव नाईक यांनी रक्ताचे पाणी केले. रणरणत्या उन्हात त्यांनी महाराष्ट्रभर दौरे काढले. बरोबरची माणसे थकली. अनेकांचे घसे कोरडे पडले; पण नाईक साहेब कधी थकलेले दिसले नाहीत. त्यांच्या स्मृती आमच्यासाठी अजूनही स्फूर्तीदायक आहेत.



# आमचे मुख्यमंत्री

**ग. त्र्यं. माडखोलकर**

कोणताही मनुष्य अधिकारावर असताना त्याच्याविषयी लिहिणे कठीण जाते. त्याची स्तुती केली तर तोंडपूजेपणाचा आरोप येतो आणि त्याच्यावर टीका केली तर त्याला राग येतो. पण, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक यांच्याबाबतीत ही दुहेरी अडचण काही जाणवत नाही.

कारण, त्यांचे सौजन्य आणि व्यवहारबुद्धी. हे सौजन्य तोंडदेखले नाही. ते कमावलेले आहे असेही म्हणता येणार नाही. त्यांच्या स्वभावाचाच तो एक भाग आहे. ते मुख्यमंत्री झाल्यापासून गेल्या अडीच वर्षांत त्यांच्याशी माझा सतत आणि निकट संबंध आला. त्या संबंधात त्यांच्या या सौजन्याचे तीन पैलू मला विशेष जाणवले.

पहिला पैलू म्हणजे श्री. वसंतराव नाईक यांचा स्वत:च्या वाणीवर असलेला ताबा. हा वाणीचा संयम मला तरी असामान्य वाटतो. पुन्हा त्यात कोणत्याही प्रकारचे ढोंग नाही, हे विशेष होय. गेल्या अडीच वर्षांत गोवा, बेळगाव-कारवार, नद्यांच्या पाण्याचे वाटप, दारूबंदीच्या धोरणात व्यवहाराच्या आणि माणुसकीच्या दृष्टीने सुधारणा करण्याची आवश्यकता इत्यादी प्रश्नांवर त्यांचे आणि काँग्रेसश्रेष्ठींचे जे मतभेद झाले, ते प्रसिद्धच आहेत. त्याहीपेक्षा ऑगस्ट महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटीने महाराष्ट्र सरकारला अडचणीत आणण्यासाठी अचानक जो राजीनामे देण्याचा डाव टाकला, तो प्रसंग तर तसा बिकटच होता. कारण, हे राजीनामे महाराष्ट्र सरकार व त्याची कायदा आणि सुव्यवस्था यांच्या बाबतीतील नीती यांचा धिक्कार करण्यासाठीच मुळी जाणूनबुजून दिलेले होते.

पण, यापैकी कोणत्याही मतभेदाच्या किंवा मतसंघर्षाच्या वेळी त्यांचा वाक्संयम रतिमात्रसुद्धा सुटलेला मी पाहिलेला नाही. दारूबंदीचे धोरण माणुसकीच्या आणि गुन्हेगारीला आळा घालण्याच्या दृष्टीने योग्य प्रमाणात सैल करण्याचा आपला निर्णय जेव्हा त्यांनी जाहिर केला, तेव्हा जवळ जवळ सगळ्या देशातील काँग्रेस कार्यकर्त्यांत प्रतिकूल भावनेचे काहूर उठले; व वर्किंग कमिटीपासून तो टेकचंद कमिटीपर्यंत सगळ्या श्रेष्ठींचा त्या निर्णयाविषयीचा विरोध कमी-अधिक तीव्रतेने प्रकट होऊन गेला. पण, आपल्या या निर्णयापासून जसे ते ढळले नाहीत त्याचप्रमाणे त्या निर्णयाला विरोध करणाऱ्या श्री. मोरारजी देसाई, श्री. ढेबर यासारख्या श्रेष्ठींविरुद्धही त्यांनी कधी चकार शब्द खाजगी बैठकीतसुद्धा काढला नाही. याहीपेक्षा त्यांच्या वाक्संयमाचा अनुभव मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटीने धडधडीत शिस्तभंग करून जो पेचप्रसंग उत्पन्न केला, त्यावेळी माझ्या अनुभवाला आला. त्या राजीनाम्यामुळे यत्किंचितही न गडबडता ते जसे ठरल्याप्रमाणे ता. २८ ऑगस्ट रोजी मुंबईहून नागपुरास राहावयाला आले, तसाच मनाचा समतोल आणि शांतपणा तो पेच सोडवितानाही त्यांनी दाखविला. ता. ३० ऑगस्ट रोजी सायंकाळी या प्रसंगाविषयी आमचे बरेच बोलणे झाले. पण, त्या बोलण्यात मुंबई प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष श्री. खेर, त्या काँग्रेसचे नेते आणि सूत्रधार श्री. स.का. पाटील किंवा राजीनामा देणारे मंत्री यांच्याबद्दल त्यांनी एकही दुरुद्गार काढला नाही. उलट, श्री. पाटील यांच्याविषयी बोलताना त्यांनी असे म्हटले की, ''त्यांच्या उंचीचा मुत्सद्दी अशा प्रकारच्या बनावाला पाठिंबा देईल, असे मला वाटत नाही.'' बेळगाव-



राज्यपाल डॉ. पी. व्ही. चेरीयन हे श्री. वसंतराव नाईक यांना महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदाची (१९६७) शपथ देत आहेत. व्यासपीठावर आहेत केंद्रीय गृहमंत्री यशवंतराव चव्हाण.

वाक्संयमाच्या जोडीला तितकाच महत्त्वाचा वसंतरावांच्या सौजन्याचा दुसरा पैलू म्हणजे त्यांचा स्पष्टपणा. कोणतेही गाऱ्हाणे, मागणी किंवा अडचण ही एखाद्या कार्यकर्त्याने म्हणा किंवा शिष्टमंडळाने म्हणा त्यांच्यापुढे ठेवली, म्हणजे प्रथम ते त्यांचे सर्व म्हणणे ऐकून घेतात. ते जर योग्य आहे असे त्यांना वाटले, तर लगेच जेवढा मुद्दा त्यांना पटलेला असेल, तेवढ्या मुद्द्यापुरता ते स्पष्ट खुलासा करतात आणि आश्वासनही देतात. जर म्हणणे पटले नाही, तर तसेही अगदी सौम्यपणाने पण स्पष्टपणाने सांगून मोकळे होतात. पण, उगाच गोड बोलणे किंवा गुळमुळीत आश्वासन देणे नाही. त्यांनी एकदा शब्द दिल्यावर तो पुरा करावयाला कदाचित वाजवीपेक्षा जास्त वेळही लागेल; पण दिलेला शब्द पुरा केल्याशिवाय मात्र ते राहत नाहीत. केव्हा केव्हा तर आपल्याकडे आलेले गाऱ्हाणे किंवा तक्रार जर त्यांना रास्त वाटली, तर तिथल्या तिथेच ते राज्ययंत्रणेचा दोष कबूल करतात आणि गाऱ्हाणे दूर करण्याचेही आश्वासन देतात.

कारवारच्या बाबतीत म्हैसूरचे मुख्यमंत्री श्री. निजलिंगप्पा आणि काँग्रेसश्रेष्ठी यांचे जे वर्तन सध्या घडत आहे, त्यामुळे त्यांच्या मनाला जरी विषाद वाटत असला, तरी तो व्यक्त करतानादेखील ते एकदा असे म्हणाले की, ''या सगळ्या दिरंगाईबद्दल आणि एकदा घेतलेले निर्णय बदलण्यात आल्याबद्दल तुम्हा-आम्हाला वाईट वाटणे स्वाभाविक आहे. पण, त्यांच्याही काही अडचणी आहेत, हे आपण ध्यानात घेतले पाहिजे. आता त्यांच्या आणि आमच्या या रस्सीखेचीमुळे केव्हा केव्हा मन कंटाळावे आणि वैतागावे, हे ठीक आहे. पण म्हणून आपण एकदम त्यांच्यावर आरोप करणे बरोबर होणार नाही.'' हा वाणीचा संयम मी दुसऱ्या कोणत्याही राजकारणी आणि विशेषत: सत्ताधारी व्यक्तीत पाहिलेला नाही.

मुंबई राज्याचे पहिले मुख्यमंत्री श्री. बाळासाहेब खेर यांच्याही तोंडून कधी कोणाविषयी दु:शब्द निघत नसे. पण, श्री. नाईक यांच्या मानाने त्यांच्यावर कटुतेचे आणि कसोटीचे प्रसंग फारसे आलेच नाहीत. शिवाय ते मृदुप्रकृती होते. उलट, श्री. वसंतराव हे सौम्य आहेत असे वाटले, तरी स्वत:च्या मतानुसार निर्णय घेताना, ते धसाला लावताना आणि अंमलात आणताना त्यांचा जो कणखरपणा गेल्या अडीच वर्षांत अनुभवाला आलेला आहे, त्यामुळे मलातरी केव्हा केव्हा असे वाटते की, चिलखतावर मलमलीचा मुलायम अंगरखा घालावा तसा तो त्यांचा सौम्यपणा आहे.



चालू हंगामात शेतकऱ्यांना बियाणे आणि खते ही दोन्हीही वेळेवर आणि पुरेशी मिळाली नाहीत व जे हायब्रिड बियाणे मिळाले, ते सदोष असल्यामुळे शेतकऱ्यांची जी नाडणूक आणि नुकसान झाले त्यासंबंधी ता. ३० ऑगस्ट रोजी मी त्यांच्याजवळ बोललो. तेव्हा त्यांनी बियाणे तयार करण्यात तज्ज्ञांची जी चूक झाली ती कबूल केली आणि मला समजावूनही सांगितली. त्याचप्रमाणे, बियाणे, खते आणि पंप बसविण्यासाठी आवश्यक असलेली उपकरणे वगैरे वक्तशीर आणि पुरेशी मिळाली नाहीत, ही तक्रारही काही प्रमाणात आणि काही ठिकाणी बरोबर असल्याचे त्यांनी चटकन मान्य केले. अशा प्रकारचा स्पष्टपणा आणि विशेषत: सरकारी यंत्रणेतील दोष किंवा चुका कबूल करण्याची प्रवृत्ती सत्ताधारी व्यक्तीत सहसा आढळत नाही.

त्यांच्या सौजन्याचा तिसरा पैलू म्हणजे सरळपणा. राजकारणात सरळपणा ही चीज कधी अनुभवालाच येत नाही. अर्थात, राजकारणातील नाना प्रकारची गुंतागुंत, डाव आणि पेच हे ध्यानात घेतले असता, राजकारणी माणसाला सरळपणाने वागणे जर गैरसोईचे वाटत असेल, तर त्याबद्दल त्याला दोष देणे कठीण जाईल. त्यामुळे एखादा पुढारी किंवा मंत्री हा एखाद्या प्रसंगी किंवा बाबतीत आपल्याशी सरळ वागला नाही आणि त्यामुळे आपली फसवणूक झाली, असे जरी अनुभवाला आले, तरी ते तितकेसे अक्षम्य वाटत नाही. पण, असल्या तोंडदेखल्या गोड बोलण्याचा आणि त्यामुळे होणाऱ्या फसवणुकीचा अतिरेक झाला, म्हणजे मात्र मन विटून जाते. श्री. वसंतराव नाईक यांचा सरळपणा हा यादृष्टीने अपवादच म्हणावा लागेल. त्यांच्या या सरळपणामुळे आणि स्पष्टपणामुळे त्यांनी केव्हा केव्हा काँग्रेसश्रेष्ठींची तर केव्हा केव्हा आपल्या सहकारी मंत्र्यांचीही नाराजी स्वत:वर ओढवून घेतल्याचे मला माहीत आहे. अशा प्रसंगाविषयी बोलताना ते उसळून विचारतात, ''मग काय मी खोटे बोलू? आणि खोटी आश्वासने देऊन फसवणूक करू? त्यापेक्षा मला नाराजी पत्करेल. आज ना उद्या मी सरळपणाने वागलो, याची जाणीव होऊन ती आपली नाराजी अनाठायी होती, असे त्या मंडळींच्याही ध्यानात आल्याशिवाय राहणार नाही.'' मला वाटते, ही त्यांची विचारसरणी अगदी योग्य आहे.

श्री. वसंतराव नाईक यांच्या गेल्या अडीच वर्षांच्या राजवटीतील त्यांची सगळ्यात महत्त्वाची प्रशंसनीय कामगिरी जर कोणती असेल, तर ती म्हणजे महाराष्ट्र राज्याच्या पाचवीला पूजलेले अन्नधान्याचे दुर्भिक्ष्य दूर करण्यासाठी त्यांनी सतत चालविलेले विविध आणि यशस्वी प्रयत्न. कै. काकासाहेब गाडगीळ हे मजजवळ बोलताना एकदा उद्‌गारले होते, 'तुमचे वसंतराव नाईक शेतीशिवाय दुसरी गोष्ट बोलत नाहीत.' त्यांच्या डोक्यात शेतीशिवाय दुसरा विषय नाही. शेतकऱ्यांच्या हितसंबंधांच्या दृष्टीने त्यांचा सगळा कारभार आज चाललेला आहे. त्यावर मी त्यांना विचारले, ''पण, यात वाईट काय आहे? आपला देश शेतीप्रधान आहे. शेतकरी हा आपल्या देशाचा कणा आहे आणि शेतीकडे दुर्लक्ष केल्यामुळेच आज आपल्यावर भिक्षांदेहीची पाळी आलेली आहे. म्हणून सध्याच्या परिस्थितीत शेती हा एकच विषय डोक्यात असलेला मुख्यमंत्री महाराष्ट्राला लाभला, हे आपले सुदैव समजले पाहिजे.''

माझ्या समजुतीने श्री. वसंतराव नाईक यांचे शेतीवर भर देण्याचे धोरण आणि शेतीच्या निरनिराळ्या सुधारलेल्या योजना अंमलात आणण्याच्या बाबतीतील त्यांची तळमळ आजच्या आपल्या स्थितीत तरी वरदानच ठरणार आहे. त्यांच्या या धोरणाची छाप केंद्रीय कृषिमंत्री आणि केंद्रीय सरकारचे शेती आणि शेतकरी यांच्या संबंधीचे धोरण यांच्यावरही पडली असल्याचे स्पष्ट दिसते. त्यामुळे, माझ्या मनात केव्हा केव्हा अशी कल्पना चमकून जाते की, महाराष्ट्र भारताला नव्या दृष्टीचा कृषिमंत्रीही देईल!!

शेती आणि शेतकरी यांच्यासंबंधीची श्री. वसंतराव नाईक यांची कळकळ आणि तळमळ जिवंत आणि अंगभूत आहे. म्हणजे असे की, त्यांच्या शासकीय जीवनाप्रमाणेच त्यांचे कौटुंबिक जीवनही त्या तळमळीने व्यापलेले आहे. त्यांनी आपल्या दोन्ही पुतण्यांना शेती आणि बागाईत यांच्या कामात घालून त्यांना उत्पादनाची नवीन दृष्टी दिली व त्यांचे जीवन समृद्धीच्या मार्गाला लावले. खुद्द त्यांच्या स्वत:च्या मलबार हिलवरील बंगल्याच्या मागल्या आवारात त्यांनी बागायतीचे निरनिराळे प्रयोग चालविलेले असून, जो काय थोडासा फुरसतीचा वेळ त्यांना राजकारणाच्या धकाधकीत मिळतो, तो सर्व वेळ ते स्वत:, त्यांच्या पत्नी सौ. वत्सलाबाई आणि त्यांचे दोघे मुलगे असे सर्वच बागायतीच्या कामात हौसेने घालवतात. ता. ३ ऑगस्ट रोजी सकाळी आम्ही त्यांच्या बंगल्यावर बोलत बसलो असता, त्यांनी मला आपल्या बगिच्यात लावलेल्या पोफळीच्या झाडाला आलेल्या ताज्या पोफळांचा घड मोठ्या उत्साहाने दाखविला होता.

**(संदर्भ : १९६६ साली प्रकाशित 'वसंतराव नाईक गौरव ग्रंथा'मधून साभार.)**



# जातीधर्माच्या पल्याड...

साठच्या दशकात शेतीचे एकरी उत्पादन फार कमी होते. वसंतराव नाईकांच्या प्रयत्नांमुळे कापूस व ज्वारीच्या नव्या जातीचे संशोधन झाले. संकरित वाण शेतकऱ्यांपर्यंत पोहोचले. शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणारे संशोधक कृषी विद्यापीठांमार्फत उपलब्ध झाले. कृषी विद्यापीठापर्यंत शेतकरी येऊ लागले. कृषी संशोधक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचू लागले. मार्गदर्शन करू लागले. परिणामी, सत्तरच्या दशकात शेतकऱ्यांचे एकरी उत्पादन वाढले. शेतकऱ्यांच्या जीवनात बदल झाल्याचे जाणवू लागले. वाळवंटातील हिरवळ म्हणून समाज त्यांच्याकडे पाहू लागला.


**प्रा. फौजिया खान**

(राज्यमंत्री )


आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडण आणि उभारणीमध्ये ज्या मोजक्या व्यक्तींचे योगदान उल्लेखनीय आहे, त्यामध्ये दिवंगत मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचा नामोल्लेख केल्याशिवाय इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. आपल्या हयातीमध्ये ज्या व्यक्ती समाजहितैषी भूमिका घेत कार्यरत असतात, त्याची नोंद भलेही बऱ्याचदा वर्तमान घेत नसेल; पण इतिहासाला मात्र घ्यावीच लागते. महाराष्ट्राच्या आजपर्यंतच्या वाटचालीचा विचार करत असताना यशवंतराव चव्हाण ते शरद पवार या पर्वाची इतिहासाला निर्विवाद नोंद घ्यावी लागणार आहे. परंतु, ह्या दोन महान नेत्यांना जोडणारी जी एक मजबूत कडी होती तिचे नाव होते वसंतराव नाईक! आणि म्हणून महाराष्ट्राचा आजपर्यंतचा प्रवास यशवंतराव चव्हाण ते शरद पवार व्हाया वसंतराव नाईक असा झाला आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये.



परभणी येथील मराठवाडा कृषी विद्यापीठाला वसंतराव नाईक यांचे नाव देऊन हे विद्यापीठ अंलकृत करावे अशी आग्रही मागणी मी आमदार असताना २००३ साली विधान परिषदेत आलेल्या एका अशासकीय ठरावावर बोलताना केली होती. त्याचा पाठपुरावा केला. त्यांच्या जन्मशताब्दी वर्षात हरितक्रांतीचे नाते मराठवाडा कृषी विद्यापीठाशी जोडण्याचा एक प्रयत्न म्हणून नामांतर होत आहे. त्याचा परभणीची नागरिक म्हणून सार्थ अभिमान आणि सरकारमधील घटक आणि वसंतराव नाईक जन्मशताब्दी महोत्सव समितीची सदस्य म्हणून मला आत्मीय समाधान आहे!



नाईक साहेबांची जडणघडण ग्रामीण भागात, वंचित, उपेक्षित घटकांत झाली. अनेक अडथळ्यांवर मात करून ते उच्च विद्याविभूषित झाले. शिक्षणाची सुविधा नसताना त्यांनी ही किमया केली. नागपूर येथील मॉरिस कॉलेजमध्ये शिकत असताना वाचनाबरोबरच त्यांना दोन व्यक्तींनी प्रभावित केले. एक, थोर समाज क्रांतिकारक महात्मा जोतिबा फुले आणि दुसरे सुप्रसिद्ध लेखक डेल कार्नेग!

त्यांच्या ११ वर्षांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कारकिर्दीकडे बारकाईने पाहिले तर शेती, शेतकरी, शिक्षण, उद्योग या बाबींबरोबरच सामाजिक बांधिलकी म्हणून वंचित घटकांकडे त्यांनी जाणीवपूर्वक लक्ष दिल्याचे दिसून येईल. सामाजिक न्याय देण्याचे काम जर सुशिक्षितांना करता आले नाही, तर अशिक्षितांकडून आपण ती अपेक्षा कशी करू, असे ते म्हणत. शिक्षणाची गंगा सर्व घटकांपर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांनी वसतिगृह व प्राथमिक शाळा सुरू करण्यास चालना दिली. शिक्षण क्षेत्रात सुसूत्रता आणली. पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा या विभागात माध्यमिक शिक्षण पूर्ण करण्यासाठी ११ वर्षे लागत; तर विदर्भात

१० वर्षे. ती एकसूत्रतेमुळेच दूर झाली.

शिक्षणाप्रती ते खूपच जागरूक असत. विद्यार्थ्यांमध्ये मूल्यशिक्षणाबरोबरच सामाजिक बांधिलकीची भावना रुजावी, असे ते सातत्याने सांगत. त्यासाठी शिक्षकाची देखील तेवढीच जबाबदारी आहे. ज्ञानदानाचे पवित्र व महत्त्वाचे कार्य करणाऱ्या शिक्षकाला समाजात योग्य प्रतिष्ठा व दर्जा सर्वांनी प्राप्त करून द्यायला हवा. शाळा व शिक्षक ही श्रद्धास्थाने विद्यार्थ्यांच्या मनात हवीत. समाजाला शिक्षकाकडून मिळत असलेल्या ज्ञानदानाची प्रतीकात्मक पावती तरी सर्व समाजाने द्यावयास हवी व त्यांच्या कार्याचा यथोचित गौरव करण्याची भावना समाजाच्या मनात निर्माण व्हावयास हवी, असे ते आग्रहाने सांगत. ते असेही म्हणत, 'मेहरबानी करून शिक्षण नोकरीसाठी घेत आहात, असे समजू नका.' एके ठिकाणी खंत व्यक्त करताना ते म्हणतात, 'शिक्षणामुळे मनुष्याला पूर्णता येते असे म्हणतात, परंतु आपल्या देशात अलीकडे दिसणारी प्रवृत्ती वेगळी आहे. त्यासाठी शिक्षण घेऊन सुसंस्कृत बनले पाहिजे.'

नाईक साहेबांचे व्यक्तिमत्त्व अष्टपैलू होते. ते ज्या काळात मुख्यमंत्री झाले तो काळ महाराष्ट्र उभारणीचा होता. राज्य घडविण्याचा होता. सीमा प्रश्न, गिरणी कामगारांचा संप, कोयनेचा भूकंप, १९७२ चा भीषण दुष्काळ सर्व प्रश्नांना त्यांनी मोठ्या कौशल्याने आणि तेवढ्याच धाडसाने तोंड दिले. औद्योगिक प्रगती तर झालीच पाहिजे, परंतु, बहुसंख्येने शेतीवर राबणारा शेतकरी व शेतमजूर यांना विश्वास देणे तेवढेच महत्त्वाचे आहे, असे त्यांना वाटायचे. राज्यात चार कृषी विद्यापीठांची निर्मिती करणे ही साधी गोष्ट नव्हती. या चार विद्यापीठांपैकी मराठवाड्यातील परभणी हे एक होय.

कोरडवाहू शेती शेतकऱ्यांना हुलकावणी देते. पाऊस वेळेवर आला नाही, तर शेतकऱ्यांचे गणित कोलमडून जाते, याचे भान नाईक साहेबांना होते. त्यामुळे त्यांनी पावसाचे पाणी अडविण्याचा व विहिरी खोदण्याचा संकल्प केला. विहिरींच्या पाण्यांवर शेती भिजू लागली. ठिकठिकाणी किर्लोस्कर कंपनीचे इंजिन शेतावर दिसू लागले. त्या काळात छोटेछोटे बंधारे बांधले गेले. पुढे ते वसंत बंधारे या नावाने ओळखले जाऊ लागले. राज्यात प्रादेशिक असमतोल राहू नये म्हणून कृषी विद्यापीठांची निर्मिती करताना कोणत्याही विभागावर अन्याय होऊ दिला नाही.

### भूदान चळवळीला योगदान

त्या काळात जमीनदारी पद्धत होती. एका-एका जमीनदाराकडे हजारो एकर शेती होती. आचार्य विनोबा भावे यांच्या भूदान चळवळीत त्यांनी झोकून दिले. यवतमाळ जिल्ह्यात त्यांनी हजारो एकर शेती भूदानात मिळवून दिली. पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू व श्रीमती इंदिरा गांधी यांना यवतमाळ येथे बोलावून भूदानाचा समारंभ त्यांनी घडवून आणला. रोजगार हमी योजना, कापूस खरेदी एकाधिकार या योजनेचे ते निर्माते आहेत. कुळ कायदा लागू करण्याचा धाडसी निर्णयदेखील त्यांनी त्या काळात घेतला. 'कसेल त्याची जमीन' अशी घोषणा करून जमीनदारांना आव्हान दिले होते. ते स्वत: जमीनदार होते. त्यामुळे जमीनदारांचे मतपरिवर्तन करण्यातही त्यांना यश मिळाले. या घोषणेमुळे शेतमजूर व छोट्या शेतकऱ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले. सामाजिक न्यायाच्या दिशेने टाकलेली ही ठोस पावले म्हटली पाहिजेत.


संत्र्याच्या बगिच्यात वसंतराव नाईक.

सत्तरच्या दशकाच्या प्रारंभी मराठवाडा विकास आंदोलन तीव्र झाले होते. अवघा मराठवाडा ढवळून निघाला होता. परंतु, नाईक साहेब विचलित झाले नाहीत. कारण, आंदोलनकर्त्यांचे प्रश्न समजावून घेऊन त्यांची सोडवणूक करून घेण्याची त्यांच्याकडे विलक्षण हातोटी होती. मराठवाडा कृषी विद्यापीठ, चिखलठाणा औद्योगिक वसाहत, औरंगाबाद येथील सिडको, मराठवाडा विकास महामंडळ हे त्यांच्या दूरदृष्टीमुळे मराठवाड्याला मिळाले. ते सर्वांना बरोबर घेऊन काम करायचे. कोणत्याही गटातटात, भेदभाव, जातीधर्मात ते कधीच अडकले नाहीत. म्हणून ते सर्वमान्य नेते झाले.


## वसंत-विचार

### ही संस्कृती नव्हे-विकृती

''माणसाने माणसात फरक करणे, माणसाने माणसाला माणसाप्रमाणे न वागविणे यात सुसंस्कृतपणा आहे काय? घाणेरड्या जनावराला स्पर्श करतो तेव्हा आम्ही बाटत नाही. कुत्र्यामांजराला स्पर्श करतो तेव्हांही आम्हाला विटाळ होत नाही. पण अस्पृश्य समाजात जन्मलेला माणूस कितीही स्वच्छ, चांगला असला तरी त्याला हात लागल्याने मात्र आम्ही बाटतो! आणि काय आश्चर्य? पाण्याचे चार शिंतोडे घेतले म्हणजे आम्ही लगेच शुद्ध पण होतो! भारतीय समाज किती विकृत मनोवृत्तीने ग्रासला आहे. आपल्या स्पृश्यास्पृश्यतेच्या कल्पना किती खुळ्या आणि निरर्थक आहेत यांची यावरून कल्पना येते. तीच जर आम्हाला उच्च संस्कृती वाटत असेल तर आपण आपली कीव केली पाहिजे.''



# कुटुंबवत्सल



**एका प्रसन्न क्षणाचे साक्षीदार वसंतराव, वत्सलाबाई, अविनाश आणि निरंजन नाईक.**

वसंतराव नाईकांच्या जीवनात वत्सलाबाईंचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. जातीपातीला थारा न देण्याच्या विचारसरणीतूनच वसंतरावांनी ब्राह्मणकन्या असलेल्या वत्सलाबाईंशी विवाह केला. वसंतरावांच्या कार्यकर्तृत्वाच्या सर्व पैलूंच्या जवळच्या साक्षीदार वत्सलाबाई होत्या. त्यांना भावलेले वसंतराव कसे होते, याविषयी **ज्येष्ठ पत्रकार शरद अकोलकर** यांनी १९६६ साली घेतलेली व वसंतराव नाईक गौरव ग्रंथामध्ये प्रकाशित झालेली मुलाखत रंजक आहे. ही मुलाखत वसंतरावांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाची ओळख हळुवारपणे करून देते.

आता हेच पाहा ना! कधीकधी आम्ही विरंगुळा म्हणून पत्ते खेळतो. परंतु, पत्त्याच्या खेळातही वसंतराव जिंकतात आणि आम्ही इतर खेळणारे त्यांना म्हणतो, ''पत्तेदेखील तुमच्या बाजूचे आहेत.''

कर्रर.. कच्चच...

ड्रायव्हरने गाडीचा ब्रेक दाबला अन् गाडी उभी करून तो म्हणाला, ''लिजीये साहब, मुख्यमंत्रीजीका बंगला आ गया.'' क्रॉफर्ड मार्केटवरून मलबार हिलपर्यंत टॅक्सीने पोहोचायला लागणारा पंधरा मिनिटांचा वेळ कसा निघून गेला हेही मला कळलं नव्हतं. वळणा-वळणानं पुढे धावणाऱ्या गाडीच्या काचांतून दिसणाऱ्या इंद्रधनुष्याच्या सप्तरंगात बुडालेली मुंबापुरी मी न्याहाळत होतो. तोच मलबार हिलवरील वसंतराव नाईकांच्या बंगल्यापुढं टॅक्सी उभी राहिली.

वसंतराव नाईकांचं.. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांचं निवासस्थान. प्रवेशद्वारावर मी क्षणभर उभा राहिलो. हिरव्या वनराईनं वसंतराव नाईकांचा बंगला वेढला होता. लगतच्या अरबी समुद्रावरून वाहणारा वारा हिरव्या ताडामाडांशी, नारळी-पोफळींशी, केळी अन् आम्रपल्लवांशी मुक्त मनानं विहार करीत होता. हिरवी वृक्षवेली हलत होती. त्यांच्यातील पोपटी चैतन्य ओसंडत होतं. प्रवेशद्वारातून आत प्रवेश करताना माझं लक्ष द्वारफलकावर गेलं. त्यावर अक्षर कोरली होती 'वर्षा.'

षड्ऋतूंच्या चक्रात अवनी आपलं वेगवेगळं रूप धारण करते. वर्षा ऋतूत सृष्टी हिरवी इरकली परिधान करते. मेघमल्हार ह्याच ऋतूत गायिला जातो. कालिदासाच्या निर्वासित यक्षान रामगिरी पर्वतावरून जलदाबरोबर ह्याच ऋतूत आपल्यहा प्रियेला संदेश पाठविला होतहा. पण वर्षाऋतूचं खरं महत्त्व वाटतं ते उघड्या धरित्रीवर काम करणाऱ्या किसानांना. कारण त्यांच्या आशेचं केंद्रस्थान म्हणजे वर्षा!

महाराष्ट्राचा मुख्यमंत्री जिथं राहतो त्या स्थानाचं नावही वर्षाच आहे. माझ्या मनात आलं, किती सार्थ नाव आहे.

विचाराच्या तंद्रीतच मी बंगल्याच्या दाराशी येऊन पोहोचलो. नेहमीप्रमाणे काही लोक तेथे वाट पाहत उभे होते. मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव श्री. पाठक यांच्याशी बोलत मी बंगल्याबाहेर उभा होतो. तोच कुठल्याशा कामाला बाहेर जाण्याकरिता म्हणून वसंतराव नाईक बंगल्याबाहेर पडले. माणसांच्या गर्दीतून अचानक त्यांचं लक्ष माझ्याकडे गेलं आणि उमलत्या स्मितानं ते मला म्हणाले,

''अरे तू केव्हा आलास?''

थोडं त्यांच्याजवळ जाऊन मी म्हणालो, ''दोन दिवस झाले. 'ग्रामदूत' साप्ताहिकाचा येत्या १ जुलै रोजी विशेषांक काढतोय. त्याचं मुखपृष्ठ तयार करून घ्यायचं होतं. थोडा वेळ मिळाला म्हणून इकडं आलो. आपल्याला वेळ नाही ह्याची मला जाणीव आहे. आणि म्हणूनच काकूंची (सौ. वत्सलाबाई नाईक) मुलाखत मिळू शकली तर प्रयत्न करावा म्हणून आलोय.''

''अस्सं होय! पण, आज तिला तर वेळ नसेल. तरीपण तू प्रयत्न कर,'' असं सांगून

वसंतराव नियून गेले. लागलीच मी चपराशाच्या हातून सौ. वत्सलाबाईंच्याकडे मुलाखतीला वेळ मिळावा म्हणून चिठ्ठी पाठविली आणि लागलीच मला बंगल्यात बोलावलं गेलं.

मी बंगल्यात प्रवेश केला त्यावेळी सौ. वत्सलाबाई आपल्या छोट्या निरंजनला शिकवीत होत्या. परंतु, मला वाटतं शिकविण्याची वेळ संपलेली असावी. लागलीच त्या येऊन दाखल झाल्या. चहा आणि फराळाचं माझ्या पुढ्यात ठेवलं गेलं. मी माझी ओळख करून देण्यापूर्वीच त्या म्हणाल्या, ''तुम्ही यवतमाळचे मागल्या सार्वत्रिक निवडणुकीचे वेळी पुसद तालुक्यात मी असताना आमच्या सोबत तुम्ही होता.''

मला जरा बरं वाटलं; आणि आम्ही दोघांनीही चहासोबतच चर्चेलाही सुरुवात केली.

'तुमच्या दृष्टिकोनातून वसंतराव नाईकांचं व्यक्तिमत्त्व' हा माझ्या मुलाखतीचा विषय असल्याचं मी त्यांना सांगितलं. त्यावेळी त्या उत्तरल्या, ''हे बघा! वसंतरावांच्या जीवनात जर माझ्या दृष्टीने सर्वांत मोठी कोणती गोष्ट असेल तर ती त्यांचा सोशीकपणा, सहनशीलता.''

''निरंजनला शिकविण्याच्या कामात मी व्यत्यय तर नाही ना आणला?''

त्यावर त्या म्हणाल्या, ''छे: छे: शिकवायचं काम संपलं होतं म्हणूनच मी तुम्हाला वेळ दिला होता.''

''हे बघा! मी जर आपल्याला काही प्रश्न विचारले तर चालेल का?'' मी विचारलं.

आणि त्यावर त्यांनी लागलीच आपली संमतीही दिली.

मी प्रश्न केला, ''वसंतरावांच्या सार्वजनिक व राजकीय जीवनाच्या प्रारंभकालापासून आपण त्यांच्या धर्मपत्नी म्हणून त्यांच्या सहवासात आहात. तेव्हा अगदी सुरुवातीपासून वसंतरावांच्या व्यक्तिमत्त्वात कोणकोणती वैशिष्ट्ये होती व त्यांचा कसकसा विकास झाला?''

माझा प्रश्न ऐकून घेतल्यानंतर सौ. वत्सलाबाई उत्तरल्या, ''१९४१ साली मी वसंतरावांशी विवाह केला. विवाहानंतर आम्ही पुसद व गहुली येथे राहू लागलो. वसंतरावांच्या सार्वजनिक जीवनाला ह्याच काळात प्रारंभ झाला. आम्ही पुसदला असताना अधून-मधून गहुलीला शेतीवर जात असू. एकदा मी आणि वसंतराव शेती पाहावयासाठी गहुलीला गेलो असताना एक माणूस वसंतरावांच्याकडे आला आणि त्याने आम्हाला ५०० रुपये उसने मागितले. त्यावेळी त्यांनी त्या माणसाला ५०० रुपये लागलीच दिले. इतरांना कोणतीही मदत करण्याची त्यांची वृत्ती आजही कायम आहे. आदरातिथ्य व दुसऱ्याच्या उपयोगी पडण्याच्या त्यांच्या या वृत्तीप्रमाणेच वसंतरावांत मी आणखी एक गुण पाहिला आणि तो म्हणजे त्यांचा निर्व्याज स्वभाव. कुणी कितीही चुका केल्या तरी चूक करणाऱ्या माणसावर ते रागावलेले मी कधीही पाहिलेले नाही. उलट ज्याचे हातून चूक झाली असेल त्याला शांतपणे त्याची चूक ते समजावून देतील. सहनशील स्वभावामुळेच त्यांनी अनेकांना जिंकले आहे असे मला वाटते.''

वत्सलाबाई बोलत होत्या परंतु त्यांना मध्येच थांबवून मी प्रश्न केला-

एल .एल. बी. होऊन वसंतरावांनी पुसद येथे वकिलीच्या व्यवसायास सुरुवात केली. फक्त वकिली करणे हा काही वसंतरावांचा एकमेव उद्योग नव्हता, तर वकिलीपेक्षाही ते शेतीत जास्त लक्ष घालीत असत. सामाजिक कामे करण्याचा त्यांनी नित्यनियमच केला होता. पुसदजवळील खेड्यात जाऊन साक्षरताप्रसार, दारूबंदी, ग्रामसुधारणा व जुन्या चालीरीती मोडून काढण्याची मोहीम त्यांनी सुरू केली होती. वसंतरावांना राजकारणापेक्षा सामाजिक सुधारणेचे कार्य करण्यात अधिक रस होता. त्यांच्या जीवनात सुरुवातीपासूनच एकाकीपणाला थारा नव्हता. रोजचे जेवण ते एकटे कधीच घेत नसत. त्यांच्यासोबत पंक्तीला चार - सहा लोक असायचे. एखाद्या दिवशी पंक्तीला जर कोणी नसेल तर त्यांना जेवण जात नसे. आपल्यासोबत जेवावयाला असलेल्यांची बडदास्त ठेवण्यात त्यांना खूप आनंद वाटायचा. आदरातिथ्य हा वसंतरावांच्या जीवनाचा स्थायीभाव. आदरातिथ्याबरोबरच इतरांना मदत करण्याची वृत्तीही त्यांच्याजवळ सुरुवातीपासूनच आहे. कुणाचे काही अडले तर त्याला मदत करण्यात वसंतराव कधीही मागेपुढे पाहत नसत.


लालबहादूर शास्त्री, वसंतराव, वत्सलाबाई आणि निरंजन नाईक.



''वसंतराव आज महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदावर आहेत. म्हणजे आज ते राजकीय क्षेत्रात आहेत. राजकारणात तर मुत्सद्दीपणा हवा असतो. डावपेच जाणणारा माणूसच राजकारणात पुढे येतो. परंतु, वसंतरावांच्या जीवनात तर डावपेच नाहीत. तेव्हा ते मुख्यमंत्री पदापर्यंत कसे पोहचू शकले? आपण त्यांच्या अगदी निकट असल्यामुळे आपण हे अधिक चांगल्या रीतीने सांगू शकता.''



''होय! वसंतराव सहनशील आहेत, आदरातिथ्य करण्यात त्यांना अतिशय आनंद वाटतो आणि अगदी मोकळ्या मनाने सर्वांशी वागण्याचीही त्यांची वृत्ती आहे. तरीही ते राजकीय क्षेत्रात प्रगती करीत राहिले आणि ह्याचे कारण म्हणजे त्यांचे भाग्य. त्यांचे नशीब इतके बलवत्तर आहे की, पुसदला वकिली करीत असतानाच ते जसे सामाजिक सुधारणेत लक्ष घालायचे तसेच राजकीय क्षेत्रातही हळूहळू त्यांचा योगायोगाने शिरकाव होत होता. पुसद नगरपालिकेचे अध्यक्ष म्हणून ज्यावेळी ते प्रथम निवडले गेले तेव्हाच त्यांच्या राजकीय जीवनाला प्रारंभ झाला; आणि पुढे अगदी योगायोगानेच त्यांना त्या वेळच्या मध्यप्रदेश विधानसभेचे तिकीट मिळाले. वास्तविक, काँग्रेसचे तिकीट मिळावे म्हणून त्यांनी अर्जही केला नव्हता. परंतु, योगायोगाने त्यांना काँग्रेसचे तिकीटही मिळाले आणि ते नुसतेच विधानसभेत निवडून आले नाहीत तर त्यांना उपमंत्रीपदही मिळाले. हा सर्व योगायोग होता व त्या वेळच्या मध्यप्रदेशात उपमंत्री झाल्यापासून आज मुख्यमंत्री होईपर्यंत कुठलेही राजकीय डावपेच न लढवता, केवळ नशिबाने म्हणा, योगायोगाने म्हणा वा त्यांच्या स्वभावामुळे म्हणा आज ते मुख्यमंत्री झाले आहेत.''

वत्सलाबाईंना मध्येच थांबवून मी म्हणालो, ''छे: एवढ्या मोठ्या महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पद कोणाला केवळ नशिबाच्या जोरावर मिळत नसते तर त्यासाठी अशा माणसाची सेवा जनतेजवळ रुजू व्हावी लागते. तशी त्यांच्या सेवेची ठेव जनतेजवळ असल्यामुळे स्वत:च्या कर्तृत्वाने नाईकसाहेब आज मुख्यमंत्री झाले आहेत.''

माझे बोलणे संपते न संपते तोच वत्सलाबाई म्हणाल्या, ''तुमचे म्हणणे खरेही असेल; परंतु माझे म्हणणे मात्र खोटे नाही. वसंतरावांच्या जीवनात नशिबाची साथ त्यांना सदैव मिळालेली आहे व तेही हे मान्य करतात. आता हेच बघा ना! कधीकधी आम्ही विरंगुळा म्हणून पत्ते खेळतो. परंतु, पत्त्याच्या खेळातही वसंतरावच जिंकतात आणि आम्ही इतर खेळणारे त्यांना म्हणतो, पत्तेदेखील तुमच्याच बाजूने आहेत.''

मी पुन्हा प्रश्न केला, ''वसंतराव मुख्यमंत्री झाल्यापासून त्यांना खूप कामे करावी लागतात. तेव्हा वैयक्तिक जीवनाकडे लक्ष देण्यास त्यांना फारशी उसंत मिळत नाही. अशावेळी आपण कोणती दक्षता घेता?''

सौ. वत्सलाबाई माझा प्रश्न विचारून संपताच उत्तरल्या, ''वसंतराव मुख्यमंत्री झाले म्हणूनच त्यांच्याकडे खूप कामे असतात असे नाही, तर त्यांचे राजकीय जीवन सुरू झाल्यापासूनच त्यांच्या धावपळीच्या जीवनाला सुरुवात झाली आहे. मुख्यमंत्री झाल्यापासून त्यांचे धावपळीचे जीवन अधिक गतिमान झाले ही गोष्ट खरी आहे. तेव्हा त्यांची पत्नी या नात्याने त्यांच्या प्रकृतीला जपणे हे माझे कर्तव्यच आहे. त्या दृष्टीने ते रात्री लवकर झोपावेत व सकाळी लवकर उठावेत असा मी प्रयत्न करते. परंतु, आजपर्यंत मला त्यात फारसे यश येऊ शकले नाही. कितीही कामे असली तरी ती करण्यात वसंतरावांना कंटाळा म्हणून कधी येत नाही. चिकाटीने काम करण्याची सवय त्यांना अगदी सुरुवातीपासून झाली आहे. साधारणत: संसारातील स्त्रिया आपल्या पतीची जी काळजी घेतात तीच काळजी अर्थातच मलाही घ्यावी लागते.''

वत्सलाबाईंनी बोलणे थांबविलेले बघून मी पुन्हा प्रश्न केला, ''मला वाटतं सामान्य लोकांच्या स्त्रियांपेक्षा राजकीय क्षेत्रांतील लोकांच्या स्त्रियांना काही जास्तीच्या जबाबदाऱ्या पाळाव्या लागतात आणि त्यासोबतच काही सुखदु:खही त्यांच्या वाट्याला आलेली असतात!''

माझ्या प्रश्नावर वत्सलाबाई म्हणाल्या, ''इतर स्त्रियांच्या संसारात धावपळीला वाव नसतो. ते संथपणे चालू असतं. परंतु, राजकीय क्षेत्रातल्या पुरुषांच्या जीवनात धावपळ, गडबड सदा चाललेली असते व त्याबरहुकूम त्यांना आपल्या जीवनाचा सूर लावून घ्यावा लागतो. सामान्य संसारातील स्त्रियांपेक्षा काही सुखदु:ख राजकारणात असलेल्या पुरुषांच्या पत्नींना असतातच. आता हेच बघाना! वसंतरावांबरोबर आमच्या छोट्या निरंजनला नेहमी बोलावसं वाटतं. परंतु, वसंतराव नेहमी गडबडीत असतात. त्यामुळे ते आवश्यक तेवढाही वेळ घरात देऊ शकत नाहीत ह्याची जाणीव झाल्याखेरीज राहत नाही.''

बराच वेळ झाला होता म्हणून मी शेवटचा प्रश्न केला.

''राजकीय जीवनातून वसंतराव निवृत्त झाल्यानंतर काय करू इच्छितात?''

''निवृत्त झाल्यानंतर आपण एखाद्या शेतात घर बांधू, त्यात सुंदरशी बाग लावू आणि शेतकरी म्हणून जीवन व्यतीत करू, असे वसंतराव नेहमी म्हणतात.''

माझी मुलाखत संपली होती. मी वत्सलाबाईंचा निरोप घेतला आणि परतायला लागलो त्यावेळी वत्सलाबाईंनी उच्चारलेले शेवटचे शब्द पुन:पुन: कानात घुमू लागले... ''वसंतराव शेती करू इच्छितात.''

वसंतरावांचं जीवन समाजसुधारक, वकील व राजकीय पुढारी अशा क्रमाने विकसित झालं असलं व त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे हे पैलू असले तरी वसंतरावांचा खरा पिंड शेतकऱ्याचाच आहे.

दुतर्फा असलेल्या हिरव्या वृक्षराईमधल्या वाटेनं मी परतत होतो. वाऱ्यावर फडफडणाऱ्या पानांच्या कोमल ध्वनीत बंगल्याच्या मागच्या बाजूस असलेल्या समुद्राच्या गर्जनेचा स्वर

**(वसंतराव नाईक यांच्या ५३ व्या जन्मदिनानिमित्त प्रकाशित गौरव ग्रंथात सौ. वत्सलाबाईंच्या दृष्टीकोनातून शरद अकोलकरांनी शब्दबद्ध केलेला लेख.)**



वसंतराव नाईक आणि डॉ. बद्रिनारायण बारवाले हायब्रिड ज्वारीच्या शेतात.

वसंतराव नाईक यांनी आयुष्यभर नवनिर्मितीचा ध्यास घेतलेली माणसे जमवून महाराष्ट्राचा विकास अधिक गतिमान करण्यासाठी त्यांचा उपयोग करून घेतला. महिको बियाणे उद्योगाचे संस्थापक, जागतिक अन्न पारितोषिक विजेते, भारतीय बियाणे उद्योगाचे जनक, पद्मभूषण डॉ. बद्रिनारायण बारवाले हे त्यापैकी एक. आधुनिक बी-बियाणे आणि तंत्रज्ञानाच्या आधारे शेतीक्षेत्रात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणणे हा या दोघांना जोडणारा समान धागा होता. डॉ. बारवाले यांनी जागविलेल्या वसंतरावजींच्या आठवणी...

# हायब्रिडला प्रोत्साहन

वसंतराव नाईक साहेबांची आणि माझी ओळख तशी अनपेक्षितपणे घडून आली. एक दिवस साहेबांचे खाजगी सचिव श्री. नाशिककरांचा मला फोन आला आणि ते म्हणाले की, ''मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना आपल्याशी बोलायचे आहे.'' क्षणभर मला काहीच सुचलं नाही. खरं सांगतो मी त्याचक्षणी खुर्चीवरून उठून उभा राहिलो. कारण, साहेबांच्या बद्दल माझ्या मनात खूप आदर होता. महाराष्ट्राला विकासाच्या वाटेवर नेणारा मुख्यमंत्री म्हणून त्यांची मोठी ख्याती होती. साहेब फोनवर म्हणाले, ''तुम्ही निर्माण केलेल्या हायब्रिड ज्वारीबद्दल मी ऐकले आहे. त्याचे काही बियाणे तुम्ही पुसदला पाठवू शकाल का? मला माझ्या शेतावर या ज्वारीचा प्रयोग करायचा आहे.'' पुढे त्यांनी आपल्या शेतीवर हायब्रिड ज्वारीचा यशस्वी प्रयोग केला.

साहेबांनी कर्तृत्वाची अनेक शिखरे काबीज केली. माझ्या मनात मात्र त्यांची प्रतिमा शेती आणि शेतकऱ्यांवर प्रेम करणारा भूमिपुत्र अशीच राहिली आहे. ते पक्के शेतकरी होते. घाम गाळून शेती पिकते. त्याला तंत्रज्ञानाची जोड दिल्यास उत्पादन वाढते हे त्यांचे तत्त्वज्ञान होते. शेतीशी ते आंतरिक धाग्याने बांधले गेले होते. म्हणूनच महाराष्ट्राला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण करण्यात त्यांची भूमिका महत्त्वाची राहिली. ज्या हायब्रिड ज्वारीने हरितक्रांतीत मोलाचे योगदान दिले ते बियाणे आम्ही निर्माण करू शकलो याचा मला अभिमान आहे. पुढे साहेबांशी असलेले नाते अधिक दृढ होत गेले. त्यांच्या आणि माझ्या वयात जवळपास २० वर्षांचे अंतर होते. पण, हे अंतर कधीच अडथळा ठरले नाही. मी अनेकवेळा त्यांच्याकडे पुसदला गेलो. तेव्हा ते शेतावर घेऊन जायचे. शेतीच्या प्रश्नाविषयी चर्चा करायचे. त्यांचे निरीक्षण सूक्ष्म होते. शेतातून फिरत असताना दगडाच्या पाळीवरून त्यांचं ते सहज उडी मारणारं चित्र आजही माझ्या डोळ्यांसमोर जसंच्या तसं उभं आहे. माणसाची पारख करणं हे खरंतर त्यांच्याकडून शिकावं. योग्य कामासाठी योग्य माणसाची निवड करीत राहिल्यानेच त्यांनी हाती घेतलेल्या प्रकल्पास यश मिळत गेले.

कृषी क्षेत्रातील संशोधनामध्ये खाजगी क्षेत्राचे महत्त्वाचे योगदान आहे, याची त्यांना पूर्ण जाणीव होती. म्हणून ते सतत प्रोत्साहन देत असत. अनेकदा व्यावसायिक अडचणी आल्या असता आम्ही त्यांच्याकडे हक्काने जात असू. प्रश्न लगेच मिटत असे. मला आठवतं एकदा मी असाच त्यांच्याकडे एक प्रश्न घेऊन गेलो. साहेब आत दाढी करीत होते. दाढी करतानाच आम्हाला त्यांनी आत बोलावून घेतलं. समस्या जाणून घेतली. लगेच सचिवांना सांगितलं, ''बारवाले साहेबांनी महाराष्ट्राला अन् देशाला हायब्रिड ज्वारी दिली आहे. त्यांना त्यांचं काम करू द्या. त्यांना कुठल्याच अडचणी येता कामा नयेत.'' ते स्पष्टवक्ते होते. कसलीही लपवाछपवी नाही, नकलीपणा नाही.

नाईक साहेबांना नेहमीच नावीन्याचा ध्यास असे. शेती क्षेत्रात होणाऱ्या संशोधनावर ते सदैव बारकाईने लक्ष ठेवून सामान्यातल्या सामान्य शेतकऱ्यापर्यंत आधुनिक तंत्रज्ञान पोहोचले पाहिजे यासाठी ते सतत धडपडत असत. शेतीक्षेत्रात एक नवी उमेद जागविण्याचे त्यांचे कार्य खूप मोलाचे आहे.

एकदा असेच त्यांनी मला बोलावून घेतले आणि म्हणाले की, ''राज्यात सध्या खताचा खूप तुटवडा आहे. केंद्राकडून म्हणावा तितका खतपुरवठा होत नाही. तेव्हा काहीतरी युक्ती शोधायला हवी. काहीही करून केंद्रीय कृषी व पुरवठा मंत्री सी. सुब्रह्मण्यम यांचा महाराष्ट्राचा दौरा आयोजित केला पाहिजे. त्यांना महाराष्ट्रातल्या शेतीचा आधुनिकीकरणाकडे होणारा प्रवास दाखवून दिला पाहिजे.'' आणि अगदी त्यांनी सांगितल्याप्रमाणे सर्वकाही झाले. दिल्लीत संसदेचे अधिवेशन सुरू असताना मंत्री महोदय महाराष्ट्रात आले. येथील आधुनिक शेती पाहून ते खूपच प्रभावित झाले. याचा परिणाम होऊन महाराष्ट्राला होणाऱ्या खतपुरवठ्यात मोठी वाढ झाली.

उत्तुंग इच्छाशक्ती, प्रामाणिक आणि नियोजनबद्ध प्रयत्न आणि कठोर मेहनत घेण्याची तयारी या गुणांनी भरलेले त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या आठवणीने आजही मन भरून येते आणि नवे काही करण्याची प्रेरणा मिळते.

**(शब्दांकन : किरण केंद्रे)**



# विनम्र राज्यकर्ता

वसंतराव नाईकांनी अनेक धाडसी निर्णय घेतले. हरितक्रांतीचे ते जनक होते, रोजगार हमी योजनेची, समुद्रात भर घालून बॅक-बे रेक्लमेशनची पायाभरणी त्यांच्या कारकिर्दीत झाली. संपूर्ण राज्यासाठी एक शिक्षण मंडळ असावे, अभ्यासक्रम एकसूत्री असावा हेही त्यांच्याच कारकिर्दीत आकाराला आले. महाराष्ट्राची निर्मिती होऊन अवघी काही वर्षेच झालेली, त्यामुळे विभागीय अस्मितेचे कंगोरे टणक व तीव्रता बाळगून होते. प्रसंग विशेषी अशा कंगोऱ्याच्या घर्षणातून ठिणग्यांचा वर्षाव होणारच. त्यांच्याच कार्यकाळात स्वतंत्र विदर्भाचे आंदोलन तीव्र होते. प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाचा एकच अभ्यासक्रम आखून राज्यभरासाठी मॅट्रिकच्या परीक्षेसाठी एकसूत्री व्यवस्था करून उगवत्या पिढीत भेदभावाचा लवलेश असू नये अशी दूरगामी व्यवस्था तत्कालीन शिक्षण मंत्री मधुकरराव चौधरींच्या नेतृत्वाखाली आकाराला आली होती. त्याचे परिणाम आज सुस्पष्ट दिसत आहेत. सहा दशकानंतर प्रादेशिक अस्मितेचे कंगोरे पूर्णत: नसले तरी जखमा होणार नाहीत इतके ते बोथट झाले आहेत.


युधिष्ठिर जोशी

वसंतराव नाईक प्रदीर्घ काळ मुख्यमंत्री असलेला निगर्वी नेता. सलग सव्वा अकरा वर्षे मुख्यमंत्रीपदी असणे आणि त्याबद्दल सामान्य नागरिकांना स्वत:बद्दल वैषम्याची सुस्पष्ट जाणीवही होऊ न देणारे व्यक्तिमत्त्व श्री. वसंतराव नाईकांचे होते. सामान्य जनाबद्दल केलेले विधान जाणीवपूर्वक केलेले आहे. सत्तेचा सारीपाट मांडून बसलेल्या त्यांच्या सभोवती असलेल्या राजकारण्यांना नाईकांची सव्वा अकरा वर्षांची खेळी मनोमनी खुलणारच कारण त्या पदासाठी तेसुद्धा एक दावेदार होतेच. परंतु, सामान्य माणूस मात्र दैनंदिन अडचणींना सामोरे जात असतानाही मुख्यमंत्र्यांबद्दल तक्रार बाळगून नव्हता ही बाब ध्यानात घ्यावी लागेल. त्यावेळी अशी घोषणा रूढ झाली नव्हती अन्यथा लोक म्हणाले असते, 'मुख्यमंत्री कैसा हो, वसंतराव नाईक जैसा हो.'

नाईक धीरगंभीर होते, त्यांच्या नजरेत 'उद्याचा महाराष्ट्र कसा असावा' याबद्दलचा सुस्पष्ट आलेख सदैव तरळत असल्याचे दिसायचे.

वसंतराव नाईकांनी मोलाचे धाडस दाखवून घेतलेला आणखी एक महत्त्वाचा निर्णय म्हणजे 'दारूबंदीच्या फंडातून महाराष्ट्राला मुक्त करणे.'

ज्यांनी १९६५ पूर्वीची मुंबई किंवा राज्यातील इतर शहरे बघितली असतील त्यांना नाईकांच्या त्या निर्णयाचे नितांत महत्त्व जाणवेल. मुंबई शहरात तर कुठल्याही अंधारलेल्या आडोश्याच्या आश्रयाने हातभट्टीचा धंदा जोरजोरात सुरू असल्याचे लक्षात येई. शहरातील सर्व झोपडपट्ट्यांत, शेजारपाजारच्या खेड्यांत हातभट्टीच्या उत्पादनाचा कुटीरोद्योग उच्चांक गाठून होता. घाणेरडी दारू पिऊन पिढ्यान् पिढ्या बरबाद झाल्यात, कुटुंबे देशोधडीला लागतीत आणि वृत्तपत्रासाठी एक हमखास बातमी असायची की, 'अमुक अमुक लोक हातभट्टीची विषारी दारू पिऊन तडफडून मेलेत.' अशी बातमी दहा-पंधरा दिवसांतून झळकत असे.



माजी राष्ट्रपती फक्रुद्दीन अली अहमद आणि वसंतराव नाईक

फॅडिस्ट गांधी आणि सर्वोदयवादी दारूबंदीसाठी आग्रही असायचेत, सरकारच्या मानगुटीवर यांची दडपण तर तिकडे हातभट्टीचा ऐसपैस फैलावलेला आणि नित्य विस्तारणारा कुटीरोद्योग. त्यांतून उद्भवणारी दादागिरी, मुंबई शहर राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी करणाऱ्या टोळ्यांचे आश्रयस्थानच त्यांच्या हाती कोट्यवधी रुपयांचा हातभट्टीचा अस्तावस्त व्यवहार गवसल्याने गुन्हेगारांना घबाडच हाती लागलेले. त्या सर्वांचा सामाजिक, आर्थिक आणि राजकीयदृष्ट्या बारकाईने अभ्यास करून वसंतराव नाईकांनी दारूबंदी रद्द करणाचा निर्णय घेतला होता. त्या निर्णयाने सरकारचा महसूल वाढला. सहकारी क्षेत्रातील साखर कारखान्यांना देशी आणि विदेशी दारूच्या उत्पादनाचे वाढीव साधन लाभले. घाणेरड्या, विषारी हातभट्टीच्या दारूला आळा बसला. दारूच्या चोरट्या व्यवसायामुळे गुन्हेगारी जगात ओढल्या जाणाऱ्या गोरगरीब हजारो युवकांचे कल्याण झाले.

१९६८ पूर्वीच्या महाराष्ट्राची अवस्था दारूबंदीपायी कशी होती याची कल्पनाही आजच्या पिढीला यायची नाही. नाईकांच्या त्या एका निर्णयाने सारेच बदलून गेलेत, ज्यांनी ते आणि आजचे सामाजिक जीवन बघितले आहे त्यांनाच कळू शकेल. सरसकट बंदी हा एकमेव उपाय कधीच नसतो - राज्यकर्ता या नात्याने लवचीकता बाळगावीच लागते.

वसंतराव नाईक मुख्यमंत्री झाले आणि पोशाखापासून रुळलेला अघळपघळपणा कमी होऊ लागला. ते स्वत: सदैव जोधपुरी सुटात असायचे. त्यांची अंगकाठीही आजच्या स्टफिट परिभाषेसारखीच होती. त्यांच्या वागण्याबोलण्यात ताठकणा आढळत असला तरी ते कमालीचे विनम्र, आर्जवी - जराही आवाज न चढविता त्यांच्या बोलण्यात मृदुता असे. वसंतराव नाईकांची विधिमंडळातील भाषणे जरी तपासलीत तरी लक्षात यावे. एखाद्या महत्त्वाच्या विषयावर बोलताना त्यांच्या प्रतिपादनात आग्रही आर्जव असले तरी मऊशार कणखरपणा असे. प्रत्येक तीन-चार वाक्यांनंतर 'मेहरबानी करून' शब्दाची पेरणी करून आक्रमक विरोधकांची धार बोथट करण्याचे कौशल्य त्यांच्या भाषणात असे. वृत्तपत्रांची सरकारला सोलून काढणारी लेखणी, विदर्भात स्वतंत्र विदर्भासाठी लढणारी जांबुवंतराव धोट्यांची सेना फुलफॉर्ममध्ये होती. मृणाल गोरे आणि त्यांच्या फायरबॅण्ड महिला सहकारी सरकारमागे लाटणे घेऊन पाठलाग करीत आणि प्रत्यक्ष विधिमंडळात सर्वपक्षीय आमदारांचा घणाघाती मारा सुरू असे. (आजच्यासारखा बोटचेपेपणा विरोधकांत नव्हता.) सलग ११ वर्षे स्वत: संदर्भात कोणत्याही प्रकारची कटुता निर्माण न होऊ देता वसंतराव नाईकांनी मुख्यमंत्री पदाची इनिंग पूर्ण केली. वसंतरावांमध्ये दोन वसंतराव सदैव परस्परांची जपणूक करीत आणि राज्यकारभार नेकीने करीत. त्यात एक वसंतराव कुशल सीईओ तर दुसरा या विषयाचा वेध घेणारा धूर्त राजकारणी असे सुरेख कॉम्बिनेशन होते. विदर्भातील गहुलीसारख्या कमालीच्या मागास खेड्यातील वसंतराव नाईक नावाच्या बंजारा समाजात जन्मलेल्या व्यक्तिमत्त्वात सामावलेले होते. त्यांच्या कॉलेज जीवनात ब्राह्मण कुलोत्पन्न घोट्यांच्या वत्सलेशी प्रेमविवाहाच्या आणाभाका करणारे वसंतराव परिवर्तनशील असल्याचे निश्चित झाले होते. प्रत्यक्ष राजकीय पटलावर त्यांचे आगमन झाल्यानंतर आणि मुख्यमंत्री पद स्वीकारल्यानंतर परिवर्तनाचा ओघ झपाट्याने वाढला. आजच्यासारखे माध्यम जगत विस्तारलेले नव्हते. वृत्तपत्रांचीही वाटचाल मर्यादित होती आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे राजकारण्यांनी, राज्यकर्त्यांनी वृत्तपत्रातून जाहिराती देऊन स्वत:ची पाठ थोपटून घेण्याचे ते दिवस नसल्यामुळे फारसा गाजावाजा झालेला नव्हता.



वसंतराव नाईकांचा जिव्हाळ्याचा विषय शेती. स्वत: शेतकरी म्हणवून घेण्यात त्यांना कोण अभिमान होता. त्यांच्याच कारकिर्दीत कृषी विद्यापीठांची आकारणी झाली. बियाणे महामंडळ आकाराला आले. १९७२ च्या भीषण दुष्काळात हा मुख्यमंत्री अस्वस्थ होता. गोधनाच्या जतनासाठी जीवाचे रान करीत होता. दुष्काळात खेडी मोडू नयेत यासाठी जीवाचे रान करीत होता. राज्यात जो जिथे असेल तेथेच काम देऊन त्याला आश्वस्त करण्यासाठी भारतात प्रथमच रोजगार हमी योजना अंमलात आली. प्रयत्न होते ते शेतकरी देशोधडीला लागू नये याची. या दुष्काळानंतर पावसाचे आगमन झाले तेव्हा लहान लेकराप्रमाणे वसंतराव आनंदी झाले होते. लगोलग खिशातील पैसे काढून मंत्रालयातील चोपदाराला पेढे आणण्यासाठी त्यांनी पिटाळले होते. तेव्हा मुख्यमंत्र्यांचा आनंद शब्दातीत होता. वसंतराव नाईकांच्या सोबत केलेला खेड्यापाड्यांतील दौरा अवर्णनीय असायचा. शब्दांनी, सांगोवांगीने त्यांचे समाधान होत नसे. स्वत: शेतात जात, पीक बघत, उकिडवे बसून शेतातील तण काढीत, उभ्या पिकाला काळजीपूर्वक निरखीत. त्यांचा शेतीअनुभव भल्याभल्यांच्या तोंडचे पाणी पळविणारा होता.

सत्तेच्या विकेंद्रीकरणाचे, जिल्हा परिषद आणि पंचायत राज निर्मितीचे वसंतराव नाईक सूत्रधार होते. लॅण्ड रिफॉर्म कायदा अंमलात आणून मालगुजारी प्रथा त्यांनी समाप्त केली. या सुधारणेच्या विरोधात त्यांच्याच पक्षातील अनेक धुरंधरांचा बीमोड करून लॅण्ड रिफॉर्म आकाराला आले.

एकाधिकार कापूस योजना राबविण्यासाठी, अंमलात आणण्यासाठी कापूस व्यापाऱ्यांची लॉबी सक्रिय होती ! परंतु, फारसा संघर्ष आणि कटकटी न होता कापूस एकाधिकार अंमलात आली. या योजनेला बाबूगिरीच्या विळख्याचे ग्रहण लागले नसते, तर कापूस एकाधिकाराच्या माध्यमातून विदर्भातील कापूस उत्पादकांचे कल्याण झाले असते. परंतु नोकरशाहीने या योजनेला काळे फासले.

बॅक बे रेक्लमेशन वाढत्या मुंबईला सामावण्यासाठी उभारले त्याचप्रमाणे नवी मुंबई रचनेची पायाभरणीही वसंतरावांनी केली. आधुनिक आणि शास्त्रशुद्ध शहरे उभारण्यासाठी 'सिडको' त्यांनीच आकाराला आणले. वीज प्रकल्प, धरणांची उभारणी एक ना दोन, कितीतरी.

असा सहृदय मुख्यमंत्री होणे नाही! ही अवास्तव स्तुती नव्हे, वास्तव आहे. उन्हातान्हात उपोषणाला बसलेले सेनापती बापट जोवर वर्षासमोर बसले तोपर्यंत वसंतराव अस्वस्थ होते. उपोषण करण्याच्या बापटांच्या निर्धाराला त्यांचा विरोध नव्हता. फक्त त्यांनी सावलीत असावे हा त्यांचा आग्रह होता.

नागपूरला हिवाळी अधिवेशन सुरू असताना विधान परिषदेचे फायर बॅण्ड शेकापचे आमदार एन. डी. पाटील यांनीसुद्धा मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानासमोर, रामगिरीसमोर मांड ठोकली. हिवाळ्यातील झोंबणारा गारठा आणि निर्धारी एन. डी. पाटील रामगिरीवर. रात्रीला मुख्यमंत्री परतले. आवाराबाहेर उपोषण करणाऱ्या एन. डी. पाटलांना त्यांनी सन्मानपूर्वक रामगिरीत आणले. बंगल्याच्या लांबच लांब व्हरांड्यात एन. डी. पाटील उपोषणाला ठाण मांडून बसलेत तर आतल्या प्रशस्त बंगल्यात मुख्यमंत्री. असे दृश्य इत:पर दिसणेच अशक्य. संवेदनांचा संकोच जसजसा विस्तारला तसतसा माणसापासून माणूस दुरावू लागला. त्यामुळे वसंतराव नाईकांच्या अशा स्मृती मुळापासून गदगदा हलवित असतात.



# नव्या आत्मभानाचे प्रतीक

मोहन राठोड

आजूबाजूला पर्वतांच्या रांगा, दाट वृक्षराजी आणि झुळझुळ वाहणारा एक मोठा ओढा, अशा निसर्गरम्य ठिकाणी गहुली हे गाव वसले आहे. या गावातच १ जुलै १९१३ रोजी वसंतराव नाईक यांचा जन्म झाला. हे गाव त्यांचे आजोबा चतुरसिंग नाईक यांनी वसविले आहे. तांड्याच्या प्रमुखाला नाईक म्हणतात. त्यांच्या सल्ल्याने गावचा कारभार चालतो. वंशपरंपरेने गावची नायकी वसंतरावांचे वडील फुलसिंग नाईकांकडे आली.

बंजारा ही जात मूळची राजस्थानातील असून, ती राजपूत-क्षत्रीय आहे. कालांतराने हे राजपूत-क्षत्रीय व्यापारी बनून वंजेला जाऊ लागले. वंज हा वाणिज्य या शब्दाचा अपभ्रंश आहे. वंजेला जाताना हे लोक टोळ्या करून जात असत व बैलाच्या पाठीवरून व्यापारी माल इकडून तिकडे व तिकडून इकडे पोहोचवित असत. व्यापाराच्या वस्तू व माल सुरक्षित राहाव्यात म्हणून ते गावापासून दूर टेकड्यांच्या पायथ्याशी थांबत असत. दळणवळणाचे साधन म्हणून देशात रेल्वे आली. परिणामी, बंजाराचा तांडा स्थिरावला.

फुलसिंग नाईक हे श्रीमंत होते परंतु गावात शिक्षणाची सोय नव्हती. चार वर्गासाठी चार गावे त्यांना कुणाला बदलावी लागली. पहिलीचे शिक्षण पोहरा, दुसरी उमरी, तिसरी बान्सी व चौथीचे शिक्षण भेजला या गावाला जाऊन पूर्ण केले. पुढचे शिक्षण विठोली व अमरावती येथे झाले. मॅट्रीकसाठी नागपूरच्या नील सिटी हायस्कूलमध्ये आले.

हायस्कूलमध्ये असतानाच त्यांचा वाचनाचा व्यासंग वाढला होता. महात्मा फुले यांच्या जीवनाचा व त्यांच्या बहुजन सुखाच्या कार्याचा परिणाम त्यांच्या मनावर होऊ लागला होता. बी.ए. पदवीपर्यंतचे शिक्षण नागपूरच्या मॉरीस कॉलेजमधून तर कायद्याचे शिक्षण विद्यापीठातून पूर्ण केले.

१९४० मध्ये त्यांनी पुसद येथे वकिली सुरू केली. दरम्यान, ६ जुलै १९४१ रोजी याटे घराण्यातील वत्सलाताईंशी आंतरजातीय विवाह झाला. अल्पावधीतच त्यांनी चांगला वकील म्हणून नावलौकिक मिळविला. वकिलीच्या माध्यमातून त्यांनी समाजकार्य केले. त्यांची राजकीय कारकीर्द सर्वश्रुत आहे. ११ वर्षांपेक्षा अधिक काळ महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदी राहून त्यांनी राज्याची सेवा केली. शेती, शिक्षण, आरोग्य, उद्योग, सिंचन आदी क्षेत्रात महाराष्ट्राला सर्वोच्च स्थानी नेले. मात्र, ते ज्या भागातून व ज्या समाजातून आले, त्यांची जडणघडण कशी झाली, हे पाहणे महत्त्वाचे आहे.

त्या काळात पुसद तालुका व बंजारा समाज अतिमागासलेला होता. समाजाचे काही देणे लागते या जाणिवेतून त्यांनी केलेले कार्य शब्दातीत आहे. वकिली व्यवसाय करीत असताना त्यांनी अंधश्रद्धा, मद्यप्राशन, सावकारी या जोखंडांतून बाहेर पडण्यासाठी समाजामध्ये जनजागृती केली. त्या काळात त्यांनी श्रमदानातून १२ गावांच्या रस्त्यांची दुरुस्ती केली. चांगला वकील म्हणूनच नव्हे, तर ग्रामसुधारणेच्या कामामुळे त्यांनी नावलौकिक मिळविला. सार्वजनिक कार्यामुळेच अनेक मानाची पदे त्यांच्याकडे चालत आली. १९४३ मध्ये ते पुसद शेतकी संस्थेचे तर १९४७ मध्ये पुसद येथील हरिजन छात्रालयाचे अध्यक्ष झाले तसेच दिग्रस येथील

> वसंतराव नाईक यांनी महाराष्ट्राच्या जडणघडणीसाठी फार मोठे योगदान दिले आहे. महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास व्हावा, यासाठी त्यांच्या कार्यकाळात अनेक योजना कार्यान्वित करण्यात आल्या. समाजातील उपेक्षित घटकांकडे त्यांनी विशेष लक्ष दिले. ते ज्या बंजारा समाजातून आले होते तो समाज शैक्षणिक, सामाजिक, आर्थिकदृष्ट्या मुख्य प्रवाहात यावा, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यामुळेच आज या समाजातील अनेक प्रतिभावंत आणि प्रज्ञावंत तरुण विविध क्षेत्रात तेजाने तळपत आहेत.



राष्ट्रीय मोफत छात्रालयाचेही ते अध्यक्ष होते. त्यानंतर १९५१-५२ मध्ये मध्यप्रदेश को-ऑपरेटिव्ह सेंट्रल बँकेचे डायरेक्टर म्हणून त्यांची निवड झाली. दरम्यान, ७ ऑक्टोबर १९४६ मध्ये नगराध्यक्षपदासाठी निवडणूक झाली. मतदारांमधून ते या पदावर निवडून गेले.

दऱ्याखोऱ्यात विखुरलेल्या बंजारा समाजाला एकत्र करण्याच्या उद्देशाने त्यांनी ३० व ३१ जानेवारी १९५३ रोजी अखिल भारतीय बंजारा युवक परिषद आयोजित करून तत्कालीन रेल्वेमंत्री लाल बहादूर शास्त्री यांना निमंत्रित केले होते. त्यानंतर १९५५ मध्ये चाळीसगाव येथे परिषद घेतली. विद्यार्थ्यांना राहण्याची सोय व्हावी म्हणून दिग्रस येथे बंजारा वसतिगृह सुरू केले. परिसरातील मागास भागातील विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाची सोय नव्हती. त्यांचे पिताश्री फुलसिंग नाईक यांना शिक्षणाची संधी मिळाली नाही, परंतु त्यांना शिक्षणाची आवड होती. म्हणूनच ते वसंतराव नाईकांना उच्च शिक्षण देऊ शकले. आपल्या पिताश्रींच्या नावाने त्यांनी पुसद येथे फुलसिंग नाईक महाविद्यालय सुरू केले. परिणामी, त्या भागातील असंख्य तरुणांना शिक्षण घेता आले. त्यांच्यासाठी वसतिगृहाची सोय केली.



भटक्या विमुक्त जातीजमातींना शिक्षण घेता यावे म्हणून नाईक साहेबांच्या काळात निवासी आश्रमशाळा सुरू करण्यात आली. मोफत राहण्याची व भोजनाची सोय झाल्यामुळे बंजारा समाजासह अन्य जाती-जमातींतील मुले शिक्षण घेऊ शकले. आज राज्यात भटक्या विमुक्तांच्या सातशेच्या वर आश्रमशाळा आहेत. याशिवाय या समाजासाठी तिसरी सूची निर्माण करून शिक्षण व नोकरीमध्ये संधी दिली. तसेच आदिवासींसाठी क्षेत्रीय बंधन शिथिल केले.

शैक्षणिक, औद्योगिक, कृषी आदी क्षेत्राचा विकास करतानाच त्यांनी सामाजिक विकासाकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले. समाजाच्या व्यासपीठावर बोलताना ते म्हणायचे, 'एकवेळ उपाशी राहिलात तरी चालेल, परंतु मुलांना शिकवा.' या अनुषंगाने औरंगाबादचे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते कर्मवीर शंकरसिंग नाईक आठवण सांगतात, 'माझे गाव औरंगाबादजवळ होते. माझे शिक्षण चौथीपर्यंत झाले होते. शिक्षणाची आवड होती, परंतु पुढे शिकू शकलो नाही. १९६५-६६ ची घटना असेल. नाईक साहेब औरंगाबाद दौऱ्यावर आले की, आम्ही त्यांना पाहण्यासाठी विमानतळावर जायचो. दुरूनच त्यांना पाहायला मिळायचे. पोलीस आम्हाला जवळपास जाऊ द्यायचे नाही. नाईक साहेबांच्या एकदा हे लक्षात आले. हे लोक दौऱ्याच्या वेळी नेहमी दिसतात. आमचा डोक्यावरचा बंजारा फेटा. त्यामुळे त्यांनी कलेक्टरला आम्हाला गेस्ट हाऊसवर घेऊन येण्यास सांगितले. पोलिसांची गाडी आली आणि आम्हाला गाडीत बसविले. आम्ही याबरून गेलो. आपली चूक झाली. आपल्याला शिक्षा होणार, याची मनातून भीती वाटू लागली. गेस्ट हाऊसवर पोहोचल्याबरोबर मुख्यमंत्र्यांसमोर आम्हाला उभे केले. नाईक साहेबांनी अधिकाऱ्यांना बाहेर जाण्यास सांगितले. आम्हाला बसायला सांगितले. चक्क बंजारी भाषेत बोलू लागले. आम्हाला धीर आला. आस्थेने चौकशी केली. समाजातील मुलांना शिकविण्यासाठी जनजागृती करा. शाळा सुरू करा, असा वडिलकीचा सल्ला दिला. त्यानंतर आम्ही कामाला लागलो. १९६६ मध्ये औरंगाबादेत खोकडपुऱ्यात बंजारा वसतिगृहाची सुरुवात केली. त्यानंतर शाळा सुरू केली. मुलं शिकली. आज मोठमोठ्या हुद्द्यावर ही मुलं आहेत. त्यांना बघून समाधान वाटते, ही केवळ नाईक साहेबांची प्रेरणा आणि आशीर्वाद होते,' असे ते अभिमानाने सांगतात. दुसरी आठवण प्राचार्य राजाराम राठोड यांच्यासंबंधाने सांगता येईल. राठोड सर उदगीर येथे प्राचार्य होते. आपल्या समाजातील एक तरुण शिक्षण क्षेत्रात एवढ्या मोठ्या पदावर आहे, याचा नाईक साहेबांना आनंद झाला. त्यांना एके दिवशी बोलवून एखादे कॉलेज सुरू करण्याची इच्छा प्रदर्शित केली. त्यानंतर राठोड सरांनी औरंगाबाद येथे त्यांच्या नावाने १९७२ मध्ये महाविद्यालय सुरू केले. आज त्याच महाविद्यालयातून अनेक मुले उच्च विद्याविभूषित झाली आहेत. ठिकठिकाणी नोकरी करीत आहेत.

नाईक साहेबांची दूरदृष्टी ही विशाल होती. सामाजिक बांधिलकी आणि राज्याचा विकास त्यांनी केला. दौलतराव भोसलेसारखा भटक्या विमुक्तांच्या कार्यकर्त्याला त्यांनी विधान परिषदेवर घेऊन वंचित घटकाला न्याय दिला, हे विशेष म्हणावे लागेल.

## आमचा प्रेरणास्रोत

**(पान २४ वरून)** गेलेली नाही. आदिवासी समाजाप्रति त्यांची असलेली भावना किती मोठी होती. शैक्षणिक क्षेत्राबरोबरच राजकीय क्षेत्रातही त्यांनी एक प्रकारे सवलत दिली. क्षेत्रीय बंधन उठेपर्यंत आदिवासींसाठी सर्वच ठिकाणी विधानसभा मतदारसंघ राखीव नव्हते. परंतु, नाईक साहेबांनी या माध्यमातून त्याची परतफेड केली, हे उल्लेखनीय म्हणावे लागेल. आज महाराष्ट्र भक्कमपणे उभा आहे, तो वसंतराव यांच्या दूरदृष्टीमुळे! आमच्या गावाचे पुनर्वसन झाल्यानंतर नवीन ठिकाणी गाव वसविण्यात आले. त्यांच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी व त्यांच्या कार्यकर्तृत्वाची आठवण म्हणून आमच्या गावाने 'खरडा'ऐवजी त्यांच्या नावाने 'वसंतपूर' असे नामांतर करून ऋण व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या नावाने असलेले हे गाव अजूनही प्रेरणा देत असते. सामाजिक कार्याची प्रेरणा नाईक साहेबांमुळे मिळाली. त्यांनी आदिवासी समाजासाठी केलेले कार्य कोणीही विसरणार नाही, या समाजातील पहिली व्यक्ती विधान परिषदेची आमदार झाली, केवळ त्यांच्या इच्छाशक्तीमुळे! क्षेत्रीय बंधन असतानादेखील महाराष्ट्रातील आदिवासींसाठी त्यांनी नियम शिथिल केला आणि शैक्षणिक सवलती दिल्या. त्यामुळे आदिवासी समाज शिक्षण घेऊ शकला. नाईक साहेबांचे विचार घेऊनच आपण वाटचाल करीत आहोत. **(शब्दांकन : मोहन राठोड)**



# कृषी विद्यापीठांचे शिल्पकार

माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची ओळख 'हरितक्रांतीचे प्रणेते' म्हणून संपूर्ण महाराष्ट्रालाच नव्हे, तर देशाला आहे. ५ डिसेंबर १९६३ रोजी मुख्यमंत्री पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर नाईक साहेबांना नैसर्गिक तसेच मानवनिर्मित संकटांना तोंड द्यावे लागले. मुख्य म्हणजे सुरुवातीच्या काळातच राज्यातील अन्नटंचाईचा प्रश्न गंभीर बनला. रेशनसाठी स्वस्त धान्याच्या दुकानावर लांबच-लांब रांगा लागत. अमेरिकेत गुरांना खाऊ घालण्यात येणारी, आयात केलेली लाल रंगाची मायलो ज्वारी लोकांना नाइलाजाने खावी लागत असे. ही भीषण समस्या पाहताना नाईक साहेब अंतर्मुख झाले आणि अन्नटंचाईची समस्या कायमस्वरूपी सोडविण्यासाठी कृषी विज्ञानाला चालना देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य नाईकसाहेबांच्या हातून घडले. भरघोस पीक देणारे ज्वारीचे संकरित वाण कृषी शास्त्रज्ञांनी शोधून काढताच या वाणाचा प्रसार व प्रचार करण्यासाठी त्यांनी महाराष्ट्रभर दौरे काढले. स्वत:च्या शेलू-गहुली येथील शेतात संकरित ज्वारीचे भरघोस उत्पादन काढून शेतकऱ्यांसमोर यशस्वी प्रयोगाचा आदर्श उभा केला. केवळ संकरित वाणाने शेतीत समृद्धी येणार नाही, हे वसंतरावांनी ओळखले. महाराष्ट्रातील शेती अधिक समृद्ध होण्यासाठी नवीन वाण बी-बियाणे, आधुनिक तंत्रज्ञान याची गरज असल्याचे त्यांच्या लक्षात आले. ही बाब लक्षात घेऊन त्यांनी महाराष्ट्रात एक नव्हे, तर चार कृषी विद्यापीठांची स्थापना केली. एका राज्यात चार कृषी विद्यापीठे एकाच मुख्यमंत्र्याच्या कार्यकाळात स्थापन करण्यात आली, ही संपूर्ण भारताच्या इतिहासातील पहिली घटना आहे. त्यामुळे शेती आणि शेतकऱ्यांवर निस्सीम प्रेम करणाऱ्या नाईक साहेबांचे नाव कृषी विद्यापीठांचे शिल्पकार म्हणून नोंदविले गेले.

१९६८ मध्ये राहुरी येथे पहिल्या कृषी विद्यापीठाची स्थापना नाईकसाहेबांच्या काळात झाली. या विद्यापीठात भरघोस फळ पिकांसाठी उपयुक्त संशोधन करण्यात आले. गणेश डाळिंबाची जात याच विद्यापीठाची देण आहे. आज या विद्यापीठातून डाळिंब पिकाचे तंत्रज्ञान विकसित करण्यात आले असून, त्याचा लाभ


डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला येथील पदवीदान समारंभात मार्गदर्शन करताना वसंतराव.

**महाराष्ट्राच्या हरितक्रांतीत आणि कृषी विकासात राज्यातील कृषी विद्यापीठांनी फार मोठी भूमिका बजावली आहे. वसंतराव नाईक यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या काळात राहुरी, अकोला, परभणी आणि दापोली या चार ठिकाणी कृषी विद्यापीठांची स्थापना करण्यात आली. एकाच वेळी चार विद्यापीठे स्थापन करण्याची आपल्या देशातील पहिली घटना होय.**

संपूर्ण महाराष्ट्राला होत आहे.

महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरीनंतर अकोला येथे विद्यापीठाची मागणी करण्यात आली. या मागणीसाठी आंदोलनाने उग्ररूप धारण केले. मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी या मागणीचा स्वीकार करून १९६९ साली अकोला येथे कृषी विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय घेतला आणि नंतर या विद्यापीठाला विदर्भाच्या अमरावती जिल्ह्यातील केंद्रीय कृषिमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांचे नाव देण्यात आले. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ आता विदर्भात कृषी संशोधनात अग्रेसर बनले आहे. या विद्यापीठातून कृषी, फलोद्यान, कृषी अभियांत्रिकी व वनशास्त्र या विद्याशाखांमधील विज्ञान स्नातक ही पदवी बहाल करण्यात येते. तसेच या विषयातील पदव्युत्तर शिक्षणही दिले जाते. विद्यापीठातून सतत संशोधन सुरू असते. बुलडाणा, अकोला, वाशीम, अमरावती व यवतमाळ या जिल्ह्यातील माती परीक्षणाचे कार्य या विद्यापीठात होते. याशिवाय कापूस, ज्वारी या पिकांवरील संशोधन सुरू असते.

राहुरी आणि अकोला विद्यापीठापाठोपाठ परभणी येथे मराठवाड्यातील पहिल्या कृषी विद्यापीठाची उभारणी नाईक साहेबांनीच केली. या विद्यापीठातून तृणधान्य व खरीप पिकांचे संशोधन मोठ्या प्रमाणावर होते. वसंतराव नाईक यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आता या विद्यापीठाचे नामकरण 'वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ' असे करण्याची घोषणा नुकतीच मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केली आहे. या नियोजित नामकरणामुळे वसंतराव नाईक यांच्या कृषी विद्यापीठ स्थापनेच्या कार्याचा गौरव होणार आहे. पश्चिम महाराष्ट्रात राहुरी, विदर्भात अकोला, मराठवाड्यात परभणी, तर कोकणात दापोली येथे 'बाळासाहेब सावंत कृषी विद्यापीठ' स्थापन करून वसंतराव नाईक यांनी महाराष्ट्राचा विभागीय समतोल अतिशय कुशलपणे सांभाळला. आज या चारही विद्यापीठांतून कृषीक्षेत्रात संशोधन, शिक्षण आणि प्रशिक्षण या माध्यमातून शेती विकासाचा मंत्र शेतकऱ्यांना गवसला आहे. या चारही कृषी विद्यापीठांचे संशोधन हळूहळू आता शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचले आहे. कृषी विद्यापीठांच्या संशोधनातून भरघोस पीक देणाऱ्या पिकांच्या नवीन जाती, नवीन बियाणे उपलब्ध होत आहे. मुख्य म्हणजे खत व्यवस्थापन, जल व्यवस्थापन, कीड नियंत्रण, याचे मार्गदर्शन विद्यापीठांद्वारे होत असल्याने शेतीला समृद्धी लाभत आहे, याचे सारे श्रेय वसंतराव नाईक यांना आहे.

(शब्दांकन : सौ. माधवी गुल्हाने)

# पायाभरणी आणि उभारणी



महाराष्ट्र हे पुरोगामी विचारसरणी असणारे राज्य आहे. त्याचे द्रष्टेपण जसे फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारसरणीत आहे तसेच ते त्या त्या वेळच्या जाणत्या नेत्यांनी घेतलेल्या लोककल्याणकारी निर्णयांमध्ये आहे. अशा जाणत्या नेत्यांमध्ये वसंतराव नाईक यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. त्यांची तब्बल साडे अकरा वर्षांची कारकीर्द महाराष्ट्राला स्थैर्य देणारी आणि गतिमान करणारी ठरली. या काळात त्यांनी घेतलेले निर्णय आणि राबविलेल्या योजना पथदर्शी ठरल्या. त्यांना सदैव ध्यास लागलेला असे.. एका बाजूने शेतीचा, दुसऱ्या बाजूने अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्याचा, तिसऱ्या बाजूने पुढील पन्नास वर्षांत विकसित होणाऱ्या मुंबई, पुणे, औरंगाबाद या शहरांचा, ग्रामीण भागातील औद्योगिकीकरणाचा, नवीन धरणांचा आणि एवढे झाल्यानंतरही ज्यांच्या हाताला काम नाही त्यांच्या हाताला काम देण्याचा. वसंतराव नाईक यांनी आपल्या दीर्घ कारकिर्दीत घेतलेले निर्णय आणि राबविलेल्या योजनांचा हा परिचय.

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी लोकशाही विकेंद्रीकरणाचे स्वप्न पाहिले. या स्वप्नाला मूर्त रूप देण्यात वसंतराव नाईक यांची भूमिका मोलाची ठरली. राज्याची सत्ता मुंबईच्या मुख्यालयात न एकवटता ती खेड्यापाड्यांपर्यंत विकेंद्रित झाल्याशिवाय खऱ्या अर्थाने आदर्श लोकशाहीची प्रतिष्ठापना होणार नाही याची यशवंतराव चव्हाण यांना जाणीव होती. याच भूमिकेतून त्यांनी तत्कालीन महसूलमंत्री वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली 'लोकशाही विकेंद्रीकरण समिती' नेमली. यशवंतरावांनी टाकलेला विश्वास वसंतरावांनी सार्थ ठरविला. पंधरा महिन्यांच्या सातत्यपूर्ण अभ्यासातून त्यांनी आपला अहवाल सादर केला. आज महाराष्ट्रात अस्तित्वात असलेल्या लोकशाही विकेंद्रीकरण व्यवस्थेचे मूळ या

**किरण केंद्रे**

अहवालात आहे. या अहवालावरूनच महाराष्ट्र पंचायत समिती व जिल्हा परिषद कायदा अस्तित्वात आला. जिल्हा परिषदेचा अध्यक्ष जिल्हाधिकारी न राहता तो लोकांनी निवडून दिलेला प्रतिनिधी असावा ही त्यांची शिफारस क्रांतिकारी होती. ग्रामीण भागातील नेतृत्वाला निर्णय प्रक्रियेत मोठा वाव असला पाहिजे ही त्यांची भूमिका होती. सत्तेच्या विकेंद्रीकरणाचे हे मॉडेल देशभर स्वीकारले गेले. त्यामुळे सत्तेच्या विकेंद्रीकरणाचे श्रेय जसे महाराष्ट्राचे आहे तसेच ते वसंतराव नाईक यांचेदेखील आहे.

### मराठीला राजभाषेचा दर्जा

१ मे १९६६ रोजी वसंतराव नाईकांनी घोषणा केली आणि ४ कोटी लोकांच्या हृदयात असलेल्या मराठीला राजभाषेचा दर्जा मिळाला. राज्यातील शासनाचे कामकाज मराठीतून चालविण्यात यावे असे आदेश देण्यात आले. तथापि, राज्यातील इतर भाषा बोलणाऱ्या लोकांची गैरसोय होणार नाही असा विश्वासही देण्यात आला. नागपूर, पुणे, औरंगाबाद येथे भाषा संचालनालयाची विभागीय कार्यालये सुरू करण्याचे ठरविण्यात आले. या निर्णयापूर्वी इंग्रजी हे शासन व्यवहाराचे माध्यम होते. एक परकीय भाषा माध्यम असल्यामुळे शासन आणि



जनता यांच्यात अंतर राहत असे. लोकशाहीत शासन व जनता यांच्यात जवळीक निर्माण करण्याचे काम भाषेच्या माध्यमातून घडून येईल हा विश्वास या निर्णयामागे होता.

### शेतीसुधारणा

वसंतराव नाईक यांना हरितक्रांतीचे प्रणेते मानले जाते. महाराष्ट्रात अन्नधान्याचे उत्पादन वाढावे, राज्य अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण व्हावे या एकाच ध्येयाने त्यांना झपाटून टाकले होते. इथला सामान्य माणूस हा शेतीवर निर्भर आहे म्हणून त्याचे कल्याण आधी व्हायला हवे अशी त्यांची धारणा होती. जिथं जाईन तिथं मी शेतीचा प्रचार करीन, शेतकऱ्यांच्या अडचणी दूर करीन, ही भूमिका घेऊन संपूर्ण महाराष्ट्रात त्यांनी शेती विषयाला प्राधान्य दिले. आधुनिक बियाणे, खते यांचा वापर वाढावा, शेतकऱ्यांचा शेतीकडे पाहण्याचा पारंपरिक दृष्टिकोन बदलून त्यांनी आधुनिक पद्धतीने शेती कसण्यासाठी उद्युक्त व्हावे यासाठी त्यांनी राज्यभर दौरे केले. आपल्या अभ्यासपूर्ण अन् अमोघ वाणीने शेतकऱ्यांत चैतन्य निर्माण केले. ''जादूची कांडी फिरवून आपण एका दिवसात स्वयंपूर्ण होणार नाही. कष्ट तुम्हाला करायचे आहेत, साधने मला पुरवायची आहेत. साधने पुरविण्यात मी कमी पडणार नाही,'' असे ते आवर्जून सांगत. त्यांच्या प्रयत्नांना फळ मिळत गेले. महाराष्ट्रात शेतीच्या आधुनिकीकरणास मोठ्या प्रमाणात चालना मिळाली. आज भरघोस उत्पादन देणारी हिरवी शेती पाहताना त्यात वसंतराव नाईकांचे प्रतिबिंब उमटल्याचे दिसते.

### जमीन सुधारणा

जमीन सुधारणा कायदा तयार करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. 'कसेल त्याची जमीन' ही भूमिका सर्वप्रथम महाराष्ट्राने स्वीकारली. 'खोती' तसेच 'मालगुजारी' नष्ट करणारेदेखील महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. जमीनधारणेच्या बाबतीत असणारी विषमता दूर करणे आणि प्रत्यक्ष कसणाऱ्या कुळांना सर्व तऱ्हेच्या पिळवणुकीपासून संरक्षण देणे हा या उपाययोजनांचा मुख्य उद्देश होता. त्यायोगे जमिनीची उत्पादनक्षमता वाढवून धान्योत्पादन वाढवण्यास शेतकऱ्यांना उत्तेजन मिळेल अशी अपेक्षा होती. वसंतराव नाईकांच्या या जमीन सुधारणा विषयक निर्णयांमुळे सामाजिक न्यायाचे तत्त्व प्रस्थापित होण्यास मोठी मदत झाली.

### उद्योगांचा विस्तार

वसंतराव नाईक मुख्यमंत्री झाल्यानंतर महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास मंडळाच्या (एमआयडीसी) कार्याला अधिक गती मिळाली. मुंबई परिसरात केंद्रित झालेले उद्योग विश्व विकेंद्रित होऊन इतर शहरांमध्ये विस्तार पावले. बुटीबोरी (नागपूर), वाळुंज (औरंगाबाद), सातपूर-अंबड (नाशिक), इस्लामपूर (सांगली), लातूर (जि. लातूर) इ. औद्योगिक वसाहती त्यांच्याच काळात निर्माण झाल्या. ऑटोमोबाईल, केमिकल, इंजिनीअरिंग उद्योग, फार्मास्युटिकल अशा विविध क्षेत्रातील उद्योगांना एमआयडीसीने जागा देऊन महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात उद्योगाचे विकेंद्रीकरण केले. एमआयडीसीने जमीन विकसित करून उद्योजकांना पायाभूत सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या. परिणामतः ग्रामीण भागातल्या सुशिक्षित तरुणांना आणि मजुरांना स्थानिक पातळीवर रोजगार मिळण्यास मदत झाली.

### रोजगार हमी योजना

महाराष्ट्राची रोजगार हमी योजना आज संपूर्ण देशभरात स्वीकारली गेली आहे. श्री. वि. स. पागे यांनी या योजनेची संकल्पना मांडली. लाखो हातांना हक्काचे काम देणारी ही योजना यशस्वीपणे राबविण्यासाठी वसंतराव नाईक यांनी अहोरात्र परिश्रम घेतले. 'मागेल त्याला काम' असे या योजनेचे स्वरूप होते. स्त्री आणि पुरुष यांना समान मजुरी, काम करणाऱ्या महिलांच्या लहान मुलांना सांभाळण्यासाठी निवारा ही या योजनेची वैशिष्ट्ये होती. रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून राज्यभरात मोठ्या प्रमाणात काम निर्माण झाले. महाराष्ट्रातील कष्टकरी शेतमजुराचा स्वाभिमान या योजनेने जागवला आणि दुष्काळी परिस्थितीत शेतमजुराला वाऱ्यावर न सोडता त्याला रोजगार मिळवून दिला. दुष्काळी भागासाठी तर ही योजना वरदान ठरली. जमीन सपाटीकरण, रस्ते बांधणी, पाझर तलाव, साठवण तलाव, विहीर खोदाई इ. कामे मोठ्या प्रमाणात झाली. वसंतराव नाईक यांच्या दूरदृष्टीतून अल्पावधीतच ही योजना यशस्वी अन् पथदर्शी ठरली.

### महाराष्ट्र राज्य लॉटरी

१९६९ साली महाराष्ट्र राज्य लॉटरीला सुरुवात झाली. ती सुरू होण्यामागची पार्श्वभूमी कामगारवर्गाला मटक्याच्या व्यसनातून बाहेर काढण्याची आहे. त्या काळात मटक्याच्या नादी लागून कामगारवर्ग आणि मध्यमवर्गाच्या आयुष्याची धूळधाण होत होती. या विषयाची चर्चा सुरू झाल्यानंतर मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी मटक्याला सामाजिकदृष्ट्या पर्यायी व्यवस्था निर्माण करण्याकरिता महाराष्ट्र राज्य लॉटरीची सुरुवात केली. एक रुपयात लाखो रुपयांची



मंत्रालयात सहकारी मंत्री आणि अधिकाऱ्यांसमवेत.

बक्षिसे जाहीर करण्यात आली. त्यावेळी या योजनेवर टीकाही झाली. मात्र, वसंतराव नाईक यांनी स्पष्टपणे सांगितले की, ''मुंबईचा गिरणी कामगार आणि कष्टकरी जनता मटक्यावर शेकडो रुपये खर्च करीत आहे आणि बरबाद होत आहे. केवळ मटका बंद करून या जुगारापासून सुटका होणार नाही. त्याला सामाजिक पर्याय निवडावा लागेल म्हणून ही लॉटरी सुरू करतो आहे. ज्याचा रुपया जाईल तो विकासकामाला जाईल आणि काही जणांना फायदा पण होईल.''

### कापूस एकाधिकार योजना

कापूस उत्पादक शेतकरी हा राज्याच्या अर्थव्यवस्थेचा एक प्रमुख आधार आहे, याची वसंतराव नाईक यांना जाणीव होती. मात्र, विदर्भातले शेतकरी पिढ्यान् पिढ्या अडते, दलाल आणि व्यापाऱ्यांच्या शोषणाखाली भरडले जात होते. ऐन मोसमात कापूस बाजारात आला की भाव पाडून व्यापारी तो खरेदी करीत. बैलगाडी घेऊन आलेल्या आणि नडलेल्या शेतकऱ्याला कापूस न विकता परत जाणे शक्य नसे. परिणामत: शेतकरी लुटला जाऊ लागला. ही लूट थांबविण्याचे वसंतराव नाईक यांनी ठरविले. त्यावेळचे सहकार मंत्री यशवंतराव मोहिते यांनी पुढाकार घेतला अन् या दोघांच्या एकत्रित प्रयत्नांमधून अभिनव अशा 'कापूस एकाधिकार' योजनेचा जन्म झाला. यासाठी १९७१ मध्ये 'कापूस संकलन प्रक्रिया व विपणन' हा कायदा विधानमंडळात संमत करण्यात आला. राज्यातल्या कापूस उत्पादक शेतकऱ्यांना योग्य भाव देणारी ही योजना होती. यामुळे शेतकऱ्यांचा कापूस भाव पाडून घेणे थांबले. कापसाची आधारभूत किंमत ठरविली जाऊ लागली. कापसाला हमी भाव मिळाला. या कापसावर प्रक्रिया करून विपणनाची व्यवस्था करण्यासाठी यंत्रणा उभारली गेली. नडलेल्या शेतकऱ्याची लूट करणाऱ्या वृत्तीला चाप लावण्यात यश आले.

### नवी मुंबईची निर्मिती

मुंबईची भरमसाठ झालेली वाढ, प्रचंड गर्दी, अपुरे अन् अरुंद रस्ते, घरांची वाढती

नवी मुंबई : वसंतराव नाईक यांच्या द्रष्टेपणाचे प्रतीक



समस्या या सर्व बाबींचा विचार करून वसंतराव नाईक यांनी मुंबईला पर्याय म्हणून नवी मुंबई वसविण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय घेतला. त्यासाठी सिडको या नव्या आस्थापनेची निर्मिती केली. आज नवी मुंबई हे अत्याधुनिक सुविधांनी परिपूर्ण असे नियोजनबद्ध शहर म्हणून ओळखले जाते. चाळीस वर्षांपूर्वी वसंतराव नाईक यांच्या दूरदृष्टीतून या शहराची निर्मिती आकारास आली. स्वप्न पाहणं सोपं असतं; पण ते प्रत्यक्षात उतरवणं महाकठीण! मात्र, वसंतराव नाईकांनी हे नवे शहर वसविण्याचे अवघड स्वप्न प्रत्यक्षात उतरवून दाखविले. त्या काळात आजच्या एवढी अत्याधुनिक यंत्रसामग्री नव्हती, तरीदेखील त्यांनी वाशी येथील खाडीवरचा महाकाय पूल बांधण्याचा चंग बांधला आणि तो पूर्णत्वास नेला. पुलामुळे मोठे परिवर्तन घडून आले. लोक हळूहळू राहावयास जाऊ लागले. आज नवी मुंबई हे प्रतिष्ठित शहर आहे. रेल्वे, वाहतूक, मूलभूत सुविधा, मुबलक पाणी, मोठमोठे मॉल्स यांची रेलचेल आहे. मागील चाळीस वर्षांत या शहराचा विकास अन् विस्तार वेगाने होतोच आहे. वसंतराव नाईकांच्या द्रष्टेपणाचेच ते प्रतीक आहे.

### ग्रामीण विद्युतीकरण

वसंतराव नाईक मुख्यमंत्री झाल्यावर महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाला अधिक गतिमान करण्यात आले. महाराष्ट्रातील खेड्यापाड्यांमध्ये वीज पोहोचविण्याचा चंग बांधला गेला. वीज उत्पादनावर भर देण्यात आला. राज्यात वीजनिर्मिती केंद्रांची मालिका उभारण्याचे प्रयत्न सुरू झाले. खापरखेडा, पारस, भुसावळ (औष्णिक), पोफळी, येलदरी (जलविद्युत) हे प्रकल्प उभारले गेले. त्याचवेळी विविध महाविद्यालयांतून विद्युत अभियांत्रिकीचे शिक्षण मोठ्या प्रमाणात सुरू झाले. त्याचा परिणाम होऊन या क्षेत्रातील तंत्रज्ञ व कर्मचारी यांची उणीव भासली नाही. प्रारंभी काही मोजक्या शहरांमध्येच विद्युतीकरण झाले होते. मात्र, ही वीज गावागावांत पोहोचविण्याचे ध्येय त्यांनी उराशी बाळगले. विद्युतीकरणाच्या माध्यमातून खेड्यापाड्यांचे रूपच पालटले. नवनवीन उद्योगांना चालना मिळाली. शेतीला वीज मिळाल्यामुळे दुबार पीक घेणे शक्य होऊ लागले. त्याचा परिणाम उत्पादन वाढीवर झाला. वसंतराव नाईकांच्या अविरत प्रयत्नातून घराघरातला काळोख दूर होऊन समृद्धीचा उजेड अवतरला.

### दुष्काळाशी मुकाबला

१९७२ साली पडलेला भीषण दुष्काळ हे महाराष्ट्रावरील मोठे संकट होते. पाऊस नाही, नदीनाले



आटलेले, पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई, शेतात कामच नसल्याने मजुरी नाही, उपासमारी अशा बिकट परिस्थितीतून मार्ग काढणे हे मोठे आव्हान होते. पण, वसंतराव नाईक डगमगले नाहीत. निसर्गामुळे ओढवलेल्या या आपत्तींवर मात करण्याचा निर्धार वसंतराव व त्यांच्या सहकाऱ्यांनी केला.

या काळात पहिला निर्णय घेतला गेला तो शाळा-कॉलेजमधील विद्यार्थ्यांची फी भरण्याचा. दुष्काळामुळे कुणाचेही शिक्षण थांबू नये अशीच यामागची भूमिका होती; शिवाय शिक्षण सुरू असताना रोजगार हमीवर काम करण्याची इच्छा असणाऱ्या विद्यार्थ्यांना अर्धवेळ काम करण्याची मुभा देण्यात आली. याचा फायदा हजारो विद्यार्थ्यांना झाला.

या काळात गावपातळीवर तलाव खोदण्याचे आणि नालाबंडिंगचे काम मोठ्या प्रमाणात करण्यात आले. पुढील काळात याचा मोठा फायदा अवघ्या महाराष्ट्राला झाला. दुष्काळात हाताला काम मिळणे महत्त्वाचे होते, म्हणून त्यांनी पंतप्रधानांना भेटून रेल्वेची कामे काढण्याची विनंती केली. त्याचबरोबर पिण्याच्या पाण्यासाठी गावोगावी टँकरने पाणी पुरविण्यात आले. माणसासोबतच जनावरांचीही काळजी घेण्यात आली. जनावरांच्या छावण्या उभारण्यात आल्या. पशुधन कत्तलखान्याकडे जाणार नाही हे पाहिले गेले. वसंतराव नाईकांची कसोटी पाहणारा हा काळ होता. त्यावर ते सर्वार्थाने खरे उतरले.



### कृषी विद्यापीठांची निर्मिती

महाराष्ट्रात चार स्वतंत्र कृषी विद्यापीठांची स्थापना करण्याचा निर्णय म्हणजे वसंतराव नाईक यांच्या शेतीविषयक वैज्ञानिक दृष्टिकोनाचा सर्वोच्च कळस होता. कोठारी आयोगाने शेतीसुधारणेच्या कार्यक्रमाला अग्रक्रम देण्याची शिफारस करताना प्रत्येक राज्यात एक कृषी विद्यापीठ असावे असे सुचविले होते. वसंतराव नाईक यांनी या विषयाचा शास्त्रशुद्ध अभ्यास केला; तेव्हा त्यांच्या लक्षात आले की, बियाण्यांच्या नव्या जाती शोधणे, कमी पावसात येणारे बियाणे तयार करणे, मातीचा पोत तपासणे इ. गोष्टींचे संशोधन होणे आवश्यक आहे. यासाठी त्यांनी कृषी संचालकांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली. पहिले कृषी विद्यापीठ अहमदनगर जिल्ह्यात राहुरी येथे उभारण्याचे ठरले. पुढे अकोला, परभणी आणि दापोली येथे कृषी विद्यापीठांची स्थापना करण्यात आली. यातून विभागीय समतोलही साधण्यात आला. कृषीक्षेत्रात संशोधन, अध्यापन व कृषीसेवा या त्रिसूत्रीतून विद्यापीठे कार्यरत झाली. पुढील काळात या विद्यापीठांनी शेती सुधारणेच्या क्षेत्रात मोलाची भूमिका बजावली आहे. या राज्यात चार कृषी विद्यापीठे स्थापन होण्याचा विक्रम वसंतराव नाईक यांच्याच नावावर आहे. वसंतराव नाईक आणि शेती यांच्या अन्योन्य संबंधांचेच हे उदाहरण आहे.

एकूणच वसंतराव नाईक यांची कारकीर्द ही महाराष्ट्राची उभरणी करणारी ठरली. कृषी, शिक्षण, आरोग्य, रोजगार, उद्योग, नागरी विकास इ. क्षेत्रात त्यांनी भरीव कामगिरी केली. अनेक संकटांमधून त्यांनी महाराष्ट्राला बाहेर काढले. अविरत प्रयत्नशीलता, वैज्ञानिक दृष्टिकोन, माणसांची पारख, सामान्य जनांविषयीचा कळवळा, शत्रूलाही आपलसं करणारी प्रसन्न वाणी इ. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये होती. अहोरात्र महाराष्ट्राचा विकास आणि विकासाचा ध्यास लागलेल्या या भूमिपुत्राला 'विकासपुरुष' हीच उपाधी सार्थ ठरते.

**(संपर्क : ७३०३४२८५५५)**

## ठळक निर्णय

* पंचायत राज्य संकल्पनेची प्रभावी अंमलबजावणी.
* कापूस एकाधिकार योजना.
* रोजगार हमी योजना.
* १९६६ साली झालेल्या कोयनेच्या भीषण भूकंपातील आपद्‌ग्रस्तांचे पुनर्वसन.
* पानशेत पुरात वाहन गेलेल्या ७० हजार घरांची बांधणी.
* १९७० च्या भिवंडी शहरात झालेल्या जातीय दंगलीतील आपद्‌ग्रस्तांना तातडीने साहाय्य.
* विधानसभा आणि विधान परिषदेतील विरोधी पक्ष नेत्याला 'कॅबिनेट मंत्री' पदाचा दर्जा दिला.
* महाराष्ट्रातील विरोधी पक्ष नेत्यांवर, कार्यकर्त्यांवर राजकीय आणि सार्वजनिक आंदोलनात भाग घेतला म्हणून गुन्हेगारी स्वरूपाच्या केसेस (चॅप्टर केसेस) न करण्याचा निर्णय.
* १९७२ च्या दुष्काळात धान्य टंचाई, चारा टंचाई यावर मात करण्यासाठी विविध निर्णय. शेतीचे नुकसान आणि पिण्याच्या पाण्याचे प्रश्न सोडवण्यासाठी अग्रक्रम.
* ज्वारीची खरेदी मार्केटिंग फेडरेशनमार्फत करण्याचा निर्णय.
* शेतीला आधुनिक करण्यासाठी, शेतीचे नियोजन व कमी पावसातल्या बियाणांची निर्मिती करण्यासाठी चार कृषी विद्यापीठांची स्थापना.
* भाडेतत्त्वावरील घरांच्या योजनेची सुरुवात.
* जिल्हा नियोजन मंडळाची निर्मिती.

# रत्नपारखी वसंतराव

वसंतराव नाईक यांच्याजवळ माणसाच्या ठिकाणी असलेली गुणवत्ता ओळखण्याची पारख होती. त्या अर्थाने ते रत्नपारखी होते. सुधाकरराव नाईक हे आज ना उद्या महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाल्याशिवाय राहणार नाहीत, असे वसंतराव नेहमी म्हणायचे. पुढे सुधाकरराव नाईक यवतमाळ जि.प.चे अध्यक्ष झाले आणि नंतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. डॉ. एन.पी. हिराणी हा मोठा माणूस होईल, असे भाकीत प्रिन्स आगाखान यांच्याजवळ नाईक साहेबांनी व्यक्त केले होते. पुढे डॉ. हिराणी आमदार आणि मंत्री झाले. शिवाजीराव मोघे यांनी आदिवासी युवक विकास संघटनेत काम सुरू केले तेव्हा, शिवाजी भविष्यात मोठा माणूस होईल, असे भाकीत नाईक साहेबांनी केले होते. शिवाजीराव पुढे वकिली सोडून राजकारणात आले. नाईक साहेबांच्या आशीर्वादाने आमदार झाले आणि कर्तृत्वाने अनेक खात्याचे मंत्री झाले...

**न. मा. जोशी**

भारतात पश्चिम बंगालमध्ये ज्योती बसू (२५ वर्षे), राजस्थानमध्ये मोहनलाल सुखाडीया (१८ वर्षे) व पंजाबमध्ये कैरो (१३ वर्षे) या तीन मुख्यमंत्र्यांनी गाजवलेल्या प्रदीर्घ कालावधीचा अपवाद सोडला तर महाराष्ट्रात सर्वाधिक काळ म्हणजे ११ वर्षे २ महिने १४ दिवस इतका दीर्घ कार्यकाल गाजवणारे वसंतराव नाईक हे एकमेव मुख्यमंत्री होते. १ जुलै १९१३ ला यवतमाळ जिल्ह्यातील पुसद तालुक्यातील गहुलीसारख्या लहानशा खेड्यात बंजारा या भटक्या विमुक्त जमातीत जन्मलेले वसंतराव नाईक यांनी आपली इहलोकाची यात्रा १८ ऑगस्ट १९७९ ला संपवली. आयुष्याची उणीपुरी ६६ वर्षे म्हणजे दीर्घ काल नव्हे, पण या आयुष्यातील अर्धे आयुष्य वसंतराव नाईकांनी समाजसेवा आणि राजकारणात घालवले. 'अहर्निशम सेवा महे'चा ध्यास घेत त्यांनी शेती आणि शेतकऱ्यांचे जीवन उन्नत व्हावे, प्रगत व्हावे, शेतकरी सुखी व्हावा यासाठी अपार कष्ट सोसले. सौजन्य, माणुसकी आणि चांगुलपणा या वैशिष्ट्यांनी ललामभूत झालेले वसंतरावांचे व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड जाऊन ३३ वर्षे झाली तरीही त्यांच्या कार्याच्या आठवणींनी आजही लाखो लोकांचे डोळे पाणावतात यातच वसंतरावांचे मोठेपण सामावलेले आहे. कार्लाईल किंवा विंस्टन चर्चिल यांनी सांगितलेली मोठ्या माणसांची सर्व लक्षणे



नाईक साहेबांच्या ठिकाणी होती.

मी अमरावतीला स्वातंत्र्यसंग्राम सेनानी आणि ज्येष्ठ पत्रकार दिवंगत बाळासाहेब मराठे यांच्या 'हिंदुस्थान'मध्ये पत्रकारितेचे धडे गिरवत यवतमाळात प्राध्यापकीच्या निमित्ताने आलो. ज्येष्ठ पत्रकार मा.गो. वैद्य, दि.भा. उपाख्य मामासाहेब घुमरे यांच्या मार्गदर्शनात, 'तरुण भारत'मध्ये वार्ताहर म्हणून काम करताना स्वाभाविकच वसंतराव नाईक साहेब यांच्या पैलूंना अल्पकाळासाठी का होईना अनुभवता आले. नाईक साहेबांचे व्यक्तिमत्त्व किती धीरोदात्त होते, याचा अनुभव त्यांच्या राजीनाम्याच्या वेळी आला. नाईक साहेबांचे भाषण १९७५ फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यात यवतमाळच्या नगर भवनात सुरू असतानाच मुख्यमंत्री पदाचा राजीनामा देण्याबाबतचा संदेश त्यांना प्राप्त झाला; मात्र अजिबात विचलित न होता नाईक साहेबांनी भाषण केले आणि मुंबईला गेल्यावर २० फेब्रुवारी १९७५ रोजी आपल्या मुख्यमंत्री पदाचा स्थितप्रज्ञ वृत्तीने राजीनामा दिला. मुख्यमंत्री पदावरून पायउतार झाल्यावर नाईक साहेब प्रथमच पुसदला आले तेव्हा यवतमाळवरून दि.ल. पांडे, देशपांडे गुरुजी, मनोहर चोखाणी, दादा राऊत, पुंडलिक मोरयडे, म.बा. मेश्राम, राजाभाऊ जोगळेकर, दिनकर बोधनकर असे ज्येष्ठ पत्रकार माहिती व जनसंपर्क कार्यालयाच्या जीपमधून पुसदला गेले होते. या ज्येष्ठ पत्रकारांसोबत माझीदेखील वारी घडली. मुख्यमंत्री असतानाचे नाईक आणि मुख्यमंत्री नसतानाचे नाईक यात कोणताच फरक आम्हाला जाणवला नाही. पूर्वीसारख्याच गप्पा, पीक-पाण्याच्या गोष्टी, शेतकऱ्यांच्या समस्या यावर नाईकसाहेबांनी दिलखुलास गप्पा मारल्या, जेवण केल्याशिवाय कोणीही जाऊ नका ही त्यांची विनंती त्यांच्याजवळ असलेल्या आपुलकीचा परिचय करून देणारी होती.

बंजारा क्रांतिदल ही संघटना स्थापन करणारे हरीभाऊ राठोड यांनी नाईक साहेबांना दाभ्यासारख्या लहान गावात आणले होते. नाईक साहेब तेव्हा हेलिकॉप्टरने दाभ्याला आले होते. गंमत म्हणजे हेलिकॉप्टर आकाशात घिरट्या घालत होते तेव्हा हरीभाऊंच्या वडिलांनी पांढरी झेंडी दाखवून हेलिकॉप्टर खाली उतरविले होते. हरीभाऊ राठोड यांच्या बाबतीतही बंजारा समाजातील हरहुन्नरी तरुण असा उल्लेख नाईक साहेब करायचे. पुढे हरीभाऊसुद्धा खासदार झाले. ''ई छोरा भविष्यमाई खुब मोटट्ठ वी.'' अर्थात, हा मुलगा भविष्यात खूप मोठा होईल, असे

नाईकसाहेब यांनी हरीभाऊंच्या बाबतीत भविष्य वर्तविले होते ही आठवण खुद्द हरीभाऊंनीच सांगितली. उल्लेखनीय म्हणजे बंजारा जमातीला भटक्या व विमुक्त जाती प्रवर्गात मान्यता देऊन त्यांना महाराष्ट्रात आरक्षण देणारे वसंतराव नाईक हेच होते, असेही हरीभाऊ राठोड यांनी सांगितले.

मुख्यमंत्री पदावरून पायउतार झाल्यावरही नाईक साहेबांनी शेतकऱ्यांच्या भल्याचा घेतलेला वसा सोडला नव्हता. गरीब शेतकऱ्यांना त्यांची शेती फुकटात नांगरून, वखरून देणे त्यांच्या शेतात पेरणी करून देणे, निंदण करून देणे इतकेच नव्हे, तर पीक काढून थेट त्यांच्या घरात पोहोचवून देण्यापर्यंतचे अविश्वसनीय वाटतील असे उपक्रम नाईक साहेबांनी केले होते. मुख्यमंत्री पदाची नाईक साहेबांची यशस्वी कारकीर्द पाहून त्यांनी अंमलात आणलेल्या पंचायत राज, रोजगार हमी, कापूस एकाधिकार इत्यादी योजना पाहून आंध्रमध्ये ब्रह्मानंद रेड्डींचे सरकार असताना लोक म्हणायचे की, 'वसंतराव नाईकांना आमच्या राज्यात मुख्यमंत्री म्हणून डेप्युटेशनवर पाठवा.' नाईक साहेबांच्या कर्तृत्वाची ही पावतीच म्हटले पाहिजे.

वसंतराव नाईकांचे शेती आणि शेतकरी यांच्याबद्दलचे नाते एवढे घट्ट होते की त्यांचे कोणतेही भाषण शेती आणि शेतकऱ्यांच्या उल्लेखाशिवाय होतच नव्हते. रा.सू. गवई यांनी कविवर्य ग.दि. माडगूळकरांच्या काव्यमय शैलीतील वसंतराव नाईकांसंबंधीच्या ओळी आपल्या आठवणीत नोंदवताना म्हटले आहे की, महाराष्ट्राची शेती आता नागवी उघडी नाही. तिच्या कटीला आज लाज राखील असे हिरवे वस्त्र आहे. शालीनता सांभाळता येईल एवढी कंचुकी तिच्या वक्ष स्थळावर आहे. ती पायघोळ पैठणी नेसून मिरवील तेव्हा वसंतरावांचे सारे मनोरथ फळाला येतील. ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांनी म्हटल्याप्रमाणे बंजारा जमातीसारख्या एका भटक्या जमातीत जन्माला आलेल्या वसंतराव नाईक यांनी शहाणपण, प्रेमळपण, माणुसकी आणि खऱ्या अर्थाने बांधिलकी म्हणता येईल अशा शेतकऱ्यांशी बांधिलकी ठेवून महाराष्ट्राच्या सचिवालयाचे (म्हणजे आजच्या मंत्रालयाचे) दरवाजे पागोट्यावाल्या शेतकऱ्यांसाठी सताड उघडे केले. राजकारणात एवढ्या मोठ्या पदावर ११ वर्षे राहूनसुद्धा नम्रता, ऋजूता आणि माणुसकी या गुणांचे एक विलोभनीय दर्शन नाईक साहेबांनी घडवले.

नाईक साहेबांचे एका शब्दात वर्णन करायचे झाल्यास 'रत्नपारखी' असे केल्यास अतिशयोक्ती ठरू नये.

**संपर्क : ८८०५९४८९५१**



# आमचे राजे

**हरीभाऊ राठोड**

विदर्भाच्या काळ्या मातीत यवतमाळ जिल्ह्यातील पुसद तालुक्यात गहुली या तांड्यात शेतकऱ्याच्या कुटुंबात जन्मलेले वसंतराव नाईक शेतकऱ्याचे कैवारी ठरले आहेत. 'शेतकरी सुखी झाला तर, देश सुखी होईल' अशी त्यांची धारणा होती. म्हणून शेतकऱ्यासाठी जे जे करता येईल ते ते त्यांनी आपल्या हयातीत शेवटपर्यंत केले. महाराष्ट्रात त्यांनी हरितक्रांती घडविण्याचा प्रयत्न केला म्हणून त्यांना 'हरितक्रांतीचे जनक' असे संबोधले गेले.

१९७२ च्या दुष्काळाला तोंड देण्यासाठी त्यांनी केलेली कामगिरी अविस्मरणीय आहे. मुख्यमंत्रीपद गेल्यानंतरही त्यांनी शेतीविषयीचा ध्यास सोडला नाही. यवतमाळ जिल्ह्यात श्रमदान करून सिलिंगमध्ये मिळालेल्या गरीब शेतकऱ्यांच्या जमिनी कसून देण्याचे, त्यांची पेरणी करून देण्याचे तर उत्पादित माल गरीब शेतकऱ्यांच्या घरापर्यंत वाजतगाजत आणण्याची 'एक अभिनव योजना' श्रमदानाच्या माध्यमातून त्यांनी राबविली. ते वर्ष १९७५-७६ असावे. यवतमाळ जिल्ह्यातील नेर तालुक्यातील मालखेड येथून श्रमदानाच्या यात्रेचा त्यांनी प्रारंभ केला आणि हातात विळा घेऊन अनेक गरिब शेतकऱ्यांच्या शेतात निंदनही केले. पेरणी, निंदन, खूरपणी इ. शेतकऱ्यांची कामे श्रमदानातून करून, शेतकऱ्याचा शेतमाल त्यांच्या घरापर्यंत पोहोचवण्यासाठी त्यांचे हजारो कार्यकर्ते आणि चाहते एखाद्या मिशनऱ्याप्रमाणे कामाला लागले होते. यवतमाळचे मित्र हिंमत पांडे, कै. दादारावजी मडावी त्या काळात वसंतरावजी नाईक यांच्याबरोबर सतत असायचे. त्यामुळे मीसुद्धा या श्रमदानाच्या अभिनव योजनेत सामील झालो.

वसंतरावजी नाईकांपासून स्फूर्ती घेऊन शिक्षक संघटनेचे श्री. विश्वासराव ठाकरे यांच्या पुढाकाराने केळापूर तालुक्यातील दाभा (मानकर) या माझ्या गावी १९७५ साली शिक्षकांचे श्रमदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. एका गरीब आदिवासी मजुरास सिलिंगची तीन एकर जमीन मिळाली होती. त्या शेतकऱ्याच्या शेतात श्रमदानाने विहीर खणून देण्याचे कार्य वसंतरावजी नाईक यांच्या प्रेरणेने शिक्षक संघटनेने स्वीकारले. शिबिरार्थी शिक्षकांनी विहिरीचे खोदकाम चालू केले. परंतु, अनेकांच्या हातांना फोड आल्यामुळे ते काम अर्धवटच राहते की काय? अशी परिस्थिती निर्माण झाली. परिस्थिती बघून मी स्वत: पुढाकार घेतला. गावातील ४०-५० युवकांना गोळा करून रात्रंदिवस विहीर खोदण्याचे अपूर्ण कार्य युवकांनी शिक्षकांसोबत पूर्ण केले. त्या विहिरीस भरपूर पाणी लागल्यावरच काम बंद केले. ही वार्ता वसंतराव नाईकांच्या कानावर पोहोचली. त्यांनी त्या विहिरीचे उद्‌घाटन करायचे ठरविले. त्या आदिवासी शेतकऱ्याला पाणी उपसण्याचे ऑईल इंजिन मोफत देण्याचे जाहीर केले. विहिरीचे उद्‌घाटन झाले तो दिवस मला अजूनही आठवतो. वसंतरावजी आपल्या भाषणात म्हणाले की, हा मुलगा भविष्यात कर्तृत्ववान होईल आणि शेतकऱ्यांच्या, गोरगरिबांच्या भल्यासाठी काम करेल. मी त्यांना शुभेच्छा आणि आशीर्वाद देतो. वसंतराव नाईकांच्या या वक्तव्यामुळे मी भारावून गेलो आजही तो क्षण मी विसरू शकत नाही. वसंतरावजी नाईक यांच्यासारख्या कर्तृत्ववान व्यक्ती फार थोड्या जन्माला येतात. राजकारणातील ते राजे होते आणि समाजकारणातील ते सम्राट होते.

शेती आणि मातीवर वसंतराव नाईकांची असलेली निस्सीम भक्ती त्यांच्या जीवनातून क्षणोक्षणी प्रत्ययास आली. १९७२ चा दुष्काळ महाराष्ट्राने अनुभवला. महाराष्ट्रातील जनता अन्नाच्या दाण्यास मोताज झाली होती. अमेरिकेतून आयात केलेली लाल रंगाची मायलो ज्वारी घशात ढकलावी लागत होती. नाईक साहेबांनी पुण्याच्या शनिवारवाड्यासमोर भीष्मप्रतिज्ञा केली- 'दोन वर्षांत महाराष्ट्र अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला नाही, तर फाशीवर जाईन.' त्यांच्या या प्रचंड आत्मविश्वासाने प्रशासकीय यंत्रणा जागृत झाली आणि शेतकऱ्यांच्या मनात नव्याने विश्वासाची पेरणी झाली. त्यांनी चार कृषी विद्यापीठांची स्थापना केली. कृषी शास्त्रज्ञांना आपल्या विश्वासात घेतले. भरघोस उत्पादन देणाऱ्या संकरित ज्वारीच्या संशोधित वाणाचा प्रचार आणि प्रसार केला. एखाद्या झपाटलेल्या शास्त्रज्ञाप्रमाणे त्यांनी संकरित वाणाचे महत्त्व पटवून दिले. जी गोष्ट पुढे सांगावयाची ती स्वत: करायची, असे त्यांचे तत्त्वज्ञान होते. शेतीतील नवनवीन प्रयोगांची प्रयोगशाळा, शेलू आणि गहुलीतील त्यांची शेती बनली. एकदा त्यांनी संकरित ज्वारीचे सी.एस.एच.१ जातीचे वाण आपल्या शेलूच्या शेतात पेरले. ज्वारीचे भरघोस पीक आले. हा प्रयोग त्यांनी इतर शेतकऱ्यांना दाखविला. या प्रयोगातून शेतकऱ्यांनी प्रेरणा घेतली. त्यांच्या प्रत्येक भाषणात शेती आणि संकरित वाणाचा उल्लेख असे. आधुनिक शेतीचा प्रत्येक प्रयोग त्यांनी आपल्या शेतीत केला.

# शेती आणि मातीवर निस्सीम भक्ती

प्रा. दिनकर गुल्हाने

डोंगर-कपारी, नाल्या-ओहळाने व्यापलेल्या साग जंगलाच्या पोटात वसलेले छोटेसे गहुली गाव. महाराष्ट्राचे एक तपापर्यंत मुख्यमंत्री म्हणून कुशल नेतृत्व करणाऱ्या स्व. वसंतराव नाईक यांचे जन्मगाव. बंजारा समाजातील सधन कास्तकार फुलसिंग चतुरसिंग नाईक यांचे चिरंजीव, आडवळणाच्या या गहुली गावचे भटकंती करणाऱ्या बंजारा समाजातील वसंतराव महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होतील, असे कुणालाही वाटले नाही. प्राथमिक शिक्षण घेताना त्यांना चार शाळा बदलाव्या लागल्या. प्राथमिक शिक्षणातील अडथळे पार करत वसंतराव नाईक नागपूर येथून एल.एल.बी. झाले आणि पुसद येथे १९४३ साली वकिली व्यवसायाला सुरुवात केली. त्याच वेळेस त्यांना राजकारणाची गोडी लागली. महात्मा गांधींच्या विचारांनी विलक्षण प्रभावित झाल्यानंतर १९४३ मध्ये ते पुसद तालुका काँग्रेसचे अध्यक्ष झाले व १९४६ मध्ये पुसद नगरपालिकेचे अध्यक्ष बनले. वकिलीचा व्यवसाय करताना गोर-गरिबांना न्याय मिळण्यासाठी ते खटले चालवत. परंतु, आर्थिक दैन्य पाहताना त्यांचे मन द्रवत असे. त्यामुळे ते कधीही गरिबांकडून शुल्क घेत नसत. त्यांचा संपर्क पुसद तालुक्यात वाढत गेला. राजकारणापेक्षाही वसंतरावांचा पिंड हा सुधारकाचा होता. गाव-खेड्यातून, वाड्या-तांड्यातून बंजारा, आदिवासी व बहुजन लोक राहत. त्यांच्यात शिक्षणाची वानवा होती. शाळा नव्हत्या. तरुणपिढी व्यसनाधीन झालेली होती. हे पाहन गांधी विचारांनी प्रेरित झालेल्या वसंतरावांना राहवत नसे. वकिली आटोपल्यावर ते रात्रीच्या वेळी खेड्या-पाड्यातून, गावकऱ्यांच्या बैठकीतून लोकांना दारूच्या व्यसनापासून दूर राहण्यासाठी प्रबोधन करीत. 'शिका, अज्ञान दूर करा, व्यसनांना दूर ठेवा, शिक्षणाशिवाय जीवनात प्रगती नाही,' असे कळवळून सांगत. ग्रामीण भागात आरोग्याबद्दल फारशी जागरूकता नव्हती. साथीचे रोग आले की, लोक मरीमायच्या मागे लागत. असाच एक प्रसंग शेलू गावातील आहे. १९४३ साली वकिली करताना त्यांची शेती असलेल्या शेलू गावात शेतीकडेही लक्ष देत. या शेलू गावात कॉलराच्या साथीची मोठ्या





प्रमाणावर लागण झाली होती. काही जीव गमावले होते. अज्ञानामुळे लोक औषधी घेण्याच्या मनःस्थितीत नव्हते. औषधीऐवजी 'मरीमाय' त्यांना जवळची वाटे, अशावेळी नाईक साहेब डॉक्टरला घेऊन शेलूत येत. सोबत औषधी आणत. लोकांना पटत नसले तरी औषधी घेण्याचा ते आग्रह करीत. गावच्या आजाराला दूर करण्यासाठी त्यांचं अंत:करण तीळतीळ तुटत होते, वसंतरावांच्या मोठेपणाची ही आठवण सांगताना शेलू येथील माजी पोलिस पाटील भाऊराव पाटील मस्के यांचे शब्द आजही अश्रूने भिजतात.

पुढे वसंतराव मध्यप्रांताच्या मंत्रिमंडळात महसूल खात्याचे उपमंत्री झाले.१९५६ साली राज्य पुनर्रचनेनंतर व्दिभाषीकातील यशवंतराव चव्हाण यांच्या मंत्रिमंडळात मंत्री झाले आणि ५ डिसेंबर १९६३ रोजी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदी आरूढ झाले. मुख्यमंत्री झाल्यानंतरही गहुली-पुसदशी त्यांची असलेली नाळ कधीही तुटली नाही. पुसद तालुक्यातील विकासाचे चिंतन त्यांच्या सहकाऱ्यांसोबत नेहमी सुरू राहत असे. पुसद परिसर हा डोंगर-माळाने व्यापलेला. तो सुजलाम्, सुफलाम् व्हावा, हे स्वप्न बाळगून वसंतरावांनी वनवार्ला येथे पूस नदीवर धरण बांधले. या धरणामुळे आज परिसराला समृद्धीचा परीसस्पर्श झाला आहे. मुंबईवरून नाईक साहेब महिन्यातून किमान दोनदा पुसदला येत. अकोल्यावरून पुसदला मोटारीने येताच थेट आपल्या बंगल्यातून शेतीची वाट धरत. चिखलांनी पाय माखले आणि अंगावरचे कपडे भरले, तरी काळी आईची सेवा करताना त्यांना धन्यता वाटे. शेलूच्या शेतीत संकरित वाणाला चांदणे लगडलेली जोंधळ्याची हातभर लांबीची कणसे बघितली की, त्यांचा आनंद ओसंडून वाहत असे. त्यांची ही शेती पाहण्यासाठी दूरवरून लोक येत व आधुनिक शेतीची प्रेरणा घेऊन जात. नाईक साहेब स्वत: कधी हाती डवरा धरत तर कधी निंदनासाठी विळा चालवत. त्यांचे हे संकरित ज्वारीवरील प्रेम बघून चोंढीच्या भाऊराव पाटील या लोकशाहिराची डफावर थाप पडे... *'संकरित ज्वारीची ही झुलणारी कणसं, जणू वसंत सभेत ही डोलणारी माणसं'*... वसंतरावांच्या भाषणाच्या सुरुवातीला भाऊराव पाटलांच्या या पोवाड्याचे सूर जोर धरत असत. त्यातून शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण होई. शेतीतून ज्वारीचे आलेले भरघोस पीक पाहून मग शेतकरीही आनंदून जात असे. ज्वारीने भरलेले पीक दिसले की, वसंतरावांच्या गाड्यांचा काफिला अचानक रस्त्यात थांबत असे. सुटा-बुटातील वसंतराव थेट बांधावर जात व शेतकऱ्याची आस्थेने चौकशी करून त्याच्या पाठीवर शाबासकीचा हात फिरवीत. या अनोख्या अनुभवामुळे जोमदार पीक काढणाऱ्या शेतकऱ्याचा उत्साह शंभर पटीने वाढत असे. एकदा वसंतराव लक्ष्मण पहिलवानाच्या घरी गेले आणि ज्वारीच्या पोत्यावर बसले. राज्याचा एक मुख्यमंत्री साध्या शेतकऱ्याच्या घरात ज्वारीच्या पोत्यावर बसतो, हे पाहून पहिलवानांना गहिवरून आले. नाईक साहेबांनी डेअरी फार्मसह प्रत्येक पिकाचा प्रयोग शेलू व गहुलीच्या शेतीत राबवून शेतकऱ्यांपुढे आदर्श निर्माण केला. या प्रयोगशील शेतीला भेटी देऊन अनेक शेतकऱ्यांनी प्रेरणा घेतली.

युवावस्थेतही वसंतरावांना शेतीचा कळवळा होता. गाव-तांड्यात युवक रिकामपणाच्या गप्पा मारत तर दुसरीकडे गवताने भरलेले पीक पाहून वसंतरावांना चिंता वाटत असे. अशावेळी त्यांनी एक



वसंतरावांचे वडील फुलसिंग बापू यांच्या उत्कट ध्यासातून वसंतराव नाईक यांनी जनता शिक्षण प्रसारक मंडळाच्या माध्यमातून उच्चशिक्षणाची गंगा पुसद परिसरात आणली. सुधाकरराव नाईक, मनोहरराव नाईक, डॉ. एन.पी. हिराणी, जय नाईक यासारख्या नेत्यांनी नाईकसाहेबांच्या शैक्षणिक विचारांचा वारसा जपत शिक्षणाची गंगा गोर-गरिबांच्या दारात नेली. आज पुसद येथे कला, वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी, फार्मसी, महिला, तंत्रनिकेतन, शारीरिक शिक्षण, आयुर्वेद अशा ज्ञानशाखा असून, या शाखांमधून गोर-गरिबांच्या मुलांना शिक्षणाची संधी प्राप्त झाली. असंख्य कुटुंबे ज्ञानप्रवाहातून स्वयंपूर्ण झाली. शिक्षणाप्रमाणेच सहकाराची रोवणी वसंतरावांनी पुसद परिसरात केली. पुसद येथे सहकारी सूतगिरणी, तर उमरखेड तालुक्यातील पोफाळी येथे साखर कारखान्याची मुहूर्तमेढ त्यांनी रोवली. खरेदी-विक्री संघ, जिनिंग प्रेसिंग, कृषिउत्पन्न बाजार समिती, विविध कार्यकारी सोसायटी अशा सहकारी संस्थांचे जाळे निर्माण केले. 'शेतकरी हा कारखानदार झाला पाहिजे' हे त्यांचे स्वप्न साकारण्यासाठी त्यांनी कृषी उद्योगांना चालना दिली. वसंतरावांच्या कार्यातून पुसद परिसर समृद्ध झाला. या परिसरासाठी वसंतराव हे खऱ्या अर्थाने 'परीस' ठरले!


आगळावेगळा उपक्रम राबविला. त्यांनी शंभर-दोनशे युवकांचे रिकामे हात विनामोबदला शेतीतील सामुदायिक निंदनासाठी वापरले आणि पिकांची जोमदार वाढ झाली. 'युवकांनी रिकामे बसू नये. शेतात घाम गाळावा. श्रमातून धान्य लक्ष्मी घरी येईल. घरा-दारात आबादी नांदेल,' असा संदेश वसंतराव आपल्या कृतीतून देत.

वनवार्ला येथील पूस धरण पूर्ण बांधून झाल्यानंतर पुसद परिसरातील शेतकरी पाण्याचा सिंचनासाठी वापर करीत नसत. पारंपरिक शेतीवरच त्यांचा भर होता. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' हा संदेश देणाऱ्या वसंतरावांना ही गोष्ट लक्षात येताच त्यांनी गावोगावी सायंकाळी शेतकऱ्यांच्या बैठका घेतल्या. त्यांच्या सहकाऱ्यांसोबत कंदिलाच्या प्रकाशात गोणपाटावर बसून शेतकऱ्यांना रब्बी गहू घेण्यास प्रवृत्त केले. बोरगडी येथील नारायण अंबोरे पाटील म्हणतात- 'आधी आमच्या स्वयंपाकघरात पाहुण्यांपुरती गव्हाची पोळी व्हायची. घरातील इतरांना ज्वारीची भाकर खावी लागे. नाईकसाहेबांच्या कृपेने आम्हा सर्वांना गव्हाची पोळी मिळाली.' ग्रामीण भागातील ही प्रतिक्रिया अतिशय बोलकी आहे. त्यांच्या दूरदृष्टीतून पुसद परिसर पूस-इसापूर-लोअर पूस ही तीन धरणे उभी राहिली आणि परिसर समृद्ध झाला.

**मनू, विहीर बांधून झाली का रे?**

नाईक साहेबांचे शेती आणि शेतकऱ्यांवर निस्सीम प्रेम होते. शेतीचे प्रयोग ते गहुली व शेलूच्या शेतात करीत. सिंचनाशिवाय शेती फायद्याची ठरणार नाही. त्यामुळे सिंचनासाठी गहुलीच्या विहिरीचे काम हाती घेण्यात आले. त्यावर वसंतरावांचे लक्ष होते. ते आजारी पडले तरी त्यांच्या विहिरीच्या बांधकामाची चिंता मनात घोळत होती. त्यांचे लाडके पुतणे मनोहर नाईक, त्यांना वसंतराव 'मनू' म्हणत. वसंतराव काकांना भेटावयास मनोहरराव येताच- वसंतरावांनी प्रश्न केला - 'अरे मनू, विहीर बांधून झाली का रे...?' आजारपणातून उठल्यानंतर मनूने 'विहीर बांधली' म्हणून सांगितले होते. ती विहीर बघायला वसंतराव शेतावर गेले. त्यावेळी त्यांच्या सोबत ज्येष्ठ बंधू बाबासाहेब नाईक, पुतणे सुधाकरराव नाईक आणि गांधीवादी नेते मणीभाई देसाई होते. वसंतरावांचे हे आगळेवेगळे रूप नक्कीच अप्रूप वाटणारे आहे.

**आदर्श बंधुप्रेम!**



वसंतराव आणि ज्येष्ठ बंधू बाबासाहेब नाईक

महाराष्ट्राच्या राजकारणात वसंतराव नाईक हे यशस्वी मुख्यमंत्री ठरले. त्यांची पुरोगामी धोरणे नव्या महाराष्ट्राचा उदय घडविणारी होती. त्यांचे हे यश पाहताना त्यांचे वडीलबंधू राजूसिंग ऊर्फ बाबासाहेब नाईक प्रसन्न असत. त्याचे कारणही तसेच होते. बाबासाहेबांचे वसंतराव यांच्यावर जिवापाड प्रेम होते. तर वसंतरावांच्या जीवनात अत्यंत जिवाभावाचे, आदराचे आणि श्रद्धेचे स्थान म्हणजे बाबासाहेब होते.

पुराणात बंधुप्रेमाला राम-लक्ष्मणाच्या अजोड प्रेमाची उपमा दिली जाते. मात्र, अलीकडच्या काळात वसंतराव व बाबासाहेबांचे बंधुप्रेम राम-लक्ष्मणासारखेच पवित्र व निस्सीम होते. त्याची अनुभूती नाईक साहेबांच्या काळात कार्यकर्ते व चाहत्यांनी वेळोवेळी घेतली आहे. वसंतराव संपूर्ण महाराष्ट्राचे राजकारण सांभाळत तर स्थानिक पातळीवरील जनतेच्या समस्या व प्रश्न सोडविण्यास बाबासाहेब अग्रेसर असत. बाबासाहेब हे खऱ्या अर्थाने लोकनेते होते. त्यांच्या पुसदच्या जनता दरबारात लोकांच्या अडीअडचणी, प्रश्न सहजपणे सुटत. काही मोठे प्रश्न व शासन स्तरावरचे नसल्यास बाबासाहेबांचा शब्द प्रमाण असे. नाईक साहेबांच्या राजकारणाचे बाबासाहेब हेच प्रमुख सूत्रधार होते. त्यामुळे अनेकवेळा जे कार्यकर्ते वा नेते नाईक साहेबांसमोर थेट जात नसत त्यांची कामे बाबासाहेबांकडून सहजपणे होत. नाईक साहेब व बाबासाहेबांमधील समन्वय उल्लेखनीय होता. नाईक साहेबांच्या बालपणात त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था बाबासाहेबांनी सांभाळली. आपल्या मोठ्या भावाचे हे विलक्षण प्रेम नाईक साहेब कधीही विसरले नाहीत. जिल्ह्यातीलच नव्हे, तर महाराष्ट्रातील सामान्य कार्यकर्त्यांना बाबासाहेब फार मोठा आधार होते. वसंतराव यांचे बाबासाहेबांवर मनस्वी प्रेम होते. एकदा फेब्रुवारी १९७९ मध्ये बाबासाहेबांना हृदयविकाराचा झटका आला, त्यावेळी डॉ. एन.पी. हिराणी हे त्यांचे फॅमिली डॉक्टर होते. त्यांनी नाईक साहेबांना या गंभीर आजाराची माहिती दिली व मुंबईचे तज्ज्ञ डॉक्टर के. के. दाते यांना घेऊन येण्याची सूचना केली. ते विमानाने नागपूरला व मोटारीने पुसदला पोहोचले. डॉक्टरांनी बाबासाहेबांची तपासणी केली. त्यानंतर एका खोलीत वसंतराव डॉक्टरांशी बोलले- 'खरे काय ते सांगा... बाबासाहेबांची प्रकृती कशी आहे?' त्यावर डॉक्टरांनी प्रकृती गंभीर आहे, असे सांगताच दोन्ही हातांचे तळवे तोंडावर ठेवून नाईक साहेब हमसून रडले. संपूर्ण महाराष्ट्राला धीर देणारे वसंतराव बंधुप्रेमाने हळवे झाले!



# आत्मविश्वास महत्त्वाचा!

''या देशाची संपन्नता वाढवावयाची असेल तर शेतीचे उत्पादन वाढले पहिजे. त्यासाठी, शिक्षण घेतल्यावर आपण नोकरीच्या शोधात फिरू नये. आजकालच्या प्रत्येक तरुणाला नोकरी हवी आहे. कारण, त्याच्यात स्वत: काही नवीन करण्याचा, स्वत: काही उत्पादन करण्याबद्दलचा आत्मविश्वास नाही. म्हणून आपल्यातला आत्मविश्वास वाढविण्याचा प्रयत्न नेहमी केला पाहिजे. मला हे जमणार नाही असे न म्हणता मला हे जमते व ते मी नक्की करीन अशी आत्मविश्वासाची भावना प्रत्येकात असली पाहिजे. जगामध्ये जेवढ्या मोठ्या गोष्टी घडल्या त्या सर्व आत्मविश्वासामुळेच घडल्या. आत्मविश्वास नसल्यास लहानसहान गोष्टीतसुद्धा माणसाला अपयश येते. याप्रमाणे पुढे देश घडविण्यासाठी आवश्यक त्या गुणांची जोपासना व वाढ तरुणांनी आता केली पाहिजे. या अवस्थेत त्यांची सर्वांगीण प्रगती झाली पाहिजे,'' अशा भावना वसंतराव नाईक यांनी ११ सप्टेंबर १९७१ साली पुसद येथील युवक मंडळाने आयोजित रोगनिदान व शस्त्रक्रिया शिबिरामध्ये व्यक्त केल्या. हे भाषण आजही तेवढेच प्रेरणादायी व स्फूर्तिदायक आहे.

आजच्या तरुण पिढीबद्दल काही लोकांच्या मनात चुकीच्या कल्पना असताना युवक कार्यकर्त्यांनी रोगनिदान व शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करावे ही कौतुकाची गोष्ट आहे. आजची तरुण पिढी हेच देशाचे खरे शिल्पकार. संघशक्तीबरोबरच त्यांनी सुदृढ शरीर आणि निरोगी मन कमावले पाहिजे.

युवक मंडळाच्या तरुण कार्यकर्त्यांनी येथे रोगनिदान व शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्याचे जे एवढे मोठे कार्य केले आहे त्याबद्दल मला आनंद होत आहे. आजची तरुण मंडळी केवढी मोठी कामे करू शकतात याचे हे एक उत्तम उदाहरण आहे. एवढा मोठा आत्मविश्वास आमच्या तरुण मंडळीमध्ये आहे हे पाहून माझ्यासारख्या साठीच्या जवळपास आलेल्या लोकांना किती आनंद होत असेल याची आपण कल्पना करू शकता. या युवक मंडळाने बालक मंदिरापासून महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थ्यांची देखभाल करण्यापर्यंत सर्व प्रकारचे कार्य केले आहे. अनेक तऱ्हेची केंद्रे काढून निरनिराळ्या क्रीडा स्पर्धा आयोजित केल्या आहेत. सांस्कृतिक आणि सामाजिक बाबतीतही पुढाकार घेतला आहे; आणि आता गरीब जनतेच्या आरोग्याची काळजीसुद्धा त्यांनी घेतली आहे.

**मोलाचे बोल**

आपल्या देशातील तरुण पिढीसंबंधी आपल्यापैकी काही लोकांच्या मनात चुकीच्या कल्पना आहेत. अशा कार्याने त्या दूर होतील असा मला विश्वास वाटतो. सर्वसाधारणत: आपण असे मानतो की, तरुणांमधील उत्साहाला योग्य वळण लावले नसल्यामुळे ते ज्या मार्गाने जावयास पाहिजेत त्या मार्गाने जात नाहीत. परंतु, आपल्या आभार प्रदर्शनाच्या भाषणात एका कार्यकर्त्याने आपल्याला जे सांगितले आहे ते फार महत्त्वाचे आहे. त्यांची केवळ स्तुती करण्याच्या भावनेने हे मी बोलत नाही. आम्ही आज ज्या पदावर आहोत तेथे आम्हाला नेण्यामध्ये समाजानेसुद्धा त्याग केला आहे; आणि त्याची



अंशत: परतफेड करण्याचा हा प्रयत्न आहे, असे ते जे बोलले ते फार मोलाचे आहे. प्रत्येक क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये किंवा कार्यकर्त्यांमध्ये ही भावना निर्माण झाली तर जनतेचे प्रश्न गतीने सुटू शकतील याबद्दल माझ्या मनात काही शंका नाही.

**संस्कृती कशात आहे?**

जनतेच्या दु:खाबद्दल आपल्याला जिव्हाळा वाटला पाहिजे. असा जिव्हाळा जेथे नाही तेथे संस्कृती आहे असे मानावयास मी तयार नाही. तेथे ज्ञान किंवा शिक्षण आहे असेही मानावयास मी तयार नाही. आज आपल्या देशातील सामान्य माणसाची संस्कृती काय आहे? एखादा मनुष्य पडला व त्याला लागले नाही असे आपल्याला दिसले तरीसुद्धा ''तुला कोठे लागले तर नाही ना?'' असे विचारण्याची आपली संस्कृती आहे. तीच संस्कृती जे अधिकारावर आहेत त्यांच्यामध्ये असली पाहिजे. नव्हे, त्यांच्यात ती जास्त प्रमाणात असली पाहिजे. याच संस्कृतीमुळे मोठेमोठे निष्णात डॉक्टर्स खेडेगावातूनसुद्धा काम करण्यास तयार होतात. मी अनेक खेड्यांत त्यांना काम करताना पाहिलेले आहे. पूर्वी आपण फिरते दवाखाने पाहिले नसतील. परंतु, गेल्या वर्षी नागपूर जिल्ह्यातील एका लहानशा गावात मी फिरता दवाखाना सुरू झाल्याचे पाहिले. खेड्यात डॉक्टर्स किंवा परिचारिका यांना राहण्याकरिता चांगली सोय नसते.

त्यामुळे शहरातील माणसे सर्वसाधारणत: खेडेगावात जाण्यास तयार नसतात. परंतु, या शिबिरात डॉक्टर्स रात्री - अपरात्री आनंदाने काम करतात हे दृश्य पाहून मला मोठा आनंद झाला. ज्यांच्याजवळ ज्ञान आहे, ज्यांच्याजवळ अधिकार आहे, ज्यांच्याजवळ कुशलता आहे त्यांच्याजवळ ही प्रवृत्ती दिसली तर जनतेचे दु:ख कमी होण्यास मदत होईल यात मला शंका वाटत नाही. जर हे शिबिर येथे निघाले नसते तर हजारो दु:खी लोकांना आज जो औषधोपचार मिळाला तो मिळाला नसता. त्यांच्यापैकी फार थोड्यांना दवाखान्यापर्यंत जाणे शक्य झाले असते. एवढ्या मोठ्या प्रमाणात एकाच ठिकाणी मदत मिळण्याची सोय होणे ही मानवतेच्या दृष्टीने फार महत्त्वाची बाब आहे. असे हे महत्त्वाचे कार्य पुसदसारख्या एका छोट्याशा गावात झाले ही सर्वांना भूषणावह गोष्ट आहे. येथे असलेल्या सर्व संस्थांनी, नागरिकांनी मोठ्या प्रमाणात या शिबिराला मदत केली याबद्दल समाधान वाटते. यापुढेही ते अधिक मदत करतील याबद्दल माझ्या मनात शंका नाही.



### देशाचे आधारस्तंभ

या देशात गरिबी अफाट आहे, अनेक प्रकारच्या गैरसोयी आहेत. कारण, या देशावर अनेक वर्षे सतत परकी सत्ता होती. त्यांनी आपल्या लोकांना दाबून ठेवले होते. त्यामुळे या देशातील लोकांमध्ये असलेली आत्मविश्वासाची भावना कमी झाली. आमचे प्रश्न आम्ही सोडवू शकू हा आत्मविश्वास राहिला नाही आणि म्हणून या देशात जबरदस्त मानवी शक्ती असूनही त्या शक्तीचा विशेष फायदा अजूनही या देशाला झाला नाही. आपल्याला सुखी व्हावयाचे असेल तर या देशाला शक्तिमान आणि बलवान बनविण्याकरिता युवकांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे. या देशाला शक्तिमान आणि बलवान केले पाहिजे म्हणजे नेमके काय केले पाहिजे, हा प्रश्न तुमच्यासमोर उपस्थित होऊ शकेल. परंतु, मी आपणास सांगू इच्छितो की, आजचे तरुण, आजचे विद्यार्थी हेच या देशाचे खरे आधारस्तंभ आहेत. उद्याचा भारत तेच घडविणार आहेत. तेव्हा त्यांच्यामध्ये देश घडविण्याचे कौशल्य आणि शक्ती असली पाहिजे. पुढे येणाऱ्या जबाबदाऱ्या पेलण्याचे सामर्थ्य त्यांच्यात असले पाहिजे. हे पुढे हवे असणारे कौशल्य, शक्ती आणि सामर्थ्य कमविण्याचे, त्यांचा संग्रह करण्याचे काम आजच्या नवीन पिढीने केले पाहिजे.

### खेळाचे मैदान मनसोक्त आनंद

यासाठी माझ्या मते पहिली गोष्ट म्हणजे युवकांची मानसिक आणि शारीरिक वाढ झाली पाहिजे. सुदृढ आणि निरोगी मनाची वाढ बलवान आणि निरोगी शरीरातच होते. त्या दृष्टीने शरीर बलवान करण्याकडे आपण लक्ष दिले पाहिजे. त्यासाठी खेळ आणि व्यायाम या आवश्यक गोष्टी मानल्या गेल्या पाहिजेत. खेळामुळे चपळता व खिलाडू वृत्ती येते; तसेच संघवृत्ती व शिस्तप्रियता याही गुणांचा विकास होतो. खेळाचे मैदान ही एक अशी जागा आहे की, जिथे सर्व जण सर्व प्रकारचे भेद विसरून निर्मल मनाने आनंद लुटतात. तुमचे मंडळ खेळाकडे विशेष लक्ष देते. खेळांच्या स्पर्धाही भरविते. ही गोष्ट त्या दृष्टीने फार चांगली आहे.

### ज्ञान कमवा

शारीरिक वाढ जशी आवश्यक आहे तशी बौद्धिक वाढही फार आवश्यक आहे. जगात व भारतात नवीन काय घडते आहे, कोणते नवीन शोध लागत आहेत याबद्दल आपल्याला ज्ञान असले पाहिजे. ती सर्व माहिती मिळविण्याचा प्रयत्न तरुणांनी केला पाहिजे. त्याकरिता खूप वाचन केले पाहिजे. डोळे आणि मन उघडे ठेवून चौफेर पाहत रोजच्या जीवनातून नवीन नवीन ज्ञान मिळविले पाहिजे. खऱ्या अर्थाने माणसाची उंची त्याच्या शारीरिक उंचीने ठरत नाही, तर त्याच्या ज्ञानावरून मनाच्या मोठेपणावरून उमद्या स्वभावावरून ठरत असते. तेव्हा शालेय अभ्यासाबरोबरच जास्तीत जास्त इतर वाचन करून मनन केले पाहिजे. आपल्या ज्ञानात रोज नवीन भर घातली पाहिजे. चांगल्या वाचनातून चांगले सुसंस्कृत मन बनले पाहिजे.

### भेदभाव नष्ट करा

आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे जाती-पातीच्या, उच्च-नीचतेच्या, गरीब-श्रीमंतीच्या व इतर साऱ्या भेदांना आपण तिलांजली दिली पाहिजे. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत कुठलाही माणूस असो, कोणत्याही जातीचा, धर्माचा असो, कोणतीही भाषा बोलणारा असो तो माझा आहे आणि मी त्याचा आहे ही भावना आपल्यात निर्माण झाली पाहिजे. माणसामाणसांत आपण भेद केल्यास भारत संघटित व एकसंघ होऊ शकणार नाही. तो कमकुवत राहील. ही गोष्ट आपण लक्षात घेतली पाहिजे. माणूस हा सर्वप्रथम माणूस आहे व धर्माच्या - जातीच्या नावाखाली त्याला कमी लेखणे ही माणुसकी नाही, हा धर्म नाही हे आपण लक्षात घ्या व सर्वांशी आत्मीयतेने

**( मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या निवडक भाषणांच्या 'समृद्धीच्या वाटा' संग्रहातून.)**

## वसंत-विचार

### शिक्षण हे समाजाचे ऋण

''आमच्या वेळी स्वातंत्र्यपूर्व काळात शिक्षण घेणे ही अत्यंत अवघड बाब होती. कधीही नापास न होता मराठी चौथी पास होण्याकरिता मला पाच शाळा बदलाव्या लागल्या. ही परिस्थिती आता बदलली आहे. खेड्यापाड्यांतील बरेच जण आता मला सांगतात, 'नाईकसाहेब, आम्ही डॉक्टर होऊ शकलो नाही, परंतु शिक्षण प्रसाराच्या सरकारच्या नवीन धोरणांमुळे आम्ही डॉक्टर आणि वकिलांचे बाप होऊ शकलो.' म्हणूनच मला जे ज्ञान मिळत आहे ते समाजाच्या त्यागातून मिळत आहे आणि या उपकाराची परतफेड मला सव्याज करावयाची आहे ही भावना शिक्षणामुळे मनात बिंबली पाहिजे. नाहीतर शिक्षणामुळे फक्त सुखी व ऐषआरामात राहण्याची भावना वाढली तर आपल्याला शिक्षण मिळाले, ज्ञान मिळाले असे मी म्हणणार नाही.''



# आदर्श गाव

**महाराष्ट्रातील गावे आदर्श झाली तरच आपले राज्य विकासामध्ये देशात आघाडीवर राहील. त्यादृष्टीने गावाने काय करायला हवे, याबाबतचे सविस्तर विवेचन वसंतराव नाईक यांनी १४ ऑगस्ट १९७२ ला स्वातंत्र्य दिनानिमित्त आकाशवाणीवरील भाषणात केले. त्यांचे हे विचार आजही तितकेच महत्त्वाचे आणि सर्वांसाठी मार्गदर्शक असे आहेत.**

देश सुखी आणि समृद्ध व्हावयाचा असेल तर खेडी सुखी आणि समृद्ध झाली पाहिजेत. खेड्यातील जनता सुखी कशी होईल याचा विचार केला पाहिजे. त्यासाठी खेड्यातील विकासकामांना विशेष गती दिली पाहिजे.

आपला देश स्वतंत्र होऊन या वर्षी पंचवीस वर्षे पूर्ण होत आहेत. सुमारे दीडशे वर्षांच्या पारतंत्र्यानंतर आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्य मिळविण्यासाठी या देशातील थोर नेत्यांचे आपल्याला मार्गदर्शन मिळाले. अनेकांनी स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतला. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी लाखो लोकांनी आपापल्या परीनं प्रयत्न केले, त्याग केला. ज्यांच्या असीम त्यागाने या देशाला स्वातंत्र्य लाभले त्यांच्यापैकी जे आज आमच्यात नाहीत त्यांना श्रद्धांजली अर्पण करणे व जे आमच्यात आहेत त्यांना मानाचा मुजरा करणे हे आपले पहिले कर्तव्य आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर साहजिकच राष्ट्रविकासाच्या योजना आपल्याला हाती घ्याव्या लागल्या. त्यासाठी पंडित जवाहरलालजींचे मार्गदर्शन आपल्याला लाभले. देशात नियोजनाचे युग सुरू झाले. अनेक खेड्यांतून नवीन नवीन कामे उभी राहिलीत. गावकऱ्यांनी या कामांसाठी सहकार्य दिले. शासनानेदेखील आपली जबाबदारी उचलली. ज्या खेड्यात स्वातंत्र्यपूर्व काळात निराशा, दारिद्र्य, रोगराई आणि अज्ञान यांनी थैमान घातले होते तेथे आता काहीतरी नवीन होऊ शकते असा आत्मविश्वास निर्माण झाला. ग्रामीण जीवनाचे चित्र काहीसे बदलले. तरीपण अपेक्षित प्रमाणात खेड्यांची उन्नती अजून झालेली नाही. देश सुखी आणि समृद्ध व्हावयाचा असेल तर खेडी सुखी आणि समृद्ध झाली पाहिजेत. देशातील जनता सुखी व्हावयाची असेल तर खेड्यातील जनता सुखी झाली पाहिजे; आणि म्हणून खेड्यातील जनता सुखी कशी होईल याचा विचार केला पाहिजे. त्यासाठी खेड्यात विकासाच्या कामांना वेग द्यावा लागेल. या दृष्टिकोनातून स्वातंत्र्याच्या पंचविसाव्या वर्धापनदिनी प्रत्येक खेड्याने आपल्या गावाच्या कार्यक्रमाच्या सफलतेसाठी आपला हिस्सा उचलण्यास पुढे आले पाहिजे. अंगीकृत कार्यक्रम पार पाडण्याचा निर्धार केला पाहिजे.

याही वर्षी पावसाच्या अवकृपेमुळे खरीप पिकांची मोठ्या प्रमाणावर हानी झाली ती भरून काढण्याकरिता पाण्याच्या प्रत्येक थेंबाचा उपयोग करून रब्बी पीक अधिक प्रमाणावर घेण्याचा कार्यक्रम आता आपण तयार करावा. दुष्काळाचा सुकाळ करण्याची जिद्द ठेवून रब्बी हंगामातील उत्पादन वाढवावे.

**बेघरांसाठी घरे**

हा कार्यक्रम प्रत्यक्ष अंमलात आणण्यासाठी सर्व गावकऱ्यांनी आपले सर्व मतभेद विसरून ग्रामसफाईसाठी दिनांक १४ ऑगस्ट रोजी एकत्र यावे व सर्व गावाची साफसफाई करावी. याच दिवशी गावकऱ्यांची एक सभा व्हावी. या सभेत गावातील जे लोक बेघर असतील किंवा ज्यांची घरे फारच लहान असतील त्यांना स्वातंत्र्याच्या पंचविसाव्या वर्धापन वर्षात निदान राहण्यायोग्य असा निवारा मिळावा यादृष्टीने विचार व्हावा. सभेत ज्यांना घरांची आवश्यकता आहे अशांची यादी तयार करावी व त्यासाठी



वसंतराव आणि शंकरराव चव्हाण.

एकंदर जागा किती लागेल याचा अंदाज घ्यावा तसेच ही जागा कुठे उपलब्ध होऊ शकेल तेपण पाहावे. हवी असलेली जमीन सरकारी किंवा ग्रामपंचायतीची असल्यास ती मोफत उपलब्ध होईल व जमीन खाजगी मालकीची असल्यास सामोपचाराने त्याही जमिनीचा ताबा ताबडतोब मिळेल अशी व्यवस्था करावी. त्या जमिनीची किंमत सरकार देईल. गरीब लोकांची घरे बांधण्याच्या दृष्टीने काही प्रमाणात सरकारी मदत मिळण्याबाबतची योजना लवकरच जाहीर करण्यात येईल.

१४ ऑगस्टच्या मध्यरात्री ग्रामस्थांनी सर्व प्रकारचे भेदाभेद नष्ट करून राष्ट्राशी एकनिष्ठ राहण्याची व प्रयत्नांची पराकाष्ठा करून देश सुखी, समृद्ध व बलशाली बनविण्याची शपथ घ्यावी.

१५ ऑगस्ट रोजी सकाळी उत्साहाच्या नवीन वातावरणात ध्वजवंदनाचे व प्रभातफेरीचे कार्यक्रम आयोजित करावेत. त्याच दिवशी सर्व गावकऱ्यांनी एकत्र येऊन आपला गाव सुधारण्याचा एक कार्यक्रम निश्चित करावा. दुपारी सर्व गावकऱ्यांनी सहभोजनाचा कार्यक्रम आयोजित करावा. त्यासाठी गावातील सर्वांनी आपला शिधा एकत्र करावा. सर्व जाती व धर्मांच्या लोकांनी सहभोजनाच्या निरनिराळ्या कामांत भाग घ्यावा. या कार्यक्रमाद्वारे सहजीवनाची व समानतेची भावना वाढीस लावावी आणि ती नेहमीकरिता टिकून राहील याची काळजी घ्यावी.

### सर्वांचा सहभाग हवा

गाव आदर्श बनविण्यात सरकारी कर्मचारी तर आवश्यक ती मदत करतीलच; पण बुद्धिमंतांनी आणि विद्यार्थ्यांनी जवळपासचे एखादे खेडे निवडून ते आदर्श बनविण्याचा संकल्प करून काम केल्यास काही अंशी सामाजिक ऋणाची परतफेड ते करू शकतील. शिवाय राष्ट्रविकासाच्या महान कार्यास हातभार लावण्याचे श्रेयही त्यांना मिळेल.

हा कार्यक्रम पार पाडण्यासाठी जेथे जेथे शासनाची, जिल्हा परिषदेची किंवा पंचायत समितीची मदत आवश्यक असेल तेथे तेथे ती नियमानुसार आणि योजनेनुसार हमखास मिळेल एवढे आश्वासन मी शासनातर्फे देऊ इच्छितो.

## ग्रामसुधारणेची पंचसूत्री

आज गावात अनेक उणिवा आहेत. त्या दूर करावयाच्या झाल्यास आपल्याला मुख्यत: पाच गोष्टींवर भर द्यावा लागेल. ग्रामसुधारणेची ही पंचसूत्री आहे. पहिली गोष्ट म्हणजे गावाची रचना नीटनेटकी असली पाहिजे. गावातील कोणत्याही भागात बैलगाडी जाईल अशा प्रकारे रस्ते रुंद व चांगल्या स्थितीत असले पाहिजेत. गावात संडास, मोऱ्या नाहीत ही परिस्थिती बदलली पाहिजे. सार्वजनिक जमिनीवरील अतिक्रमणे दूर केली पाहिजेत. घरांची बांधणी आरोग्यवर्धक असली पाहिजे. आसपास झाडे लावण्यास योग्य अशी एक हेक्टर जागा निवडून तेथे झाडे लावावी व त्यांची जोपासना करावी. दुसरे म्हणजे ग्रामपंचायत सहकारी संस्था, वाचनालय, महिला मंडळ यांसारख्या ग्रामविकासाला मदत करणाऱ्या सार्वजनिक संस्था गावात असल्या पाहिजेत. या संस्थात ग्रामवासीयांनी जास्तीत जास्त भाग घेऊन त्या कार्यक्षम ठेवाव्या. निरनिराळ्या सरकारी योजना गावात यशस्वीपणे राबविल्या पाहिजेत. तिसरे म्हणजे वंश, पंथ, धर्म, जात यावर आधारित माणसामाणसांतील भेद नष्ट केले पाहिजेत. गावातून अस्पृश्यतेचे संपूर्ण उच्चाटन झाले पाहिजे. जोपर्यंत गावातील भेदाभेद व उच्च-नीच भाव नष्ट होत नाहीत, तोपर्यंत खेड्यात सौख्य व समृद्धी येणार नाही आणि म्हणून समाजस्वास्थ्यासाठी आवश्यक असणारी समतेची भावना वाढीस लावण्याच्या कामास सर्वांत जास्त महत्त्व दिले पाहिजे. चौथे म्हणजे गावातील आरोग्य टिकविण्यासाठी व वाढविण्यासाठी सतत प्रयत्न व्हावयास पाहिजे. पिण्यासाठी स्वच्छ पाणी मिळाले पाहिजे. गाव नेहमी स्वच्छ ठेवला पाहिजे. पाचवे म्हणजे आधुनिक पद्धतीने शेती करून उत्पादन वाढविण्याच्या बाबतीत गाव प्रयत्नशील असावा. रोज नवीन लागणारे शास्त्रीय शोध, सुधारित बी-बियाणे व अवजारे, रोगप्रतिबंधक उपाय, रासायनिक खते व पाणी यांचा जास्तीत जास्त चांगला उपयोग करून घेऊन उत्पादन वाढविण्याचा ध्यास गावकऱ्यांनी घेतला पाहिजे. उत्पादन वाढविल्याशिवाय गावात आणि पर्यायाने देशात सुख व समृद्धी येणार नाही. म्हणून शेतकऱ्यांनी आणि शेतमजुरांनी उत्पादनवाढीचा कार्यक्रम तयार करून तो अंमलात आणावा.''

ग्रामविकासाच्या या विधायक कार्यक्रमाला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने प्रत्येक विकास गटातील दोन आदर्श खेड्यांना वर्षअखेर शासनातर्फे बक्षिसे देण्यात येतील. पहिले बक्षीस साडेसात हजार रुपयांचे आणि दुसरे पाच हजार रुपयांचे राहील.

या विधायक स्पर्धेत सर्व गावांनी भाग घेऊन आपापले गाव आदर्श बनविण्याचा दृढ संकल्प केला पाहिजे. संकल्पसिद्धीसाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे. देशाने माझ्यासाठी काय केले हे न पाहता देशासाठी मी काय केले याचे समाधानकारक उत्तर आपल्यापैकी प्रत्येकाला देता येईल असे राष्ट्रकार्य पुढील एका वर्षात आपण केले पाहिजे. गाव महान बनला तरच देश महान बनणार आहे हे लक्षात ठेवून स्वातंत्र्याच्या पंचविसाव्या वर्धापन वर्षात महाराष्ट्रातील सर्व गावे आदर्श बनविण्याच्या महत्त्वाच्या कामात आपण सर्वांनी हातभार लावला पाहिजे. मला आशा आहे की, आपण सर्व जण गावे आदर्श बनविण्यास झटू व विकासाच्या आघाडीवर राहण्याची महाराष्ट्राची परंपरा याही बाबतीत कायम ठेवू.

(माहिती व जनसंपर्क महासंचालनालय प्रकाशित 'समृद्धीच्या वाटा' या मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या निवडक भाषणाच्या संग्रहातून)

# युवकांसाठी रेड रिबन

युवकांमध्ये असणारा शास्त्रीय माहितीचा अभाव आणि प्रयोगशील वृत्ती यामुळे युवक एचआयव्ही आणि लैंगिक आजारांना सहज बळी पडतात. महाविद्यालयीन युवकांमध्ये एचआयव्ही/एड्स आणि ऐच्छिक रक्तदानाबद्दल जागृती करण्यासाठी राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्था, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने रेड रिबन क्लब हा कार्यक्रम राबविला जातो. या कार्यक्रमांतर्गत युवकांना सुरक्षित आणि आरोग्यपूर्ण जीवन जगण्यासाठी प्रोत्साहित केले जाते.

रेड रिबन क्लबची स्थापना महाविद्यालयीन स्तरावर केली जाते. महाविद्यालयातील एनएनएसच्या माध्यमातून कार्यरत असलेल्या १५ ते २० विद्यार्थी व विद्यार्थिनींचा मिळून क्लब तयार केला जातो.

रेड रिबन क्लब स्थापन करण्याचे मुख्य उद्देश खालीलप्रमाणे आहेत–

एचआयव्ही/एड्स प्रतिबंध, काळजी व निगा आणि औषधोपचार याबाबतची शास्त्रीय व वस्तुनिष्ठ माहिती पोहोचविणे.

युवकांमधील नवीन एचआयव्हीच्या संसर्गाला अटकाव घालणे.

समाजामध्ये एचआयव्हीबद्दल असणारा कलंक व भेदभाव कमी करून एचआयव्हीसह जगणाऱ्यांना आधार देण्यासाठी युवकांना प्रोत्साहित करणे, युवकांना ऐच्छिक रक्तदानासाठी प्रोत्साहित करणे.

रेड रिबन क्लबच्या सदस्यांची अपेक्षित भूमिका म्हणजे त्यांनी रेड रिबन क्लबच्या माध्यमातून, स्वैच्छिक रक्तदान करणे, महाविद्यालयातील इतर विद्यार्थ्यांना रेड रिबन क्लबच्या कार्यक्रमांमध्ये सहभागी करून घेणे, एचआयव्ही संसर्गितांच्या हक्क अधिकाराबद्दल जागृती करणे, युवकांमधील एचआयव्ही आणि एड्सबद्दलचे असणारे गैरसमज दूर करण्यासाठी प्रयत्न करणे इ.

रेड रिबन क्लबच्या माध्यमातून लैंगिक व प्रजनन आजार याबाबतची माहिती दिली जाते, त्याचबरोबर युवकांनी महाविद्यालयीन स्तरावर आणि समाजामध्ये एचआयव्ही आणि एड्स प्रतिबंधाचे माध्यम म्हणून कार्यरत राहावे यासाठी प्रयत्न केले जातात.

रेड रिबन क्लब अंतर्गत राबविण्यात येणारे कार्यक्रम, एचआयव्ही आणि एड्स संदर्भात, जीवन कौशल्ये, रक्तदान, लैंगिक शोषण आणि त्यासंदर्भातील कायदे, एचआयव्हीसह जगणाऱ्यांचे हक्क व अधिकार इ. विषयांशी संबंधित महाविद्यालयात चर्चासत्रांचे आयोजन करणे; तसेच या विषयांशी सदर्भात पोस्टर स्पर्धा, रॅली, निबंध लेखन स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा यासारख्या कार्यक्रमांचे आयोजन करणे. मुख्यतः हे सर्व कार्यक्रम राबवित असताना वेगवेगळे न राबवता महाविद्यालयातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांचा एक भाग म्हणून त्यांचा समावेश करणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ एनएनएसच्या ग्रामीण शिबिरात एचआयव्ही/एड्स संबंधित विषयांचा समावेश करण्यात यावा. शासनातर्फे एचआयव्ही संदर्भात दिल्या जाणाऱ्या सेवा सुविधांना भेट देऊन त्यांची माहिती करून घेणे व ती माहिती इतरांपर्यंत पोहोचविणे इ.

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेतर्फे सध्या राज्यातील मुंबई विद्यापीठ, पुणे विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ (कोल्हापूर), राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ (नागपूर), संत गाडगेबाबा विद्यापीठ (अमरावती), उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ (जळगाव), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ (औरंगाबाद), स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ (नांदेड), सोलापूर विद्यापीठ, डॉ. पंजाबराव कृषी विद्यापीठ (अकोला) या विद्यापीठांतर्गत येणाऱ्या निवडक ६०० महाविद्यालयांमध्ये हा कार्यक्रम राबविला जात आहे.

**रेड रिबन क्लब सदस्यांच्या बोलक्या प्रतिक्रिया :**

मुंबई विद्यापीठातंर्गत असलेल्या श्री सदाशिव हरी केळकर महाविद्यालय देवगडची रेड रिबन क्लब सदस्य मयुरी राणे म्हणते, रेड रिबन क्लबच्या माध्यमातून देण्यात आलेल्या प्रशिक्षणामुळे एचआयव्ही/एड्स संबंधी शास्त्रीय माहिती मिळाली तसेच पुढील आयुष्यात कशा प्रकारे आपली वर्तणूक असली पाहिजे याबाबत अतिशय महत्त्वाचे मार्गदर्शन मिळाले जे पुढील आयुष्याचा पाया मजबूत करण्यासाठी उपयोगी ठरत आहे.

साधन
हेल्पलाइन
022-2411 4000

एकनाथ सीताराम देवेकर महाविद्यालय, वरवडचा रेड रिबन क्लब सदस्य महेश शिंदे म्हणतो, मी ग्रामीण भागातून आलेलो आहे, सुरुवातीला मला एचआयव्ही/एडसबद्दल बोलायला अवघड वाटत होते, पण रेड रिबन क्लबच्या माध्यमातून मिळालेले प्रशिक्षण व मार्गदर्शनामुळे मी माझ्या मित्रांसोबत मोकळेपणाने एचआयव्ही/एड्सबद्दल बोलायला शिकलो त्याचबरोबर इतर विद्यार्थ्यांपर्यंत याची माहिती पोहोचविण्यासाठी महाविद्यालयात आम्ही विविध कार्यक्रमांचे आयोजन करतो.

विद्या प्रतिष्ठान, विद्यानगरी, बारामतीची विद्यार्थिनी प्रियांका लगाडे म्हणते, रेड रिबन क्लबमुळे एचआयव्ही/एड्सबद्दल मूलभूत माहिती मिळाली ज्यामुळे त्याचा उपयोग मला माझ्या मित्र मैत्रिणींमध्ये एचआयव्ही / एड्सबद्दल शास्त्रीय माहिती देण्यासाठी झाला, त्याचबरोबर ऐच्छिक रक्तदान चळवळीला बळ देण्यासाठीही झाला, या क्लबच्या माध्यमातून आम्ही महाविद्यालयात पथनाट्याच्या माध्यमातून ही माहिती इतरांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला तसेच रक्तदान शिबिराचे आयोजनही केले.

अशा प्रकारे रेड रिबन क्लब म्हणजे युवकांना एचआयव्ही प्रतिबंधाच्या कार्यात सहभागी करून घेण्याचे प्रभावी माध्यम बनले आहे. ही चळवळ मर्यादित न राहता ती मोठ्या प्रमाणात महाविद्यालयीन स्तरावर राबविण्याची गरज आहे.

**– सुहेल जमादार**
९४२२४२४८५८

# अर्थतज्ज्ञ बाबासाहेब

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अनेक विषयांमध्ये गाढा अभ्यास होता. त्यापैकी अर्थशास्त्र हा एक विषय. त्यांनी सखोल अध्ययन करून आर्थिक विषयावर सविस्तर विवेचन केले. त्यांचे आर्थिक विचार तत्कालिक स्वरूपाचे नाहीत. त्यांच्या आर्थिक विचारांना वैश्विक महत्त्व आहे. चलन निर्मितीच्या क्षमतेवर परिणामकारक नियंत्रण ठेवण्यासाठी बाबासाहेबांनी अनेक सूचना केल्या. स्वातंत्र्योत्तर काळात अनेक वित्त आयोगांनी केंद्र राज्य आर्थिक संबंधांची जी पुनर्रचना केली त्याला डॉ. आंबेडकरांचे मूलग्राही विवेचन पायाभूत ठरले आहे. भारतीय रूपया, चलननिर्मिती आणि भाववाढ इत्यादी आर्थिक प्रश्नांबाबत मांडलेले विचार आजही अतिशय उपयुक्त आहेत.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अर्थशास्त्राचे गाढे अभ्यासक होते. त्यांनी आर्थिक विषयावरील शेकडो ग्रंथांचा सखोल अभ्यास केला होता. डॉ. आंबेडकर हे खरे अर्थशास्त्राचे विद्यार्थी होते. त्यांच्या एम.ए., एम. एस्सी. व पीएच.डी. या सर्व पदव्या अर्थशास्त्र विषयाच्या आहेत. इतकेच नव्हे, तर डी.एस्सी.. ही उच्चतम पदवीदेखील "The Problem of the Rupee" या मौद्रिक अर्थशास्त्रावरील प्रबंधावर त्यांना प्रदान करण्यात आली होती. यावरून हे स्पष्ट होते की त्यांनी अर्थशास्त्राच्या सखोल अभ्यास केला होता. मुंबई येथील सिडनहॅम कॉलेजमध्ये १९१८ ते १९२० या दरम्यान ते अर्थशास्त्राचे प्राध्यापक होते. जागतिक स्तरावरील अर्थशास्त्राचे प्रोफेसर एडविन सेलीग्मन आणि प्रोफेसर एडविन कॅनन यांच्याशी त्यांनी अर्थशास्त्रीय विषयावर अनेकदा चर्चा केली. अर्थशास्त्राच्या या दोन प्रोफेसरांनी डॉ. आंबेडकरांच्या ग्रंथांना प्रस्तावना लिहिल्यात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपले आर्थिक विचार पुढील चार स्वरूपात मांडलेले आढळून येतात.

१. प्रबंध लेखनाच्या स्वरूपात मांडलेले आर्थिक विचार.

२. लेख आणि भाषणाच्या स्वरूपात मांडलेले आर्थिक विचार.

३. कमिशनला दिलेल्या साक्षी आणि जाहीरनाम्याच्या स्वरूपात मांडलेले आर्थिक विचार.

४. विधेयकाच्या स्वरूपात मांडलेले आर्थिक विचार.

डॉ. आंबेडकरांचे अर्थशास्त्रीय लेखन हे प्रामुख्याने प्रबंधांच्या स्वरूपात आहे. कोलंबिया विद्यापीठात अर्थशास्त्रातील 'एम.ए.'च्या



पदवीसाठी सुरुवातीला त्यांनी "Ancient Indian Commerce" या विषयावर लघुशोध प्रबंध लिहिला होता. परंतु, नंतर त्यांनी या विषयाऐवजी "Administration and Finance of the East India Company" प्रबंध एम.ए.च्या पदवीसाठी १९१५ मध्ये सादर

डॉ. प्रदीप आगलावे

केला होता. 'प्राचीन भारतीय व्यापार' या ७२ पानांच्या शोधप्रबंधातील पहिल्या आणि दुसऱ्या प्रकरणात मध्य पूर्वेशी व्यापार संबंध याबाबत विवेचन केले आहे; तर तिसऱ्या प्रकरणात ब्रिटिश काळातील भारताच्या आर्थिक परिस्थितीचे विश्लेषण केले आहे. १९२१ मध्ये डॉ. आंबेडकरांनी M.Sc. पदवीकरिता 'Provincial Decentralization of Imperial Finance in Birth India' या विषयावर लघुशोध प्रबंध सादर केला होता.

'ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन आणि अर्थनीती' या ४२ पानांच्या लघुशोध प्रबंधामध्ये डॉ. आंबेडकरांनी १७९२ ते १८५८ या काळात ईस्ट इंडिया कंपनीच्या प्रशासन आणि वित्तनीती संबंधीच्या धोरणातील बदलांचा ऐतिहासिक आढावा घेतला. कंपनीच्या धोरणातील बदलांचा भारतीय जनतेवर कसा अन्याय झाला याचे विदारक आर्थिक विश्लेषण त्यांनी प्रस्तुत लघुशोध प्रबंधात केले.

ईस्ट इंडिया कंपनीकडे भारताच्या व्यापाराचा एकाधिकार होता. परंतु, ही गोष्ट ब्रिटिश राज्यकर्त्यांना आवडत नव्हती. या एकाधिकाराचा मोबदला म्हणून या ना त्या कारणांसाठी ब्रिटिश सरकार स्वत:चा फायदा करून घेण्याची संधी सोडत नव्हते. परंतु, त्याची झळ मात्र भारतीय जनतेला सोसावी लागली. ब्रिटिश सरकारने १८१५ मध्ये कायदा करून कंपनी सरकारला प्रशासन आणि वित्त या दोन गोष्टींत फारकत करण्यास भाग पाडले. १८३४ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीचा व्यापाराचा एकाधिकार नष्ट करून ब्रिटिश जनतेसाठी भारताशी व्यापार करण्याचा मार्ग मोकळा करण्यात आला. १८५८ मध्ये ईस्ट इंडिया कंपनी बरखास्त करून ब्रिटिश सरकारची सत्ता भारतात प्रस्थापित करण्यात आली.

१७९२ ते १८५७ या काळात कंपनी सरकार आणि पर्यायाने ब्रिटिश सरकारने भारतीय जनतेची पिळवणूक केली. भारतीय जनतेवर विविध प्रकारचे कर लावण्यात आले होते. जमिनीवरील कर विशेष जाचक होता. शेतकरी वर्ग या करामुळे कसा भरडला गेला, याचे विवेचन डॉ. आंबेडकरांनी केले. कंपनी सरकारने मोठ्या प्रमाणात कर्जे घेतली होती. महसूल आणि सरकारी कर्ज या स्वरूपात उभारलेल्या पैशाचा विनियोग फारच कमी



"The Problem of the Rupee : It's origin and its solution" हा डॉ. आंबेडकरांचा मौद्रिक अर्थशास्त्रावरील महत्त्वाचा प्रबंध होय. हा प्रबंध १९२३ मध्ये प्रकाशित करण्यात आला. याच प्रबंधावर त्यांना डी. एस्. सी. ही सर्वोच्च पदवी प्रदान करण्यात आली होती. हाच प्रबंध १९४७ मध्ये "History of Indian Currency and Banking" या नावाने प्रकाशित करण्यात आला. या ग्रंथात भारतीय रुपयाच्या उत्क्रांतीची ऐतिहासिक मीमांसा करण्यात आली. १८०० ते १८९३ या काळात चलनाचे परिणाम म्हणून भारतीय रुपयाची कशी जडणघडण होत गेली, त्याबद्दल डॉ. आंबेडकरांनी सविस्तर विवेचन केले. भारतासाठी आदर्श चलन पद्धत कोणती? या अत्यंत महत्त्वाच्या विषयावर त्यांनी मूलगामी विचार मांडलेत.




प्रमाणात जनतेच्या हितासाठी केला जायचा. १८५८ मध्ये ईस्ट इंडिया कंपनी बरखास्त केल्यानंतर कंपनी सरकारवर असलेल्या ६९३ लाख पौंड खर्चाचा बोजा भारतीय जनतेवर टाकून ब्रिटिश सरकारने भारतीय जनतेवर कसा अन्याय केला, याचे अतिशय प्रभावी विश्लेषण डॉ. आंबेडकरांनी केले.

'भारताने इंग्लंडसाठी प्रचंड आर्थिक योगदान दिले. परंतु इंग्लंडचे भारतासाठी मात्र नगण्य आर्थिक योगदान राहिले,' अशी टीका डॉ. आंबेडकरांनी केली. ब्रिटिश सरकारचे भारतासाठी जे योगदान आहे, ते प्रामुख्याने गैरआर्थिक स्वरूपाचे असून हे योगदान भारतासाठी मोलाचे असल्याचे डॉ. आंबेडकर मान्य करतात.

### ब्रिटिश भारतातील प्रांतिक वित्ताची उत्क्रांती

डॉ. आंबेडकरांनी पीएच.डी.च्या पदवीकरिता "A National Dividend of India : A Historic and Analytical Study" (भारताचा राष्ट्रीय नफा : एक ऐतिहासिक आणि विश्लेषणात्मक अभ्यास) हा प्रबंध कोलंबिया विद्यापीठात सादर केला होता. त्यानंतर हाच प्रबंध १९२५ मध्ये "The Evolution of Provincial Finance in British India" या नावाने प्रकाशित करण्यात आला. प्रस्तुत ग्रंथास प्राध्यापक एडविन सेलीग्मन यांची प्रस्तावना आहे.

'ब्रिटिश भारतातील प्रांतिक वित्ताची उत्क्रांती' या ग्रंथात डॉ. आंबेडकरांनी ब्रिटिश-केंद्र सरकार आणि त्यावेळची घटक राज्ये यांच्यातील आर्थिक संबंध १८३३ ते १९२१ या प्रदीर्घ कालखंडात कसकसे विकसित झालेत त्याची ऐतिहासिक मीमांसा केली आहे. १८३३ ते १८७१ या काळात भारतीय सरकारच्या वित्त व्यवस्थेचे संपूर्ण केंद्रीकरण झाले होते. खर्चाचा अर्थसंकल्प करण्याचा अधिकार राज्यांकडे होता. परंतु, त्याला लागणारा पैसा उभारण्याची जबाबदारी केंद्र सरकारकडे होती. घटक राज्य सरकारच्या मागण्या वाढल्या म्हणून केंद्र सरकारचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढला. त्यामुळे सरकारची अर्थसंकल्पीय तूट प्रचंड प्रमाणात वाढली म्हणून १८९१ मध्ये केंद्र सरकार आणि घटक राज्ये यासाठी स्वतंत्र अर्थसंकल्प करण्याची पद्धत भारतात प्रथमत:च सुरू झाली.

केंद्र आणि घटक राज्यांचा स्वतंत्र अर्थसंकल्प करण्याची पद्धत सुरू झाल्यावर सुरुवातीला उचलून दिलेल्या रकमेपुरते अंदाजपत्रक असे घटक राज्याच्या अर्थव्यवस्थेचे स्वरूप होते. १८७१-७२ ते १८७६-७७ या सहा वर्षांच्या कालखंडात प्रचलित असलेल्या काही विशिष्ट सरकारी खात्यांच्या आर्थिक प्रशासनाची जबाबदारी घटक राज्यांवर सोपविण्यात आली. या पद्धतीत केंद्र सरकारने स्वत:च्या खर्चात बचत केली. परंतु, घटक राज्यांच्या अर्थसंकल्पावरचे दडपण वाढले. त्यांना उत्पन्न व खर्च यांच्यात मेळ साधण्यासाठी नवीन कर आकारणी करावी लागली. अर्थसंकल्पीय तूट भरून काढण्यासाठी आधीच करांच्या बोजाखाली दबून गेलेल्या रयतेवर कराचा आणखी भार टाकण्यात आला.

नेमून दिलेल्या महसुलावर आधारित अंदाजपत्र (Budget of Assigned Revenues) पद्धत १८७७-७८ ते १८८१-८२ या वर्षांच्या काळात राबविण्यात आली होती. त्याप्रमाणे समायोजित नियोजनाची तरतूद करण्यात आली. घटक राज्यावर सोपविलेल्या प्रत्येक महसुली साधनाच्या बाबतीत अनेक वर्षांच्या सरासरीच्या आधारावर नियोजकाची रक्कम ठरवली जायची. त्यानंतर महसुलाच्या हिस्सा वाटपावर आधारित अंदाजपत्रकाची पद्धत राबविण्यात आली. ही पद्धत सर्वात यशस्वी ठरली. त्यामुळे १८८२-८३ ते १९२०-२१ अशी जवळपास ३८ वर्षे ही पद्धत चालू राहिली. नव्या पद्धतीमुळे महसुली साधनांची केंद्र सरकार आणि घटक राज्ये यांच्यात विभागणी करण्यात आली. केंद्र सरकार आणि घटक राज्ये यांनी गोळा केलेल्या महसुलाचा सुनिश्चित हिस्सा एकमेकांना द्यायचा अशी तरतूद करण्यात आली. या नव्या पद्धतीमुळे वित्तीय व्यवस्थेत लवचीकता आली. १९१९ च्या 'रिफार्म' ॲक्टनुसार जबाबदार सरकार निर्माण करण्याच्या दृष्टीने स्वयंशासित संस्थांची पद्धतशीर जोपासना निर्माण करण्याचे तत्त्व मान्य करण्यात आले. विधिमंडळांना सरकारवर अंकुश ठेवण्याचा अधिकार प्रथमच

मिळाला, त्यातून युगांतर घडले. डॉ. आंबेडकरांच्या मते, पूर्वीच्या वित्तीय रचना सदोष किंवा कुचकामी ठरल्या गेल्या म्हणून नव्हे, तर या युगांतराचा प्रभाव एवढा दांडगा होता की पूर्वीच्या वित्तीय व्यवस्थेला नवे स्वरूप देणे ही काळाची गरज ठरली.

१८३५ पूर्वी भारतात सुवर्ण मानक आणि रुपयाचे रौप्य मानक अशी द्विमान चलनपद्धती प्रचलित होती. १८३५ च्या कायद्यानुसार सुवर्ण मानक रद्द करून देशभर एकधातुमानावर आधारित चलन पद्धती सुरू झाली. त्यानुसार रुपयाच्या परिमाणाच्या स्वरूपात चलन पद्धतीचे एकसूत्रीकरण करण्यात आले. १८० ग्रॅम टाय वजनाचे १६५ ग्राम चांदी असलेला रुपया हे एकमेव चलनच संपूर्ण देशभर प्रस्थापित करण्यात आले. त्यामुळे भारतात रौप्यमानकाची सुरुवात झाली. परंतु, ही पद्धत देशाच्या गरजा भागविण्यासाठी अपर्याप्त असल्याची जाणीव लवकरच होऊ लागली. त्यासाठी दोन कारणे जबाबदार होती.


१. देवाणघेवाणीसाठी चलनाचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला.

२. आंतरराष्ट्रीय व्यापार वाढून चलनाचा वापर वाढला.

डॉ. आंबेडकर स्पष्ट करतात की, रौप्यमानकाच्या मर्यादा स्पष्ट झाल्यानंतर देखील सुवर्णमानकाचा स्वीकार न करता रौप्यमानकाच्या जोडीने सरकारी कागदी चलनाचा चंचूप्रवेश करण्यात आला. ही बाब चलनाच्या संदर्भात अतिशय दुर्दैवी घटना होती.



१८७३ पर्यंत भारतीय रुपया आणि ब्रिटिश पौंड यांच्यातील विनिमयाचा दर १ रुपया - १ शिलींग आणि साडे दहा पेन्स या पातळीवर होता. याचा अर्थ सोने आणि रुपये यांच्यातील विनिमय दर १ औंस सोन्यास साडे पंधरा औंस चांदी असा होता. परंतु, १८७३ नंतर मात्र सोने आणि चांदी यांच्यातील विनिमयाचा दर स्थिर ठेवणे कठीण झाले. विनिमयाचा हा दर स्थिर न राहण्याची दोन कारणे डॉ. आंबेडकरांनी नमूद केलीत.



१. पहिले म्हणजे युरोपमध्ये त्यावेळी झालेले चांदीचे निमुद्रीकरण होय.

२. दुसरे सोन्याच्या तुलनेत चांदीच्या उत्पादनात आलेली प्रचंड वाढ आणि त्यातून कमी झालेली चांदीची म्हणजेच चांदीच्या चलनाची किंमत होय.

सोने आणि चांदीच्या तुलनात्मक उत्पादनाच्या आकडेवारीचा तपशीलवार आढावा घेऊन डॉ. आंबेडकरांनी असा निष्कर्ष काढला की, 'रुपयाच्या अवमूल्यनात चांदीचा अतिरिक्त पुरवठा जबाबदार नाही, तर जगातील प्रमुख देशांनी रौप्यमानकाचा त्याग केल्यामुळेच रुपया पौंड विनिमय दरात विसंवाद निर्माण झाला.'

सोने-चांदीचा विनिमय दर स्थिर ठेवणे कठीण झाल्यामुळे भारताचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले. याबाबातचे सविस्तर विवेचन डॉ. आंबेडकरांनी केले. डॉ. आंबेडकर स्पष्ट करतात की, 'भारत हा स्वत: रौप्यमानक स्वीकारलेला परंतु सुवर्णमानक स्वीकारलेल्या देशांशी घनिष्ठपणे जखडलेला देश असल्यामुळे त्याचे आर्थिक व वित्तीय जीवन सोने आणि चांदीच्या तुलनात्मक किमतींवर अंमल गाजविणाऱ्या आणि पर्यायाने रुपया-पौंड विनिमय दराचे नियंत्रण करणाऱ्या आंधळ्या शक्तीच्या अधीन होते.' या सर्व घटनांची तार्किक परिणती म्हणून पुन्हा सुवर्ण मानकाची मागणी पुढे आली. भारतासाठी भविष्यकाळाच्या दृष्टिकोनातून आदर्श चलन पद्धती कोणती? या संदर्भात अर्थतज्ज्ञांपुढे दोन प्रमुख पर्याय होते.

१. सुवर्णमानक- ज्यात सोन्याच्या नाण्यांचा वापर चलन म्हणून अभिप्रेत असतो.

२. सुवर्ण विनिमय मानक- ज्यात कागदी नोटांचा चलन म्हणून वापर होतो. कागदी रुपये घेऊन ठरावीक दराने सोने देण्याची सरकारकडून हमी घेतली जाते.

सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ प्रोफेसर केन्स आणि इतर अर्थशास्त्रज्ञांनी सुवर्ण विनिमय मानकाचा पुरस्कार केला होता. त्यांच्या मते हे परिणाम लवचीक आहे. परंतु, डॉ. आंबेडकरांनी त्याला कडाडून विरोध केला. त्यांच्या मते 'सुवर्ण मानक' हेच भारतासाठी योग्य होते. आपल्या युक्तिवादाच्या समर्थनासाठी त्यांनी ऐतिहासिक पुरावे देऊन सुवर्णमानक असताना भारतातील रुपयाच्या किमती कशा स्थिर होत्या याचे पुराव्यासहित विवेचन केले. सुवर्ण विनिमय मानक प्रचलित असताना रुपयाचे मूल्य घसरले. परिणामत: भाववाढ झाली. हे त्यांनी स्पष्ट केले.

भारतातील चलन आणि वित्ताच्या रॉयल कमिशनपुढे अर्थशास्त्रज्ञ डॉ. आंबेडकरांनी १५ डिसेंबर १९२५ ला साक्ष देताना स्पष्टपणे नमूद केले होते की, 'चलननिर्मिती करणाऱ्या संस्थेच्या चलननिर्मितीच्या क्षमतेवर अंकुश असण्याची आवश्यकता आहे. अन्यथा, अनिर्बंध चलनपुरवठा आणि त्यातून भाववाढ होऊन आर्थिक स्थैर्य धोक्यात येऊ शकते.'

**(– डॉ. प्रदीप आगलावे डॉ. आंबेडकर विचारधारा विभाग,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर. संपर्क : ८८१२६२६६०)**



# कामगार हिताचे सजग प्रहरी

> व्हाईसराय कौन्सिलमध्ये मंत्री म्हणून काम करताना १९४२ ते १९४६ या कालावधीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी श्रम, जल व विद्युत ही खाती अतिशय कुशलतेने हाताळली. स्वातंत्र्यपूर्व काळात सुरुवात झालेल्या बाबासाहेबांच्या या कार्याची छाप स्वातंत्र्यानंतरच्या आर्थिक नियोजनातही पडल्याचे दिसते. श्रम मंत्री म्हणून बाबासाहेबांनी कामगारांच्या हितासाठी अनेक निर्णय घेतले.



भि. म. कौसल

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव पुढे आले की देशाच्या राज्यघटनेचे शिल्पकार व दलितांचे कैवारी ही त्यांची प्रतिमा सर्वसामान्यपणे मन:पटलावर अंकित होते. या दोन्ही कार्यात बाबासाहेबांचे योगदान अतुलनीय आहे. तथापि, बाबासाहेब डॉ. आंबेडकर यांनी जलसिंचन व वीज खात्याचे मंत्री म्हणून उत्तम पायाभूत सुविधा निर्माण करून देशाच्या आर्थिक विकासात जे मोलाचे योगदान दिले त्याविषयी फारशी चर्चा होताना दिसत नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा २० जुलै १९४२ रोजी व्हॉईसरायच्या एक्झीक्युटीव्ह कौन्सिलमध्ये समावेश करण्यात आला. २७ जुलै रोजी त्यांनी पदभार ग्रहण केले. त्यांच्याकडे श्रम, सिंचन, वीज, सार्वजनिक बांधकाम व खाण विभागाचा कारभार सोपविण्यात आला. कामगार मंत्री म्हणून देशातील कामगारासंबंधी धोरण ठरविण्याची जबाबदारी त्यांच्यावर होती. या माध्यमातून त्यांनी देशाच्या कामगार चळवळीला नवीन दिशा देण्याचा पुरेपूर प्रयत्न केला. त्या काळात कामगारांची कोणतीही संघटित स्वरूपाची चळवळ नव्हती किंवा कामगारांच्या कल्याणाचे कायदेही नव्हते. इंग्रजांनी या देशात कारखानदारी उभी केली ती येथील कामगारांनी कष्ट करून उत्पादन करावे व त्या माध्यमातून संपत्ती अर्जित करावी या हेतूने. देशात स्वस्तात मजूर उपलब्ध असल्याने कमी किमतीच्या श्रमशक्तीच्या जोरावर आपला दबदबा निर्माण करण्याचे धोरण इंग्रजांनी अवलंबिले होते. या परिस्थितीला नवीन दिशा देण्याचा प्रयत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केला. कामगारांची उत्पादकता वाढविण्यासाठी त्यांना विविध सवलती मिळाव्या, ज्यामुळे अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य आणि सन्मानाने काम करण्याचा हक्क मिळावा या हेतूने बाबासाहेबांनी दिनांक ७ ऑगस्ट १९४२ रोजी मालक, कामगार आणि सरकारचे प्रतिनिधी यांची त्रिपक्षीय परिषद दिल्ली येथे आयोजित केली. कामगारांच्या प्रश्नांसंबंधी विचारविनिमय करण्यासाठी देशात प्रथमच अशी बैठक आयोजित करण्यात आली हे विशेष. या परिषदेत पहिला मुद्दा होता ट्रेड युनियन स्थापन करण्याचा. अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य आणि सन्मानाने काम करण्याचा अधिकार. कामगारांची दुखणी मांडण्यासाठी संपाचे हत्यार उपसणे हा मूलभूत अधिकार, मात्र संपाचा अतिरेक नको आदी मुद्द्यांवर या परिषदेत सविस्तर चर्चा करण्यात आली.

### ट्रेड युनियनला कायद्याचा आधार

या परिषदेतील चर्चेच्या अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १३ नोव्हेंबर १९४३ रोजी मध्यवर्ती कायदेमंडळात भारतीय कामगार संघटना सुधारणा विधेयक (The Indian Trade Union amd. bill) सादर केले. त्यानुसार नियोक्त्याकडून कामगार संघटनेला मान्यता देणे, कामगार संघटना स्थापन करण्यासाठी अटींची पूर्तता करून कामगार संघटनेला मान्यता न देणे हा कायदेशीर गुन्हा ठरविणे अशा तरतुदी या विधेयकात करण्यात आल्या. ट्रेड युनियनला सक्तीने मान्यता देणारा कायदा करून बाबासाहेबांनी देशातील समस्त कामगारांच्या प्रगतीचा मार्ग प्रशस्त केला. पुढे घटना समितीमध्ये काम करताना कामगारांच्या हितांचे रक्षण होण्याच्या दृष्टीने श्रम (Labour) हा विषय संविधानाच्या समवर्ती सूचित समाविष्ट केला. कामगारांचे विविध प्रश्न हाताळण्यासाठी कामगार आयुक्त (Labour Commissioner) या संस्थेची निर्मिती बाबासाहेबांनी केली.

**महिला कामगारांसाठी कार्य**

कामगार महिला असो की पुरुष, सर्वांच्या हिताची काळजी बाबासाहेबांनी घेतली. महिला कर्मचाऱ्यांच्या हिताचे अनेक कायदे त्यांनी मंजूर करवून घेतले. सध्या महिला कर्मचाऱ्यांना सहा महिन्यांची पूर्ण पगारी रजा मंजूर करण्यात येते. या कायद्याचा पाया डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घातला हे कदाचित महिलांना ठाऊक नसेल.

ट्रेड युनियन ॲक्टमुळे कामगारांना संप करण्याचा अधिकार मिळाला. आपल्या विविध प्रश्नांकडे लक्ष वेधण्यासाठी संपाचे हत्यार उपसणे हा मूलभूत अधिकार असला तरी या अधिकाराचा अनाठायी वापर करण्याचा प्रयत्न झाल्यास कामगारांचे नुकसान होईल ही बाब त्यांनी आवर्जून सांगितली. देशात गरिबी ही अतिशय महत्त्वाची समस्या असल्याने उत्पादन वाढीला चालना मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे आवश्यक असेल तेव्हाच संपाचे हत्यार उगारावे अशी त्यांची धारणा होती. देशातील कामगार चळवळीला जी स्थिरता आज मिळाली आहे त्याचे संपूर्ण श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी श्रम मंत्री म्हणून केलेल्या कार्याला जाते.

मध्यवर्ती कायदेमंडळात २९ जुलै १९४३ रोजी त्यांनी खाण आणि प्रसुती काळातील फायदे दुरुस्ती विधेयक (The mines, maternity benefit amd. bill) सादर केले. या विधेयकाद्वारे महिला कामगारांना प्रसुतीच्या काळात पूर्ण पगार मिळण्याची तरतूद करण्यात आली. महिला व पुरुष कामगारात कोणताही भेदभाव पाळला जाता कामा नये. लिंगभेदाच्या आधारे महिलांच्या कामाचा हक्क डावलण्यात येणार नाही याची त्यांनी पुरेपूर काळजी घेतली. त्या काळी महिलांना कोळसा खाणीच्या आत काम करण्याची मनाई होती; तसेच महिला व पुरुष यांच्या पगारातदेखील तफावत होती. ही विसंगती दूर करण्यासाठी बाबासाहेबांनी मध्यवर्ती कायदेमंडळात ८ फेब्रुवारी १९४४ रोजी हा मुद्दा उपस्थित केला. कोळसा खाणीत काम करण्यास महिलांना प्रतिबंध दूर करणे आणि कोणताही लिंगभेद न करता समान कामासाठी समान मजुरी मिळण्याच्या तत्त्वाचा पुरस्कार केला. कामगार कोणत्या परिस्थितीत काम करतात हे प्रत्यक्ष पाहण्यासाठी त्यांनी दिनांक ९ डिसेंबर १९४३ रोजी धनबाद व १० डिसेंबर १९४३ रोजी राणीगंज कोळसा खाणीला भेट दिली. ते कोळसा खाणीत गेले व कामगारांच्या सोयी-सुविधांविषयी परिस्थिती समजून घेऊन कामगारांशी चर्चा केली. उत्पादन वाढविण्यासाठी कामगारांच्या सोयी-सुविधांकडे फारसे लक्ष न देता दिवस-रात्र त्यांच्याकडून काम करून घेतले जात असे. या परिस्थितीचा विचार करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १ नोव्हेंबर १९४४ रोजी कारखाना - दुसरे सुधारणा विधेयक (The factories 2nd amd. Bill) सादर केले. या विधेयकाच्या पहिल्या भागात सुटीच्या दिवशी काम केल्याच्या बदल्यात अन्य दिवशी बदली रजा मिळण्याची तरतूद तर विधेयकाच्या दुसऱ्या भागात पगारी तरतूद करण्यात आली. कामगारांचे कामाचे तास कमी करणे व ज्यादा काम केल्यास ओव्हर टाईमचे दर ठरविण्यासाठी त्यांनी २१ फेब्रुवारी १९४६ रोजी कारखाने दुरुस्ती विधेयक (The factories amd. Bill) कायदे मंडळात सादर केले. कामगारांना पुरेशी सामाजिक सुरक्षा मिळावी, त्यांच्या महागाई भत्त्यात वेळोवेळी सुधारणा करण्यात यावी व बेकारीच्या काळात त्यांना आधार मिळावा या हेतूने बाबासाहेबांनी ११ मार्च १९४६ रोजी मध्यवर्ती कायदेमंडळात एका कपात सूचनेला उत्तर देताना वरील मुद्द्यांचे जोरदार समर्थन केले. या गोष्टीला आता फारसे महत्त्व नसले तरी शिक्षण पूर्ण केल्यानंतर तरुण-तरुणींना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात याकरिता त्यांची नोंदणी शासन स्तरावर करण्यासाठी Employment Exchange कार्यालये स्थापन करण्यास बाबासाहेबांनी ९ सप्टेंबर १९४४ रोजी मंजुरी प्रदान केली.





श्रम मंत्री म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे कार्य स्वातंत्र्यपूर्व काळात केले ते अद्वितीय आहे. त्यांनी मध्यवर्ती कायदे मंडळात वेळोवेळी सादर केलेली विधेयके किंवा विविध परिषदांमधून कामगारांच्या सर्वांगीण हितासाठी मांडलेले मुद्दे पाहता बाबासाहेब कामगार हिताचे रक्षण करणारे सजग प्रहरी होते, असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही.

(लेखक माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या नागपूर विभागाचे संचालक आहेत.)



# वसंतवैभव

जन्मशताब्दी वर्ष

१ जुलै २०१२ -३० जून २०१३

**माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या जन्मशताब्दी वर्षात राज्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहेत. १ जुलै २०१२ रोजी वसंतराव नाईक यांचे जन्मशताब्दी वर्ष सुरू झाले असून, १ जुलै २०१३ रोजी मुंबईत मान्यवरांच्या उपस्थितीत जन्मशताब्दीचा समारोप समारंभ होईल.**

**स्व. वसंतराव नाईक यांच्या जन्मशताब्दी वर्षात प्रस्तावित कार्यक्रमांची रूपरेषा ठरविण्यासाठी मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीच्या बैठकीत घेतलेले निर्णय...**

१. परभणी येथील मराठवाडा कृषी विद्यापीठास वसंतराव नाईक यांचे नाव.

२. यवतमाळ जिल्ह्यातील पुसद तालुक्यातील गहुली येथे वसंतराव नाईक यांचे भव्य स्मारक.

३. वसंतराव नाईक यांच्या जीवनावर आधारित डॉ. जब्बार पटेल यांनी दिग्दर्शित केलेल्या लघुपटाचे राज्यभर प्रदर्शन.

४. राज्यातील सहा विभागांमध्ये कृषी मेळावे व कृषी प्रदर्शन.

५. वसंतराव नाईक यांच्या जीवनावर टपाल तिकीट.

६. विदर्भ एक्सप्रेसचे ‘वसंतराव नाईक विदर्भ एक्सप्रेस’ असे नामकरण करण्यासाठी रेल्वे मंत्रालयास प्रस्ताव.

७. विमुक्त जाती व भटक्या जमाती समाजातील कार्यकर्त्यांसाठी ‘वसंतराव नाईक समाज भूषण पुरस्कार’.

८. विमुक्त जाती व भटक्या जमाती समाजातील मुला-मुलींसाठी वसतीगृह.

९. वसंतराव नाईक यांच्या षष्ठ्यब्दीपूर्तीच्या निमित्ताने प्रकाशित केलेल्या हिरवी क्षितिजे या ग्रंथांच्या तृतीय आवृत्तीचे पुनर्मुद्रन.

१०. शालेय अभ्यासक्रमात वसंतराव नाईक यांच्या जीवनचरित्राचा समावेश.

११. वसंतराव नाईक यांनी विधीमंडळात केलेल्या भाषणांच्या ग्रंथांचे प्रकाशन.

१२. औरंगाबाद, नागपूर,यवतमाळ या ठिकाणी वसंतराव नाईक यांच्या छायाचित्रांचे प्रदर्शन.

१३. वसंतराव नाईक यांच्यावर लोकराज्य विशेषांक.

१४. वसंतराव नाईक यांच्या कालखंडातील लोकराज्य मासिक संशोधनासाठी उपलब्ध करून देणे.

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MH/MR/South - 210/2012-14
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, December 2012.
Date of Publication : 10th of every Month


**लोकराज्य वाचायलाच हवे, कारण...**


**शासनाच्या योजना, निर्णय, उपक्रम**

**यांची अधिकृत माहिती मिळते केवळ**

**लोकराज्यमध्येच....**

**लोकराज्य वाचा - समृद्ध व्हा - इतरांना सक्षम करा**




# लोकराज्य

आता लोकराज्यची वर्गणी ऑनलाइन भरा...

**भेट द्या आमच्या वेबसाइटला**

http://dgipr.maharashtra.gov.in

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ

लोकराज्य LOKRAJYA

प्रति / To :

प्रेषक / From

दिगंबर वा. पालवे
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन, बरॅक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक प्रमोद त्र्यं. नलावडे, महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी एच. टी. मीडिया लि. प्लॉट नं. ६, टी. टी. सी. एम. आय. डी. सी. इंडस्ट्रियल एरिया, दिघे, ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई - ४०० ७०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : प्रमोद त्र्यं. नलावडे